
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २७८०



अलका तू असं लिही

सौ. मालती दांडेकर

REFBK-0022703

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 OCT 1979

19 DEC 1979

4 JUL 1982

7 JUL 198


19 JUN 19

(क्र. मा. प.)

संदर्भ शाखा
निबंध
२७६०
२२७०३
२६।९।७९

अलका तू असं लिही

(ललित साहित्यासंबंधी पत्रे)



सौ. मालती दांडेकर



वरदा बुक्स

'वरदा', सेनापती बापट मार्ग, पुणे १६.

प्रकाशक :
ह. अ. भावे
'वरदा बुक्स'
'वरदा', सेनापती बापट मार्ग
पुणे ४११ ०१६.

© सौ. मालती दांडेकर

पहिली आवृत्ती : ऑगस्ट १९७९

मुखपृष्ठ : सालकर

किंमत : वीस रुपये

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
प्रमोद प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.

★ श्री माधव कानिटकर यांच्या 'मानिनी' मासिकातून इ. सन १९७१–७२ साली यातले काही लेख प्रसिद्ध झालेले आहेत हे आभारपूर्वक नमूद करावेसे वाटते.

अनुक्रमणिका

विभाग १ : लेखनाची पूर्वतयारी

		पृष्ठ
१	वाचन	१
२	ज्ञानवही	९
३	सातत्य	१७
४	निरीक्षण	२२
५	अनुभवाचे विश्व	३०
६	कल्पिताची सृष्टी	३६
७	कसे लिहू ? काय लिहू ?	४२

विभाग २ : लघुकथा

८	कथाविश्व	५०
९	कथा निवेदन	६३
१०	कथेचे बाह्यसौंदर्य	७७
११	,, अंतःसौंदर्य– कथावस्तु	९२
१२	,, अंतःसौंदर्य– भावदर्शन	१०७

विभाग ३ : कादंबरी

१३	कादंबरीचे क्षेत्र	११५
१४	कादंबरीचे कथानक	१३१
१५	कादंबरीची रचना	१४६
१६	व्यक्तिप्रधान कादंबरी	१६३
१७	वातावरणप्रधान कादंबरी	१७६
१८	कादंबरीचे उद्दिष्ट	१९०

अर्पण–

महाराष्ट्रातील नवोदित लेखक–लेखिकांस–

सौ. मालती दांडेकर

थोडेसे मनोगत– या ललित पत्रांबद्दलचेच

प्रिय अलका,

मागे आपली भेट झाली तेव्हा तुझी लेखनाची आवड व उत्कंठा मी पाहिली होती, तुझी या बाबतची प्रयत्नशीलताही मनात भरली. तुझ्या डोळ्यांतून एक नवोदित उत्सुक आणि भावशील अशी नवोदित लेखिकाच जणू मला स्पष्ट दिसत होती– आणि हा अंदाज खोटा नव्हता ! दोन चार दिवसांतच तू मला लेखनाबद्दल– तेही ललितकथा– कादंबरीबद्दल इतके काही प्रश्न विचारत राहिलीस की त्या सगळ्यांची उत्तरे एकावेळी एकदमच देणं मला कठीणच झालं. तुझे प्रश्न मला स्पष्ट आठवताहेत अजून–

'ताई, मला सारं सांग. कशी लिहावी चांगली कथा ?'

'मला झकास कथा अन् कादंबरी लिहावीशी वाटते, पण मला ती लिहिता येईल की नाही ?'

'कादंबरीचा विषय कसा ग सुचतो तुम्हाला ताई ? तू पहिली कादंबरी कशी लिहिलीस ? कोणत्या अडचणींनी अडवलं तुला ?'

'याचाही अभ्यास असतो का ? कसा करायचा तो ? सांग ना. '

असे प्रश्नांवर प्रश्न तुझे. तूच सांग, घाईने दहा-पाच वाक्यांत आटपून टाकण्याजोगा हा विषय लहानगा थोडाच आहे ? मी उभं आयुष्य या लेखनाराधनेतच घालवलं आहे, तेव्हा याबद्दल मला तुला खूपसं काही सांगता येईल, सांगेनही, पण एकदम नाही. अग, हा सगळा लेखनव्याप किती मोठा ? वीतभर लेखनांकुरातून एवढे मोठे पुष्पोद्यान लेखक कसे फुलवतो

हे सहज व थोडचा वेळात सांगण्याचे काम एकंदरीत अवघडच !

तथापि अलकनंदे, तुझे याबद्दलचे प्रश्न चांगले होते, विचारांना चालना देणारे होते, इतकेच नव्हे तर दरेक नवोदित लेखक-लेखिकेच्या मनात लेखनारंभीच्या कालात उभे राहणारे असेच होते. तेव्हा तुझ्या आवडत्या अशा, कथा व कादंबरी या ललितसाहित्याच्या प्रमुख दोन शाखांबद्दलच सावकाशीनं तुला सविस्तर माहितीपत्रं लिहिण्याचं मी ठरवून ही पत्रं लिहायला घेतली, आज तो संकल्प पुरा होतो आहे, तीच ही 'अलका, तू असं लिही !' पत्रमाला.

मला आठवतं अलके, चाळीस-एक वर्षांपूर्वी मीही कधी एकदा नवोदित लेखिकेचं मन घेऊन या ललित साहित्याच्या प्रांतात नव्यानं भीतभीत पाऊल टाकणारी लेखिका होते. मग अनेकांच्या मार्गदर्शनाचे साह्य घेत मी सतत लिहीत राहिले. अनुभवाची साठवण होऊ लागली व लेखनाला स्थैर्य, सफाईदारपणा इ. येऊ लागलेसे मलाच दिसू लागले. नित्य वाचनानेही कथा-कथानक, त्यांची निवेदन शैली, विषयाची योग्य निवड व अखेर त्या सर्वांची गुणवत्ता याबद्दल मला नीट अंदाज बांधता येऊ लागला. इतर लेखकांच्या प्रभावी लेखनातूनही मला स्फूर्ती मिळत गेली, हेही एकदम मान्य. तर या सर्वांचेच प्रतिबिंब कळत-नकळत या पत्रांतून उमटलेलं तुला आढळेल व तुला व तुझ्यासारख्या नवोदित लेखक-लेखिकांना त्याचा बराचसा उपयोग होऊ शकेल असे माझे मन मला सांगत आहे.

अलकनंदा ! तुला या सर्व पत्रांतून कथा व कादंबरीच्या लेखनाबद्दल जे जे काही सुचलं, आठवलं, ध्यानात आलं व जे सांगण्यासारखं उपयुक्तही वाटलं, ते सारं सारं मी विस्तारानं सांगितलं आहे. सावकाशीने हा आपला पत्रव्यवहार चालू होता. कधी दोन महिन्यांनी एक पत्र तर कधी चार महिन्यांनी ! या कूर्मगतीने ही पत्रं पुरी होता होता २-४ वर्षे उलटली. तुझ्या लक्षात येईलच की आता ही पत्रं प्रसिद्ध करण्याचं घाटत आहे, तर तोपर्यंत आणखी थोडा अवधी उलटणारच ! तर यात उल्लेखित झालेल्या कथा-कादंबऱ्या अगदी आज घडीच्या आढळणार नाहीत, बहुतेक गेल्या दशकातल्याच असणार त्या जास्तीत जास्त ! पण आता वाङ्मयाच्या गुण-दोषांची जाण असण्याचा विवेचक दृष्टिकोन तुला आलेला आहे, तेव्हा

स्वतःच आघाडीच्या कथा-कादंबऱ्या तू स्वतःच निवड करून वाच म्हणजे समीक्षणाचा दृष्टिकोन तुझा तुलाच योग्य व समतोल बनवता येईल.

अलकाताई, या सर्व पत्रांतून मी तुला बरेच काही सांगितले. लेखन हीही एक ललितकलाच आहे व तिचाही पद्धतशीर असा एक रेखीव अभ्यासक्रम असतो, हीच मुळी अनेक नवोदित लेखकमंडळींना नवी कल्पना वाटते ! पण हा अभ्यासक्रम शक्य तो सोपा करण्यासाठी मी 'पूर्वतयारी' हा स्वतंत्र विभाग कल्पून तो तुला प्रथम सांगितला आहे. मग कथा-कादंबरी-बद्दलही खूपसं सुचवलं, तुला ते जास्त अवघड तर नाही ना वाटलं ? खरं तर गंभीर गोष्टी सांगण्यात भाषेचा सोपेपणा ठेवणं हे मलाही जास्त कठीण होत होतं, पण एकंदरीत ही पत्रमाला तुला लिहिताना तसा प्रयत्न मी केलेला आहेच.

ही यशस्वी लेखनाची अवघड वाटचाल करताना जसे मी या मार्गातले खाचखळगे, कठीण रस्ते, धोक्याची वळणे इ. सारं तुला दाखवलं, तद्वत्च दरेक होतकरू लेखकास अपेक्षित असलेले यशोमंदिराचे स्थानही दाखवून ठेवलेले आहेच ! मला मान्य आहे, वाटचाल जरा अवघड आहे– पण तू हे मार्गक्रमण करीत राहा, कदाचित काही वर्षे लागतील अगर कुणी सांगावे ?– तू ललितलेखनात अत्यंत निष्ठेने व सातत्याने कार्यशील राहशील तर अगदी अल्पावधीतसुद्धा तू हे यशाचे शिखर गाठू शकशील व एक नामवंत यशस्वी लेखिका होशील ! बस बस; अलकनंदा, माझी तरी दुसरी कोणती अपेक्षा आहे यावाचून ?

बी– ९ स्टाफ कॉलनी
M. R. E. कॉलेज
जयपूर ३०२ ००४.
१० जुलै १९७९

सौ. ताई–
(सौ. मालती दांडेकर)

हे सहज व थोडक्या वेळात सांगण्याचे काम एकंदरीत अवघडच !

तथापि अलकनंदे, तुझे याबद्दलचे प्रश्न चांगले होते, विचारांना चालना देणारे होते, इतकेच नव्हे तर दरेक नवोदित लेखक-लेखिकेच्या मनात लेखनारंभीच्या कालात उभे राहणारे असेच होते. तेव्हा तुझ्या आवडत्या अशा, कथा व कादंबरी या ललितसाहित्याच्या प्रमुख दोन शाखांबद्दलच सावकाशीनं तुला सविस्तर माहितीपत्रं लिहिण्याचं मी ठरवून ही पत्रं लिहायला घेतली, आज तो संकल्प पुरा होतो आहे, तीच ही 'अलका, तू असं लिही !' पत्रमाला.

मला आठवतं अलके, चाळीस-एक वर्षांपूर्वी मीही कधी एकदा नवोदित लेखिकेचं मन घेऊन या ललित साहित्याच्या प्रांतात नव्यानं भीतभीत पाऊल टाकणारी लेखिका होते. मग अनेकांच्या मार्गदर्शनाचे साह्य घेत मी सतत लिहीत राहिले. अनुभवाची साठवण होऊ लागली व लेखनाला स्थैर्य, सफाईदारपणा इ. येऊ लागलेसे मलाच दिसू लागले. नित्य वाचनानेही कथा-कथानक, त्यांची निवेदन शैली, विषयाची योग्य निवड व अखेर त्या सर्वांची गुणवत्ता याबद्दल मला नीट अंदाज बांधता येऊ लागला. इतर लेखकांच्या प्रभावी लेखनातूनही मला स्फूर्ती मिळत गेली, हेही एकदम मान्य. तर या सर्वांचेच प्रतिबिंब कळत-नकळत या पत्रांतून उमटलेलं तुला आढळेल व तुला व तुझ्यासारख्या नवोदित लेखक-लेखिकांना त्याचा बराचसा उपयोग होऊ शकेल असे माझे मन मला सांगत आहे.

अलकनंदा ! तुला या सर्व पत्रांतून कथा व कादंबरीच्या लेखनाबद्दल जे जे काही सुचलं, आठवलं, ध्यानात आलं व जे सांगण्यासारखं उपयुक्तही वाटलं, ते सारं सारं मी विस्तारानं सांगितलं आहे. सावकाशीने हा आपला पत्रव्यवहार चालू होता. कधी दोन महिन्यांनी एक पत्र तर कधी चार महिन्यांनी ! या कूर्मगतीने ही पत्रं पुरी होता होता २-४ वर्षे उलटली. तुझ्या लक्षात येईलच की आता ही पत्रं प्रसिद्ध करण्याचं घाटत आहे, तर तोपर्यंत आणखी थोडा अवधी उलटणारच ! तर यात उल्लेखित झालेल्या कथा-कादंबऱ्या अगदी आज घडीच्या आढळणार नाहीत, बहुतेक गेल्या दशकातल्याच असणार त्या जास्तीत जास्त ! पण आता वाङ्मयाच्या गुण-दोषांची जाण असण्याचा विवेचक दृष्टिकोन तुला आलेला आहे, तेव्हा

स्वतःच आघाडीच्या कथा-कादंबऱ्या तू स्वतःच निवड करून वाच म्हणजे समीक्षणाचा दृष्टिकोन तुझा तुलाच योग्य व समतोल बनवता येईल.

अलकाताई, या सर्व पत्रांतून मी तुला बरेच काही सांगितले. लेखन हीही एक ललितकलाच आहे व तिचाही पद्धतशीर असा एक रेखीव अभ्यासक्रम असतो, हीच मुळी अनेक नवोदित लेखकमंडळींना नवी कल्पना वाटते ! पण हा अभ्यासक्रम शक्य तो सोपा करण्यासाठी मी 'पूर्वतयारी' हा स्वतंत्र विभाग कल्पून तो तुला प्रथम सांगितला आहे. मग कथा-कादंबरी-बद्दलही खूपसं सुचवलं, तुला ते जास्त अवघड तर नाही ना वाटलं ? खरं तर गंभीर गोष्टी सांगण्यात भाषेचा सोपेपणा ठेवणं हे मलाही जास्त कठीण होत होतं, पण एकंदरीत ही पत्रमाला तुला लिहिताना तसा प्रयत्न मी केलेला आहेच.

ही यशस्वी लेखनाची अवघड वाटचाल करताना जसे मी या मार्गातले खाचखळगे, कठीण रस्ते, धोक्याची वळणे इ. सारं तुला दाखवलं, तद्वत्च दरेक होतकरू लेखकास अपेक्षित असलेले यशोमंदिराचे स्थानही दाखवून ठेवलेले आहेच ! मला मान्य आहे, वाटचाल जरा अवघड आहे– पण तू हे मार्गक्रमण करीत राहा, कदाचित काही वर्षे लागतील अगर कुणी सांगावे ?– तू ललितलेखनात अत्यंत निष्ठेने व सातत्याने कार्यशील राहशील तर अगदी अल्पावधीतसुद्धा तू हे यशाचे शिखर गाठू शकशील व एक नामवंत यशस्वी लेखिका होशील ! बस बस; अलकनंदा, माझी तरी दुसरी कोणती अपेक्षा आहे यावाचून ?

बी– ९ स्टाफ कॉलनी
M. R. E. कॉलेज
जयपूर ३०२ ००४.
१० जुलै १९७९

सौ. ताई–
(सौ. मालती दांडेकर)

पूर्वतयारी

१) वाचन
२) ज्ञानवही
३) सातत्य
४) निरीक्षण
५) अनुभवाचे विश्व
६) कल्पिताची सृष्टी
७) काय लिहू ? कसं लिहू ?

१. वाचन

प्रिय अलका–

तुला लेखन करावंसं वाटतं. खूप वाटतं, पण त्याच्या आधी काही बाबींचा विचार अवश्य झाला पाहिजे. पहिली गोष्ट, लेखक व्हायचं असेल, तर, त्या कलेकडे प्रवृत्ती बालपणापासूनच दिसू लागते. तुला माहीत आहे का, आपल्या लता मंगेशकर तीन वर्षांच्या होत्या, तेव्हा वडिलांबरोबर एका गाण्याच्या मैफलीत या एवढ्याशा मुलीने सहजस्फूर्त एक सुंदर तान घेतली होती ते ? आपली वैशाली अवघी तीन–चार वर्षांची– पण चित्रं किती छान काढू लागलीय् तेव्हापासूनच, तुला माहीत आहेच.

तर कलेचे अंकुर माणसांत असे उपजतच असतात व ते पुढे हलके हलके विकसित होतात. शिल्पकला, संगीत, चित्रकला, अभिनय याप्रमाणच लेखन हीही एक कलाच आहे. हे तू प्रथम ध्यानात घे. त्या दृष्टीने तुला लेखनाची बुद्धि बालपणापासूनच आहे, ही गोष्ट सर्व प्रथम महत्त्वाची. शाळेत असताना तू शाळेच्या मासिकात छोटे लेख लिहायचीस. तेही मी पाहिले होते. लहान मूल बाराखडचा काढायला शिकते, तेव्हाची अक्षरे काही मोठीशी वळणदार नसतात, परंतु पुढे त्याला चांगलं लिहिता वाचता येणार, याची ग्वाही त्या नवशिक्या लेखनात जरूर असते, तसेच तुझे ते बाललेख, त्यामध्ये मोठासा आशय नसे व लेखनालाही सुसंगती नसायची. पण एखाद्या विषयावर तू

कल्पनेने चार शब्द जुळवून बरे लिहू शकतेस, ही प्रवृत्ती माझ्या त्याचवेळी ध्यानी आली होती, याचा अर्थ लेखनकला तुझ्यात बीजरूपानं होती व तुझा लेखनाचा पिंड आहे हाच !

आता तुला लेखन करावेसे वाटते, हेही यथायोग्यच. पण अलका, एक सांगते– नुसते काही करावेसे वाटणे व ते उत्कृष्ट तऱ्हेने हातून घडणे या दोन फार वेगळ्या गोष्टी आहेत. संकल्प आणि सिद्धी यात असावे तेवढे मोठे अंतर या दोन गोष्टींत असते ! इच्छा हे पुलाचे एक टोक, तर इच्छेची पूर्तता हे दुसरे टोक. पण हा मधला फार मोठा पूल ओलांडून जायला कितीतरी कालावधी लागतो. तूच सांग, प्रगतीचा हा मार्ग स्वीकारल्यावाचून लेखन प्रगत होईल का ? कधीच नाही. आणि ही वाटचाल तुला करावी लागणारच. म्हणून तर काही अनुभवाचे उपायन बरोबर द्यावेसे वाटते आहे.

तुला आठवतं का, एकदा बापूमामा आपल्या घरी आले आणि त्यांची ट्रंक विसरली रेल्वेतच ! पैसे, कपडे, वाटेत लागणारे खाद्यपदार्थ, कामाचे कागद, सगळे हरवून आले होते ते, दर पावलाला त्यांचं अडत होतं. काहीही सामान नसतांनाच प्रवास कसा सुखकर होणार ? या लेखन-प्रांतातल्या प्रवासाचंदेखील हे असंच आहे. वाटलं म्हणून उठलं, अन् मुशाफरीला निघालं, असं करणाऱ्याचा प्रवास धड होत नाही, त्यासाठी पूर्व-तयारीची जरूर असते, वाटभर पुरेल अशी शिदोरी हाती पाहिजे आणि नेमाने रोज थोडं थोडं अंतर काटलं गेलं पाहिजे– अगदी वर्षानुवर्ष.

तू म्हणशील, आता दूरचं अंतर काटायला खूप वाहनं मिळतात, मोटारीत, स्कूटरवर बसलं की भिर्रदिशी मी हे सिद्धीचं दुसरं टोक गाठीन, तर तसंही नव्हे. या मार्गात द्रुतगती वाहने माणसाला घेता येतच नाहीत. पावला-पावलानंच प्रगतिपथावर जावं लागतं. हेच तर अवघड ! कलेचा अंकुर असणे ही महत्त्वाची गोष्ट मी म्हटली खरी, पण या अंकुराच्या वाढीला फार वेळ लागतो. तेथे घाईघाईने 'मी झटकन या अंकुराचा फलवृक्ष करून दाखवीन,' ही अपेक्षाच मुळी वेडेपणाची ठरेल, आणि बीज उत्कृष्ट असलं ना, तरी त्याची वाढ, वातावरण, भूमी, जलसिंचन, व जोपासन, यांवरच खरी अवलंबून असते. लेखनबीजाच्या वाढीसाठी तुला

असे प्रयत्न धडपडून करायला हवेच आहेत. मी म्हणते ती पूर्वतयारी– प्रवासाची शिदोरीही– या प्रयत्नातच तुझ्या हाती येणारी आहे. त्याबद्दल थोडंसं आज सांगते.

या लेखनाची पहिली तयारी, म्हणजे खूपसे वाचन ही आहे. लेखक म्हटला म्हणजे तो वाचनवेडा असतो, असेही गृहीत धरायला हरकत नाही. तुलाही तो छंद सुदैवाने दिसतो आहे. पण जसा लेखनाला आकार स्वतः द्यावा लागतो तद्वत वाचनालाही आपणच योग्य ती दिशा लावावी लागते. माझ्या लहानपणी मी हाती सापडेल ते भलेबुरे पुस्तक वाचीत असे, तेव्हा निवड करण्याची बुद्धीही नव्हती व बाल-कुमार यांच्यासाठी अशी आता-सारखी बहुविध पुस्तकंही नव्हती. पण तसे तुझे थोडेच ? बहुधा तुमच्या हातात आतापर्यंत शालेय लायब्ररीतून व घरातून बऱ्यापैकी पुस्तकेच येत होती. पण यापुढचा वाचनाचा क्रम कसा असावा तेही थोडं लिहिते. कारण आता तुला वाचनस्वातंत्र्य आहे. इंग्लिश कादंबऱ्यांपासून ते कुटुंबनियोजनाच्या पुस्तकांपर्यन्त काहीही वाचायला तुला आता घरच्यांनी मोकळीक दिलेली आहे. म्हणूनच पुस्तकांची निवड व आवड ठरविण्याचे कठीण काम आता स्वतः तुझ्यावरच आले आहे, ते जास्त काळजीने व्हायला हवे.

प्रथम, लेखनाप्रमाणे वाचन हाही एक अभ्यासच आहे. हे लक्षात घे. कॉलेजमध्ये तू नेमलेल्या विषयावरचीच पुस्तकं अभ्यासतेस तेव्हा तो विषय तयार होतो, तसेच काहीसे या वाचनाबद्दल असते. जे हातात येईल ते तासन् तास वाचणे यात कालाचा, शक्तीचा व बुद्धीचा उगीचच अपव्यय होतो. म्हणून वाचन आखीव हवे. त्यात निवड तर जरूर हवीच हवी. वाचन हे लेखनाचेच एक अंग आहे, असे समजून वाचनाचा व्यासंग सतत वाढवीत तर राहाच, पण तो डोळसपणे पुस्तके पारखून घेऊन वाढव, हे पहिले कलम.

आता, इतकं वाचन नित्य का म्हणून करायचं, हा प्रश्न समोर उभा रहाणारच. त्याची कारणे दोन-तीन आहेत–

१) यातून स्वतःचा शब्दसंग्रह वाढतो व ही शब्दसंपत्ती लेखनास समृद्धी आणते.

२) इतर लेखकांनी एकेक विषय कसा हाताळलेला आहे, हे ध्यानी

येते. व अशा विविध लेखकांची पुस्तके वाचली की एकच विषय किती तऱ्हांनी मांडता येतो हे कळून स्वतःच्या लेखनातला एकांगीपणा दूर होतो, आपल्या बुद्धीस, विचारास समतोलपणा येतो. सखोलताही येते.

३) विचार मांडावे कसे, भाषाशैली कशी असावी याचे तर वाचनातून जणू पाठच मिळतात. ही शैली प्रत्येक लेखकाची वेगळी असते आणि ती पुस्तकाच्या भाषेतून ठायीठायी डोकावून बघत असतेच. आपले बाळ बाहेर पाठविताना माता त्याला मनापासून नटवीत असते. तशी लेखकांनी अतिशय आत्मीयतेने आपल्या लेखनकृतीवर चढवलेली ही आवरणे ! यांचा म्हणजेच इतरांच्या लेखनगुणांचा– अभ्यास, हा आपल्या लेखनाला किती पूरक ठरेल, बघ बरं ? या शैलीचं रूपही लेखकागणिक अगदी वेगवेगळे असते. भाऊसाहेब खांडेकरांची भाषा म्हणजे अलंकार ल्यालेली युवती, तर सानेगुरुजींची भाषा अती जिव्हाळ्याची, हरि नारायण आपटयांची शैली घरगुती वळणाची तर लक्ष्मीबाई टिळकांची निर्मल विनोदाने शोभणारी ! कोणाला विलक्षण उपरोधाने कथा सांगाविशी वाटते तर अलीकडच्या नवकथेतल्या उपमा अत्यंत नाविन्यपूर्ण असतात. पण असे सांगत किती बसणार ? जसजसे तुझे वाचनविश्व मोठे मोठे होत जाईल तसतशी ही विविधता आपोआपच तुझ्या ध्यानी भरेल. मात्र एक लक्षात ठेव हां, यांचा अभ्यास म्हणजे अंधानुकरण नको व्हायला. तुझी स्वतःची लेखनशैली (ते विकसित होईल तेव्हाची गोष्ट !) स्वतंत्रच असली पाहिजे व तिला सुबक आकार तूच दिला पाहिजेस !

४) यानंतर शेवटचा मुद्दा. वाचनाचा सर्वांत महत्त्वाचा फायदा असा की, ते एक ज्ञानवर्धनाचं प्रमुख साधन आहे. त्याने बहुश्रुतता प्राप्त होते. नाही तरी कॉलेजातल्या विषयांचा अभ्यास तुम्ही ग्रंथांवरूनच जास्त प्रमाणात करता की नाही ? ग्रंथ हे माणसाचे गुरू आहेत, हे वचन तू अनेकदा वाचले असशीलच ? अनभिज्ञतेचा दोष दूर करणारा स्नेही ग्रंथासारखा दुसरा कोण आहे ? सांग. तर अशा अनेक दृष्टींनी वाचनाचा अभ्यास करावा लागतो. शिवाय हे वाचन फक्त कादंबरी, कथा, नाटक यापुरतेच उपयोगाचे नाही. अलका, मी पुष्कळदा पाहिलंय, तू केवळ ललित विषयांवरचीच पुस्तकं वाचतेस ! आत्मरंजन म्हणून हे अगदी ठीक, पण

जेव्हा तुला लेखनानुषंगी व्यासंग म्हणून वाचन करायचे असेल, तेव्हा मात्र आपली जुनी पुराणे, संतसाहित्य, जुनी नाटकं, ऐतिहासिक जुन्या गोष्टी सांगणारी पुस्तकं (बखरीसुद्धा !) व शास्त्रीय पुस्तकं, काव्याची पुस्तकं आणखी चरित्रे, निबंध हे सर्वग्राही वाचनविश्व तुला आपले म्हणायला हवे. मी स्वतःही कितीतरी दिवस आगरकरांच्या निबंधांना, टिळकांच्या मोठ्या चरित्राला हातच लावला नव्हता, पण मग कोणी मान्यवर लेखकाने वेळेवारी मला ही योग्य सूचना केली, इतकेच नव्हे तर त्यांनी 'ह्यामुळे तुमच्या लेखनास समृद्धी प्राप्त होईल व बहुश्रुतपणाही लाभेल' असेही मला सांगितले ! आता ते मलाही पटले आहे. पण आधीचे पुष्कळ दिवस गोष्टी व कादंबऱ्या यांच्याच वाचनात मी बुडवून टाकले होते, उमेदीचा व मोकळचा वेळाचा व्यय जे मिळेल तेच वाचण्यात झाला होता. तसे तुझे होऊ नये, म्हणून मी तुझ्या या लेखनाच्या उषःकालातच तुला प्रेमानं ही सूचना करीत आहे. समजलं ना ?

तेव्हा एकंदरीत सांगायचं म्हणजे वाचन हीच लेखकाची पहिली शाळा ! शाळेत जसे आपण, नियमित अभ्यासाला उपयुक्त ठरेल तेच वाचून घेतो, त्याप्रमाणे आपल्या लेखनविषयास उपकारक ठरेल तेच वाचायचं, असा तू आता निश्चय करून टाक. ही उपयुक्तता कोठकोठल्या प्रकारांची असू शकते हे वर मी तुला लिहिलेलं आहेच.

वाचकांचेही एका थोर लेखकाने तीन वर्ग कल्पिले आहेतच, तेवढे तुला सांगून मग हे लांबलेले पत्र आटोपते घेईन. जुने वाळूचे घडयाळ परवा एका संग्रहालयात तू पाहिलेस, त्यातली वाळू इकडून तिकडे जाते पण ती त्या भांड्याला स्पर्शही करीत नाही, तो प्रकार म्हणजे– पारायणे करूनही मनावर काहीही ठसा न उमटणाऱ्या वाचकांचा ! दुसरे वाचक गाळण्या-सारखे. शुद्ध अंश गळून जाऊन गाळ तेवढा त्यात राहतो, त्यापैकी म्हणजे वाचनातून नेमका आक्षिप्त वा गलिच्छ भाग तेवढाच ध्यानात ठेवणारे आणि तिसरे हिऱ्यांच्या खाणीतल्या मजुरांसारखे. ते खाणीतील गदळ टाकून फक्त शुद्ध हिरे तेवढे वेचून काढतात. तू या शेवटच्या प्रकारासारखी वृत्ती ठेव आणखी आपल्या साहित्यसोनियाच्या खाणीतून उत्कृष्ट दर्जाचे साहित्य निवडून मनन करू लाग कशी ? लेखक व्हायची पहिली पायरी– उत्कृष्ट

वाचक होणे हीच !

तू मनःपूर्वक विचारतेस म्हणून एवढं मोठं पत्र लिहिलं आहे. हे आवडलं असेल, तर कळव, म्हणजे आणखीही अशीच पत्रं लिहायला मला उत्साह वाटेल. मात्र जरा सावकाशीनं एकेक पत्र लिहावं म्हणते– वेळ होईल तसतसे. चालेल ना ? आता बाकीच्या गोष्टी पुढील पत्रांतूनच !

बाय बाय अलका–

तुझी–

सौ. ताई

□ □

२ ज्ञानवही

प्रिय अलका,

गेल्या पत्रात मी तुला काही गोष्टी लेखनाची पूर्वतयारीं म्हणून सुचविल्या, नाही का ? त्याच तयारीपैकी आणखी एक महत्त्वाची गोष्ट आज सांगेन म्हणते. अर्थात या साऱ्या पूर्वतयारीच्या गोष्टी पुऱ्या हस्तगत झाल्यानंतरच मग लेखन सुरू करावयाचे की काय ! असा प्रश्न तुला पडला असेल ? छे छे, अग, अशी तू थांबत बसलीस तर कदाचित तुझी तिशीसुद्धा उलटून जाईल ! कारण ही तयारी अशी अमक्या तमक्या दिवसांतच संपणारी नव्हे, तर ही लेखनाच्या संगतीसोबतीने चालणारी किंबहुना त्यांची कायमचीच सहचरी आहे. तेव्हा या तयारीला पूर्णावस्था प्राप्त होईतो लेखन थांबविण्याची जरूर नाही. तुला सुचेल ते लिहू लाग व त्यात या पूर्वतयारीचा योग्य तो उपयोग करून घे कशी.

लहानपणी ऐकलेली एक जुनी कविता नजरेपुढे येते आहे बघ यावेळी. 'केल्याने देशाटन, पंडितमैत्री सभेत संचार ! शास्त्र-ग्रंथ विलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार' अशी होती ती. पूर्वी माणसाला चातुर्य व ज्ञानवृत्ती प्राप्त होण्याचे हेच राजमार्ग होते. आणि आजच्या आपल्या लेखनकलेच्या विकासालाही नेमके उपयुक्त ठरणारे हेच उपाय आहेत हं ! कसे ते पाहा. लेखकाने खरे म्हणजे खूप प्रवास करायला हवा, तुझ्याही ध्यानात आलं

असेल, अशा देशोदेशी हिंडून आलेल्या माणसांचं लेखन किती वेगळं व चित्तवेधक होतं ते ? प्रवासात निरीक्षणाला किती वेगवेगळे विषय मिळतात, तऱ्हेतऱ्हेचे लोक भेटतात आणि परोपरीचे स्वभावधर्म आढळतात. तुला एक छोटंसं उदाहरण सांगते. आम्ही उदेपूरला गेलो होतो ना, तेथे 'सहेलियों की बाडी' म्हणून एक सुंदर स्थळ पाहायला गेलो बरं का. तेथे मुला-बाळांना व दोन-तीन स्त्रियांना घेऊन एक शेटजी आले होते. या सहेलियांच्या वाडीत शंभर कारंजी होती. व ती सुरू करायला एक रुपया द्यावा लागत होता. प्रत्येक माणूस आला की शेटजी मंडळींना घेऊन कारंज्याकडे यायचे. त्याने कारंजी सुरू केली नाहीत की परत जाऊन, बागेत बसून राहायचे वाट बघत ! कारण त्यांना रुपया द्यायचा नव्हता पण ती कारंजी मात्र पाहायची होती ! दोन-तीन तास ते याप्रमाणे घोटाळत होते म्हणून गाईड म्हणाला. अखेर आम्ही कारंजी सुरू केली तेव्हा शेटजींच्या मंडळींनीही ती पाहिली व ते खूष झाले.

प्रसंग लहानसा. पण माणसाचा मूळस्वभाव कोठेही जा, डोके वर काढतोच, याचे प्रत्यंतर पटवणाराच. आपले गो. नि. दांडेकर ? त्यांनी परिस्थितीच्या आवर्तात सापडून नर्मदापरिक्रमा केली होती– त्या जिवंत व विविध अनुभवांनी त्यांची 'कोणा एकाची भ्रमण गाथा' किती नाविन्य-पूर्ण व आकर्षक झाली आहे ? वाचलीस ना तू ती कादंबरी ? वर सांगित-लेल्या त्या कवितेतल्या दुसऱ्या दोन गोष्टीही पंडितमैत्री आणि सभेत संचार पूर्वीइतक्या कठीण राहिलेल्या नाहीत. कॉलेजात उच्च शिक्षण घेणाऱ्या तुम्हा सगळ्यांनाच हल्ली विद्वान लोकांचा सहवास लाभतो व सभा, व्याख्याने यांचाही सहज लाभ नित्य होत असतो. पण प्रवास मात्र सगळ्यां-नाच करता येईल असे म्हणता येत नाही. आणि केवळ लेखनासाठी निरीक्षण म्हणून आवर्जून प्रवास करणारे तर फारच थोडे लोक.

पण अलका, ह्या सर्व ज्ञानाचा आपल्या चिमुकल्या मुठीनं आपण हलके हलके बराच संग्रह करू शकू, हेच मला आज तुला सांगायचे आहे. एक फार मोठे साधन आपल्या हाताशी असते, त्याचा लेखकाने उपयोग करून घ्यायला हवा. ते म्हणजे आजपर्यंत अनेक लेखकांनी जी साहित्यनिर्मिती केली आहे, त्यातले महत्त्वाचे उतारे वा टिपणे घेणे हे होय. बघ ना, तुला मी आता

ती जुनी कविता सांगितली तीही माझ्या टिपणीत होतीच. आणि तुला मागल्या एका पत्रात वाचकांचे तीन प्रकार सांगितले तोही उतारा माझ्या जुन्या संग्रहातलाच !

दूरदूरची सुंदर स्थळे तुला पाहता येणारही नाहीत कदाचित, समजा ! पण त्यांचे यथातथ्य वर्णन अनेक लेखकांनी केलेलं असतं, ते तर तुला वाचता येईल ? त्यातले उत्तम उतारे काढूनही ठेवता येतील– केव्हाही परत वाचता यावे म्हणून; शिवाय स्थलवर्णन कसे करावे वा कसे असावे याचा धडाही हे उतारे सहज देतील. तू म्हणशील मला काय करायचे हे स्थलदर्शक उतारे ? अग तू विसरतेच आहेस की ! तुझ्या आगामी कथा कादंबऱ्यातील पात्रे काल्पनिक असली तरी तीही केव्हा ना केव्हा खऱ्याखुऱ्या भारतात हिंडलेली तू दाखवणारच ना ? त्यांच्या आयुष्यातले प्रसंग काय नेहमी तू ' विक्रमपूर, नवलपूर, विलासनगरी ' इत्यादी काल्पनिक गावातच योजणार आहेस थोडीच ? सत्यसृष्टीतल्या गावातच ही तुझी मंडळी जेव्हा राहतील, तेव्हा त्या राहणीत स्थलवर्णनं जरूर येतील. ती तू या सत्य उताऱ्यांच्या सहाय्यानं सत्यदर्शी करू शकशील. तुला दोन अलीकडची उदाहरणं देते हवीतर. प्रभाकर पेंढारकर या लेखकाचे ' हरवलेला मधुचंद्र ' हे पुस्तक मी नुकतेच वाचले. त्यात सिमला-दार्जिलिंगच्या प्रवासाचे व तेथल्या राहणीचे वर्णन आलेले आहे– इतक्या बारीक तपशीलाचे व इतके विविध प्रकारे नटलेले की– ते त्या लेखकाने समक्ष पाहूनच सर्व लिहिले असल्याची माझी खात्रीच पटली. लेखनात ' देशाटन ' हे किती सजीवता भरू शकते याची ती साक्षच होती बघ. येथे टिपणे नकोत. मनाच्याचा वहीत स्वतः चक्षूंनी टिपलेली दृश्ये व याचे आलेख चित्रित होत असतात.

दुसरे उदाहरण शैलजा राजे यांची ' दोलन ' कादंबरी आहे, तिचे. ती आहे आसामातील नागालँडमधल्या हकीगतीवर आधारलेली. त्यातली वर्णने इतकी सूक्ष्म तपशीलाची नसली तरी नवीन वेगळ्या तऱ्हेची अशी आहेत व त्यात इतकी प्रादेशिकता प्रत्ययाला येते की बसबस् ! मी अखेर त्यांना ' हा प्रवास तुम्ही केव्हा केला आहात ?' असं विचारलेसुद्धा ! तर त्यांनी उत्तर दिलं, ' पण मी समक्ष गेलेच नव्हते तिथे. तेथली सारी माहिती मिळवूनच लिहिलं आहे ते पुस्तक. '

आता पाहा बरं तूच ? तऱ्हेतऱ्हेची आसामविषयक अनेक प्रकारची माहितीची कात्रणे व टिपणे त्यांनी जमवली असल्यावाचून, का इतकं सत्याभासी वर्णन, त्या लिहू शकल्या ? तेव्हा स्थलवर्णनांचे उतारे हे तुझ्या टिप्पणवहीतले एक महत्त्वाचे प्रकरण म्हणून नमूद करून ठेव, विसरू नकोस.

यानंतर थोरांचे विचार, सुभाषिते, यांचीही समृद्धी तुझ्याजवळ हवी. सुभाषिते मोठी चटकदार व थोडक्यात महत्वाचे तत्त्व विशद करणारी असतात. **उदा . ' सर्वेगुणा कांचनम् आश्रयन्ते '**

हे एक संस्कृतमधले प्रसिद्ध सुभाषित घे. आजही या गोष्टीचा प्रत्यय येत नाही का जगात ? तर सुभाषिते ही स्थलकालातीत असतात, तरीही चटकन् कोणत्याही कालात वा परिस्थितीत, ती मनांस एकदम पटतात हे विशेष.

उदा. ' अभिज्ञान शाकुंतल ' हे नाटक जुन्याकाळी रचले गेले, पण त्यातले ' अर्थोऽहि कन्या परकीय एव ' हे सुभाषित आजही सर्वार्थाने प्रत्ययाला येत नाही का ? प्राचीन संस्कृत साहित्यात अशी सुभाषिते जागोजाग तुला आढळतील. आणि केवळ संस्कृततच नव्हे तर संतवाङ्मयाच्या प्राकृत भाषेतही ती वैपुल्याने आहेत. समाजात सर्वांच्या तोंडी असणारी वचने बरीचशी तुकोबांची आहेत हे तुझ्या लक्षात आले असेलच. त्यांपैकी–

' जया अंगी मोठेपण तया यातना कठीण ' हे वचन घे किंवा ' सुख पाहतां जवापाडे, दुःख पर्वताएवढे. ' हे वचन ह्वेतर बघ. यांचा सर्रास वापर आज मराठी बोलभाषेत केला जातो व त्यामुळे त्यांना सुभाषितांसारखेच महत्त्व प्राप्त झाले आहे. अलीकडच्या मराठी वाङमयातही सुभाषितांची संख्या कमी नाही. मोठमोठ्या धर्मगुरुंची कांही वचनेही सुभाषितांसारखीच असतात, महंमद पैगंबराचे ' **मातेच्या पायाखाली स्वर्ग असतो !** ' हे शब्द सुभाषितांसारखेच नाहीत का ? तर हीही ठेवीत जा टिपून. मात्र, यांचा उपयोग आपली बहुश्रुतता वाढविण्याकडे, ज्ञानकक्षा वाढविण्याकडेच अधिक करायचा असतो. लेखनात जर दोन शब्दाआड म्हणी, सुभाषित येऊ लागले तर शेजाऱ्याच्या संसारात उगीच वरचेवर डोकावणाऱ्या अगाऊ शेजारणीसारखेच ते नकोसे व्हायचे ! तेव्हा सुभाषिते माहीत असली, तरी, ती लेखनात कुठे, केव्हा वापरावी किती प्रमाणात याचा हिशेब तुझा तूच

ठरवायला हवा. वेलदोडे, केशर वगैरे मसाला मिष्ट पदार्थांची रूची निश्चित वाढवणारा असतो, पण त्याचे प्रमाण पातेलेभर जिनसाला दोन-तीन चिमूटभर एवढेच असते हे तू पाहिलेलं आहेसच.

तर ही अशी चटकदार, प्रेरक वाक्ये म्हणजे सुभाषिते. ती लेखकाला ध्रुवतान्यासारखी योग्य दिशा नित्य दाखवीत असतात. तुलाही मिळतील ती तुझ्या वाचनविश्वात, ती तू संग्रहात ठेव.

अलका, आणखी एक ध्यानी ठेव, या टिपणवहीमध्ये वर्णनसुंदर उतारेही टिपून ठेवायची तू सवय लावून घे. संतकवींच्या वाङमयात याचे वेधक नमुने कमी नाहीत काही. उदारणार्थ मुक्तेश्वराच्या काही काव्यपंक्ती घेऊ. तो मोठा सौंदर्यप्रेमी कवी होता. त्याने शकुंतलेचे वर्णन किती सुंदर शब्दांत केले आहे. तू पहाच एकदा– शकुंतला कशी होती?

कनकलतिका सौदामिनी । कि चंद्रकळा तनुधारिणी !
सुवर्णकेतकी पत्रवर्णी– सुगंधखाणी हरिणाक्षी ।

किती थोडक्या शब्दात केव्हढा मोठा आशय त्याने व्यक्त केलाय् अन् तोही उपमांच्या बहाराने !

ज्ञानेश्वरीतही तुला बहारदार उपमा, दृष्टान्त, उत्प्रेक्षा यांचा सुंदर फुलोरा जागोजाग आढळेल. अशा या वाङमयाच्या वाचनासाठीही तू जरूर वेळ राखून ठेवीत जा अलका. आणि येथेच तुझ्या टिपणवहीची पावले रोखू नकोस हो. जुन्या वाङमयात केवळ धार्मिक ग्रंथच होते असे नाही. त्याही-वेळी नव्या मराठीची नवी जडणघडण होत होती आणि त्या दृष्टीने भाषा वेगळ्या आगळ्या शब्दरंगाने रंगतही होतीच. भाषेची ही टप्प्याटप्प्याने होणारी प्रगती तुला या वाङमयातून अवश्य बघता येईल. तो एक मराठीचा अभ्यासच म्हणेनास ?

उदाहरणार्थ या टिपणवहीत जुन्या शाहिरांच्या लावण्या, पोवाडे यात येणाऱ्या काही सुंदर वाक्यांकरता तू थोडी पाने राखीव ठेव बरं का. भाषेला जोश आणखी जवानी, शृंगार आणि शौर्य यांची शब्दलेणी पूर्वकाळी खरे तर शाहिरांनीच चढवलेली आहेत. काही काही वाक्ये फारच कल्पनासुंदर-तेने नटलेली दिसतात त्यापैकी. त्यांत उपमा, उत्प्रेक्षांनाच केवळ बहर आला आहे असे, नव्हे तर त्या उपमा अगदी वेगळेपणानं नटलेल्या म्हणूनही आकर्षक

आहेत. उदाहरणार्थ लावणीकार होनाजी बाळा याने सुंदर युवतीचे वर्णन करताना '**चपल जशी नागिण गव्हळी**' ही नागिणीची उपमा वापरलेली बघ, किती सार्थ वाटते ती. त्यात गतीचा डौल, सौंदर्य व मोहक वेधकपणा या सर्वांचा एकदम प्रत्यय येतो ! सांगायचे असे की, या शाहिरी वाङ्मयातही तुला वाङ्मयीन दृष्टीने काही वेधक स्थळे आढळतील आणि तोच प्रकार ग्रामीण गीतांचा अगर ओव्यांचा. त्यात तुला प्रेमाच्या माणसांना तांदुळाचा ढीग, कलमी आंबा, बहराला आलेला शेवगा, लग्नाच्या मुलीला धन्याची कोथिंबीर, अशा अनेकानेक नव्या पण जीवननिष्ठ उपमांची रेलचेल आढळेल. उपमा कशी किती प्रकारांनी, वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारातून दिल्या जातात. त्यांचा पाठ तुला लोकवाङ्मयातूनही याप्रकारे मिळण्याजोगा आहे व तीही एक समृद्ध साहित्यशाखा आहे. तेव्हा तिकडेही कधीमधी लक्ष देत जावे.

थांब, तुझी टिपणवही येथेच मिटू नकोस ! गेल्या अर्धशतकात जे लेखक कवी, नाटककार होऊन गेले व आजही, जे वयोवृद्ध साहित्यिक साहित्यसेवा करीत आहेत, त्यांच्याही लेखनातले काही सुंदर उतारे घेण्याचीसुद्धा तुला सवय व्हायला हवी ! या दृष्टीने नमुन्यादाखल माझ्या एका जुन्या टिपणवहीतलाच एक उतारा येथे देत आहे. फार मजेदार आहे. तू, तांबे केशवसुतांपासूनच्या कविता वाचीत असशीलच ? मराठी कविता कशी आहे ? अशा प्रश्नाला कै. न. चि. केळकरांनी दिलेले उपमात्मक व तुलनात्मक उत्तर आहे हे–

'तांब्यांच्या कवितेची सगुण मूर्ती कल्पिली तर ती मला कडेवर मूल घेतलेल्या प्रेमळ प्रौढ तरुणीप्रमाणे दिसते; केशवसुतांची– दाभणकाठी पंचा नेसलेल्या, कोरीव मिशांच्या सुदृढ चित्पावन ब्राह्मणाप्रमाणे ! गिरीशांची– ब्राह्मण स्त्रीने मुद्दाम गुर्विणीचा वेश घ्यावा तशी. चंद्रशेखरांची लांब आडवे गंध लावणाऱ्या शास्त्र्याप्रमाणे. बालकवींची– पालवीत लपून किलबिलणाऱ्या पक्ष्याप्रमाणे. माधव ज्युलियनांची बरीच वर्षे महाराष्ट्रात राहिलेला पठाण आपल्याबरोबरच्या स्त्रीशी जसा बोलतो तशी. अत्र्यांची– शेजारी उभे राहून गुदगुल्या करून डोळ्यातून पाणी काढणाऱ्या अस्वलासारखी !'

अर्थात ही त्यांची वैयक्तिक मते; तीच आपणही स्वीकारावी असं मुळीच नाही. पण वर्णनाची एक आकर्षक पद्धत म्हणून हे वर्णन छान

वाटते, हे तर खरे ? अर्थात् केवळ लांब लांब उतारेच सुंदर वा लक्षणीय असतात असं नाही. म्हणीप्रमाणे थोडक्या शब्दात सारा आशय अतिशय चटकदारपणे व्यक्तवणारी वाक्येही हिऱ्यांच्या अंगठीप्रमाणे लहान पण मूल्यवान असतात. उदा. लताबाई मंगेशकरांचे वर्णन वि. स. खांडेकरांनी एके ठिकाणी 'लता ? छे, कल्पलता !' अशा तीनच शब्दांत किती आशय-घनतेने व्यक्त केले आहे. ते तेवढेच समर्पक आहे ना ? 'सुशिलेचा देव' कर्त्या वा. म. जोश्यांनी 'ध्येये म्हणजे दुःखे !' असंच एक सुंदर संक्षिप्त वाक्य एके ठिकाणी योजलेले आहे. खांडेकरांच्या वाङमयात तुला जागोजाग या उपमा– उत्प्रेक्षांचा टवटवीत मला बहरलेला दिसेल व या दृष्टीने उतरून घेण्यालायक सुभाषिते तर पानापानावर आहेत...किती टिपून घेशील ? सांग.

आणखी एक. हे उतारे मराठी वा संस्कृत वाङमयापुरतेच सीमित हवेत असे नव्हे. त्यात इंग्रजी व हिंदी सुभाषिते वा उत्कृष्ट विचार यांचाही समावेश कर. कणाकणाने हे माहितीधन तू आतापासूनच जमवू लाग. थोर साहित्यिकांची साहित्यविषयक मते व विचार, असाही एक कप्पा या वहीत असू दे, राखीव म्हणून हे 'साहित्य' तुला त्या त्या साहित्यिकांच्या लेखनातून वा भाषणातून मिळू शकेल. एखादे कठीण प्रमेय सोपे करून सांगताना त्यांनी भाषा कशी योजली आहे, याचेही मार्गदर्शन तुला यामुळे होईल...

...पण पुरेच. प्रज्ञावंताला सारंच काही उलगडून सांगावं लागत नाही. उतारे का, कसे व कोणते घ्यावे हे तुला वरील उदाहरणावरून चांगले समजले असेल. या उताऱ्याबरोबर कात्रणे चिटकवण्याची पण एक वही हाताशी ठेव. पुस्तकातले उतारे लिहून घ्यावे लागतात पण दैनिकांचे, साप्तहिकांचे तसे नाही, त्यांचे आयुष्य तात्पुरते असते व म्हणून ती वाचून झाल्यावर इतरांच्या दृष्टीने टाकाऊ होतात. पण आपल्याला मात्र त्यात निश्चित कांहीतरी ग्राह्यांश आढळतो. पूर्वी एका साप्तहिकात 'स्त्रियांची नोकरी व संसार' यावर एक परिसंवाद येत होता. अनेक स्त्रियांनी स्वानुभव लिहिले होते त्यात. ती कात्रणे मला माझ्या 'धुक्यातील वाटा' या निबंधाला फार उपयोगी पडलेली स्मरतात.

तर सांगायचे असे की तुझ्या लेखनविषयाला अत्यंत उपयुक्त असे स्फुट

विचार, माहिती, आकडेवारी, इतिहास जे जे दैनिकातून आलेलं तुला आढळेल, त्याही कात्रणांचा संग्रह करायचा छंद तू लावून घे. कोणी हसेल, अभिजात लेखनाला इतकं आवडंबर हवय् कशाला ? असं म्हणणारे लेखक, मित्रमैत्रिणी मलाही भेटले आहेत. पण आपला माहितीकोश समृद्ध करण्याचा हाही एक सोपासा उपाय असतो असा माझा तरी नित्य अनुभव आहे. तेव्हा आलं ना लक्षात ? लेखनाच्या पूर्वतयारीबरोबर या अशाही ज्ञानवहीला तू अवश्य आपलीशी कर. पण आता थांबतेच, लिहून लिहून माझाही हात दुखायला लागला आहे अन् तुलाही एकदम फार मोठे अभ्यासासारखे दडपण पडण्याची शक्यता आहे. म्हणून पुरेच. मात्र एक आहे. परत येईन, अगर भेटेन तेव्हा ही असली एक तरी वही मला तू आठवणीने दाखवायला हवीसच ! अच्छा.

उत्तर मेऊ दे हं–

तुझी

सौ. ताई

□ □

३ सातत्य

प्रिय अलका–

माझ्या मागल्या पत्रावरून तुला वाटलं असेल, की झाली पूर्वतयारी, चला बसूया लेखनाला ! तर तसं नाही. प्रत्यक्ष लेखनाला काय, तशी केव्हाही सुरुवात करता येतेच. पण परीक्षेचे पेपर लिहायला तू घेतेस तेव्हा फक्त त्या तीन-चार तासांपुरतेच लेखन केले की झाले, असे थोडेच असते ? वर्षाच्या सुरुवातीपासून तुम्ही तन्हेतन्हेने सतत दहा-बारा महिने त्या विषयाचा अभ्यास करीत राहता, तेव्हा कोठे तीन तासांचा परीक्षा पेपर समाधानकारक लिहिता येतो ! एकाच विषयाचा व्यासंग असा जेव्हा सतत ठेवावा, तेव्हाच त्यातून लोकांना काही सांगण्यासारखे ज्ञान आपण उद्धृत करू शकतो. पटतं ना ?

ललित लेखनाची गोष्ट तशीच. वर दिलेल्या उदाहरणात मी 'सतत' हा शब्द आवर्जून दोन वेळा वापरला आहे. कारण कोणत्याही कलेची वाढ व्हायला तिचा 'सतत अभ्यास' अगर 'सातत्य' हे अत्यावश्यक असतेच असते. मागे जी पूर्वतयारी तुला मी कळवली आहे त्याच्या, जोडीला लेखकाला आणखीही काही नियम वा काही पथ्थे पाळणे जरूर असते. त्यातलाच एक नियम 'सातत्य' हा आहे. त्यासंबंधी थोडं विस्तारानं सांगावंसं वाटतं.

तू 'गाता गळा शिंपता मळा आणि लिहिणाराचा हातवळा' ही म्हण कोठे-तरी ऐकली असशीलच ?

या म्हणीत मी वर नमूद केलेल्या गोष्टीच सांगितलेल्या आहेत. नित्य गाण्याचा रियाज करणाराची आवांजी सुरेल राहते, नियमाने पाणी दिल्याने मळा भरारतो. आणि नित्य लिहीत गेल्याने लेखनाची हातोटी निर्माण होते; हे यातले तत्त्व खोटे आहे का पाहा बरं? माझ्याकडे पुष्कळदा नवशिक्या लेखक-लेखिकांचे लिखाण तपासण्यासाठी अगर अभिप्रायासाठी येते. तुला काय सांगू अलका, बालवर्गातल्या मुलांच्या अक्षरात, उदाहरणांच्या मांडणीत जशा खूप चुका आढळाव्या तसे यात कित्येक लेखनदोष राहून गेलेले मला स्वच्छ दिसायचे ! पहिल्या पहिल्या गोष्टी, कथा, तशाच असायच्या म्हणा. कोणी थेट आपल्या आवडत्या लेखकाचं–त्याच्या शैलीचं– इतकं अनुकरण केलेलं दिसे की जणू त्या लेखकाचीच एखादी कथा या नवविद्यार्थ्याने सही-सही उतरवून आणली आहे ! खरं म्हणजे तसं मुळीच असता कामा नये, इतरांच्या लेखनशैलीचा अभ्यास जरूर करावा, पण स्वतःच्या लेखनाची शैली स्वतःचीच हवी, हे मला वाटतं तुला मी मागे सांगितलेलं आहेच.

दुसरा, असंभाव्यतेचा दोष. एका भावशील तरुणानं आपली पहिली दीर्घकथा मला वाचायला दिली. प्रीतीपायी घडलेल्या पाच आत्महत्या होत्या त्यात ! अरे बापरे ! एखादी खुनांची मालिका असलेली भयानक रहस्यकथाच मी वाचते आहे की काय, असं मला वाटलं.

अर्थात सुरुवाती सुरुवातीचे लेखन सदोष असणारच असे म्हणा, त्यात नव्या लेखकांचा मुळीच दोष नाही. गवई गायला शिकत असतो, तेव्हाचे त्याचे पहिले गायन मैफल गाजविण्याइतके उत्कृष्ट कसे होईल? चित्रकाराची गोष्ट घे. पहिल्यावहिल्या त्याच्या चित्रात रंगयोजना ठीक असेल. आकृतीही बऱ्या येत असतील पण अनुभवी माणसं 'त्याचा हात चित्रकलेला फार चांगला आहे पण अजून पुष्कळ श्रम घेतले पाहिजेत.' असंच म्हणताना तू ऐकलं असशील. अग सर्वच कलांचं हे असंच ! अंकुर असले तरी सतत अभ्यास हवा. तर कलाकृतीत सफाई येते, ही यातली प्रमुख गोष्ट तू कधीही नजरेआड करू नकोस. आपल्या कलाविषयाचा सतत व्यासंग ठेवणे, हेच त्या कलेत सौंदर्य आणणारे मोठ्यात मोठे साधन आहे. सतत म्हणजे किती दिवस? वर्ष? दोन वर्ष ! असं तू विचारणारच, त्याला उत्तर 'कलावंत

जन्मभर मनानं साधक वा विद्यार्थीच असावा लागतो' असंच खरं म्हणजे द्यायला हवं, पण 'सर्व जन्म' म्हटल्यावर तुझे कोवळे मन बिचकेल एकदम म्हणून 'वर्षानुवर्ष' असं मी सोपं उत्तर देईन.

आपल्या वाङ्मयव्यासंगाची सर्व सारस्वताची देवता, श्रीशारदा वाग्देवी. इतर देवदैवतांप्रमाणेच आपले हे दैवतही मोठे हट्टी आहे. वर्षानुवर्ष तपस्या, भक्ती केल्यावाचून ते प्रसन्न होत नाही ! सरस्वतीचा वरदहस्त असल्यावाचून आपल्या लेखनात 'प्रासादिकपणा'चा गुण येत नाही. तेव्हा लिहीत राहा. वर्षानुवर्ष सातत्याने लिहीत राहा, तरच तू उत्कृष्ट लेखिका होशील. सरस्वतीची सेवा ही, भक्तीचे सारे गुण लेऊन शोभणारी वावरणारी एक तपस्याच आहे, म्हणेनास ? यातही भक्तीप्रमाणे एकनिष्ठा लागते. केवळ याच विषयाला मन वाहून टाकावं लागतं. आज नृत्यकला आवडते म्हणून त्यातल्या काही भावमुद्रा शिकून घेतल्या, उद्या सतारीची आवड उत्पन्न झाली, तिकडे क्लासात नाव घातलं, तेरवा भरतकामाचे नमुने उतरून आणून ते सुंदर टाक्यात विणले...असं तुझं फार होतं, मी पाहिलं आहे ते. खरं म्हणशील तर यातली प्रत्येक गोष्ट तुला सुंदर तऱ्हेने करता येते. मीही ते मान्य करीन. लोक तुला 'ऑल राऊंड' (चांगल्या अर्थी !) अगर अष्टपैलू गुणांची म्हणतातही. मीही त्याबद्दल तुला शाबासकी देईन– अगदी अवश्य. पण आपल्या लेखनाविषयाच्या दृष्टीनं विचार केला तर ही वृत्ती कलेच्या बाबतीतली एकनिष्ठा दुभंगच नव्हे तर त्रिभंग, चौभंगसुद्धा करणारी ठरेल !

लेखनकला तेवढीच श्रेष्ठ, इतर कलांचं त्यापुढे कसलं आलंय महत्त्व ? असं वेड्यासारखं मला मुळीच म्हणायचं नाही. लेखनाइतक्याच दुसऱ्याही कला श्रेष्ठ आहेत, हे मलाही पटतं, फक्त माझं म्हणणं एवढंच की आपल्या आयुष्यात सवडीचे क्षण आधीच किती थोडे मिळणार ! हा वेळाचा 'कोटा' अनेक गोष्टींवर खर्च झाला तर एकाच विषयात प्राविण्य आपल्याला प्राप्त होणे नाही, कधीच नाही !

एक उदाहरण घेऊ. तुला एखादे गाव अतिशय रम्य वाटले आहे, गावाच्या रचनेची, लोकांच्या भाषासंस्कृतीची, किंवा गावच्या ऐतिहासिकतेची तुला

पूर्ण माहिती हवी आहे, समज, तर, केवळ एखाद्या दिवसाच्या जॉली ट्रिप-मधून ती तुला समजेल का ? अगदी याच उदाहरणाप्रमाणे हा आपला लेखनप्रांत आहे. येथे सहज मजेने ट्रिप करून भागायचं नाही, कधीकाळी दोन-चार गोष्टी लिहाव्या, एकादी श्रुतिका लिहावी अन् परत फिरावे असे केले तर या प्रांताची नीट वा संपूर्ण ओळख कधीच होत नाही, त्या कलेत पारंगतता कधी येत नाही !

अर्थात् सर्व लेखकांवावत माझा हा सिद्धांत नाही, कारण प्रत्येक लेखकाची प्रकृती (लेखनाची) निराळी व प्रवृत्तीही निराळी. कोणी कोणी लेखक स्फूर्ती आली की तासचे तास बसून लिहू शकतात. एका थोर लेखिकेनं मला सांगितलं की, कादंबरीचा विषय माझ्या डोक्यात जणू उकळत राहतो, उधाण येत असतं मनातून सारखं अन् तो विषय मी सगळा लिहून काढी-पर्यंत मला जेवणाखाणाचीसुद्धा आठवण होत नाही !!

असे हे अपवाद आपण सोडून देऊ. कारण त्याच्या बुद्धीची झेप व ताकदच निराळी ! पण सर्वसाधारण दृष्टीने म्हटले तर लेखकाने नित्य लेखन करावे, इतकेच नव्हे तर तो रोजचा दिनक्रम समजून त्याला नियमित वेळही द्यावा, असं मला मनापासून वाटतं. सतत लेखनाचे हे तंत्र अवलंबित राहिले की हळूहळू पण निश्चितपणे, लेखणीला सराईतपणा येतो, व्यासंगाचे क्षेत्र जसजसे वाढू लागेल तसतशी लेखनात गुणसंपदा उत्पन्न होते. आणि पहिले-पणाचे दोष आपोआपच गळून पडतात. लेखनातून. 'रोजच लिहायचं ? म्हणजे काय काय लिहू ? अन् कसं लिहू ?' असा प्रश्न तुझ्यापुढे या वेळी उभा राहिला असेल. त्याबद्दलही मला पुष्कळ सांगायचे आहे. पुन्हा केव्हा तरी ते पाहू. पण आज एवढेच ध्यानी ठेवायचे, साहित्याची साधना ही वर्षानुवर्ष करावीच लागते व त्यासाठी आयुष्यातला रोजचा ठराविक वेळ तिकडे द्यावा लागतो, निदान देणे बरे.

' लिहायला असं मुद्दाम रोज बसून प्रतिभा फुलते ? स्फूर्ती तर वाटेल तेव्हा येते, ती तर मोठी लहरी असते असं ऐकलं होतं आम्ही !' असा तुझा आक्षेप मला ऐकू येतोच आहे एकीकडे पण अलका, स्फूर्ती झाली तरी तीही क्षणिक असून नाही चालत. तो अग्निस्फुल्लिंग आहे. याकडून प्रकाश देण्याचं कार्य आपल्याला करून घ्यायला हवं. स्फूर्ती अगर प्रतिभेलाही थोडं-

फार वळण लावता येतं, असा माझा तरी अनुभव आहे आणखी असं की, रोजच्या अभ्यासानं प्रतिभाही उजळून निघते. मी आता पंचवीस-तीस वर्षे पहाटे नेमानं तीन तास लिहीते आहे, तू पाहतेच आहेस ना ? मला प्रतिभेनं कधी अडवलं नाही अगर काय लिहू अशी विवंचनाही कधी लावलेली नाही. तेव्हा तुझ्या लेखनस्फूर्तीला तू प्रयत्नानं व्यासंगी बनवू शकलीस तर त्याचा फायदा तुला फार फार होईल एवढं निश्चित. मग कधीपासून लेखनाचा नित्यक्रम धरणार तू ? अन् तसा धरलास तर तुझ्या प्रतिभेचा अनुभव काय येतो ? सर्व ऐकायला मी उत्सुक आहे अगदी ! लवकर लिही बरे का मला त्याबद्दल.

आणखी एक. गुलाबी पहाटेची साखरझोप मोडूनच प्रत्येकाला लिहावं लागतं असं मात्र नाही. बरे का. तू, दुसऱ्या कोणत्याही तुझ्या सवडीच्या वेळी लेखन कर नाहीतर ' पहाटे ' उठण्याची धास्ती घेऊन लेखनच वेडयासारखं देशील सोडून ! तसं नाही करायचं हो !

अच्छा– पुढले पत्र ' निरीक्षण ' या शीर्षकाचं आहे. कल्पना कर बरं हे ' निरीक्षण ' कोण्याप्रकारचं व कसं कसं असेल, त्याची ?

..... आशिस अलका–

तुझी–

सौ. ताई

¤ ¤

४ निरीक्षण

प्रिय अलका–

गेल्या पत्रात मी लिहिलेल्या बाबती तुझ्या मनास आल्या व फार फार आवडल्या हे वाचून खरोखरच मला समाधान झाले. कारण मी तुला लिहिणार आहे, ती ही सगळीच पत्रे आपली साधीसुधी. तुला संपूर्ण लेखन-शास्त्र समजावून देण्याइतकी त्यांची ताकद नाही. त्यांचा जीव लहान आहे आणि तुझ्या नवोदित लेखनाच्या काळात या अनुभवाच्या बोलांनी तुला काही मार्गदर्शन व्हावं इतकाच छोटासा हेतू या पत्रलेखनात मी मनाशी बाळगला आहे. या विषयावर तसे पुष्कळ ग्रंथ आहेत. ते तू पुढे वाच. तूर्त प्राथमिक तयारी म्हणून ही पत्रे उपयोगी पडतील.

अलका, तुला मागल्या दोन पत्रांतून मी वाचन व टिपण या दोन बाबती-बद्दल विस्तारानं सांगितलं, पण तेवढीच पूर्वतयारी लेखकाला पुरेशी होते असे मात्र नाही हं ! आणखी एक बाब अशी आहे की त्याबद्दल लेखकाचे मन जागृत हवे, ती म्हणजे निरीक्षणशक्ती. तू जे काही लिहिशील ते काल्पनिक असले तरीही, कोठेतरी समाजात ऐकलेले, पाहिलेले अगर स्फुर-लेलेच लिहिणार आहेस ना ? मग ज्याबद्दल तुला लिहायचं आहे त्या विषयाचं प्रत्यक्ष व मानसिक निरीक्षण तुला करायला नको का ? आणि हेही सप्रयोगावाचून मनाला शिकवण दिल्यावाचून थोडेच साध्य होणार ?

तेव्हा लेखनाची पूर्वतयारी म्हणून तू उत्कृष्ट निरीक्षकही व्हायचा निश्चय कर कशी ?

मला माहीत आहे, हे वाचल्यावर तुझ्या खटयाळ वृत्तीला ऊत येणार व तुझ्या मैत्रिणींसमवेत तू ही माझी पत्रे वाचीत असल्यास खूपशा हास्य-लहरी तिथे खळखळणार ! कल्पनाचक्षूंनी मला तुझा तो चेहरा दिसतो आहे, इतकेच नव्हे तर तुझे प्रश्नही ऐकू येताहेत, 'या, 'निरीक्षणा'चा अभ्यास या कॉलेजजीवनात तर फारच चांगला होतो, घरच्यापेक्षा !! पण आम्ही ज्या त्या वर्गबंधूचे सूक्ष्म निरीक्षण करू लागलो तर अनेक गैरसमज पसरण्याची धास्ती आहे, त्याचं कसं काय ?'

'जे दिसते ते पाहातोच आहोत की आम्ही नेहमी ! आणखी उत्कृष्ट निरीक्षक कसं व्हायचं बाई ? वर्गबंधूंची 'मनेही' तपासून बघावी म्हणतेस की काय लेखनासाठी ? मग लेखन राहील बाजूला अन् दुसऱ्याच काही जमती घडायची वेळ यायची, मग ?' अन् असे प्रश्न मनी उठणं बरोबरच आहे ! केवळ 'निरीक्षक हो' म्हटल्यावर अशा शंका मनात उद्भवणं अगदी सहजच. पण अलका, मी निरीक्षण म्हणतेय ना, ते केवळ कॉलेजातल्या सहाध्यायी तरूणांबद्दल अगर त्यांच्या रूपदर्शनाबद्दल नाहीच, तर समाजातल्या अनेक घटकांबद्दल म्हणते आहे. अनेक व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाबद्दल म्हणते आहे. आणि हे निरीक्षण, हा या लेखनअभ्यासाचाच एक मोठा धडा आहे म्हणेनास ? तुझे एक जुने पत्र माझ्यासमोर यावेळी आहे. तुम्ही शाळेत असताना कोठल्यातरी– मला वाटतं गोकाकच्या– ट्रिपला गेला होतात, तेथून तू हे पत्र मला लिहिले आहेस. यात शाळेत आलेल्या एका नव्या बापट नावाच्या तापट शिक्षिकेचं वर्णन तू किती थोडक्यात पण हुबेहूब केलं आहेस? इतकं की, तिची वारंवार गळ्यातली माळ चाचपण्याची सवय, बोलताना डावा ओठ मध्येच दाताखाली दाबून धरण्याची पद्धत, हेदेखील तू नमूद केले आहेस या पत्रात ! आणखी या वर्णनात इतका खरेपणा होता की, मग एकदा त्या बाईंना, मी पाहिल्याबरोबर लगेच ओळखलं 'त्याच ह्या' म्हणून, आता सांग, तुला निरीक्षणाचं महत्त्व शब्दांनी कोणी शिकवलं नसलं, तरी तुझ्या लेखणीला ते जमलं की नाही ?

तर हे निरीक्षण व्यक्तीचं व्यक्तिमत्व साकार करण्याच्या दृष्टीने

लेखनात अतिशय उपयोगी पडतं तू पाहिलं आहेस का नीट ? एकच विषय असला तरी त्याबद्दल अनेक व्यक्ती वेगवेगळे उद्‌गार काढतात. आणि उद्‌गार हेही मनाचेच एक दर्शन असल्यामुळे त्या सहजोद्‌गारातूनसुद्धा व्यक्तीव्यक्तिच्या स्वभावातली भिन्नता पाहाणाऱ्याच्या ध्यानी भरते. परवा काय झालं, अगदी खूप खूप उकडलं आणखी मग धुवांधार पाऊस आला, तो सतत दोन तास. आमच्या बिल्डिंगमधली बरीच मंडळी गॅलरीत एकत्र जमून रस्त्याकडे बघत होती. त्यांचे विविध तऱ्हेचे उद्‌गार बसल्याजागी कानावर आले. गंमत म्हणून तू तिकडे पाहा जरा लक्ष देऊन–

'जळला मेला पाऊस ! हा थांबणार तरी केव्हा ?'

'बाकी आता शेतकऱ्यांची चिंता दूर झाली असेल. वाटच बघत होते ते, खरं की नाही ?

'या वर्तमानपत्रात वेधशाळेचे अंदाज येतात ते बरोबर कधी नसायचेच मेले !'

'काय उकडलं बाई ? मला तर अशावेळी कूलर लावल्याबाचून चैनच नाही पडत बघा.'

'बरं का, आता उद्याच उषा अरुणला रेनकोट आणायला हवेत हां– कितीदा म्हटलं मी–'

'हां, म्हटलंत. ते मी ऐकतोच आहे, पण एक तारखेला अवकाश आहे. तोवर भिजू द्या त्यांना.'

'अग रश्मी, आमचं नशीबच असं आहे. की एकही बेत धड पार म्हणून पडायचा नाही, सिनेमाला जावं म्हटलं तर आलाच हा पाऊस धावून मेला.'

'मिस् करुणा, अशा पावसात भिजतभिजत जाण्याची गंमत काही वेगळीच आहे नाही ? मला तर फार आवडतं पावसाचे थेंब झेलून घ्यायला, तुम्हाला ? थोडं जाऊ या बाहेर ?'

'ही अशी भिजलेली सृष्टी पाहिली की मला मुक्तेश्वरांपासून कुसुमाग्रजापर्यंत सगळ्यांनी पावसाबद्दलचे सुंदर धन्योद्‌गार काढलेले आठवतात. माझा नवा काव्यसंग्रहही पाहा मिस्टर जोशी, अशा कवितांची त्यातही उदाहरणे आहेत.'

'आपला वसंत रेशनचं धान्य आंणायला गेला होता. भिजली तर नसतील धान्यं ?'

'या बिल्डिंगची शाकारणी उन्हाळ्यात जरूर व्हायला हवी होती, पण लक्षात कोण घेतो !'

पाहिलंस ? प्रसंग एकच पण प्रतिक्रिया किती प्रकारच्या आढळात येतात ते ? आता सांग, या भिन्न उद्‌गारांवरून माणसाच्या वेगवेगळ्या मनोवृत्तीची कल्पना येऊ शकते की नाही ? व्यवहारात नेहमीच हे असे भिन्न स्वभावाचे नमुने दिसत असतात. कोणी घायकुत्या स्वभावाची माणसं 'जळ्ला मेला पाऊस !' या शब्दाप्रमाणे ज्या गोष्टी आपल्या स्वाधीनच्या नसतात, त्याबद्दलही चिडचीड करणारी तर कोणी त्याकडे काव्यात्म दृष्टीने बघणारी. एक ना दोन ! व्यक्ती तेवढचा प्रकृती, ही म्हण उगीच नाही.

अनंत माणसांचे जग आपल्याभोवती पसरलेले असते व त्यातून निरीक्षणाच्या परीक्षणाच्या अभ्यासाला खूपच वाव तसतो, संधीही असते आणि त्यावरून भिन्नस्वभावी माणसांची ओळख आपण पटवूनही घेत असतो. यातूनच लेखकाची निरीक्षण– परीक्षण– बुद्धि जागृत असेल तर दुसराही एक फायदा होतो. लोक केवळ एखादा उद्‌गार काढूनच थांबतात असं थोडंच? आपल्या आजूबाजूला सहज नजर टाक, कितीतरी व्यक्तीचे संवाद चालू असतात ! जरा लक्ष दिलं तर कळतं की, बोलण्याचे त्याचे विषय अनेक प्रकारचे आहेत. एकाच ऑफिसमध्ये काम करणारी दोन माणसं भेटली तर बहुधा बॉस, टी. ए. पी. ए. च्या अडचणी, सहकाऱ्यांपैकी कुणाचा तरी त्रासिकपणा, अशावर संवाद चालतात. तुझ्यासारख्या दोघी तिघी तरुणी एकत्र जमल्या की कॉलेज, त्यातला तो अमका तमका लाईन मारतो, एखाद्या प्रोफेसरला शिकवायला येत नाही, त्याची चेष्टा, 'ए ही साडी कुठे घेतलीस ?' 'नवं पिक्चर पाहिलंस की नाही ?' 'तो हिरो अगदी सध्या फॉर्मात आहे...' असेच विषय निघत असणार होय ना ? आणि दोन-चार गृहिणी जमल्या म्हणजे 'माजघरातल्या चर्चा' कशा असतात, ते तर तुझ्या घरी तू कितीकदा तरी ऐकले, पाहिले आहेसच ? घरभाडी वाढली, नळ उशीरा येतो, रेशनमधलं अमकं धान्य मुलखाचं खराब होतं,

मुलांची शाळा सकाळची झालीय ऐन थंडीत, स्वेटर विणायला घेतलाय मी, पण किती महाग झालीय लोकर सध्या ? आहेर काय दिलात ? दूध किती महागलं हो ? इत्यादी विषय. बरोबर आहे. माणूस जे जीवन जगत असतो. त्यातलेच विषय रंगून बोलत असतो. अलीकडे सगळ्यांच्याच बोलण्यात राजकारण व क्रीडाक्षेत्र याही गोष्टी येतात, तू पाहातेसच ?

काय ? हे क्षेत्र कमी आहे ? अलकनंदा, हे संवाद तू जसे कानावर पडतात तसे लिहायचा नंतर सवडीच्या वेळी प्रयत्न करून बघ. कथाकादंबरीत संवाद कसे असावे, किंवा मार्मिक वा मर्मभेदक बोलणे कसे योजावे, हे तुला त्यावरून कळेल. खेळकर, मोकळे, विनोदी, प्रसन्न रागीट, कुत्सित, पूर्वग्रहदूषित, अनुभविक, शांत, दूरदर्शी अशा अनेक तऱ्हेच्या रंगांनी रंगलेले संवाद तुला हाताशी तयार मिळतील. नाटकातले संवाद मोजके, आणि पाठ केलेले, पण हे तसे निर्बंधित थोडेच ? ही बोलणी सहजस्फूर्त असतात आणि म्हणूनच अशा प्रकारचे व्यक्तींच्या वयानुसार वा स्वभावानुसारचे संवाद आपल्याला कथाकादंबरीत लिहिता आले तर त्यांत कृत्रिमपणा येत नाही, उलट सहजसुंदरता येते. पण ती साधायला हरघडी सहजी कानावर येणाऱ्या आजू-बाजूच्या शब्दब्रह्माचं चिंतन करायला हवे व ते बोलणाऱ्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व त्या उद्‌गाराशी ताडून बघता आलं पाहिजे.

तुला आठवतं? माझी एक 'उपेक्षिता' नावाची गोष्ट तू वाचली होतीस. त्यात सदैव व ज्याच्या त्याच्याशी तिटकाऱ्यानं बोलणारी एक बाई दर्शविली होती मी. 'तशीच ती का बोलते ? असं तू विचारलं होतंस तेव्हा. त्याला उत्तर हेच, अग, असली एक 'पेटकरबाई' एका गावी मी खरीच पाहिली तिचे सदा कडवटलेले उद्‌गार ऐकले. अन् मग हे असं का ? म्हणून माझ्याही मनाला विचार पडला होता, तुझ्यासारखाच. नंतर मला तिची जीवनकथा कळली. त्यात सख्ख्या आईपासून सर्वच माणसांनी केलेली तिची होरपळ व दुष्ट फसवणूक मला कळली. तूच बघ, मनाचे कडू अर्क अशा परिस्थितीतच तयार होतील की नाही. व सर्व मनच असं कडू जहर असल्यावर उद्‌गारातही तो विषाद उतरणार की नाही ?

अर्थात संवादामागचे व्यक्तिमत्व पारखणे हा अभ्यास कठीण आहे, बराच.

तरी पण तो तुला करायला हवाच.

आणखी एक बाबत अलका. ह्या संवादामागच्या व्यक्ती किती अनंत तऱ्हेच्या ? कोणी ऐन फॅशनेबल व टिपटॉप कपड्यांच्या, तर कोणी गबाळ-ग्रंथी, कोणी बांधेसूद, कोणी एखादे झाड आडवे अगर सरळसोट उंच वाढत जावे तशा आकारहीन देहाच्या. कोणाचे डोळे भेदक तर कोणाचा आवाज मंजुळ. माझ्याशी एकदा फोनवरून एक अपरिचित गृहस्थ बोलले, त्यांच्या आवाजातलं कोवळेपण व मार्दव मला फोनवरूनदेखील जाणवले होते व नंतर त्यांचा परिचय झाला तेव्हा राकट दिसणाऱ्या त्या गृहस्थाचा आवाज इतका मृदुमधुर असावा याचे मला अतिशय आश्चर्य वाटले होते, ते आठवते. सांगायचं असं, की व्यक्तीही खूप तऱ्हेच्या दिसतात. त्यांच्या काही लकबीही असतात. भाषेच्या किंवा तुझ्या 'बाईच्याप्रमाणे गळचातील माळ चाचपणे, अगर किल्ली फिरवणे, विचारात पडल्यावर एखादे बोट कपाळाला टेकणे, मनासारखे बोलणे ऐकले की चुटकी चुटक्न वाजवणे...अशा कित्येक सवयी, त्याही संवादांबरोबर ध्यानी भरतात किंवा निदान लेखकाच्या ध्यानात त्या आल्या पाहिजेत, असंच म्हणणं बरं. व्यक्तिदर्शनाच्या फार कठीण अशा विषयाला ह्या सजीव व्यक्तींच्या निरीक्षणाने फार मोठा सत्याचा पाया लाभतो. प्रो. फडक्यांच्या काही कादंबऱ्यांत अशा माणसाच्या स्वाभाविक सवयी, लकबी व सहजोद्गार यांचा फार समर्पक उपयोग करून घेतलेला आहे व त्यामुळे त्यांच्या लेखनसृष्टीतली काही माणसे अगदी खऱ्या सारखी वाटतात.

अलका, तुला वाटेल की फक्त व्यक्तीपुरतीच निरीक्षणाची व्याप्ती लेखकाने ठेवावी म्हणून ! छे ग, तसं मुळीच नव्हे. वातावरणाचेही निरीक्षण उत्तमप्रकारे करावे लागते. लहानसे गाव नव्याने पाहिले, तर, तेथे गेलो, त्यावेळी कोणता ऋतू होता ? झाडे कोणकोणती होती ? ती फुलायच्या रंगांत होती की पानझडीच्या बेतात होती ? नदी असेल तर तिच्या तीरावर एखादे देऊळ होते काय ? पूल होता की नाही, पाखरं नदीत पाणी प्यायला उतरत असली तर ती कोणती, कशी ? आकाश कसे दिसत होते ? ढगाळलेले, स्वच्छ की गुलाबी ? ती वेळ कोणती होती, सारे काही नजरेत

सामावता आले पाहिजे ! आणि कंजूष माणसाप्रमाणे नुस्ता संचय करून नाही लेखकाचे चालत ! त्याने हे स्मृतिधन वापरलेही पाहिजे बरं का ! समज तुझ्या लेखनात तुला अशावेळी एखादा प्रसंग घडलेला दाखवायचा असेल तर हे असले निरीक्षण तुला येथे जरूर उपयोगी पडेल. नाहीतर कल्पनेने लिहिलेले वातावरण पुष्कळदा असंभाव्य ठरते व आपल्या लिखाणाचा कस उतरतो. तुला माझेच एक उदाहरण सांगते हवे तर. माझ्या अलीकडच्या एका कादंबरीत मी ग्रामीण जगताचं वर्णन केलं होतं. त्यात:–

'शेवरीच्या कापसाची बोंडे उलून त्या म्हाताऱ्या वाऱ्यावर तरंगत होत्या !'

असा एक उल्लेख होता. घरची शेतीवाडी लहानपणापासूनच पहात आलेले एक आमचे मित्र हे हस्तलिखित वाचताना म्हणाले – 'हे चुकीचं आहे बुवा. तुम्ही लिहिलंय त्यावेळी शेवरीची बोंडं उलत वा तडकत नाहीत! अन् उसाचे उंच निळे तुरेसुद्धा वर्षात नक्की केव्हा दिसतात, त्याची आधी खात्री करून घ्या. तोही तुम्ही दिलेला महिना चुकला आहे.' आणि मग मी त्यांच्या साहाय्याने त्या दुरुस्त्या केल्या. तात्पर्य असं की आपण शेतीवाडी केलेली माणसं नव्हे. तेव्हा ते उल्लेख करायचे असले तर काळ, वेळ व पिकांची परिस्थिती याची 'चक्षुर्वैसत्यम्' अशी निरीक्षणाने जमवलेली सामग्री आपल्या हातात हवी. नाहीतर, त्यातल्या दर्दी माणसाला विचारून तरी ती मिळवून घ्यावी. हे मी शिकले. तेव्हा सृष्टीनिरीक्षणही हवे, ते अगदी बारकाईचे हवे, इतकेच नव्हे तर त्याच्याशी स्थळ, काल, वेळ, ऋतुमान यांचे आणि झाडे, पिके, फळे,फुले, आकाशदर्शन यांचेही नेमके गोत्र जमले पाहिजे.

तर असा आहे हा पसारा निरीक्षणाचा. पण म्हणून भांबावून जायला नको. आपला व्यासंग हळूहळू वाढतो तद्वत् हे क्षेत्रही हळूहळू व्यापक होत जाते– आपल्या आपणच. मनाला तशी सवय मात्र लावून घे एवढंच. हो बरी आठवण झाली. एक सूचना, तू हे निरीक्षण करताना लोकांच्या लक्षात येईल इतके व्यक्तींकडे टक लावून बघत राहू नकोस हं ! नाहीतर गैर-समाजाचे धक्के उत्पन्न व्हायचे उगीच व मी हे शिकवले म्हणून माझ्याकडेही

दोष यायचा ! इतरांना नकळत चतुराईने आपण ही सामग्री जमा करायची हेच धोरण ठेव अलका तूर्त इतकेच,...

पुढचे पत्र तुझे उत्तर आल्यावर लिहायला घेईन व त्यांत माझ्या अनुभवाचे काही बोल तुला लिहीन म्हणतेय. पाहू या काय जमतं ते.

तुझी–
सौ. ताई.

□ □

५. अनुभवाचे विश्व–

प्रिय अलका–

अग, लेखनाला तू खरोखरीच आरंभ केला आहेस की काय ? सुटीत तू इथे असताना 'मी कथा लिहिल्या आहेत एक दोन' असं म्हणाली होतीस, आणि आज तर पोस्टाने त्या पाठवूनही दिल्या आहेस ! खरे म्हणजे पहिल्या वाङ्मयकृती क्वचितच निर्दोष असतात. ते शिकाऊ धडे आहेत, असेच समजणे बरे, पण शितावरून भाताची परीक्षा सुग्रण स्त्री करू शकते. तद्वत या प्रयत्नावरून तुझ्यात लेखनांकुर जागे होत आहेत व तू जमेल तशा कथा धडाक्याने लिहू लागणार हे मात्र मी ओळखले. पण का ? कथाच का प्रथम ? याला तू काय उत्तर देशील ? तुला सुचत नसले तर मी देते ते ! तुझीच ही गोष्ट आहे असे नव्हे, तर अनेकजणांचीही हीच प्रवृत्ती मला दिसून आली आहे. बहुतेक नवोदित लेखक कथेनेच आपल्या लेखनाचा श्रीगणेशा करतात ! कारण स्पष्ट आहे. कथा लिहायला सोपी वाटते. सुरुवातीला आपण ती चटकन् लिहू शकू, अशीही कल्पना व धारणा होते, पण तुला खरं सांगू का ? जी दिसायला सोपी पण लिहायला अवघड असते ना, तिचं नाव कथा !

पण ते राहू दे. कथेबद्दल मी तुला सविस्तर पत्रे लिहिणार आहेच नंतर, तेव्हा ते सारं, बघू. या पत्रात परत मी आज लेखकाच्या पूर्वतयारीतल्या

वेगळ्याच एका बाबीबद्दल लिहीन म्हणते.

अलका, एक ध्यानी ठेवायचं, लेखनाला खरोखरीच प्रारंभ करण्यापूर्वी काही सामुग्री हाताशी आणि मनःकोषात असावीच लागते. एखाद्या नव्या वधूने सासरी स्वयंपाकघरात, एखादा जिन्नस करून बघण्यासाठी पाऊल ठेवलं व तेथे धान्यधुन्य, तिखटमीठ, मसाले असं काहीच नसलं, सगळी कपाटं, कोठीघरं मोकळीच असली तर ती पाकसिद्धी कशाची करील ? सांग. या स्वयंपाकसाहित्याप्रमाणेच लेखनालाही हाताशी वेगवेगळं 'साहित्य' असायलाच पाहिजे, तर चांगली लेखनकृती निष्पन्न होईल. 'अय्या ! ही कसली आणखी सामुग्री अन् लेखकाला कसलं आलं आहे साहित्य ? एक फौंटनपेन अन् कागद एवढी सामुग्री बस्स् होते उलट !'

असे थट्टेचे उत्तर तुझ्या ओठावर आलेले मला इथूनसुद्धा जाणवते आहे ! अग, तेच तर मला आवर्जून सांगायचं आहे तुला.

लेखनकला इतर कलांप्रमाणेच एक कला असली तरी तिचे दृश्य रूप अगदी साधे असते...इतर कला बघ ! संगीताचीच गोष्ट घे, उदाहरण म्हणून गायक उत्कृष्ट असला तरी त्याला पेटी. तबला यांची साथ पूरक म्हणून आवश्यक आहे. चित्रकलेला मूर्तरूप येण्यासाठी पुष्कळदा चित्रविषय प्रत्यक्ष समोर असावा लागतो. तसं कुठं असतं या लेखनाचं ? पण उलट असं की, ही दृश्य सामुग्री लेखनकलेला लागत नाही खरी, पण दुसरी काही अदृश्य सामुग्री लागते व तीही स्वतः लेखकालाच जमा करावी लागते– कणाकणाने आणि तेच कठीण काम होऊन बसते ! मागल्या पत्रात या अदृश्य सामुग्रीपैकी 'बहुश्रुतपणा' मिळवण्याचा, ग्रंथवाचन हा एक उपाय मी सुचवलेला आहेच तुला ? आज तशाच दुसऱ्या एका उपायाबद्दल काही लिहिते.

अलकनंदे, तू जे लिहिशील ते सर्वस्वी काल्पनिक असणारच नाही, खरं ना ? त्याला कोठे ना कोठे सत्याचा आधार, वास्तवाचा रंग आणि अनुभवाची साथ असणारच ! उदा. तू लिहून पाठवलेल्या दोन गोष्टीच पाहा ना ? कॉलेजात नव्यानंच प्रवेशलेल्या एका छोटया गावातल्या तरुणीचं मन त्यातल्या एका गोष्टीतून चांगलं प्रकट झालं आहे. आणखी, मी ओळखलं बरं का ! ते मन त्या कथानायिकेचं नव्हे, तर हा नवीनतेचा

अनुभव घेणारी मुलगी स्वतः तूच होतीस, खरं ना ? त्यावाचून त्या कथानकात एवढी समरसता उतरणं कठीणच. तेव्हा 'ही कसली सामुग्री ?' या प्रश्नाचं उत्तर नकळत तुझं तूच शोधून काढलं आहेस. होय, अनुभवांची समृद्धी हीच ती पहिली सामुग्री !! पण त्याबद्दलही थोडा व्यापक आणखी सखोल विचार करणं ही लेखनाची एक उत्कृष्ट पूर्वतयारी आहे. तू पुढे कथा-कादंबरी लिहिणार असे एक मधुस्वप्न नजरेसमोर वागवूनच आपण बोलू या. तुझ्या कथा-कादंबऱ्यांतून कितीतरी प्रकारच्या व्यक्ती येणार. अनेक काल्पनिक माणसे त्यांत अवतरणार. समाजाचेच ते चित्रण. त्यात राणी असेल, मोलकरीण पण असेल, सरदार, जहागीरदार असतील, तसे कारखान्यातले कामगारही असतील ! शिक्षिका, प्रोफेसर, गायक, नर्तिका, दुकानदार, भाजी मार्केटमधला फळवाला, तसेच रिक्षावाला, वैमानिक, गृहिणी वा प्रौढकुमारी... असे समाजातले विविध घटक तू रंगवणार, खरे ना ? मग या सर्व भूमिकांचा अनुभव एकाच लेखकाला सर्व आयुष्य खर्च करूनही घेता येईल का ? तूच बघ. अर्थात वेळेला एखादा माणूस रावाचा रंक वा संत्र्याचा मंत्रीही होऊ शकतो, नाही असे नाही. पण असे उदाहरण फार विरळ, हजारात एखादे; शिवाय या दैवाच्या चढउताराचा अनुभव घेणारी माणसे स्वतः लेखक असतातच, असं थोडंच ?

अलका, मी जी अनुभवाची सामुग्री असावी म्हणते, ती केवळ स्वानुभवाची नव्हे, हे तुझ्या आता नीट लक्षात येईल. अर्थात काही स्वतःचे अनुभवही तू चित्रित करू शकशील व त्यात आत्मीयताही अधिक प्रकर्षाने उमटेल हे खचित पण ते काही असले, तरी एका व्यक्तीच्या अनुभवांचे क्षेत्र समाजजीवनाची व्यापकता वर्णन करायला थिटे पडते हेच खरे. तेव्हा या अदृश्य सामुग्रीतला फार मोठा भाग अनुभवाचे क्षेत्र हा असून त्यातला एक लहानसा विभाग स्वानुभूती हा आहे, अशी तू मनाशी खूणगाठ बांधून ठेव.

अर्थात दुसऱ्या दृष्टिकोनानेही आपणाला ही अनुभूती प्राप्त करून घेता येतेच– ती म्हणजे दुसऱ्याच्या अनुभवांचे मनन चिंतन करून. तुला आठवतं का, पुण्याला आपण सुधीर फडक्यांचे 'गीतरामायण' ऐकायला गेलो होतो एकदा, सीतात्यागाचा प्रसंग गीतांतून रंगला होता–

'सरले जीवन, सरली सीता,
जगेन रघुकुलदीपा करता–
फल धरी रूप, हे, सुमन मिटे !'

हे सीतेचे शब्द कानांवर पडत होते व कित्येक श्रोत्यांच्या डोळ्यांत आसवे चमकत होती ! सांग अलका, त्या हजारो वर्षांपूर्वीच्या प्रसंगाच्या हकीगतीशी आपल्या मनाने इतकं जवळीकीचं नातं कसं जोडलं ? किंवा एखादा चित्रपट आपण पाहतो, त्यात हृदयाला भिडणारे काही प्रसंग असतात, काही शोकान्तिका असतात, ते पाहून आपले मन व्यग्र होते, ही कशाची खूण ? चित्रपटाचे कथानक तर सर्वस्वी कल्पित असते तरी एवढी तद्रूपता ?

तर या साऱ्याचं कारण एकच, परानुभूती असली तरीही मनाचा धर्म तिच्याशी समरस होण्याचा असतो हेच.

जिथे भावनोत्कटता प्रत्ययाला येते, तिथे मनाचे धागे गुंततात, विचारांचं विश्व जागं होतं आणि लेखनाचा पिंड असेल तर अशा वेळी लेखकास नवी प्रेरणा, नवी स्फूर्ती पण मिळते. तेव्हा 'अनुभवांची समृद्धी' या विषयाची नोंद मनाशी करताना तू प्रथम अगत्याने, स्वानुभूती आणि 'परानुभूतीचा प्रत्यय घडलेली अनुभूती' अशी दुहेरी नोंद कर, विसरू नकोस. ही परानुभूतीची मिळकत कशी प्राप्त होते याची काही उदाहरणे मी वर दिलीच आहेत. वाचनाचे महत्त्व मी तुला मागे समजावून दिलेले आहेच, पण आणखीही एक प्रकारचे वाचन उपकारक ठरते, ते म्हणजे काल्पनिक का होईना, पण इतर व्यक्तींच्या अनुभवांचे वर्णन त्यात येते– असे की जे वाचून आपल्या मनावरही त्याचा ठसा उमटतो. लेखकाची लेखणी कुशल असेल तर ती वाचकांना वर्णित व्यक्तींच्या जीवनातील अनुभवांचा समरसतेने प्रत्यय घडवू शकते. तुझे स्वतःचेच उदाहरण घे हवे तर. वाचनविश्वात तू किती रंगून जातेस ? नायक-नायिकांच्या सौख्यवर्णनाने तू सुखावतेस व त्यांच्या हाल-विपत्तींनी तुझे डोळे ओलसर होतात, हे मी कितीदातरी पाहिले आहे. परानुभूतीचा प्रत्यय अशाप्रकारे अप्रत्यक्षरित्या आपल्या मनावर घडतो, पण म्हणून तो कमी महत्त्वाचा नव्हे, हे सूत्र ध्यानात ठव.

परानुभूतीची ही ठेव वा मिळकत वाढविण्याचा आणखी एक फार चांगला पण तेवढाच अवघड मार्ग आहे. तो म्हणजे स्वतःच्या स्वभावाची स्नेहशीलता ! तुला हसूच येईल हे वाचून. स्वतःच्या स्वभावावर का कुठे लेखनाचे यशापयश अवलंबून असते ? असेही तू थट्टेनं विचारशील ! पण मी जो स्वभावाचा एक वेगळा गुण सांगते आहे, त्यावर लेखनाचे नसले, तरी कथाबीजे मिळवण्याचे कसब मात्र जरूर अवलंबून आहे, अलका, मला स्वतःला तो अनुभव आलेला आहे. प्रथम मलाही कशावर कथा लिहावी, असा थोडाबहुत संदेह उत्पन्न होई. माझे वयही त्या वेळी तुझ्याएवढेच होते व अनुभूतीचे क्षेत्र तर अगदीच नगण्य ! पण मग हळूहळू आसपासच्या स्त्रीजगात मी रमू लागले. त्या स्त्रिया खेडूतच. पण उत्तम मैत्रीचे मोल त्याही जाणत होत्याच. मी माझ्या सभोवारच्या अनेक स्त्रियांची मैत्रीण झाले, आमच्यात जिवींची हितगुजे होऊ लागली व त्यातूनच एकेकीचे वेगवेगळे अनुभवाचे विश्व मजपुढे शब्दाकार घेऊन प्रकट होऊ लागले. अलका, तुला कल्पनाही नसेल, स्वतःच्या जीवनातले भावनोत्कट प्रसंग सांगताना, माणूस किती तन्मयतेने बोलतो, त्याची ! पण मी तो अनुभव घेतला आहे– एकदाच नव्हे, अनेकदा. त्या मैत्रिणींच्या खऱ्याखुऱ्या अनुभवातून माझ्या लेखनविषयांची जरूर समृद्धीही झालेली आहे. तुझ्याभोवती ग्रामीण युवती नाहीत, मान्य, पण रेसीडेन्सीत राहायचे म्हणजे किती वेगवेगळ्या प्रकारच्या व समाजातल्या भिन्न भिन्न थरातल्या मुली तेथे एकत्र येतात ! त्यांच्याशी तू स्नेह जोडू शकशील व एकेकीच्या जीवनग्रंथातली वेगवेगळी पाने तुला वाचायला मिळतील. तुझे अनुभूतीचे क्षेत्र त्यामुळे वेगळे असूनही निश्चित वाढू शकेल. आलं ना ध्यानी ? परानुभूती असली तरी तीही सुंदर शब्दांत लेखकाला मांडता येते. चंद्र परप्रकाशी असला, तरीही त्याचे चांदणे सौम्य व अल्हादक असतेच ना ? तसेच हे. तेव्हा लक्षात ठेवायचे ते हे :–

लेखन तीन तऱ्हांनी समृद्ध करता येते, (१) स्वानुभूती (२) परानुभूती (३) काल्पनिकता.

पैकी परानुभूतीचा तुझ्या दुसऱ्या गोष्टीत तू स्वतःला नकळत अवलंब केलाच आहेस. त्या गोष्टीत एका चंचल कॉलेज तरुणीचे स्वैर जीवन व त्याचे दुष्परिणाम तू छान वर्णिले आहेस. तू इथे असताना तुझ्या मैत्रिणीं-

बद्दल बोलत होतीस. त्यावरून तुझी ही 'चंचला' कोण आहे, तेही मला न सांगताच समजले, तेव्हा याबद्दल तू अधिक अभ्यासू वृत्ती ठेव. इतकेच मी तूर्त सुचवीन. या बाबतीत इतर प्रसिद्ध लेखक काय म्हणतात, तेही जरूर मनन करण्यासारखे आहे. उदा. प्र. के. अत्र्यांचे शब्द बघ हवेतर–

> 'विराट समाज पुरुषाच्या विविध स्वरूपावर वाङ्मय रचण्यास विविध प्रतिभेचे कुशल लेखक हवे आहेत. ह्या लेखकांना त्या त्या गोष्टींचं ज्ञान हवे, अवलोकन पाहिजे, अनुभव पाहिजे व कल्पनाही पाहिजे.'

पाहिलेस ना अलका ? आतापर्यंत तुला पत्रं लिहिली, त्याचे सारच या प्रसिद्ध लेखकाने थोडक्यात दिल्यासारखे वाटते की नाही ? आता काल्पनिकतेचा शेवटचा (किंवा आद्य म्हण पाहिजे तर !) मुद्दा. पण ते सारे या पत्रात सांगायचे, म्हणजे सारे लेखनशास्त्र चार शब्दांत सांगू पाहण्यासारखेच ! तो मोठा विषय. त्यासाठी मी तुला स्वतंत्र पत्र लवकरच लिहीन. तोपर्यंत तुलाही थोडा विसावा अन् मलाही जरा विश्रांती मिळेल, ती हवीच, नाही का ?

तुझी–
सौ. ताई.

□ □

६ कल्पिताची सृष्टी

प्रिय अलका–

मागल्या पत्रात मी तुला लेखनाच्या तीन तऱ्हा सांगितल्या होत्या· स्वानुभूती, परानुभूती व काल्पनिकता, आठवतं ना ? आज त्या शेवटच्या विभागावद्दल– काल्पनिकतेवद्दल– तुला थोडीफार 'कल्पना' द्यावी असं मनात आहे.

मी त्या पत्रात म्हटलं होतं की लेखक जे लिहिणार त्याला कोठेना कोठ, सत्याचा आधार, आणि वास्तवाचा रंग असतोच, अनुभवांची साथही असते. होय ना ? पण आणखी एक गोष्ट यात दाखल करायला हवी. ती म्हणजे कल्पनासुंदरतेचे लेणे. या लेण्यावाचूनचे लेखन म्हणजे अगदी फिकेफिके, नीरस, असेच उतरणार. तुला ही गोष्ट मान्य करायला हवी की, ललित-लेखन म्हणजे अनेक वेळा कल्पिताचे मनोरेच असतात. अर्थात त्यात सौंदर्य उत्पन्न व्हावे म्हणून त्याला वास्तवाची बैठक घातली जाते. पण पुष्कळ लेखक याही गोष्टीला तयार नसतात. त्यांचे म्हणणे, कल्पित कथानक बोलूनचालून ! त्यात वस्तुनिष्ठता ऊर्फ वास्तवाची लुडबूड हवीच कशाला ? आणि प्रख्यात लेखक सॉमरसेट मॉम यांचे उद्‌गार ध्यानी घेण्यालायक आहेत याबाबत. ते म्हणतात–

'जे लेखक आपली पात्रे काल्पनिक आहेत असे म्हणतात ते

स्वतःला तरी फसवतात अगर वाचकांना तरी !'

अर्थात हे साहित्यशास्त्रावरचे इंग्रजी ग्रंथ तू स्वतःही वाचू शकशील. व त्यात तुला या लेखन कलेबद्दलची कितीतरी प्रमेये व स्वानुभवाचे बोल वाचायला मिळतीलच, तूर्त लक्षात ठेवायचे ते हे की, परानुभूती व स्वानुभूती यातून जसा कथानकाच्या कल्पनेचा जन्म होतो, तशीच त्या कल्पनेची वाढ, काल्पनिक विचारसृष्टीतूनही होते, आणि ह्या कल्पिताचा साज चढविल्याविना लेखनात रससौंदर्य निर्माण होतच नाही !! समजा की एखाद्या माणसाच्या हाती काही सुंदर फुलझाडांची बीजे कोणी दिली, पण ती फुलवावी कशी, रुजवावी केव्हा, किती पाणी घालावे, हेच त्याला कळले नाही, आणि मशागत व जोपासना यांचे धोरण त्यांच्याकडून मुळीसुद्धा पाळले गेले नाही तर त्या बीजांचे अंकूर मूळ धरतील का ? तेथे माळ्याचंच मन असायला हवं. तशीच ही या कथाबीजांची गोष्ट. ती आपल्याला समाजातून मिळतात, वाचनातून मिळतात, कल्पनेच्या साम्राज्यातूनही हाती येतात काहीवेळा, पण त्यांना जतन करून वाढवावे कसे, ही एक अतिशय कुशलतेची पण अवघड गोष्ट आहे. कल्पकतेचीच सारी विश्वामित्री सृष्टी, मान्य, पण तीही प्रयत्नाने रम्य करता येते, कलात्मकतेने तिला मोहकता देता येते. अलकाताई तुला वाटेल, लेखक जसे जग पाहतो तसेच रंगवतो का ? आणि त्याने तसेच रंगवावे का ? तर, तसे नसते व नसावेही ! जशी माणसे दिसतात, जशा वस्तू दिसतात, परिस्थिती, प्रसंग जसे घडतात, तसेच्या तसे उचलून शब्दरूपात आपल्या वहीवर ठेवणे, यात लेखकाची कसली आहे कर्तबगारी ? अन्यांनी तर स्पष्टच म्हटले आहे की,

> 'जसे घडते तसे वर्णन करायला चातुर्याची किंवा बुद्धीची फारशी गरज नाही. व वाङ्मय ही वस्तूंच्या वर्णनाची जंत्री पण नव्हे !'

या परखड मतातला दृष्टीकोन तू नेहमीच ध्यानी ठेव. याबाबत मला चित्रकाराचे उदाहरण देता येईल. एखादी कोळीण मासे धरताना तू पाहतेस, किंवा एखादी स्त्री जलभरणाचे काम करतानाही अनेकदा दिसते, या बायका तुला एरवी चित्तवेधक वाटतात का ? पण तेच चित्रकार दलालांच्या कुंचल्यांच्या रंगस्पर्शाने यांच्या चित्रात केवढा मोहकपणा येतो ? फार काय,

परवा आपण एक चित्रप्रदर्शन पाहायला गेलो होतो. दाराशी एक भिकारीण अंगावर मूल पाजीत येणारा-जाणारांपुढे तोंड वेंगाडून भीक मागत होती. तिकडे कोणाचे लक्षसुद्धा गेले नव्हते ! पण त्या प्रदर्शनातले पहिल्या नंबरचे चित्र होते भिकारणीचेच– 'याचना' नावाचे.' त्यातल्या रंगांमुळे ते चित्र किती सुरेख दिसत होते, ते तुला आठवत असेलच. सत्याहून चित्र उत्कट का आणि कशाने झाले, सांगू ? दुसरे काही नाही, वास्तवाला कलात्मकतेचा जादूचा हात लागला होता चित्रात. अन् तोच आपले मन वेधून घेत होता. बस्.

लेखनातही हीच किमया होते. वास्तवातली पात्रे येथे येतात पण तशीच्या तशी नव्हे, तर लेखकाच्या कल्पिताचे रंग लेवून. त्याच्याच विचारांचे मुलायम वस्त्र परिधान करून, आणि त्यात कमावलेल्या भाषाशैलीनं अलंकृत होऊनच, मग ती अतिशय आकर्षक वाटू लागतात. त्यात एकप्रकारचे चैतन्यही भासू लागते ह्यात नवल थोडेच ?

आणि हे सारे, लेखकाच्या कल्पकतेची, कलात्मकतेची जी जोड लेखनाला मिळते ना, त्याचमुळे ! पुष्कळदा कादंबरी वाचताना वाटतं, अमूकतमूक व्यक्तीवरून तर ही लिहिली नाही ना ? कल्पितातून असा सत्याभास निर्माण होणे ही त्या कलात्मक लेखनाची एकप्रकारे कसोटीच. मागे एकदा, 'दुरितांचे तिमीर जावो' या नाटकात, मामा पेंडसे यांनी दिगंबराच्या (नायकाच्या) दुष्ट मेहुण्याची भूमिका केली होती. तो दुष्टपणा त्यांच्या हावभावात, शब्दात, दृष्टीत, आवाजात इतका भिनलेला दिसत होता की, प्रेक्षकांना फारच चीड आली व एकाने तर एक जोडाच त्यांना रंगभूमीवर संतापून मारला ! पण मामांच्या शब्दात 'आज माझ्या भूमिकेला योग्य न्याय मिळाला, प्रेक्षकांना मी इतका दुष्ट वाटलो !' अशी यावद्दलची प्रतिक्रिया होती.

तर काल्पनिकतेतून सत्याभास उत्पन्न करणे हे लेखनातले मोठे यशाचे गमक आहे. मात्र लक्षात ठेवायचं असं की, सत्य व्यक्तींची ही वर्णनं नाहीत. 'जी वाचताना खूप ओळखीची, निश्चित कुठेतरी पाहिलेली अशी व्यक्ती वाटते पण नीट ओळखू येत नाही ती सुरेख जमलेली व्यक्तिरेखा' असा स्थूल नियम समजायला हरकत नाही तुला.

पण एक ध्यानी घे. याबाबत सत्य व काल्पनिक यांचे मिश्रण करावयाचे तेही मोठ्या कुशल हातानेच. डॉक्टर रोग्यांना औषध (मिक्शर) देतो त्यात किती तरी औषधी द्रव्ये असतात. पण ते मिश्रण योग्य प्रमाणात व जरूर आरोग्यदायी केलेले असते. तशी जाण या मिश्रणातही लागते. तू हरी नारायण आपट्यांचे 'पण लक्षात कोण घेतो ?' वाचले आहेसच. त्यातले 'शंकरमामंजी' हे पात्र फार वैशिष्ट्यपूर्ण व प्रभावी झाले आहे. ते व्यवहारातल्या कोठल्या 'शंकरमामंजी'चे शब्दचित्र असेल ? अशाप्रकारच्या चर्चा त्यावेळी होत होत्या. आणि त्याला स्वतः ह. ना. आपट्यांनीच दिलेले उत्तर मोठे लक्षणीय व उद्‌बोधक आहे. ते म्हणतात–

> 'शंकरमामंजी हे एका माणसाचे चित्र नाही. अनेक माणसांच्या स्वभावातल्या खुळांची खिचडीच ती ! ती स्वादिष्ट करण्यासाठी किती मसाला घालायचा, ते इतर कादंबऱ्यांच्या मार्मिक वाचनाने व स्वतःच्या अवलोकनाने मी ठरवले व सुदैवाने ती चांगली साधली !'

अगदी हीच विचारसरणी एका चित्रकाराची पण आहे. त्याने एकदा एका अतिशयच सुंदर रमणीचे चित्र रेखाटले. मग, ही अशी देखणी, मनोहर स्त्री तुम्हाला मॉडेल म्हणून कोठे आढळली ? म्हणून कोणी प्रश्न केला. त्यावर त्या चित्रकारानं हसून सांगितले–

'ही 'चित्रा' मला एका जागी आढळलेलीच नाही. हिचे इतके मोठे, काळेभोर केस मी मदुरेत पाहिले. हे भावूक डोळे बंगालमध्ये मला दिसले, हा गुलाबाच्या फुलांचा टवटवीत रंग तर काश्मिरमधून मी आणला ! आणि सौंदर्य वाढवणारी ही वस्त्रभूषा महाराष्ट्रातून मिळाली मला !' किती सार्थ होतं त्याचं बोलणं ? बघ.

तर अलकनंदा, ललित लेखकसुद्धा अशा प्रकारचे व्यक्तीसौंदर्याचे, स्वभावविशेषांचे वेगवेगळे नमुने प्रथम चोखंदळ दृष्टीने मनात साठवितो व त्यातून स्वतःचे अगदी वेगळे, सुंदर व कल्पनारम्य चित्र तयार करीत असतो.

तेव्हा, हे लक्षात घे की चित्रकला व शब्द-चित्रकला यात पुष्कळसं साम्य आहे. चित्रविषयात मूळचे रंग बदलून कलात्मक रंग भरावे लागतात. शब्दचित्रातही तेच करावे लागते. दुसरे साम्य, चित्रविषय सुंदर ठरेल असा

निवडावा लागतो. तसा लेखनविषयही प्रभावी ठरेल अशी आपल्याला कटाक्षाने निवड करावी लागते. भावदर्शनाला चित्रात जरूर स्थान असते, तसेच ते कथाचित्रांतही असते. पार्श्वभूमीला चित्रकार जरूर महत्व देतो, लेखकानंही ते दिलेच पाहिजे ! थोडक्यात म्हणजे, उत्तम व्यक्तीचित्र फलकावर उतरते ते शब्दावाचूनचे चित्र व शब्दकला लेऊन कागदावर उतरते ते अमूर्त भावचित्र !

लिहिता लिहिता पत्र मोठेच झाले, पण शेवटचा एक महत्त्वाचा मुद्दा लिहिते. अन मग हे लांबलेले पत्र संपवते.

मूळ मी 'काल्पनिकता' यावर लिहितेय, होय ना ? ही कशी वाढवावी ? दिसायला सोपा पण उत्तराला मोठा अवघड प्रश्न. काल्पनिकतेचं शिक्षण असं दुसऱ्यानं देऊन जमत नाही, स्वतःलाच पुढेपुढे उत्तम कल्पना स्फूर्त होतात. पण, तू या अभ्यासात तूर्त नवशिकी आहेस म्हणून थोडे सूचनात्मक सांगते काही. परवा इथल्या रामाच्या देवळात दोन उतार वयाच्या बायका बोलत होत्या. त्यातले एकीचे एक उदास वाक्य कानी आले– 'यापेक्षा देव लवकर माझे डोळे मिटील तर चांगले !' बस्स्. यावर माझ्या मनात किती कल्पना आल्या...तिची सून वा मुलगा धड वागत नसतील काय ? का वृद्धाश्रमात पोचवलं आहे हिला त्यांनी ? की तिला अपत्यशोक झाला असेल ? का वृद्धपणी स्वतःच्या पोटाचीच चिंता ग्रासीत असेल, की एखादे असाध्य दुखणे आहे, हिला झिजवणारे ? की बिचारीला पैशापायी लुबाडले आहे नातेवाईकांनी ? का मुलगी वाईट मार्गाला लागली आहे ? का मुलगा हिप्पी होऊन नशेत पडून असतो हिचा ?...तुला हसूच येईल हे वाचून, पण व्यक्ती पाहिली, तिचे काही शब्द ऐकले, की लेखकाचा मनोवारू किती भरधाव जाऊ शकतो व किती प्रकारच्या कल्पना या मनात स्फुरू लागतात, याची ही छोटी झलकच !

येथे एका जुन्या वाळवोध कुटुंबाकडे एकदा गेले होते मी सहज. तेथे कुटुंबातला एक तरुण विषमानं एकाएकी संसाराच्या भरल्या ताटावरून उठून गेला होता– कायमचा. त्याची आई मला शांतपणे म्हणाली– 'त्याला तर काही इलाजच नाही. देवापुढे काय बोलणार ? पण आमची सूनबाईही कुठेशी दूर निघून गेली– शिक्षण व लग्न पुन्हा करायला, आम्हीसुद्धा काही

'नाही' नस्तं म्हटलं हो, विशीतली तर पोर, आम्हालाही ते कळतं की, पण सांगितलंन् सुद्धा नाही, जीव तुटतो तो त्यासाठी.' ते शब्द ऐकल्यावर मन बारा वाटांनी धावू लागले माझे. कुठे गेली ती अन् का ? शिकायला ? मूल असेल तर कसं काय ? अन् मग या एकटचा आईचं कसं काय ? ती सून दिसायला कशी असेल ? स्वभाव धड असेल की नाही ? एक ना दोन.

आणि अखेर मग या कल्पनेच्या गुंडाळीतून मी 'रेशीम धागे' नावाची गोष्ट लिहिली, तेव्हा मला बरे वाटले. गोष्ट काल्पनिकच पण पार्श्वभूमी सत्याची होती.

तर कोणाचंही वैशिष्टय ध्यानी आलं, की त्याबद्दल लेखकाने कल्पनेला स्वैर सोडावे. मनात हजार प्रश्न करावे, उत्तरे शोधावी, निदान उत्तरे द्यायचा काल्पनिक प्रयत्न करावा. आगगाडी, लोकलमध्ये तुटके संवाद कानी येतात. प्रेमात पडलेल्या मित्र-मैत्रिणींची चोरटी हालचाल व अकारण उमललेली वृत्ती दिसते, प्रोफेसर्सचे वेगवेगळे नमुने दिसतात, तुमच्या घरी तऱ्हेतऱ्हेची मंडळी येतात, बोलतात, नवे काही नित्य तू पाहतेस, ऐकतेसच,' या सर्व गोष्टी कल्पना-तरंगांना फार पोषक ठरतात तेव्हा अशाप्रकारे स्वतःच्या कल्पनेला किती तऱ्हांनी आकार देता येतो व येईल याचा अदमास घेत राहा. असल्या कल्पना-साम्राज्यातूनच कथानक तुझ्याकडे चालत येईल ! काल्पनिकतेचा हा प्रांत हस्तगत करणे कठीण असले, तरी अशक्य खास नाही हे आत्ताच 'लिहून' ठेव. पण आता कंटाळली असशील तू ? तेव्हा बाकीचे पुढच्या पत्रातूनच. कसेकसे लेखन प्रयत्न करतेस, ते मात्र कळव बरं का, नाहीतर मी आपली लांब लांब पत्रं इथून लिहितेच आहे अन् तुला ती नावडती होतच आहेत– असं व्हायचं उगीच !!

तुझ्या पत्राची वाट पाहणारी–

तुझी–
सौ. ताई

□ □

७ काय लिहू ? कसं लिहू ?

प्रिय अलका,

आज तुला एका महत्त्वाच्या विषयावर पत्र लिहिणार आहे. व हाही लेखनाच्या पूर्वतयारीतलाच एक भाग आहे. तुझा स्वभाव पडला अधिरा (तरुणपणी तो असायचाच !) तेव्हा तू डोळे मोठे करून म्हणणारच, की आता पूर्वतयारीच किती ? कीर्तनातला पूर्वरंगच असा लांबत चालला तर आख्यान केव्हा सुरू व्हायचं ? तर, हे पत्र या पूर्वतयारी विभागातलं शेवटचंच प्रकरण आहे, बरे का. मग आपण 'प्रत्यक्ष लेखन' याकडे वळणार आहोतच.

अलका या पत्राचं शीर्षक पाहिलंस ना ? काय लिहू ? कसं लिहू ? हा अष्टाक्षरी मंत्र प्रत्येक नवोदित लेखकांच्या मनात उभा राहण्याजोगा आहे. (अतिशय प्रतिभावंत लेखकांची उदाहरणे आपण अपवाद म्हणून बाजूला ठेवू या.) मला स्वतःला लेखनारंभी ह्या प्रश्नानं काही दिवस अडवलेलं होतं. अनेक नवोदित लेखक-लेखिकांची मला जी पत्रं येतात, त्यातूनही वरील दोन प्रश्न प्रामुख्याने विचारलेले असतात. तेव्हा, याबद्दल तुला आज थोडंसं लिहीन म्हणते आहे.

अलका, कसं लिहावं, हे एका वाक्यात लिहिण्याएवढं सोपं नाही व काय लिहावं हे एका पत्रात सामावण्याइतकं छोटं नाही– सोयीसाठी मी याचे

दुहेरी रूप कल्पिले आहे. भावनात्मक व अभ्यासात्मक. लिहावे काय व कसे ? दुसऱ्या प्रगल्भ शब्दात याचे स्पष्टीकरण, लेखनाचा विषय कोणता व आविष्कार कसा करावा, असे होऊ शकेल. आजकालची वाङमयसमीक्षा तू वाचीत असशीलच ? नसलीस तर कधीमधी जरूर वाचीत जा. त्यात 'आशय व अभिव्यक्ती' अशी दोन मोठी अर्थगंभीर नावेही याचसाठी उपयोगिलेली तुला दिसतील. खरोखर कोणाचेही लेखन उत्तम ठरायला या दोन्ही बाजूंची परिपूर्णता लागतेच. कोणत्या विषयाबद्दल लिहिणार, हा प्रश्न समजा सुदैवाने (किंवा प्रयत्नाने) सुटला तरी 'कशाप्रकारे हे सांगू ?' हा दुसरा प्रश्न नवोदितांची वाट अडवायला तयारच. तूच बघ, मूर्तीची कल्पना हृदयात ओतप्रोत भरून राहिली आहे, तिला लागणारी उत्तम दर्जाची मऊसूत माती हाताशी आहे पण मूर्ती बनवण्याचे शिल्प कसे करावे ? हा प्रश्न येणारच. सांगावेसे मनातून पुष्कळच वाटते आहे, अगदी उत्कट विचार कंठापाशी येऊन थबकले आहेत– मन अगदी उचंबळून येते आहे– मान्य, पण आविष्कारालाही जरूर महत्व आहेच ना ? कोणत्या शब्दांनी हा आविष्कार योग्य होईल हे बघायला नको ? इमारतीचा आराखडा तंत्रज्ञांनी सुंदर काढला, पण त्या इमारतीची प्रत्यक्ष बांधणी कशा कसबीपणाने पार पाडण्यात आली, हेही महत्त्वाचेच. तेव्हा लेखनाचा, काय व कसे या दोन्ही दृष्टींनी विचार व्हायला हवा.

पैकी काय लिहावयाचे या प्रश्नाकडे वळू. खरे म्हणशील तर या दोन्ही प्रश्नांची पद्धतशीर, तांत्रिक, शास्त्रीय दृष्टीकोनाची उत्तरे तुला देण्यासाठीच मी ही पत्रे लिहायला घेतली आहेत ! तेव्हा दरेक पत्रातून तुला लेखनाचे विषय व रचना याबद्दल थोडीफार माहिती कळणारच आहे, पण एक आहे, लेखनकलेला फक्त तांत्रिक किंवा शास्त्रीय अभ्यासच पुरेसा होतो असं कुठं आहे ? लेखक रंगवणार ते सारे मानवी भावभावनांचे जग ! अर्थात या कलेत हृद्यता भरू लागते ती या भावनात्मक लेखनानेच. समजा, चित्र-विषय उत्तम मिळाला आहे पण सुंदर व यथातथ्य रंग नकोत का भरायला त्या चित्रात ? सजीवतेची, प्रत्यक्षाची कल्पना त्यावरून यायला हवीच आणि ही लेखनातली बाजू अगदी महत्त्वाचीच आहे अलके. याबद्दल काही वाङमयसमीक्षकांनीही कटाक्षाने सांगितलेले आहे. उदा. मा. का. देशपांडे

यांनी 'साहित्य-साधना' नावाच्या एका ग्रंथात तर लघुकथा व लघुनिबंध यांना भावकथा व भावनिबंध ही नवीन नावेही या अभिप्रायानेच देऊन टाकलेली दिसतात. तेव्हा काय लिहावयाचे या प्रश्नाचे उत्तर 'मानवी जीवनातील भावभावनांचे वर्णन व त्याला अनुषांगिक घटना' हेच योग्य ठरेल.

आणि हे भावभावनांचे जग तरी एका तऱ्हेचे, किंवा छापातून सारख्या डिझाईनची रांगोळी उठावी तसे एकसारखेच असते, म्हणतेस काय ? छे, तसे तर मुळीच नाही. एक 'प्रेम' ही भावना घेतली तर त्याचेसुद्धा किती प्रकार असू शकतात बघ. प्रणय, पति-पत्नी प्रेम हे तर इथे प्रधानपद घेऊन बसलेलेच आहे ! पण याशिवाय बंधुप्रेम, अपत्यप्रेम, वत्सलता मित्रप्रेम, राष्ट्रप्रेम, मातृप्रेम, गृहप्रेम, मातृभूमीचे प्रेम असेही अनंत प्रकार आहेतच. विनोद म्हटला तरी त्यातही गालावर नाजूक स्मितखळी उमटवणारा, मार्मिक, बोचराझोंबरा, उपहासाने केलेला, दोषदिग्दर्शनासाठी केलेला, केवळ निर्मळ स्वरूपाचा, असे अनेक विभाग !

अखेर वाङमय तरी काय ? व्यक्तीचं, समाजाचंच एक शब्दचित्र की नाही ? या शब्दचित्रात भावरंग भरल्यानंच ते हृद्य होत असतं. प्रा. फडक्यांनी आपल्या प्रतिभासाधन ग्रंथातही 'काय सांगायचे, याचे उत्तर एकच, संसारात मनुष्य जो संग्राम प्रत्यक्ष करीत आहे, त्याचीच विविधांगे भावनांच्या व कलेच्या साजाने सजवून सांगायची' असे म्हटले आहे. तेव्हा, काय लिहायचं, या प्रश्नाचं आणखी एक (वरील साऱ्या घटनांना अनुषंगिक असं) सोपं उत्तर म्हणजे, लेखकाने स्वतःला पटले ते, मनाला आवडले अगर ओरबडीत राहिले ते, जे अनुभवले ते, जे जग त्यानं पाहिले ते, जी मानवी स्वभावाची विविधता त्यानं पाहिली, ऐकली असेल ती, स्वतःच्या हृदयाला स्पर्श करणाऱ्या घटना, शब्द, मनाला जागृत करणारे प्रत्यय, जे जे त्याला जाणवले, ते ते सारे स्वतःचे मानसिक जाणिवेचे विश्व त्याने साहित्यरूप करावं (अर्थात् लेखनाच्या काही मर्यादा ओळखून) असं मी म्हणेन.

काय लिहावं ह्याबद्दल जसं मी तुला सूचनात्मक सांगते आहे, तसं काय लिहू नये, याबद्दलही एक-दोन गोष्टी तू ऐकून ठेवलेल्या बऱ्याच. पहिली

गोष्ट म्हणजे लेखकाला स्वत:ला जे नीट माहिती नाही, त्या प्रांतातलं काही एक लिहायचं नाही, हा नियम मनाशी ठरवून टाकावा. जे कधी स्वप्नातही पाहिले नाही त्याच्या हकीगती लिहिण्याचे धाडस नव्या लेखकांनी तरी करू नये. ज्याने विमानप्रवास कधी केलाच नाही, अशा लेखकाने आपल्या कथेतल्या नायकनायिकांच्या आयुष्यातल्या काही घटना विमानात घडलेल्या दाखवल्या, तर त्यात शे-पन्नास चुका होणार व ह्या विमानातले माहीतगार वाचक त्या ओळखणारच ! मग ती कथा कितीही हृदयंगम असेना ? तिचे मोल वाचकाच्या दृष्टीने एकदम कमीच होते ! तेव्हा अनभिज्ञतेने काही लिहायचे नाही, हा महत्वाचा सिद्धान्त ध्यानी ठेव, तुला आवडलेली माझी एक कथा ' शूरा मी वंदिले ! ' ही गिर्यारोहक नायिकेबद्दल होती. ही कथा लिहिण्यापूर्वी गिर्यारोहण करून आलेल्या दोन मुलींना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या मुलाखती घेतल्या होत्या. मग त्या दोघींचे अनुभव एकत्र वर्णून माझी कथा निर्माण झाली. तर माहिती मिळवूनही कथा संपन्न होऊ शकते, पण ती माहिती इतकी अचूक असावी की अनभिज्ञतेचा निसटता संशयसुद्धा वाचकांना येता कामा नये !

आणखी एक लहानसा मुद्दा याबाबत सांगण्यासारखा आहे. अलका, तुला ही पत्रं लिहितेय ना, या निमित्तानं माझ्याही लेखनाची पहिली वहिली वर्षं माझ्या नजरेसमोर हलकेच येताहेत बघ. तुझी आताची संभ्रमित स्थिती मी फिरून एकवार अनुभवते आहे जणू. काही जुन्या घटनांची चित्ररिळे परत उलगडताहेत नजरेसमोर. मला एक घटना अजून आठवते त्यातली.

एका नामवंत लेखिकेला मी एकदा विचारलं.

' सध्या आपण काय लिहिताहां ? '

त्या म्हणाल्या– ' काहीही नाही ! कोणता असा मोठा नवा विषय आहे की ज्याला मी हाती घ्यावं ? जे काही लिहायला घ्यावं, त्यावर शेकडो लोकांनी आधीच लिहिलेलं आहे, मग मी तरी नव्यानं काय सांगू ? आणि नाविन्यच नाही ते कसलं आलंय् लेखन ? तो कालापव्यच आहे. म्हणून तूर्त लिहीतच नाही. '

अलके, हे त्यांचं बोलणं ऐकल्यावर मला एकदम जिन्यावरून खाली पडल्यासारखंच झालं. मी माझं इवलंसं लेखन या दृष्टीने तपासून पाहिलं

तर काय ? कोठल्याही दृष्टीचं नावीन्य कोणत्याही माझ्या कथेत नाही ! त्याच पति-पत्नी प्रेमाच्या, नाहीतर पुराणकालापासून वर्णित झालेल्या प्रणयाच्या कथा. मोठा उद्वेग आला, काहीएक लिहूच नयेसं उदासवाणं झालं काही दिवस.

पण आपल्या मनाचा एक मोठा छान धर्म आहे. ते बरोबर उलट विचारही करू लागते अशावेळी, व वृत्तीची उदासीनता नेटाने हटवू लागते. माझं मन मला म्हणू लागलं–

' पण नाविन्याचा निकष विषयाला कशाला लावते आहेस उगीच ? तसे तर सगळे विषय संतसाहित्यातही हाताळलेलेच ! ' आई ' ही गोष्ट सृष्टीच्या प्रारंभकाळी होतीच ना ? पण या ' जुन्या ' विषयावरच पर्लबक्ने ' मदर ' कादंबरी लिहिली, साने गुरूजींनी ' श्यामची आई ' लिहिले, माधव ज्यूलियननी ' प्रेमस्वरूप आई ! ' लिहिले, यशवंतांनी ' आई म्हणोनी कोणी ' लिहिले...आणि तरीही हे सर्व वाङ्मय लोकांना खूप आवडलं, ते का? सांग. त्याचं उत्तर हेच की, हा विषय सर्वांच्या परिचयाचा, आणि जिव्हाळ्याचाही होता, म्हणूनच त्यात साऱ्यांना अधिक आत्मीयतेचं दर्शन घडलं. तर नावीन्य विषयांत नसेना ? ते भाषाशैलीत असावे, नव्या शब्दलेण्यांच्या सजावटीत असावे, विचारसौंदर्य वेगळ्या तऱ्हेचे असावे, सुरेख असावे, आणि मांडणी नित्यनूतन असावी असं बघ, दगड, माती, लाकूड या मूलभूत गोष्टी जुन्याच, त्याच त्याच. पण त्यातून कुशल तंत्रज्ञ किती नावीन्यपूर्णतेने नटलेली शिल्पे, इमारती, वास्तू बांधतात ? तो विचार डोळ्यापुढे ठेवून प्रतिभेला उमलू दे! '

मनाचे हे मोठे व्याख्यान एका दमात मला ऐकावे लागले असे नाही. बरेच दिवस हे विचार मनात दृढमूल होतहोत आत्मसात होत होते आणि मग एक दिवस हे माझं औदासीन्य केव्हा व कुठे पळून गेलं कोण जाणे ! तर; काय लिहावे या लेखनाची वाट अडवणाऱ्या पहिल्या प्रश्नाबद्दल तुला पुष्कळच काही माहिती मी दिली आहे खरी, पण तू जर निष्ठेने लिहीत राहिलीस, तर, तुलाच आढळून येईल की हा प्रश्न तसा कठीण व पेचात टाकणारा नाहीच, कारण, व्यवहारात वागतानासुद्धा तुझ्या मनातली लेखिका जागृत असेल तर, आसपासच्या परिसरातूनही तुला लेखनायोग्य

विषय आढळू शकतील. मात्र तसे हे विषय वेचून घ्यायला नजर घारीची व तत्परता दाणे टिपणाऱ्या चिमणीची हवी, हेही ध्यानात असू दे.

आता या अष्टाक्षरी मंत्राच्या उत्तरार्धाकडे– कसे लिहू, याकडे– थोडे लक्ष पुरवू. कसे लिहावे याचा प्रकट अर्थ लेखनाचा आविष्कार कसा करावा हाच हाही, काय लिहावे या प्रश्नाएवढ्याच महत्त्वाचा शंभर मार्कांचा पेपर आहे बघ कसे लिहावे तर कलापूर्णतेने, कसे लिहावे तर आकर्षक शैलीने ! कसे लिहावे तर मनोहर भाषेने, कसे लिहावे तर सुंदर रचना दिसेल असे, अशी याची अनेक उत्तरे तुझ्या ओठवर आली असतील ? अगदी खरी अन् पटणारीच आहेत ही सारी उत्तरे पण त्या सर्वांचं विवेचन या एका पत्रात करणं शक्य होणार नाही, कारण हा विषयच तसा व्यापक आहे ना ! तथापि तुझ्या सर्व उत्तरांतच एकवटलेली एक-दोन छोटीशी उत्तरे मला सुचली आहेत. कसे लिहावे तर अभ्यासपूर्णतेने ! आणि हा अभ्यास कसा करावा ? याबद्दलचे अनेक प्रकारचे व विविध दृष्टिकोनातून केलेले विवेचन हळूहळू या पत्रसंसारात तुला जागोजाग पहायला मिळणारच आहे. तेव्हा ती पुनरुक्ती न करता मी आज या प्रश्नाच्या दुसऱ्याही एका महत्वाच्या उत्तराकडे वळते.

अलका, लिहावे कसे; तर तन्मयतेने, विषयाशी तद्रूप होऊनच ! सगळ्या चित्रवृत्तींचा लय लेखनाकडे लावूनच लिहिलं पाहिजे, तर ते उत्कट रस-सौंदर्याने अलंकृत होईल. एक प्रकारे समाधी लावण्याचीच, पण जरा सोपी तऱ्हा. मलाही बऱ्याच प्रयत्नांनंतर यात यश आलं आहे बघ, आता तर लिहिताना माझी मी नसतेच मुळी. माझे सारे व्यक्तिमत्व कोठेतरी दूर जाऊन बसते, मी माझ्या नायक-नायिकांच्या मनात शिरते, त्यांच्या डोळ्यांनी जग बघू लागते; त्यांच्या सुखदुःखाशी अगदी समरस होते. कधी जमतं, कधी एवढं जमत नाही! पण लेखकाला हे जमलं पाहिजे, तरच यशश्री त्याला माळ घालील एरवी नाही ! अर्थात ही तद्रूपता याहून किती पराकोटीची होऊ शकते, याचे एक उदाहरण कुठेसे वाचनात आले, फार मजेदार आहे बघ, फ्रेंच कादंबरीकार बालझाक याचे आहे ते. लेखन करीत असता नित्य तो आपल्या मानसकन्या-पुत्रांशी तद्रूप झालेलाच दिसे. एक दिवस तो दुःखाने आपल्या एका मित्राला म्हणाला,

'कळलं का तुम्हाला ? फ्रान्सिस वारली ! टोनीनं तिला नकार दिला आणि मग त्या हळव्या पोरीनं अंथरूण धरलं ते कायमचंच.'

मित्राला प्रथम काही समजेचना. टोनी कोण आणि ही फ्रान्सिस कोणाची कोण ? पण मग बाल्झाकच्या बोलण्यावरून लक्षात आले की तो त्याच्या चालू कादंबरीतल्या नायक–नायिकांबद्दल बोलत होता !

बघितलंस ना ? याचं नाव खरी तद्रूपता. अर्थात या अतीव प्रमाणात दरेक लेखकाला ही साधणं वा तिचं असं अनुकरण करणंही फार कठीण; क्वचित प्रसंगी हे अव्यवहार्यही ठरणारे व्हायचे, पण सुवर्णमध्य काढायचा म्हटले तर निदान लेखनाच्या वेळेस तरी आपण स्वत्त्व विसरून आपल्या प्रतिमासृष्टीशी मनाने एकरूप व्हावे, हेच योग्य. सुप्रसिद्ध चित्रकार पिकासो यांची चित्रं तू पाहिलेली आहेसच. तो एक उत्कृष्ट कलावंत मानला जातो. त्याचे निवेदन बघ हवे तर. तो म्हणतो–

'चित्रशाळेत प्रवेश करताना मी माझे शरीर बाहेरच सोडून आत जातो. जसं मंदिरात जाताना जोडे बाहेर ठेवतात ना ? तसं.'

किती थोडक्या शब्दांत मनानं कलेशी तद्रूप होण्याची आपली सवय त्याने वर्णिली आहे, नाही ?

तर सांगायचं असं की, वर्ण्य विषयाशी मनाचं तादात्म्य साधूनच लेखन व्हायला हवं. नुकतीच एक नामांकित लेखिका मला म्हणाली–

'एकाद्या नाटकात काम करणाऱ्या अभिनेत्रीहूनही आमचं काम अधिक कठीण आहे, कारण अभिनेत्रीला एकावेळी एकच भूमिका करावी लागते आणि आम्हाला ? एकाचवेळी कितीतरी स्वनिर्मित पात्रांच्या मनोभूमिकेत शिरून वेगवेगळे विचारदर्शन वाचकाला घडवणं प्राप्तच होऊन बसतं, भारी अवघड मामला.'

नीट विचार केला तर या शब्दांतले खरे तत्त्व आपल्याही प्रत्ययास येते. तूच बघ. आपल्या लेखनक्षेत्रात कितीतरी व्यक्ती, वारा नकळत घरात यावा, तशा चोरपावलांनी येतात ! कोणी महत्त्वपूर्ण, तर कोणी नायक–नायिकेला उठाव देणाऱ्या दुय्यम अशा भिन्न मनोवृत्तीच्या व भिन्न संस्कारांच्याही. या

इतक्या विविध व्यक्तींच्या मनोगतांच्या वेगळचाआगळचा छटा दाखवायच्या म्हणजे त्या त्या व्यक्तीच्या मनोभूमिकेशी लेखकाने एकरूप व्हायला नको का ?

दिसायला तरी अशक्यप्राय गोष्ट. पण अनेकांना ती साध्य झाली आहे; असेही दिसते. कशाने ? तद्रूपतेने. आणि कल्पकता ही लेखकाची खरी सखी या भूमिकेतही त्याला मदत करते, लिखित शब्दमूर्तीही अशा कल्पित भावलेण्यांनी ती नटवते की अगदी लाजबाब !

दुसरी बाब अशी की तद्रूपतेलाही अभ्यासानं स्थिरता आणता येते. तुझ्या मंगल आत्याची सहा–सहा इंच जाडीची भली जाडजूड, पुस्तकं तू प्रथम पाहिलीस तेव्हा तू म्हणालीस– ' बापरे ! ही एवढी पुस्तकं आत्या केव्हा, कशी वाचील अन् कधी डॉक्टर होईल कोण जाणे !' पण हळूहळू, रोज थोडा–थोडा त्या पुस्तकेश्वरांचा अभ्यास करून ती डॉक्टर झालेली तू पाहातेच आहेस. तर एकदमच प्रत्येक गोष्ट साधली पाहिजे, वा आली पाहिजेच, अशी माझी घाई अगर सक्ती नाही हं ? जे प्रयत्नाने जमेल ते धीर धरून सातत्याने लिहावे. आपल्या प्राचीन साहित्यकारांनी ललित वाङमयाला ' ब्रह्मानंद सहोदर ' असं नाव दिलं आहे. हा ' ब्रह्मानंद ' विषयाशी तादात्म्य झाल्याविना कसा येईल ?

आणि आता, पुढले पत्र ? आता आपण एकदम लघुकथा प्रांतात शिरणार आहोत अलकाताई ! तेव्हा हुश्शार !

तुझी–
सौ. ताई.

□ □

विभाग दोन

– लघुकथा –

८ कथाविश्व

प्रिय अलका,

गेल्या पत्रात तुला लेखनाच्या पूर्वीची मानसिक तयारी व अभ्यास याबद्दल मी बरंच काही सांगितलं. पण नाटक पाहण्यास उत्सुक झालेल्यांना स्टेजवरचा मखमली पडदा केव्हा हटतो असं झालेलं असतं, किंवा सिनेमाला गेल्यावर त्यातली पहिली न्यूजरील केव्हा गुंडाळतील एकदाची ? असं प्रेक्षकांचं मन तक्रार करू लागतं, तसा मात्र माझ्या या माहितीपत्रांनी तुला कंटाळा येऊ नये, म्हणून मी एकदम 'प्रत्यक्ष लेखन' कसे करावे, या विषयाला आज सुरुवात करीत आहे.

●

वाचनाचे बरेच प्रकार मी तुला एका पत्रात लिहिल्याचं मला स्मरतं आहे, तद्वत् लेखन हेही अनेक प्रकारांनी साकार होत असतं. कथा, कादंबरी, नाटच, काव्य, निबंध, चरित्र, समीक्षा, असे कितीतरी त्याचे प्रकार ज्यावर लिहायचं त्या विषयांचेही, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक असे कालदृष्टचा होणारे विभाग आहेतच. मनातल्या उत्कट विचारांची प्रतिसृष्टी निर्माण करण्याचं हे शब्दमाध्यम, त्याचे रूप अनंत प्रकारचे आहे. स्वतःच्या वाङ्मयप्रकृतीला यातून कोणत्या प्रकारची जास्त ओढ आहे हे ओळखून घ्यावं अन् करावी सुरुवात एका शुभघडीला लेखनाची.

माझी प्रथम याबाबतीतही फसगत झाली होती. मी लग्नानंतर प्रथम एक कविता केली– फार सामान्य झाली होती. पण मग मला एकसारख्या गोष्टी– लघुकथाच– लिहाव्यासे वाटू लागले, काव्य रचावेसे वाटलेच कधी, तर कोणी मणामणाचे ओझे डोक्यावर दिलेय असा मनावर भार पडू लागला आणि मी ओळखले– मी गद्य लेखिका आहे, कवयित्री होऊ शकणार नाही!! अन् हा निर्णय मी स्वतःच माझ्या लेखनकालाच्या पहिल्या दोन-तीन महिन्यांतच घेतला, तो बरोबर ठरला. लेखनाचा कोणता प्रकार स्वतःला जास्त ओढ लावतो हे निश्चित ठरवणं हे पहिले काम, लेखकाचे.

बाकी तुझ्या बाबतीत हा प्रश्न पडण्याचा मुळी प्रश्नच नाही. केव्हाच मी ओळखले आहे की तुझी लेखनप्रकृती कथाप्रकाराकडेच अधिक ओढ घेत आहे ते. कारण, मागेच तू दोन गोष्टी लिहून मला पाहायला पाठवल्या होत्यास व आज तर पुण्याच्या 'ललिता' मासिकाने तुझी कथा चक्क छापली आहे! 'लेखिका कु. अलकनंदा' ही त्यावरची अक्षरे पाहून मनाला इतके कौतुकमिश्रित समाधान वाटले, की काय सांगू?

तू कथामाध्यम निवडलेस ही गोष्ट छान झाली. आता कथेची मूलतत्त्वे कोणती, तिची, आकृती-प्रकृती कशी असावी, कथा कशी आकर्षक करावी, कशा वेधक तऱ्हेने सजवावी इत्यादीबद्दल प्रथम लिहावे म्हणते. अर्थात 'कथा' हा शब्द केवळ दोन अक्षरांचा. पण त्याबद्दलचे विवेचनही असेच चिमुकले असेल अशी कल्पना मात्र मुळीच करून घेऊ नकोस हं. बटु-वामनाच्या दोन पावलांनी जसं जग व्यापलं होतं, तद्वत् 'कथा' या दोन अक्षरांनी आज वाङ्मयप्रांतातली मोठ्यात मोठी जागा व्यापून टाकलेली तुला दिसेल. तेव्हा कथेसंबंधी मी तुला जे काही सांगणार आहे, त्याला कदाचित तीन-चार पत्रेही पुरी पडायची नाहीत, इतक्या अधिक व्याप्तीचे हे बडे प्रकरण होणार...होऊ दे, जे सांगेन ते अनुभवाचे व तुला कथा-लेखनात थोडेफार मदतशील होईल, असेच असेल, एवढं नक्की.

*

आजकाल वाङ्मयीन उद्यानात लघुकथांना फार बहर आलेला आहे. मासिके, वर्तमानपत्रे वगैरे सगळीकडेच कथेसाठी राखीव खुर्च्या असतात व

वाचनालयांतील शेल्फामध्ये कथासंग्रहाचे कप्पे रेल्वेच्या फर्स्टक्लास डब्याप्रमाणे बरेचदा मोकळे दिसतात– लोकांनी ही पुस्तके नेल्यामुळे ! हे असे का ? हा विचार तुझ्याही मनात कधीतरी आलाच असेल, त्याचे उत्तर एवढेच की कथा लिहिण्याकडे लेखकांची प्रवृत्ती जास्त असते व वाचकांच्याही उडच्या पडतात त्या कथा-कादंबरीवरच ! बरोबर आहे, तूच बघ, आजचे सुशिक्षितांचे दैनंदिन जीवन, त्याला किती वेग आलेला आहे तो ? घडचाळाच्या काटचावर जीवनाचे तास मोजले जातात. अशा घाईच्या जीवनात करमणूक म्हणून वाचायला गंभीर शास्त्रीय ग्रंथ, निबंध, प्रबंध, टीकाग्रंथ, कोण पसंत करील ? तेव्हा लघुकथा हा रंजक प्रकार लोकप्रिय ठरला आहे तो लेखक-वाचक दोघांच्याही दृष्टीने. पण हा लेखनप्रकार वाटतो तसा सोपा नाही अलके ! मला वाटतं, मागल्या एका पत्रात मी 'जी दिसायला सोपी पण लिहायला अवघड असते ती लघुकथा' अशी सहज एक व्याख्या तुला लिहिली होती नव्हे का ? आज त्या अवघडपणावरच, तूला सोपे वाटेल असे काही, विवेचन मी करणार आहे.

लघुकथेची समर्पक व नीटनेटकी व्याख्या बघायची असेल तर, प्रा. फडक्यांनी लघुकथा या विषयावर स्वतंत्र पुस्तकच लिहिले आहे, त्यात आहे, ती अशी–

'शक्य तितक्या परिणामकारक रीतीने व शक्य तितक्या कमी पात्र-प्रसंगाच्या साह्यानं सांगितलेली एकच एक गोष्ट म्हणजे लघुकथा.'

ही व्याख्या मोठी उद्बोधक आहे व कादंबरी आणि लघुकथा यातला फार मोठा फक्त यातून स्पष्ट झाला आहे. कादंबरीत अनेक पात्रे, पुष्कळ प्रसंग व अनेक तऱ्हेचे भावदर्शन असते. लघुकथेत या सर्वांचा वापर अगदी शक्य तेवढचा कमी पात्र-प्रसंगांनीच झाला पाहिजे आणि हे सूत्र कथा-लेखकांच्या मनातून केव्हाही सुटता कामा नये.

पुष्कळ नवोदित लेखक मनात गृहीत धरतात की लघुकथा म्हणजे कादंबरीचे छोटे रूप– लहानशी कादंबरीच जणू ती ! तसे मुळीच नाही. आई व मुलगी यांचा तोंडवळा सारखा असेल. रूप, बांधा, काही स्वभावगुण हेही सारखे असू शकतील, पण दोघींचे देह वेगळे आहेत. आईचे अनुभवाचे, जाणिवेचे जगही वेगळे. ते अधिक संपन्न असते. तर मुलीचे विचारक्षेत्र

तिच्या सीमित अनुभवानुसार छोटेसे असते, विचार निराळे असतात, दोघींचे व्यक्तिमत्व स्वतंत्र असते. अगदी हेच नाते आपल्या कादंबरी व कथेत आहे म्हणेनास ?

तुझ्या लक्षात राहावे म्हणून मी कथा-कादंबरीचे साम्य-फरकच आधी या पत्रात नीट लिहिते. प्रथम आपण सांम्ये पाहू या. ती अशी :–

कथा व कादंबरीतील साम्ये–

१. दोन्ही कथानक-प्रधान असतात.

२. निवेदनशैली दोन्हींत सारखी असू शकते.

३. व्यक्तिदर्शन हे दोन्हींतही महत्त्वाचे.

४. चतुर व सहजसंवाद हा महत्त्वाचा घटकही समानच.

५. दोन्ही वाङ्मयप्रकारांना मनोविश्लेषण आणि निसर्गवर्णने यांनी रंगत चढते.

६. प्रसंगाप्रसंगाच्या चतुर बांधणीमुळच दोघींचाही देहबांधा सुंदर आकार घेत असतो.

७. भाषासौष्ठव हे दोन्हींतही अवश्य हवे.

८. कथानक संपताना दोहोंतही काही विशिष्ट प्रत्ययकारिता लेखकाला अपेक्षित असते.

अलका, ही अशी बरीच साम्ये दिसली तरी हे दोन्ही वाङ्मयप्रकार एकमेकाहून अगदी वेगळे, हे तू प्रथम मनावर पक्के ठसवून घे. हा विरोधही पुढीलप्रमाणे स्थूलमानाने सांगता येईल, तिकडेही लक्ष दे जरा व खालील फरक पाहा–

(१) लघुकथा ही स्वतंत्र व आपल्यापरीने पूर्ण असते. पण ती कादंबरीचे एक प्रकारण ती होऊ शकत नाही.

(२) कथेचा देह लहान, तेव्हा कपडेही तिच्या मापाचेच, म्हणजे आटपसर हवेत. उगीच स्कर्टवाल्या लहान मुलीला जड पैठणी (अगर आजच्या काळात नऊवारी शालू) नेसवण्याचा अट्टाहास चालायचा नाही ! तेव्हा वर्णने, संवाद, प्रसंग व व्यक्ति या सर्वांची व्याप्ती अगदी नेटकी व बेताचीच पाहिजे !

(३) कादंबरीचे क्षेत्र मोठे, तिच्यात, अनेक जणांच्या भावदर्शनाला

भरपूर वाव असतो, चारचौकी वाड्यात अगर अलेजाही बंगल्यात खूप माणसे आरामाने राहू शकतील अशी मुबलक जागाही असते. पण लघुकथेचा संसार एका खोलीत, टुमदारपणे मांडलेला, तिच्यात एकच एक संसार, एखादीच 'भावना' नीट राहू शकेल. गर्दीला तेथे जागा नाही व नसावीच.

(४) कादंबरीचे कथानक विस्तृत, मोठा कालखंडाचे आणि अनेक व्यक्तींचे असते. लघुकथेचे कथानक चिमुकले, व कमी व्यक्तींचे, असेच धरावे लागते. प्रसंगांची तीच तऱ्हा.लघुकथेत प्रसंग थोडे तर कादंबरीत ते अनंत असतात.आणि कालखंड ? कथेचे कथानक कदाचित चार-पाच तासांतही घडू शकते, वा पंधरा-वीस वर्षांचेही धागे गुंफलेले कधी कधी त्यात दिसू शकतील, पण अर्थातच ते त्रोटकच असतील. कादंबरी अनेक वर्षांच्या, सविस्तर अशा पूर्ण हकीगती सांगेल– कधीकधी दोन-तीन पिढ्यांच्याही घटना सांगेल. 'व्याप्ती' हा कादंबरीचा प्रमुख देहबंध असतो, लघुकथा सडसडीत बांध्याची समजावी तिच्यापुढे.

(५) कादंबरीत एखाद्या व्यक्तीचे संपूर्ण चित्र वा चरित्र दिसू शकते. लघुकथेनं ही पूर्णता दर्शविणे जागेच्या अभावी कठीणच, पण त्या व्यक्ति-, मत्वाचा एखादा अंश घेऊन तोच ठसठशीतपणे व समर्थरूपात लघुकथा व्यक्त करू शकते.

६) लघुकथेपेक्षा कादंबरीचे क्षेत्र खूपच विस्तृत असल्याने, कादंबरीत कथानकाच्या अनुरोधाने इतरही अनेक विषय येत असतात व त्या विषयां-बद्दल लेखकाची स्वतःची मते प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या व्यक्त करायला त्याला उत्तम वाव मिळतो व मोठे क्षेत्रही लाभते. लघुकथेत अशी सोय थोडीच आहे ? तिच्यांत वर्ण्य विषयाखेरीज इतर गोष्टींना जागाच नाही राहत ! हा सर्वांत मोठा फरक लक्षणीयच.

अलके, कथा व कादंबरी यांच्या रूपसादृश्यांतले हे वेगळेपण तुझ्या नीट ध्यानी आले असेलच आता !

लघुकथा कादंबरीहून कशी निराळी आहे, हे आपण पाहिलेच. आता लघुकथेचा परिवार कोणत्या प्रकाराचा आहे हेही जरा बघूया. असं बघ, एक लघुकथा म्हटली तरी तिचे प्रकार बरेच दिसतात, माझ्या दृष्टीने हे प्रमुख **प्रकार पुढीलप्रमाणे आहेत:–**

१ लघुकथा.
२ दीर्घकथा.
३ लघुत्तमकथा.
४ रूपककथा.
५ रहस्यकथा.
६ शास्त्रीय सत्यावर आधारित असलेल्या नवलकथा.
७ भयकथा.
८ नवकथा.

असे हे कथेचे प्रमुख अष्टावतार, अगदीच वेगवेगळ्या तोंडावळ्याचे, या दरेकाची थोडीबहुत ओळख या पत्रांतून तुला आज करून द्यावी, असे मी ठरवले आहे. त्यामुळे तुला कथाविषय निवडायचे पुष्कळसे सोपे होईल.

यांतील लघुकथेबद्दल प्रथम पाहू या. लघुकथा ही व्यातीने बेताची असावी, हे तिच्या नावावरूनच लक्षात येते. पैकी काही कथांना कॅरॅक्टर स्टोरी ऊर्फ स्वभावदर्शक कथा ' म्हटले जाते. व त्यांत व्यक्तीच्या स्वभावचित्रणालाच प्रामुख्याने महत्त्व दिलेले दिसते. (या प्रकाराची उदाहरणे मी तुला नंतर देणारच आहे) तर काही कथा समस्याप्रधान असतात एखाद्या, सामाजिक रूढीचा जाचकपणा लोकांना कसा छळवादी होतो हे त्या सांगतील, काही कथा भावनादर्शक असतात, मानवी आयुष्य म्हणजे अनेक भावभावनांचा खेळ– (साधा नव्हे, लपंडावाचादेखील किंवा कधी कधी जीवघेणाही खेळ !) यांत प्रीती, साहस, दुष्टता, कामुकता, राक्षसी महत्त्वाकांक्षा, सुजनता, चारित्र्यशीलता, वात्सल्य, औदार्य, अशा अनंत भावनांचे संघर्ष घडून कथा-कादंबऱ्यांची कथानके बनतात. काही कथा केवळ रंजकस्वरूपाच्या, तर काही तत्त्वप्रधान, रंजककथा आणि विनोदीकथा यांचे मूळ कार्य वाचकांचे घटकाभर मनोविनोदन करावे एवढेच असते. त्या दृष्टीने याही कथांचा वाचकवर्ग चांगला मोठाच आहे. तत्त्वप्रधान कथांचे प्रमाण एकंदरीत हातां-बोटांवर मोजण्याइतके अत्यल्प दिसते. पण सृष्टीतील चिरंतन तत्त्वे– उदाहरणार्थ, माणूस कितीही समर्थ असो तो नियतीपुढे अखेर हतबल, हताश आहे, हे, किंवा वार्धक्य उर्फ जरा, जरासुद्धा मनुष्य टाळू शकत नाही, माणूस हा विकाराधीन आहे. निसर्गाला क्षमा माहीत नाही...

इत्यादी शाश्वत सत्ये त्यातून प्रकट होतात. प्रादेशिक कथांचेही एक दाल लघुकथेच्या घरप्रपंचात आज विस्तारत आहे, यांत गोवा, कोकण, वऱ्ह किंवा आदिवासींचा मुलूख इत्यादी स्थलांच्या पार्श्वभूमीवर या कथा वेगव पणाने खुलतात आणि ग्रामीण कथेनंही या कथेच्या ओटयावर आपल कांबळी अंथरून मुक्काम केला आहेच अलीकडे. पाहिलेस ? एक क म्हटली, तरी तिचे रूप किती प्रकारचे आहे ते ? या सर्वांचे वर्णन केव इटुकल्या चार ओळींनी होणारे नव्हेच. त्यासाठी मी स्वतंत्र प्रकरणे योजिली आहेत. मोठ्या पैठणीची घडी चिमुकल्या पर्समधे कशी राहणार तूच बघ बरं ?

*

कथाविश्वाचा दुसरा प्रकार दीर्घकथा. ही लघुकथेचीच ज्येष्ठ बहीं आहे म्हणेनास ? स्वभावदर्शन, व्यक्तिवर्णन, संवाद, स्थलवर्णने इत्या बाबतींना दीर्घकथेत नेहमीच अधिक वाव मिळतो– पण परिणामी 'एक एक संस्कार' करण्याचे लघुकथेचेच मुख्य धोरण दीर्घकथेनेही पाळले दिसते. हिची व्याप्ती पुष्कळदां 'लघूकादंबरी' म्हणण्याएवढी अधिक दिसते, व हरी नारायण आपटयांनी, आपल्या एका व्याख्यानात एकदा द 'दीर्घकथा ही छोटी कादंबरीच !' अशी व्याख्या केल्याचेही माझ्या वाचन आले, पण एकंदरीत आपल्या दीर्घकथांच्या परिशीलनात, हे प्रमेय आजच्य दीर्घकथेला लागू पडणारे नाही, असेच ध्यानीं येते. अलके, एखादा, किशो वयीन मुलगा काही वर्षांनी भेटला तर, तो जाणता तरुण झाल्याचे आपल ध्यानी येते. चेहरा, स्वभाव, सवयी अर्थात् पूर्वीचेच. पण चेहऱ्यावर प्रौ तेची थोडीबहुत झाक आलेली स्पष्ट दिसते व जगाची ओळख अधि आल्याची जाणही त्याच्या नेत्रांतून स्पष्ट दिसत असते. तसेच हेही कल दीर्घकथा हे लघुकथेचेच अधिक विकसित रूप आहे पण कादंबरीचे म छोटे रूप नव्हे ! किंवा असे म्हणूया की लघुकथा ते कादंबरी या प्रगतीच्य प्रवासातला दीर्घकथा हा एक मधला टप्पाच आहे !

कथेचा सर्वांत छोटा प्रकार म्हणजे लघुतमकथा. या लघुतमकथेबद्दल त नियम सांगता येणे कठीणच. कधी तिची व्याप्ती दोन-तीन पृष्ठांची अस तर कधी अगदी थोड्क्या शब्दांपर्यंतही ती आक्रसून लहान झालेली दिसते

चांगल्या लघुकथेत प्रसंगांची गर्दी नसावी असे एक गमक आहे, पण लघुतमकथेला तर अगदी एखादा-दुसराही प्रसंग पुरेसा होतो ! या संदर्भात अत्र्यांनी गमतीने एक लघुतमकथा सांगितली होती. ती अशी–

ती पुढे चालली होती.
तो मागून चालत होता.
त्याला खोकला आला.
तिने मागे वळून पाहिले
तो बेशुद्ध पडला.
ती त्याची बहीण होती.

अलका, बघ. अत्र्यांनी या लघुतमकथेत एक प्रसंग, विस्मयकारक शेवट व कमी म्हणजे दोनच पात्रे आणली आहेत. जणू लघुतमकथेचे सूत्रच त्यांनी यात व्यक्त केले आहे. हिंदीमध्येही अशी लघुतमकथेची विडंबने मला पाहायला– ऐकायला मिळाली. ती अशी–

१. तुम और हम, दोनो खतम् !

२. एक था राजा, एक थी रानी, दोनो मर गये. खतम् कहानी !

पण ही गमतीची बात बाजूला ठेवून पाहिले तर 'अगदी कमी शब्दांत एकच एक संस्कार मनावर करणारी छोटी गोष्ट' अशी लघुत्तमकथेची व्याख्या करता येईल. मागे किर्लोस्कर मासिकाने लघुतमकथेच्या स्पर्धा लावल्या होत्या, त्यात साडेतीनशे कथांतून सौ. सुनंदा वर्तक यांच्या 'कोवळा' नावाच्या कथेला पहिलं बक्षीस मिळालं आहे. ती तू कुठं मिळाल्यास अवश्य वाच. एका नव्यानं उदित होणाऱ्या प्रणयभावनेचा आकस्मिक व अनपेक्षित असा शेवट (अनपेक्षित शेवट हा लघुतमकथेचा अविभाज्य घटकच समज!) कसा झाला हे त्यात फार सहजतेने सूचित केले आहे.

रूपककथांचा माझा फारसा अभ्यास नाही. पण साध्या लघुत्तमकथा सांगून त्याच्या आडोशाने एखादे मोठे सुंदर, वैचारिक तत्त्व विशद करावयाचे हा रूपककथेचा बाणा असतो अर्थात रूपककथा ही साधीच गोष्ट असते. ती लघुत्तमकथेप्रमाणे धक्कातिका होऊ शकत नाही, वा, ती केवळ व्यक्तींचीच असते असेही नाही, तर मानवी जीवनाबरोबर सृष्टीतील इतर प्राणीही त्यात आढळतात. इसापच्या काही गोष्टी उत्तम रूपककथा ठरणाऱ्या आहेत

इत्यादी शाश्वत सत्ये त्यातून प्रकट होतात. प्रादेशिक कथांचेही एक दालन लघुकथेच्या घरप्रपंचात आज विस्तारत आहे, यांत गोवा, कोकण, वऱ्हाड किंवा आदिवासींचा मुलूख इत्यादी स्थलांच्या पार्श्वभूमीवर या कथा वेगळेपणाने खुलतात आणि ग्रामीण कथेनंही या कथेच्या ओटचावर आपली कांबळी अंथरून मुक्काम केला आहेच अलीकडे. पाहिलेस ? एक कथा म्हटली, तरी तिचे रूप किती प्रकारचे आहे ते ? या सर्वांचे वर्णन केवळ इटुकल्या चार ओळींनी होणारे नव्हेच. त्यासाठी मी स्वतंत्र प्रकरणेच योजिली आहेत. मोठ्या पैठणीची घडी चिमुकल्या पर्समधे कशी राहणार ? तूच बघ बरं ?

*

कथाविश्वाचा दुसरा प्रकार दीर्घकथा. ही लघुकथेचीच ज्येष्ठ बहीण आहे म्हणेनास ? स्वभावदर्शन, व्यक्तिवर्णन, संवाद, स्थलवर्णने इत्यादी बाबतींना दीर्घकथेत नेहमीच अधिक वाव मिळतो– पण परिणामी 'एकच एक संस्कार' करण्याचे लघुकथेचेच मुख्य धोरण दीर्घकथेनेही पाळलेले दिसते. हिची व्याप्ती पुष्कळदां 'लघूकादंबरी' म्हणण्याएवढी अधिकही दिसते, व हरी नारायण आपटचांनी, आपल्या एका व्याख्यानात एकदा तर 'दीर्घकथा ही छोटी कादंबरीच !' अशी व्याख्या केल्याचेही माझ्या वाचनांत आले, पण एकंदरीत आपल्या दीर्घकथांच्या परिशीलनात, हे प्रमेय आजच्या दीर्घकथेला लागू पडणारे नाही, असेच ध्यानीं येते. अलके, एखादा, किशोर वयीन मुलगा काही वर्षांनी भेटला तर, तो जाणता तरुण झाल्याचे आपल्या ध्यानी येते. चेहरा, स्वभाव, सवयी अर्थात् पूर्वीचेच. पण चेहऱ्यावर प्रौढतेची थोडीबहुत झाक आलेली स्पष्ट दिसते व जगाची ओळख अधिक आल्याची जाणही त्याच्या नेत्रांतून स्पष्ट दिसत असते. तसेच हेही कलम. दीर्घकथा हे लघुकथेचेच अधिक विकसित रूप आहे पण कादंबरीचे मात्र छोटे रूप नव्हे ! किंवा असे म्हणूया की लघुकथा ते कादंबरी या प्रगतीच्या प्रवासातला दीर्घकथा हा एक मधला टप्पाच आहे !

कथेचा सर्वांत छोटा प्रकार म्हणजे लघुतमकथा. या लघुतमकथेबद्दल तसे नियम सांगता येणे कठीणच. कधी तिची व्याप्ती दोन-तीन पृष्ठांची असते तर कधी अगदी थोडक्या शब्दांपर्यंतही ती आकसून लहान झालेली दिसते!

चांगल्या लघुकथेत प्रसंगांची गर्दी नसावी असे एक गमक आहे, पण लघुतम-कथेला तर अगदी एखादा-दुसराही प्रसंग पुरेसा होतो ! या संदर्भात अज्यांनी गमतीने एक लघुतमकथा सांगितली होती. ती अशी–

ती पुढे चालली होती.
तो मागून चालत होता.
त्याला खोकला आला.
तिने मागे वळून पाहिले
तो बेशुद्ध पडला.
ती त्याची बहीण होती.

अलका, बघ. अज्यांनी या लघुतमकथेत एक प्रसंग, विस्मयकारक शेवट व कमी म्हणजे दोनच पात्रे आणली आहेत. जणू लघुतमकथेचे सूत्रच त्यांनी यात व्यक्त केले आहे. हिंदीमध्येही अशी लघुतमकथेची विडंबने मला पाहायला–ऐकायला मिळाली. ती अशी–

१. तुम और हम, दोनो खतम् !

२. एक था राजा, एक थी रानी, दोनो मर गये. खतम् कहानी !

पण ही गमतीची बात बाजूला ठेवून पाहिले तर 'अगदी कमी शब्दांत एकच एक संस्कार मनावर करणारी छोटी गोष्ट' अशी लघुत्तमकथेची व्याख्या करता येईल. मागे किर्लोस्कर मासिकाने लघुतमकथेच्या स्पर्धा लावल्या होत्या, त्यात साडेतीनशे कथांतून सौ. सुनंदा वर्तक यांच्या 'कोवळा' नावाच्या कथेला पहिलं बक्षीस मिळालं आहे. ती तू कुठं मिळाल्यास अवश्य वाच. एका नव्यानं उदित होणाऱ्या प्रणयभावनेचा आकस्मिक व अनपेक्षित असा शेवट (अनपेक्षित शेवट हा लघुतमकथेचा अविभाज्य घटकच समज!) कसा झाला हे त्यात फार सहजतेने सूचित केले आहे.

रूपककथांचा माझा फारसा अभ्यास नाही. पण साध्या लघुत्तमकथा सांगून त्याच्या आडोशाने एखादे मोठे सुंदर, वैचारिक तत्त्व विशद करावयाचे हा रूपककथेचा बाणा असतो अर्थात रूपककथा ही साधीच गोष्ट असते. ती लघुत्तमकथेप्रमाणे धक्कातिका होऊ शकत नाही, वा, ती केवळ व्यक्तींचीच असते असेही नाही, तर मानवी जीवनाबरोबर सृष्टीतील इतर प्राणीही त्यात आढळतात. इसापच्या काही गोष्टी उत्तम रूपककथा ठरणाऱ्या आहेत

या रूपककथांचा अभ्यास तू करणार असलीस तर खांडेकरांचे सुवर्णकण हे पुस्तक (मिळवून !) वाच. खलिल जिब्रानचे नाव रूपककथांबाबत फार प्रसिद्ध झालेले आहे, त्यांचाही पुष्कळांनी अनुवाद केला आहे. तोही एकदा मिळाल्यास पाहून टाक.

आता रहस्यकथा. रहस्यकथांची आवडदेखील सर्वांना असते, असे नाही, पण ज्यांना असते, ती माणसे विश्रांतीचा सगळा वेळ त्या वाचनात रमून जातात हेही खरेच. मात्र, हे लेखनकसब सहजसाध्य नाही व आंतरिक इछे-वाचून रहस्यकथा लिहिताही येणार नाही, असा एक नवा सिद्धात बांधावासा वाटतो. तुला जर एखादी अशी कथा कधी लिहावीशी वाटली, तर, जयंत देवकुळे यांच्या जुन्या रूपांतरित रहस्यकथा व युवराजकथा (ह्या नुकत्याच पुन्हा ४–५ वर्षांपूर्वी प्रकाशित झाल्या आहेत.) तू अवश्य वाच. भाषाशैली आकर्षकतेने रहस्यकथाही किती रंगू शकते याचा तो एक उत्कृष्ट नमुना आहे, पुर्वी 'मनोरंजन' मासिकात दर अंकात शेरलॉक होम्सची एकेक रुपांतरित वेधक कथा येत असे, आज तू 'होम्स' मूळ इंग्रजीतून वाचू शकशील, व पेरिमेसन, अॅगाथा ख्रिस्ती इ. लेखकांच्या जगप्रसिद्ध दीर्घकथा तुला कोठेही सुलभपणे मिळू शकतील. त्याच तुला या कथाप्रकाराची शिकवण उत्तम तऱ्हेने देऊ शकतील. आजही या कथांची रूपांतरे अनेक मासिकांत येतात, ती तुझ्या वाचनात असतील ?

शास्त्रीय सत्यावर आधारलेल्या पण उत्कंठापूर्ण आणि विस्मयकारक कथा हा रहस्यकथांचाच सख्खा भाऊ शोभणारा प्रकार आहे. आपल्याकडे या कथा आलेल्या दिसतात; त्या बहुधा पाश्चात्य कथांची स्वैर रूपांतरे होऊन. यातील प्रमुख कल्पना, एखाद्या संशोधकाने रसायनशास्त्रांतला एखादा विलक्षण शोध लावणे व नंतर त्या शोधाचे काही अतर्क्य परिणाम त्याच्या अनुभवास अगर दृष्टोत्पत्तीस येणे, अशीच पुष्कळशा कथांतून आढळते. मला वाटतं. द. पां. खांबेटे, गजानन क्षीरसागर, भा. रा. भागवत इ. इ. लेखकांनी अशा कथा लिहिलेल्या आहेत. माणसाला तरुण किंवा आहे त्याहून अल्पवयी करणारे रसायन, ते थोडे जास्त प्रमाणात घेतले गेल्यामुळे एक संशोधक फारच लहान, मूल झाला येथपर्यंत या कल्पनांची भरारी असते ! तसेच मंगळ अगर दुसऱ्या उपग्रहांवरून आलेले काही

विचित्र मानव व त्यांनी येथल्या मानवी जीवनात उडवलेले गोंधळ हा शास्त्रीय अनुमानांवर आधारित असा एक कल्पनाविलास; हाही अलीकडच्या काही कथांतून मला पाहायला मिळाला आहे. एकंदरीत हा कथाप्रकार वेगळा असला तरी नवीन आहे व अजून या गोष्टी अल्पसंख्यच आहेत. आधुनिक शोधांची व सायन्सची परिपूर्ण व नीट माहिती असल्याखेरीज ह्या गोष्टी लिहिणे कठीणच, म्हणूनच मला वाटतं, या प्रकारच्या कथा कमी आढळतात.

साहित्यात भयकथांचाही एक नवा प्रघात आजकाल जोमाने वाढीस लागलेला दिसतो. पण तो एवढा नवा आहे की, त्याबद्दल काहीही विधान करणे धाष्टर्याचेच ! तरीपण अदृश्य सृष्टीबद्दल, भुतेखेते इत्यादी मानवेतर योनीबद्दल, मृत जीवात्म्यांबद्दल मनुष्याच्या मनात एक विचित्र वा भीतीयुक्त कुतूहल नांदत असतेच ! त्यामुळेच की काय, अशा गोष्टींनाही वाचकांचा प्रतिसाद चांगला मिळतो. नारायण धारप यांच्या कथांचे उदाहरण याबाबत उल्लेखनीय ठरेल. विशेष असे, की या त्यांच्या भयकथांतूनही भाषासौष्ठव व वर्णनसहजता ही पाहायला मिळतात, एवढेच नव्हे तर काही वेळा व्यक्तिदर्शनही आकर्षक व यथातथ्य असते. उदाहरणार्थ, धारपांची 'समर्थ' ही व्यक्तिरेखा नावाप्रमाणेच समर्थ व प्रबल अशा लोभस व्यक्तिमत्त्वाची अशी आहे व अगदी शेरलॉक होम्सप्रमाणेच ती अविस्मरणीय वाटणारी झालेली आहे. पण अशा कथांच्या वाचनाने मनात एक प्रमुख विचार मात्र वारंवार येतो. केवळ भुते व त्यांचा परिवार यांचा संबंध, अशा कथेतून मानवाला, भीतीने गर्भगळीत होण्याइतका येतो, अगर भुतांच्या अतर्क्य शक्ती अशा सूड घेणाऱ्या व मानवी जीवनाला नित्य मारकच असतात; हा परिणाम इष्ट ठरणारा नाही. उलटपक्षी या मारक शक्तींवरही तारक उपाय आहेत व धैर्यवान व सत्प्रवृत्त माणूस आत्मबलाने त्या दुष्टतेवर विजयही मिळवू शकतो, हा परिणाम अशा प्रकारच्या ज्या कथेत येतो, त्या कथेचे गुणमूल्य माझ्या मनात एकदम उंचावते ! आणि याच दृष्टीने मला धारपांच्या अशा सर्व भयकथा 'समर्थकथा' अधिक श्रेयस्कर वाटतात. रत्नाकर मतकरींच्याही कथा या दृष्टीने तू एकदा वाच. फारच वेधक आहेत.

अर्थात् हे सर्व मी तुला, हा एक कथेचा वेगळा आविष्कार, तिचे एक वेगळे रूप, 'एवढ्याच दृष्टीने लिहिले आहे हं अलके ! खरे तर, शास्त्रीय सत्यकथा वा भयकथा हे दोन्ही लेखन प्रकार सर्वांना साधणारेही नव्हेत व ते तू कधी लिहिशील, असंही मला वाटत नाही, पण लेखकाला हीही माहिती पाहिजे; म्हणून हे सांगून ठेवले, इतकंच. वाङ्मयाचे स्वरूप 'नवरसप्रधान' असते, त्यात एक 'भयानक रस'ही असतोच ! त्यातलाच हाही एक भाग म्हणावा, इतकंच.

राहता राहिली नवकथा. खरे म्हणशील तर अलका, नवकथा हा लघुकथेचाच आजचा नवा आविष्कार आहे. गेल्या पिढीतल्या लेखकांच्या लघुकथा तू वाचल्या असशीलच. त्यावरून तुझ्या लक्षात येईल की, त्यावेळची लघुकथा अधिकांशाने घटनाप्रधान अशीच असे. पण साहित्य हे पाणी बांधून ठेवलेले सरोवर थोडेच ? ती एक ओघवती नदीच आहेच, तिचा प्रवाह नित्य नवीनवी वळणे घेत पुढे पुढे जात असतो. अर्थात साहित्याच्या, कादंबरी, नाट्य, ललितनिबंध इत्यादी प्रकारांच्या मांडणीत व आविष्करणात जसा कालक्रमाने फरक पडत गेला तसा लघुकथेतही पडत चालला आहेच. लघुकथेचा पूर्वीचा घाट आज साफ बदलू पाहत आहे. पूर्वीची कथा 'अमुक अमुक घडले, म्हणून हे असे असे झाले.' असे सरळ व प्रमुखपणे सांगायची, तर आजची बदललेली कथा, घटना तर सांगेलच पण 'त्याला किंवा तिला असे असे वाटत राहिले, त्यांच्या मनात असे आले' हेच अधिक प्रामुख्याने ती व्यक्त करील. थोडक्यात म्हणजे, नवकथेच्या घटनात मनोविश्लेषण अधिक प्रमाणात असते, असे म्हणावयास हरकत नाही. अर्थात पूर्वीचे जे लघुकथेचे देहबंध होते ते नवकथेतही कायम असतातच, फक्त मांडणी वेगळी आणि त्यातले विचारप्रवाहही वेगळे असं आपल्याला म्हणता येईल.

काही दृष्टींनी लघुकथा ही नवकथेच्या रूपांत प्रगतिपथावरही आहे, असेसुद्धा मला वाटते. उदा. पूर्वीपेक्षा लघुकथेच्या विषयांचे वर्तुळ आज कितीतरी वर्धित झाले आहे, त्याच्या कक्षा रुंदावत चालल्या आहेत. उच्चभ्रू लोकांच्या रंगेल पार्ट्या, कॅबरे डान्स, मद्यांच्या मैफली, सोसायटी गर्ल्स, ह्या विषयांचे तर आजवर लघुकथेने दर्शनही घेतले नव्हते कधी. मोठी

सोवळी होती कथा पूर्वी त्या दृष्टीने ! आजचा काळाबाजार तर सोडाच, पण तरुण देखण्या गौरांगींचा अनेक शहरातून चालणारा 'गोराबाजार' तरी पूर्वीच्या लघुकथेला माहिती होता थोडाच ? तसेच निरनिराळ्या जमातीतल्या लोकजीवनाची वर्णित कथानके, हेही एक आजच्या बदलत्या कथेचे वैशिष्ट्य म्हणता येईल. उदा. स्टेशनवर हमाली करणारी अर्धवयाची मुले, टांगेवाले अगर रिक्षावाले, कारखान्यात रोज मजुरी करणारे कामगार, रस्ता तयार करण्यासाठी दगड वाहणाऱ्या व दगडाचे बारीक तुकडे करणाऱ्या वडार जमाती, फूटपाथवर झोपणारे पाटीवाले, इत्यादी समाजाच्या सर्व थरांतून कथा-कादंबरीचे विषय आज घेतले जातात व त्यांच्या जीवनाची यथार्थ कल्पना आजची नवी कथा-कादंबरी घडवते असे मला वाटते. काही विषय तर अगदीच नवे. उदा. कस्टम्सखाते व सोन्याची चोरटी आयात हा विषय अगदी नवा, पण श्री. दा. पानवलकर यांच्या कथेत तो प्रामुख्याने आढळतो. शशिकांत यर्नाळकर यांच्या कथेतून बस-ड्रायव्हर व मोटारट्रकच्या धंद्यातले जीवन पुष्कळदा रंगलेले असते. एकत्र कुटुंबातल्या विसंगतींवर आनंद जातेगावकर आपल्या कथेतून नेमका विदारक प्रकाश पाडतात. मुंबईत एका खोलीत दोन-तीन दाम्पत्ये एकत्र राहण्याची कसोटीची वेळ आजच्या नवविवाहित गृहिणीवर येते, तिची मानसिक कुचंबणा व पतीची रात्रभेटही न होण्याची घर-परिस्थिती या बिकट समस्येचे कटुदर्शन आजकालच्या अनेक नव्या लेखकांनी घडवलेले आहे. ही समस्याच मुळी ३०-४० वर्षांपूर्वीच्या लघुकथेला माहीत नव्हती ! पण आज ? या सर्व भिन्नभिन्न कथानकांनी आजची नवकथा विषयांच्या दृष्टीने अधिक संपन्न झाली आहे, हे निश्चित.

दुसरी कथासंसारातली महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा लेखकाचा दृष्टिकोन. तोही अगदी वेगळा होतो आहे. उदा. समाजात पूर्वी अवैध स्त्री-पुरुषसंबंध एकदम पापाच्या पराकोटीचाच मानला जाई व तेव्हाच्या लघुकथेतूनही तसाच परिणाम जनदृष्टीस यावा असे लेखक लिहीत ! आज याकडे, केवळ पाप म्हणूनच पाहिले जाते असे नाही, तर आत्यंतिक प्रीती, यौवनसुलभ अनिर्बंध, असे प्रणयसहवासाचे सौख्य, मिश्रसमाजात वरचेवर येणारी स्त्री-पुरुषांची जवळीक व काही ठिकाणी

तर केवळ आर्थिक गरज, अशीही कारणे या घटनेच्या मुळाशी असतात असे दर्शवून, ह्यात एवढे भयंकर पाप नाही, असेही अनेक कथांतून काही वेळा व्यक्त केले जाते ! याचा अर्थ आज समाजाची नीतिमूल्येच पार बदलली अगर रसातळाला गेली असा मात्र नव्हे हं अलका ! पण त्याकडे वेगळ्या बाजूनींही पाहता येते व ती दृष्टीही विचारणीय आहे, अशा प्रकारचा हा लेखकांचा पूर्वीहून वेगळा व नवा दृष्टीकोन आजची नवकथा तुम्हाला आवर्जून सांगेल. या दृष्टीने आजकालच्या नव्या मासिकांतून खूप कथा येतात, त्या तुझ्या वाचनात असतीलच.

तर अशी आजची नवकथा. पाश्चात्य कथावाङ्मयाचे संस्कार घेऊन आज तिचे रूप वेगळे बनत आहे हे तर निर्विवादच, पण हे नवे रूप सर्वस्वी चांगले अगर सर्वस्वी निंद्य नाही, हे तुझ्या लक्षात आले ना ? लघुकथा आजवर कालानुसार निरनिराळा वेष धारण करीत आली आहे आणि नवकथा करीत असलेले रूपदर्शन, हेही अजून प्रयोगावस्थेत आहे, या संक्रमणावस्थेतून लघुकथा कदाचित आणखीही एखादे नवे उन्नत रूप घेईल ! कोणी सांगावे ?

*

तर अलका, मराठी वाङ्मयातले कथाविश्व हे असे प्रचंड व फार मोठ्या व्याप्तीचे आहे. त्याची केवळ स्थूल रूपरेषा तुला आज या लांबलचक पत्रातून मी दिली आहे. हे सारे समीक्षण तुला रुचेल अशी मी आशा करू ना ? आणि आता या लांब पत्रानंतर महिनाभर सुट्टी हं !

तुझी–
सौ. ताई.

९ कथानिवेदन

अलकाताई, आज तुम्हाला आम्ही कथानिवेदनाच्या वेगवेगळ्या पद्धतीं-बद्दल सांगणार आहोत. तुम्ही यावर चेष्टेने (अगर कुचेष्टेनेसुद्धा) म्हणणारच की, गोष्ट मनात जशी उभी राहील तशी लेखकाने सांगावी ! त्यात कसली वेगवेगळी तऱ्हा ? अगदी बरोबर. पण आपल्या कथेला नाविन्याचा वा आकर्षकतेचा साज चढवायचा असेल, तर या वेगवेगळ्या तऱ्हा तुम्ही माहीत करून घ्याच ! मीही कथालेखनात या तऱ्हा तऱ्हेतऱ्हेने वापरल्या आहेतच. फक्त त्यांचे वर्गीकरण आतासारखे कटाक्षाने व कसोशीने त्यावेळी कोणी फारसे करीत नसे एवढेच ! आता यावर पुष्कळ ग्रंथ निघाले आहेत व कथेची रचना शास्त्रशुद्ध व आकर्षक कशी करावी याचेही मार्गदर्शन पुष्कळांनी केले आहे, ते माहीत करून घ्यायला तुमची हरकत नाही ना ? तर एकंदरीत कथानिवेदनाच्या भिन्न तऱ्हा अशा दिसतात–

१. पात्रमुखी कथन.

२. कथानकांतून लेखकाने तटस्थपणे दूर राहून सरळ हकीगती तिऱ्हाईत-पणे स्वतःच सांगणे.

३. संवादातूनच कथानक सुचवणे व प्रगत करणे.

५. पत्रात्मक स्वरूप.

५. डायरी, आत्मवृत्त इत्यादीतील पाने दर्शवून निवेदन.

यांचा आता क्रमाने विचार करू आणि आपण त्यासाठी एक छोटेसे उदाहरण घेऊ या. तुमच्या एकाद्या काल्पनिक कॉलेजमैत्रिणीचेच. कसे ?

●

तर अलका, प्रथम एक प्रश्न स्वतःला करून पाहा. गोष्ट कोण सांगणार आहे ? तू स्वतःच ? की तुझ्यातली लेखिका ? तूच सांगणार असशील तर पुढीलप्रमाणे पात्रमुखी पद्धतीने व त्यातही प्रथमपुरुषी निवेदनाने (फर्स्ट पर्सन्‌मध्ये) ती अशी सुरू करता येईल–

'आज कॉलेजात आमच्या नेत्राची चर्या अगदी उतरलेली दिसली मला. का बरं ? नेहमीचे हे हर्षित फुलपाखरू आज असं पंख दुखावल्याप्रमाणे स्तब्ध, उदास का आणि कशानं ? मी विचारच करीत राहिले...'

अच्छा, ठीक आहे आरंभ. नेहमीच या पात्रमुखी पद्धतीबद्दल वाचकांना अधिक जिव्हाळा वाटतो. कारण कथेतील व्यक्तिचित्रांचा निकट भावस्पर्श होणारी अशी त्या कथेतलीच एक व्यक्ती कथा सांगते, हा आभास यात उत्पन्न करता येतो. आणखी एक, पात्रमुखी कथनात कथेतील कोणतीही व्यक्ती पूर्ण कथा सांगू शकेल, अगर कथानकातील दोन-तीन प्रमुख व्यक्तीही कथेचा थोडाथोडा भाग सांगून एका कथेचे सारे धागे गुंफून टाकतील ! महादेवशास्त्री जोशी यांची 'पुत्रवती' नावाची कथा आहे, त्यात आपल्या मातृहीन अर्भकाची गोष्ट एक पिता सारे मनचे दुःखप्रसंग त्यालाच उद्देशून सांगतो आहे अशी अनोळखी कल्पना साकार झाली आहे. तर प्रभाकर तामणे यांची 'नेत्र घे झाकून चंद्रा' नावाची भावकथा आहे, त्यात कथा-नायक, त्याची पत्नी, व त्यांची ५–६ वर्षांची मुलगी या तिघांनीही कथेतल्या घटना क्रमाक्रमाने सांगून कथानक पुरे केले आहे. या पद्धतीत कथेतील पात्रांना आत्मप्रकटीकरणाला पुष्कळच वाव मिळतो हे लक्षणीय जाहे. या पद्धतीला प्रा. फडक्यांनी 'साक्षात पद्धत' असे नाव दिले आहे.

आता दुसरी पद्धत बघ. लिहिणारी तर तूच. पण तुझ्या मनातली लेखिका तुझ्या कथाविश्वांतून जरी दूर जाऊन तटस्थवृतीने 'असे– असे, तिथे ते प्रसंग घडले' हे वाचकांना सांगणार, समजलं ना ? वरील 'नेत्राचे' उदा-हरण तू या पद्धतीने असे लिहू शकशील–

'वडिलांचे ते कठोर शब्द ऐकताच नेत्रा स्तब्ध झाली. हर्षाने स्वच्छंद उडणाऱ्या फुलपाखराचे पंखच मोडून टाकल्यासारखे झाले एकदम. एवढा आपल्या व रवींद्रांच्या प्रीतीचा अपमान यांनी करावा? ती कॉलेजात गेली तींही उतरलेल्या चर्येनं अन् आसवांनी न्हाणाऱ्या डोळ्यांनीच.'

आहे ना ही निवेदनाची झकास तऱ्हा? या तऱ्हेने कथावर्णित व्यक्तींच्या मानसिक भावविभावांचेहि वर्णन लेखकाला सहज येते व दृष्टीसमोर अगर दृष्टीआडही घडलेल्या संबंधित घटनांची पुरी हकीगतही सांगता येते. तो जणू सर्वज्ञ असतो यावेळी निवेदन प्रांतात. प्रा. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी या पद्धतीस, 'दर्शनपद्धत' असे एक सुरेख नाव दिलेले आहे. वरील दोन्ही पद्धतींचा वापर एकाच कथेत करूनही अनेकांनी सुंदर कथा लिहिल्या आहेत.

संवादांतून कथानक प्रकट करणे ही एक कौशल्याची बाब आहे अलका. हे संवाद कथानकाच्या अगर नायिकेच्या तोंडी घालता येतात, अगर ते त्यांच्या दोघांच्याही निकट संबंधित व्यक्तींचेही आपसात झालेले दाखवता येतात. फार काय दूरान्वयाने नायक नायिकांशी संबंध पोहोचणाऱ्या अशा काही व्यक्तीही या संभाषणातून कथानकाला गती देऊ शकतात. उदाहरणार्थ, नेत्रा–आपली तात्पुरती कथानायिकाच. ती– तिच्याबद्दल तिच्या मैत्रिणी आपसांत अशी बातचीत करतील :

'ए! आपल्या नेत्राला आताशा झालंय तरी काय?'

'कुठे काय झालं आहे? कॉलेजक्वीन ठरवल्यापासून तर बाईसाहेब नुसत्या फुलपाखरासारख्या मजेत विहरत आहेत. रोज नवी साडी– नवी वेषभूषा–

'ते कपड्यांचं जाऊ दे ग! ती कशानं तरी फार दुःखी झाली आहे एवढं खरं. अगदी विझलेली अन् थंड वाटतेय बघ.'

'कशावरून पण?'

'अग, काल आपला तो हीरो– रविन्? नेहमीसारखा तिच्याशी बोलायला गेला तर ताडकन् वळून वाघ मागे

लागल्याप्रमाणे ती चालायला लागली अन् मग हळूच तिने
डोळेसुद्धा टिपले, स्वतः मी पाहिलं हे ! '

हीही पद्धत निवेदनात एक वेगळेपणा आणू शकते आणि यांत लेखकाला आणखी एक सवलत मिळते, ती, ही की, अशा दोन-चार संवादात तो कथानकातल्या कित्येक घटना सुचवूं– सांगू शकतो व त्यामुळे कथेला अटोपशीरपणा जरूर येतो. तू लक्षपूर्वक पाहशील तर दरेक कथेत थोडेतरी संवाद असतातच असे तुला दिसेल. ते शक्य तेवढे स्वाभाविक असले, की कथानकाला रंगत चढू लागते. तर, संवाद असे योजावेत की त्याने दुहेरी कार्य झाले पाहिजे. एकतर, कथा ह्या संवादांच्या पायवाटेवरून पुढे पुढेच जायला हवी. तिथेच कथानक एकाजागी रेंगाळता कामा नये व दुसरे म्हणजे कथेला संवादचातुरीनं वेगळं सौंदर्य लाभले पाहिजे ! आणखी एक बघ. आता ते पूर्वीचे दिवस गेलेत हं–! नाटकी आवेशात पूर्वीचे कथानायक नायिकेला ' हे हृदयपुष्प तुझ्या चरणकमलावर मी अर्पण करीत आहे ' असे म्हणत असत ! आज आपण व्यवहारात बोलतो तसेच संवाद कथांतून लिहिले जातात व तेच युक्त ठरेल. सांगण्याचा मुद्दा असा की, कथेतले संवाद प्रत्यक्षातले वाटले पाहिजेत ते साधे तर असलेच पाहिजेत– पण बोलणाऱ्याच्या वयाला, पेशाला, स्वभावाला शोभणारेही हवेत. खरे म्हणजे हे साध्य होणे बरेच कठीण आहे. पण आपल्या सभोवारचे संवाद लक्ष लावून ऐकणे हाच याचा अभ्यास होऊ शकेल, हे मी पूर्वी एकदा तुला सांगितलंच आहे. उदा. कथेत बोलणारी व्यक्ती एक असू शकेल, कबूल. पण ती ज्या ज्या व्यक्तींशी बोलते त्या त्या व्यक्ती भिन्न वयाच्या व भिन्न मनोवृत्तीच्या असू शकतात की नाही ? सांग. मग हे एकाच व्यक्तीचे निरनिराळ्या माणसांशी होणारे संवाद अगदी वेगळेही होतात, आणखी हे कसब तुला तर विशेषच जमते, बरे का ? ' तू छोटचा अंजूबरोबर बोलतेस ते किती निराळे ? तिची बाहुली, नवा फ्रॉक, तिच्या छोटचा कविता, तिचे चॉकोलेट, तिचे रंगीत खडू वगैरे बालिश विषयांत तू रंगून जातेस अगदी. पण आईबरोबरचे तुझे संवाद वेगळेच असतात ! उदा–

'काय झालं ग आम्ही सहाच्या शोला गेलो म्हणून ? कँपात दूर थिएटर असलं तरी काय झालं ? आम्ही चांगल्या चार-पाच जणी आहोत की. त्यात

कसली भीती येताना ? पण तुझा आपला रिकामी काळजी करण्याचा स्वभावच. आई ! आता लहान आहे का मी ?'

तुझी रुष्ट स्वरातली अशी वाक्ये मी तेथे कितींदातरी ऐकली आहेत; अन् तुझी मैत्रिणीवरोबरची भाषा ? ती खास कोणत्यातरी मूल्यवान् हित-गुजाचीच ठेव ! आणखी सहाध्यायी मित्रांवरोबरची भाषा ? ती तर आम्हां भावडच्या वयस्क मंडळींना कळणेही मुष्कील; असंच ना ? तर सांगायचं असं की, बोलणाऱ्या व्यक्तिनुसार संवादक्षेत्रेही भिन्न होऊ शकतात, इतकेच नव्हे तर त्यांचा आशय व भावही अगदी वेगळा-आगळा असा आढळात येतो. त्याचे निरीक्षण व मनन लेखकाने सुरुवातीला तरी अभ्यास म्हणून करावे, असे माझे म्हणणे.

जी गोष्ट कथेची तीच कादंबरीचीही... अलके. कादंबरीतही संवाद खूप लागतातच व तेही कथेत येणाऱ्या संवादांप्रमाणे चटकदार, कथानकाची गतिप्रगती वाढवणारे आणि सहजसुंदर असेच असावे लागतात, व ही संवादातली साहजिकता कशी असते वा असावी, हे व्यवहारात ऐकू येणाऱ्या संवादांवरूनच चांगले ध्यानात येते. म्हणून ' संवाद ' हा कथानकातला एक महत्त्वाचा घटक तुला आज थोडा विस्ताराने सांगितला आहे, म्हणजे पुढे कादंबरीच्यावेळी मला तो परत सांगायला नको. आणखीही एक ध्यानी ठेव. आजकालच्या मराठी कथेला संवादांनी एकप्रकारचे वेगळेच नाविन्य आणले आहे ते म्हणजे फोनवर झालेली संभाषणे ! त्यांचीही स्वतंत्र कथा होऊ शकते ! या भाषणाचा विशेष असा की, याला वेळाची मर्यादा असल्याने संवाद अगदी थोडक्यात आटोपावे लागतात व त्यामुळे ते अधिकच आशयघन व चुरचुरीत होऊ शकतात. प्रभाकर तामणे यांचीच ' एक दिवाणे– नवथर गाणे ' ही कथा पाहा. यात नायिकेची नोकरीच मुळी टेलिफोन ऑफिसात ! तेथूनच ती नायकाशी उत्कट प्रेमाची संभाषणे करते आणि गंमत ही की आजूबाजूचे कर्मचारी यांच्याही कानी हे भाषण पडत असते व हे गुप्तप्रेम खऱ्या अर्थाने षट्कर्णी होत असते ! आणि या अडथळ्यांची एक मजेदार किनार त्या प्रेमसंवादाला वरचेवर लागलेली पाहून वाचकही खूष होतोच !

अलका, पत्रात्मक कथाकादंबरी ही निवेदनाची आणखी एक शैली, यात

लेखकही, स्वतःच ' कथेतल्या माणसांची पत्रे ' लिहून कथानकांचे धागेदोरे कळवू शकेल– अर्थात तटस्थ भूमिकेतून किंवा लेखक स्वतःच कथेत गुंतलेला आहे, कोठल्यातरी वेगळ्या नावाने कथेतल्या वातावरणात वावरत आहे अशीही कल्पना केल्यास तोही (लेखक स्वतः) कथेतली एक भूमिका करणारा घटक ठरून राहील. समज, की तुझ्या गौरी या मैत्रिणीला आपल्या पूर्वपरिचयाच्या ' त्या नेत्राची ' बातमी तू कळवणार आहेस. तर गौरी आणखी तू, दोघीही या कथेत पदार्पण करून पत्राने तिच्याबद्दल चर्चा करताहा, अशीच भूमिका तुला घ्यायला हवी. हे पत्र तू असे लिहू शकशील.

> ' गौरी, अग आपली निटू, आपली ती कॉलेजक्वीन नेत्रा ? ती सध्या मुळीच मूडमध्ये नाही. सदा कपाळाला आठी अन् मनातही अढीच; पाहावं तेव्हा कळी कोमेजलेली. काय झालं आहे, कोण जाणे ! विशेष बातमी म्हणजे लैला–मजनूची जोडी पण फुटलेली दिसते आताशा. रविंद्र अन् ती एकमेकांकडे घायाळ नजरेनं बघतात व मान फिरवून दोघेही चालते होतात. कॉलेजात आजकाल हे मोठे सेन्सेशनच झाले आहे बघ.'

अशा पत्रलेखनात पात्रमुखी प्रकटनपद्धतीचा जिव्हाळा आपोआपच उतरतो. पण केव्हा ? पत्रे आकर्षक तऱ्हेने लिहिण्याची कला असेल तरच– बाकी तू आधीच सुरेख पत्र लिहितेस तेव्हा तुला हे कलम तसे अवघड नाही वाटणार म्हणा !

या पद्धतीत आणखी एक मोठीच सवलत लेखकाला मिळते, ती ही की, असे पत्र कथेतली कोणीही व्यक्ती कोणालाही लिहू शकते. उदा. नेत्राचा ' रविन् ', हाही, हे अपेशी प्रेमकरण वैतागाने आपल्या जिवलग मित्राला लिहू शकेल, अगर स्वतः नेत्रा ' दुसऱ्याशी लग्न होणार असल्याचे ' वृत्त आसवांनी भिजलेल्या कागदावर रविंद्राला लिहील किंवा नेत्राचे वडीलही मुलीला जरबेचे, धाक दाखवणारे एक कडक पत्र लिहितात असेही दर्शविता येईल, कथेला वैचित्र्याची देणगी पत्रात्मक कथनपद्धतीने सहज मिळू शकते. व पत्रनिवेदनाने लेखक, पत्रे लिहिणाऱ्या व्यक्तीचा स्वभाव, वय, विचार, मनोगत यांचाही एक वेगळा आगळा आलेख दर्शवू शकतो, हे विशेषच.

आणखी एक मजा बघ. पत्रांप्रमाणेच या निवेदनपद्धतीत एखाद्या तारेचा मजकूर, नेत्राप्रमाणे एखाद्या नायिकेची 'दुसऱ्याशीच लग्न होत असल्याची' विवाहपत्रिका, क्वचित वर्तमानपत्रांची कात्रणे हीही समाविष्ट करता येतात. आणखी एक वेगळा प्रकार म्हणजे या पत्रकथेत दुसऱ्यांच्या चिठ्ठ्या, पत्रातला मजकूर किंवा छोटे पत्र, पत्रातच दाखवता येते व मग कथेत निवेदनाचा तोचतोपणा राहत नाही. अशा पत्ररूप कथा मासिकातून तुम्ह्या पाहाण्यात असतीलच ? विशेष म्हणजे या पत्रमाध्यमाचा कादंबरीतही उत्तम उपयोग करून घेता येतो, म्हणजेच, कादंबरीत, अधूनमधून काही पत्रे व त्यांची उत्तरे देऊन निवेदनाची रंजकता लेखक वाढवू शकतो. उदा. माझ्या 'तेजस्विनी' कादंबरीत मी तर एक स्वतंत्र पत्रांचेच प्रकरण दिले आहे ते बघ. काही पूर्ण कादंबऱ्याच केवळ पत्रांच्याही असतात. उदा. पु. भा. भावे यांची 'अकुलिना' ही बरीच गाजलेली कादंबरी, ती अशी संपूर्ण पत्ररूप असूनही रंजक व चित्तवेधक व उद्‌बोधक वाटणारी आहे. तेव्हा, समजलं ना ? उत्तम पत्रलेखन हा कथानकाला आकर्षकता प्राप्त करून देणारा एक स्वतंत्र पैलू आहे.

आणखी एक यातलाच निवेदनप्रकार म्हणजे डायरीची पाने दर्शवून कथानक त्यातूनच उलगडत ठेवण्याचा. कथेतीलच एखाद्या व्यक्तीच्या रोजनिशी 'लेखनातील' काही पृष्ठे दाखवूनही कथेला तुम्ही वेग व वैचित्र्य यांचा लाभ करून देऊ शकाल. यातही एक चांगली बाजू अशी की, पात्रमुखी निवेदनाचीच पद्धत स्वीकारून ही व्यक्ती दैनंदिनी लिहीत असते, म्हणून ह्या लेखनात अधिक आत्मीयता व जिव्हाळा तर उत्पन्न होतोच, पण वेगवेगळ्या कथाव्यक्तींचे भिन्न विचारवर्तुळही स्पष्ट होते ! उदाहरणार्थ वरील 'नेत्रा'च्याच कल्पित कथेत, नेत्राच्या त्या 'निर्दय' वडिलांच्या डायरीची काही पृष्ठे दाखवल्यास त्या कथेस अगदी वेगळा पण नवा रंग चढू शकेल. कसा तो पाहा– त्या पित्याच्या 'कल्पित' डायरीतले एक पृष्ठ असेही असेल–

> 'नीटी,– माझी लाडकी नेत्रा, परवापासून पावसानं झोडपलेल्या लतेसारखी अगदी निस्तेज झालेली मला दिसत का नाही ? बेबी, तुझी ही विझल्यासारखी चर्या पाहून माझ्या

जीवाची अहोरात्र होरपळ होते आहे, पण त्या नीच अर्ध-वयाच्या जहागीरदारानं मला कसं चिमटचात पकडलं आहे, ते तुला कसं आणि काय सांगू बेटा ? 'तुमची अब्रू की मुलीचं सुख ?' हा प्रश्न करून त्याने तुला मागणी घातली आहे...! विचाराने डोके भणाणते आहे, वाटतं, झोपेच्या गोळ्या खूप खाव्या अन् हे विचार कायमचेच थांबवावे– पण परत तुझाही विचार येतो... पोरी नीता, माझे एक जीवन रहस्य त्या दुष्टाच्या हाती लागले आहे ग–! कसे सांगू तुला ?' इत्यादी...

तर डायरीच्या काही पृष्ठांनी कथानकाला आकर्षकता लाभते इतकेच नव्हे तर पूर्ण दैनंदिनीरूप केलेल्याही कथा-कादंबऱ्या आज पाहण्यात येतात, अशा प्रकारचे एक चांगले सरस उदाहरण म्हणजे अलीकडेच प्रसिद्ध झालेली शं. ना. नवरे यांची ' दिवसेंदिवस ' ही कादंबरी होय.

कथानिवेदनात वैचित्र्य व विविधता आणणाऱ्या आणखीही काही विद्वन्मान्य तऱ्हा आहेतच अलके, त्यासंबंधीही थोडेफार पाहू या. पैकी, एक प्रकार म्हणजे गोष्ट ज्या क्रमाने घडत जाते, तशीच सरळ सांगणे. ही तऱ्हा आजवरच्या अनेक कथा-कादंबऱ्यातून वापरली गेली आहे; पण यांत फारसे लेखकाचे कौशल्य मानता येत नाही. तूच बघ, दूरचा रस्ता सरळ, आखीव दिसत असतो, तो चालून जायचा. यात अवघड तरी काय आहे मोठे ? या कथनपद्धतीचे आपण एक छोटेसे उदाहरण घेऊ या– पुढील परिच्छेद बघ–

'सुमतीचा लग्नापूर्वीच प्रेमभंग झाला होता. लग्न झाले पण नवरा अगदी तिरकस व संशयी स्वभावाचा होता. आणि काय दुर्दैव पाहा, मूल झाले तर तेही रंगरूपाने आई-वडिलां-प्रमाणे नसावं ? मग तर संशयकल्लोळातील फाल्गुनरावा-सारखा तिचा पती सारखाच तिचा संशय घ्यायला लागला ! आणि काय विचारता ? रोज खडाष्टकं, कडू बोलणी, मानहानी ! ! अखेर काडीमोड घ्यायचा सुमतीनं मनाचा ठाम निश्चय केला.'

यांत, एका पूर्ण कथेच्या एकामागोमाग घडलेल्या घटना सरळ क्रमानं सांगितल्या आहेत. जणू लेखक वाचकांना म्हणतो, ' चला माझ्याबरोबर या

रस्त्यानं, असे असे घडत गेले ते ते सारे पाहतच पुढे जाऊ आपण.'

ही पद्धत लिहायला सोपी व सर्वमान्य अशी आहे म्हणून तिचा वापर आजही असंख्य कथानकांतून होत आलेला दिसतो. पण कथेचे कथानक दुसऱ्याही तऱ्हेने सांगता येते. ही दुसरी तऱ्हा म्हणजे कथेची अखेर आधी सांगायची व मग या परिणामाला पूर्वघटना कशा कशा प्रकारे येऊन पोहोचल्या ते विशद करायचे. या दृष्टीने वरील कथानक असे सांगता येईल–

> 'सुमती घटस्फोटाचा अर्ज करायला निघाली होती ती मनाचा पुरा निश्चय करूनच. दिवाणखान्यात तिच्या पतीचा मोठा फोटो होता तिकडे पाहत ती, त्याला उद्देशून म्हणाली, 'अहो, लग्नापूर्वी केलं असेल प्रेम मी सुनीलवर. पण नंतर कधीतरी मी तुमच्याशी, तुमच्या प्रेमाशी प्रतारणा केली होती का ? तरी आपलं, सारखं धमकावून 'बाळ असा वेगळचा रूपाचा का झाला ?' हेच विचारणं तुमचं ! जीव नको झाला आहे. नाटकातला तो 'फाल्गुनराव'सुद्धा एवढा संशयी नसेल !' मग ती डोळे पुशीतच गाडीत बसली.

मघाशी पहिल्या पद्धतीला आपण सरळ रस्ता म्हटले होते. तर या प्रकाराला वळणावाकणाची, मध्येच झाडीत लपलेली, मध्येच थोडीशी दिसणारी अशी पायवाट म्हणू आणि तुला चित्रकलेचं ज्ञान आहेच, अलके, तेव्हा सरळ रेषेपेक्षा वक्ररेषेत अधिक सौंदर्य असते, हे तत्त्व तुला नवेही नाही. दुसरा फायदा असा की वळणाची वाट जसे बरेचसे अंतर एकदम काटू शकते तद्वत् या पद्धतीने कथानकातले पूर्वी घडलेले प्रसंग अगदी थोडक्यात अगर सारांशरूपानेही सांगता येतात, नाहीतरी उंचावरून पाहिलं की वस्तू छोट्या दिसतातच ना ? तसे हे प्रसंग, दुरून पाहून सुटसुटीतपणे दाखवता येतात व आपोआपच कथेतले मितव्ययाचे धोरण साध्य होते. ही निवेदनाची युक्ती अगर क्लृप्ती अधिक कलापूर्णही आहे व हिचे इंग्रजी नाव 'फ्लॅशबॅक' पद्धत असे पडलेले आहे, ते अनेक वेळा तुझ्याही कानावर आले असेलच.

अर्थात या पद्धतीला जास्त कलापूर्ण का म्हणायचं ? अशी तुझी जिज्ञासा

असणारच, त्यासंबंधीही बघू. अलका, आठवतं. का तुला, आपण एकदा औरंगाबादला असताना वेरुळची लेणी बघायला गेलो होतो ते? तेथे कैलास लेणे 'आधी कळस मग पाया रे!' या प्रसिद्ध उक्तीनुसार, शिखरापासून आरंभ करून खाली पायापर्यंत खोदले, कोरले, गेले आहे हे कळल्यावर विस्मयाचा केवढा धक्का बसला होता सर्वांना! आणि मग त्या अनाम कलावंताची कला, तेथल्या इतर उत्कृष्ट कोरीव कामाहून शतपट अधिक, अशी आपल्या मनाला मनाला झाली होती, हेही तुझ्या स्मरणात असेलच? तर हीही 'फ्लॅशबॅक पद्धत' तिच्या अवघडपणामुळे व नाविन्यामुळे तशीच अधिक कलापूर्ण ठरणारी आहे.

अर्थात हीच पद्धत कथाकाराने सर्ववेळी वा सर्वथैव वापरावी असा मात्र सिद्धान्त मुळीच नाही हं! पुष्कळशा कथा-कादंबऱ्यांत वा नाटकांत ही अशी निवेदनपद्धती वापरतात, पण काही थोड्या मर्यादेपर्यंतच. काही घटना सरळ घडलेल्याही दर्शवाव्या, 'आता पुढे काय?' अशी उत्सुकता वाचकांत वा प्रेक्षकांत निर्माण करावी; काही या फ्लॅशबॅक पद्धतीनं दाखवून 'हे असं कसं झालं असेल?' ही वाचकांना उत्कंठा वाटू द्यावी व कथेला दोहो निवेदन प्रकारांनी रंजनलेणे चढवावे, हीच संयुक्तपद्धत अनेक लेखकांनी स्वीकारली आहे, तसेही तुला करायला हरकत नाही. चित्रपटांत नाही का, एखाद्या नायकाचे अगर नायिकेचे काही जन्मरहस्य असते ते मध्येच केव्हातरी 'बीस बरस पहले!' म्हणून जुन्या हकीगतींची रिळे उलगडून थोडा वेळ दाखवले जाते व मग परत क्रमवार घटना सुरूच, तसेही हेही. तर सांगायचं असं की 'निवेदनाच्या चमत्कृतीपूर्ण विविध तऱ्हा' याच दृष्टीने तू इकडं पहा व लिहिताना जरूर तेव्हा यातल्या कोठल्याही पद्धतीचा एकेरी अगर संमिश्र उपयोग कर. कथा सुंदर लिहिली जावी हेच खरे उद्दिष्ट; ते कोणत्या पद्धतीने नीट साधेल हे तुझे तुलाच समजू शकेल. आणखीही एकदोन छोट्या पण महत्वाच्या बाबतीत या निवेदन संदर्भात तुला सांगाव्याशा वाटताहेत. सांगू ना? त्यांनी काही हे पत्र फारसं मोठं व्हायचं नाही.

अलके, कथानकाचे निवेदन अगदी आरंभापासून शेवटच्या वाक्यापर्यंत मनोवेधक झाले पाहिजे, असा यातले, तंत्रमंत्र, साधना, शिकवण वगैरे लिहिणाऱ्यांचा कटाक्ष आहे, हे माहीत आहे का तुला? नसेल बहुतेक.

कारण आरंभालाच कोण एवढी पहिल्या वाक्यापासून निवेदनगुणांची चिकित्सा करायला बसलं आहे ? असाच नवोदित लेखकांचा साधा सरळ हिशेब, तो चुकीचाही नाही. पण आपण जी लेखनिर्मिती करणार, ती जास्तीत जास्त निर्दोष व आकर्षक व्हावी यासाठी दरेक लेखकाने जागृत व प्रयत्नशील राहायला हवेच, असे मला तरी मनापासून वाटते, म्हणून कथेचा आरंभ व शेवट याबद्दलही थोडंफार सांगून ठेवते हं ! कथनात कंटाळवाणेपणा येऊ नये म्हणून, लेखकाने प्रारंभापासूनच पात्रे, प्रसंग, वर्णन, संवाद सगळ्यांबद्दलची वाचकांची उत्सुकता खेळती ठेवली पाहिजे– नुसती खेळती नव्हे, तर, ती वाढतीचढती राहील अशी रचना केली पाहिजे, हा एक सिद्धान्त मनाशी प्रथम बांधून ठेव ! वाचकांची उत्सुकता प्रथमपासून अखेरपर्यंत कायम कशी ठेवावी, याबद्दलही काही सर्वसाधारण नियम आहेत, व वेगवेगळे प्रकारही आहेत कथनाचे. कोणाची वर्णनशैली इतकी सुंदर असते की, त्या भाषेच्या ओघांत वाचक नकळत पुढेपुढे धाव घेत राहतो, क्षणभर मध्ये थांबायलाही त्याला उसंत नाही जशी ! कोणी कथानकाची रचनाच इतकी उत्कंठापूर्ण तऱ्हेने करतात की 'याची अखेर काय होणार ?' हे प्रश्नचिन्ह वाचकांची उत्सुकता सारखी जागृत ठेवते. आणखी एक-दोन लहानशा युक्त्या करूनही ही उत्कंठा जागृत करता येते अलका, त्याही तुला सांगून ठेवलेल्या बऱ्याच. अग, कथेचा आरंभ, आरंभीची वाक्ये, यांनीही वाचकमनात उत्सुकता निर्माण करता आली तर तुम्हाला पन्नास मार्क. माझ्याच एका कथेचं उदाहरण देण्याचा मोह मला या वेळी होतो आहे, कारण तू ती माझी ती 'सुंदर तारुण्य' कथा वाचलेली आहेसच ? 'तारुण्य सुंदर असते, कारण–' हे त्या कथेचे पहिले अर्धेच वाक्य होते व हे कारण कोणते असावे, याचा संदेह वाचकांच्याच नव्हे तर कथानायिकेच्या मनातही मी शेवटपर्यंत तरंगता ठेवला आहे, आणि मग अगदी शेवटी मुसोलिनीचे ते वाक्य– 'तारुण्य अत्यंत सुंदर आहे, कारण मृत्यूलाही भीक न घालणारे काळीज फक्त तारुण्याजवळच असते–' हे लिहून कथा संपवली आहे. ती कथा पुष्कळजणांना आवडल्याची पत्रेही मला त्यावेळी आली होती. तर कथेचा आरंभच कुतूहल निर्माण करणारा असावा, असे बऱ्याच कथाकारांनी व वाङ्मयसमीक्षकांनी सुचवलेले आहे, ते तुला जमल्यास पाहा.

उदा.–

'साडेसात वाजून गेले, सूर्याचे ऊन ऊबदार झाले. तात्यासाहेबांच्या बागेतही ते ऊन सगळ्या कळ्याफुलांवर मायेचा हात फिरवू लागले– रोजच्यासारखेच.'

या आरंभापेक्षा–

'सकाळी सूर्याचे पिवळे सोनसळी ऊन चोहींकडे रांगू लागले, तरी आज तात्यासाहेबांच्या खोलीच्या खिडक्या अन् दारे बंदच ? असे का ? आहे तरी काय प्रकार ?'

हा आरंभ एकदम उत्कंठानिर्मिती करणारा वाटतो की नाही ? तूच बघ. वाटलं तर आणखी एक उदाहरण घेऊ– पात्रमुखी पद्धतीच्या कथेचे. प्रथम ही एक कथेची साधी सरळ सुरुवात पाहा–

'माझं नाव आशा. आईनं मोठ्या हौसेनं माझं हे नाव ठेवलं खरं, पण नावाप्रमाणे माझ्या आयुष्यात काहीच घडलं नाही, निराशाच उलट वाटणीस आली.'

उलट आता याच कथनाची ही दुसरी कुतूहलजनक सुरुवात बघ–

'आशा, आशा ! काय म्हणून ठेवलं आईनं माझं हे नांव ? कशासाठी ? म्हणे आशा. आई ग, यापेक्षा 'निराशा' हेच नाव मला खचित् छान शोभल असत ग ! आहे काय आज या रिकाम्या हातात निराशेवाचून दुसरं ?'

ही जास्त बरी वाटते ना ? कारण स्पष्ट आहे. कुतूहल जागृत करण्याची युक्ती या दुसऱ्या प्रारंभात वापरलेली आहे.

अर्थात कुतूहल सुरुवातीपासूनच कथेत पेरावे, असा काही पक्का नियम नाही हं, पण गोष्टीच्या आकर्षक सुरुवातीची ही सुरुवात जमली तर फार चांगलं, इतकंच मला म्हणायचं आहे. केव्हा केव्हा कथेची सुरुवातीची वाक्ये मुद्दाम सूचकतेने वापरलेली असतात व ती कथाविषयाकडे अचूक अंगुलि निर्देश करीत असतात. उदाहरणार्थ–

'वसंताच्या पाऊलखुणा पुसट झाल्या आहेत, येतो आहे तो ग्रीष्म– उन्हाळ्यानं जमिनीला भेगा पाडणारा, अन् सगळ्यांना हायहाय करायला लावणारा.'

ही सुरुवातीची वाक्ये, एखादी तारुण्याचा बहर ओसरलेली निराश प्रेम-भग्न प्रौढकुमारिका अशी कथानायिका, व तिची गोष्ट, सूचित करू शकतील, होय ना ? अशी सूचकताही कथाविषयास सौंदर्याचा साज चढवीत असतेच पण तिचा उपयोग मार्मिकतेने करता यायला हवा एवढेच.

आणि कथा शेवट ? जसं आरंभाबद्दल थोडंफार सांगितलं, तसं कथेच्या शेवटाबद्दलही एक-दोन बाबती सांगता येण्याजोग्या आहेत. अलका, कोठलीही कथा आपण वाचूं लागलो की, तिचा अमक्या प्रकारचा शेवट असेल, अशी एक आपली मनोधारणा बनू लागते, नाही का ? या आपल्या अपेक्षेला अनपेक्षित कलाटणी शेवटच्या प्रसंगात अगर वाक्यात देऊन कथा संपवणारेही काही प्रसिद्ध लेखक आहेत. ओ. हेन्री यांच्या कथा त्या दृष्टीने फार गाजलेल्या आहेत– नुसत्या गाजलेल्याच नव्हेत अलका. तर चमत्कृतीपूर्ण व आकस्मिक वाटणारा कथाशेवट ' हे त्यांचे खास वैशिष्टय मानले जाते. त्या कथा तू वाचल्यास की माझ्या म्हणण्याचं प्रत्यंतर तुला येईल.

अर्थात् वरील तऱ्हेचा कथाशेवटच इष्ट, श्रेष्ठ व तसाच दरेक लेखकाने तो केला पाहिजे, असं मुळीच मी म्हणणार नाहीये, एक पद्धत आपली तुला माहीत असावी म्हणून सांगितली आहे, पण कथा-शेवट कसा करावा वा असावा याबद्दल मला तुला दुसरंच महत्त्वाचं काही सांगायचं आहे ; ते असं की:

' लेखकाला कथेत प्रामुख्यानं काय सांगायचं आहे, ते सांगून झालं की लगेच गोष्ट संपलीच पाहिजे ! मग उगीच ज्यादा तपशिलाची लांबण लेखकाने लावता कामा नये ! समजा की, ' सगळे संकटाचे गड जिंकून नायकाने दुष्प्राप्य नायिकेचे प्रेम संपादन केले.' अशी तुला एक यशस्वी प्रेमकथा लिहायची आहे, तर शेवटची वाक्ये तू ' त्याने हर्षाने तिच्याकडे पाहिले. नजरेला नजर भेटली. काय नव्हतं त्या नजरेत ? आर्जव तर होतंच व त्याच्याबद्दलची अथांग प्रीतीही हलकेच नजरेतून डोकावत होती.' एवढीच वा अशीच लिहू शकशील. पण मग ही वाक्ये लिहिल्यावर त्यानंतरही दोघांची प्रेममय बोलणी काय झाली, त्यांचे पुढे लग्न कसे झाले, खलनायक कसा डाफरतच राहिला, विहीणींचे मानपान झाले की नाही, आजूबाजूचे लोक काय म्हणाले, अन मग ' रात्र ' कशी रंगली, हनिमून कुठे

झाला ? इत्यादी तपशील देण्याची बिल्कुल जरुरी नाही ! हां, आता एक मात्र आहे, लग्नापासूनच जर तुझ्या कथेचा आरंभ होत असला तर कदाचित या सगळ्या पायऱ्यांवरून तुझ्या कथानकाला तू नेऊ शकशील व त्यातल्या कथापोषक घटना उचलून घेऊ शकशील. पण तुझ्या प्रेमकथेची अखेर ' नायकनायिकांचे प्रेमलग्न ' हीच असल्यास तुला हा घोटाळा लिहीत बसायचं कारणच नाही उरत ! दुरून बोहले अगर लग्न-मंडप बोटाने दाखवला की बस, मग मंडपाच्या लगीनघाईत शिरायचं काय प्रयोजन ? सांग पाहू ?

तर अशा या निवेदनाच्या एकेक तऱ्हा. पुढल्या पत्रात कथेबद्दल दुसऱ्याही काही महत्त्वाच्या गोष्टी सांगेन. तोपर्यंत निरोप घेते. मात्र हे लांब पत्र कितपत मनास आले ? ते मात्र जरूर कळव हं. अन् यातल्या कोठल्या तऱ्हेचे निवेदन तू कथेतून वापरणार तेही पाहायला मी उत्सुक आहेच--! अच्छा, घेऊं निरोप आता ?

तुझी--
सौ. ताई

१० कथेचे बाह्यसौंदर्य

प्रिय अलका,

गेल्या दोन पत्रांनी लघुकथेच्या स्वरूपाची थोडीबहुत तोंडओळख तुला झालेलीच आहे. पण एखाद्या मैत्रिणीची पुरी ओळख करून घ्यायची असेल तर तिचा सहवास अधिक झाला पाहिजे, खरं ना? त्यानंतरच तुला तिच्या स्वभावाचे भलेबुरेपण कळून येईल आणि गुणांची किंवा दोषांची ओळख पटेल. तर आज अशी लघुकथेबद्दलची जास्तीची माहिती द्यावी म्हणते. मग हच्या दृष्टीने तू कथा अधिकाधिक वाचशील, व त्यामुळेच तुझा लघुकथेशी घनिष्ट संबंध येईल, व ओळख पक्की होईल.

सांग अलका, एखादी मैत्रीण चांगली अगर उत्तम, असे तू म्हणतेस, तेव्हा ही पारख तू कोणत्याकोणत्या दृष्टीनं करतेस? परवा तुझ्या दोन नव्या मैत्रिणी– जया व विजया– मी सहज पाहिल्या. जयाची वेषभूषा अगदीच साधी होती– लक्ष जाऊ नये इतकी सामान्य. पण बोलणं अति मृदू, जिव्हाळचाचं व वागणं अगदी समयोचित व सरळ वृत्तीचं होतं. उलट विजया? अत्यंत टापटिपीची, अद्ययावत् वेषभूषा, रूपभूषाही अतिशय काळजीपूर्वक करणारी अशी दिसली. पण तिची प्रवृत्ती लोकांची कुचेष्टा करण्याकडे, इतरांना तुच्छ मानण्याकडेच अधिक दिसून आली. तुला मात्र या दोघी सारख्याच प्रिय होत्या. का बरे? एकीचं अंतःसौंदर्य व एकीचं

बाह्यसौंदर्य दोन्ही तुला सारखंच लोभनीय वाटत होतं, ओळखलं की नाही मी बरोबर ?

सांगण्याचं कारण असं की, ' लघुकथा ' हचा तुझ्या वाङमयीन मैत्रिणी-तही हे दोन्ही तऱ्हेचे सौदर्य सामावलेले असते, पण एक आहे, जिच्यात ही दोन्ही सौदर्य एकवटलेली प्रत्ययाला येतात, तीच लघुकथा सर्वार्थाने आकर्षक ठरते. एखाद्या आदर्श युवतीप्रमाणे उत्तम बांधा जसा कथेला असू शकतो तसेच भावसौंदर्यही असू शकेल ! शकेल असेच केवळ नव्हे, तर असतेही !

पैकी आज आपण कथेच्या बाह्यसौंदर्याबद्दल प्रथम विचार करू. हे बाह्यसौदर्य पुढील बाबतींवर अवलंबून असते:—

१. संवादचातुर्य.

२. भाषाशैली.

३. वर्णने.

४. बांधेसूदपण.

ज्याला उत्कृष्ट कथालेखक व्हायचं आहे त्याने या प्रत्येक बाबतीचा काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे, हे उघडच आहे. पैकी ' संवादचातुर्या ' बद्दल मी ' निवेदन ' प्रकरणात तुला बहूतांशी कल्पना दिलीच आहे. तेव्हा पुनरुक्ती नको, तर प्रथम आपण आता 'भाषाशैली ' याकडेच लक्ष देऊ या.

या भाषाशैलीचे किती प्रकार ? अन् प्रत्येकाचे रूप वेगळाले. काही नमुने बघण्याजोगे आहेत. आमच्यावेळी गाजलेली, पण आता जुन्या वाचनालयात-सुद्धा दुर्बिण लावूनच शोधावी लागतील अशी काही शैलीदार पुस्तकं माझ्या आठवणींत आहेत, पण त्यांची उदाहरणे तुला देणे बरे नाही, कारण झटकन हाती न लागणाऱ्या उंचावरच्या द्राक्षघडांसारखीच ती तर !

त्यापेक्षा अलीकडच्याच काही लेखकांची उदाहरणं देते, ती तुला, ती ती पुस्तकं मिळवून पडताळून तरी बघता येतील. अलका, शब्द व वाक्ये यानीच भाषा समजते, पण त्यातूनच निरनिराळ्या लेखकांची शैली भिन्नत्त्वाने मन वेधून घेते. उदा. ज्योत्स्ना देवधर यांच्याएका कथेची सुरुवातच अशी:—

हा दवाखाना.

हे रोगी.

ही मी.

डॉक्टरीण.

दीपा पैंगणकर.

स्वच्छता आहे. शुभ्र पडदे. साफ फरशी. फ्लॉवरपॉटमध्ये डोलणारी फुलं...रंगीबेरंगी...खूप नावलौकिक आहे माझा. पेशंटस्‌ची रीघ असते. दिवस संपतो. रात्र होते. पण रोगी कमी होत नाहीत...

किती छोटी वाक्ये. लहानशा देठावर चिमुकली बटनशेवंती फुलावी तशी. पण तुझ्यासमोर एका दवाखान्यातल्या कुशल स्त्री डॉक्टरचे चित्र ती उभी करू शकतात.

अर्थात वाक्ये तुटक तुटक अगर छोटीच असावीत, त्यातही शब्द कमीच असावे व तेच काय ते आकर्षक भाषाशैलीचे एक लेणे– असे मात्र मुळीच मला म्हणायचे नाही, पण ह्या अशा क्रियापदांरहित वाक्यांचा एक नवा पायंडा आजकालच्या अनेक कथांतून पडू लागलेला दिसतो, त्याची ओळख तुला करून दिली इतकेच. मात्र एक कलम नीट लक्षात ठेवायचे, ते हे की, भाषेला वरील 'बाळलेणे' जसे खुलून दिसते तसा प्रौढतेचा साज, म्हणजेच भारदस्त वाक्ये व उपमालंकारांचे लेणे, हेही छान शोभून दिसते. आणखीही ही काही लेखकांची उदाहरणे भाषाशैलीचे नमुने म्हणून लक्षणीय ठरतील. उदा. अच्युत बर्वे हे दहा-पंधरा वर्षांपूर्वीचे एक चांगल्यापैकी कथाकार म्हणून प्रसिद्ध. त्यांच्या 'धार' या कथेत 'मी सुखात होतो' हे सांगण्याची शैली बघ–

'मी सुखात होतो. फार सुखात होतो. सर्वसाधारण माणसे इतकी सुखात नसतात. काही असली तरी सर्वकाळ नसतात, पण सुखाची माझ्यावर मेहरनजर होती. चवीने खावे तसा मजेच्या नानापरी मी भोगत होतो. काम करण्यात मजा वाटत होती. मित्रांशी गप्पागोष्टी करण्यात आनंद वाटत होता. फार काय, रस्त्यावरून साधे चालायचे झाले तरी चेंडूने उशी घेत जावे तसा मी मजेत चालत होतो. मला काय कमी होते ? सुख माझ्यासाठीच जन्माला आले आहे असे वाटत होते.'

बघितलंस ? येथ वाक्ये तोकडी नाहीत. भाषालंकार फारसे नाहीतच

पण तरीही हे सांगणे जिव्हाळ्याचे वाटते, कारण माणसाच्या आत्म-प्रतीतीची झलक यात उमटली आहे, शिवाय एकच वाक्य किती प्रकारे खुलवता येते हेही यातून दिसून येते. तरी मी बव्यांची 'सुखा 'बद्दलची काही थोडीच वाक्ये येथे दिली आहेत, तेथे मुळात ती याच्या दुप्पट तरी आहेत ! भाषा खुलवून लिहिण्याचा एक प्रकार एवढ्याच दृष्टीनं तू इकडे पाहावेस.

दुसरे असे की, लेखकाने ज्या कोणत्या कालखंडातल्या कथानकाची निवड केली असेल त्याला सुसंगत ठरेल अशीच कथेची भाषा नको का ? शिवाजीच्या अगर पेशवाईच्या काळातले कथानक असेल तर जी भाषा त्याकाळी चालत होती तशाच पद्धतीची असावी लागेल कथेतही ! आजकाल जसे इंग्रजी शब्द मराठीच्या गळ्यात गळा घालून भाषेत रूढ झाले आहेत. तसे त्यावेळी अनेक उर्दू शब्द मराठीत रुळलेले होते व भाषेची ही जडण-घडणही काही वेगळ्या तऱ्हेची होती. हे लक्षात घेऊन काहीजणांनी ऐतिहासिक गोष्टी लिहिल्या, फार सुंदर लिहिल्या. उदा. अशीच एक 'कळवंतीण' नावाची कथा बाबासाहेब पुरंदऱ्यांनी किती छान लिहिली आहे, तू वाचली आहेस का ? सगळी भाषा त्या काळाला शोभेशीच. उदा:

> 'तेवढ्यात खासबारदाराने श्रीमंतांच्या नावाची ललकारी दिली. ललकारीचे अल्काब दरबारात घुमू लागले. भराभर सारा दरबार शेलेशाली सावरीत उभा राहिला. महालाच्या भव्य प्रवेशद्वारातून श्रीमंत पंतप्रधान सवाई माधवरावसाहेब पेशवे दरबारात प्रवेशले. त्यांच्या डाव्या खांद्यावर भरजरी शेला होता, गळ्यात मोत्याचा आणि नवरत्नाचा कंठा होता. मस्तकावरच्या पगडीवर चमकती कलगी अन् मोत्यांचा डौल-दार तुरा होता. सरदारदरखदारांचे मुजरे घेत व शास्त्री-पंडितांना किंचित झुकून नमस्कार करीत श्रीमंत मसनदीकडे चालले होते–'

कशी आहे भाषा, पाहिलीस अलका ? यामध्ये अल्काब, कलगी, तुरा, मसनद, दरखदार, दरबार, खास बारदार इत्यादी तत्कालीन समाजात चालू असलेलेच शब्द वापरल्यामुळे हे वर्णन एकदम आपल्याला पेशवाईत

खेचून नेणारे झाले आहे ना ?

भाषाशैलीला आणखी एकप्रकारे सौंदर्यसाज चढवता येतो, तो म्हणजे उपमा दृष्टान्तांनी अगर शाब्दिक कोटयांनी. बोलून-चालून उपमादृष्टान्त वगैरे तर भाषेचे अलंकारच म्हटले गेलेले, तेव्हा यांनी भाषा अलंकृत दिसणारच ! आपल्या मागल्या पिढीचे लेखक भाऊसाहेब खांडेकर यांना तर साहित्य प्रांतात गमतीने 'कोटयाधीश' म्हटले जाई. कारण त्यांच्या साहित्यात पानोपानी कोटया असत. उदाहरणार्थ ही एक त्यांची कोटी बघ–

'या जगात लंगडी असूनही उत्तम चालणारी अशी 'सबब' ही एकच गोष्ट.'

किंवा पुढील एक उपमा पाहा–

'जिज्ञासा हे व्यसन आहे, बाईटाविषयीचे कुतूहल म्हणजे वेश्येचे सौंदर्य !'

सुभाषिताप्रमाणे भासणाऱ्या या अशा उपमाही त्यांच्या वाङ्मयात जागोजाग वैपुल्याने सापडतात. महादेवशास्त्री जोशी हे एक सात्त्विक प्रकृतीचे लेखक, कोकणच्या पार्श्वभूमीवरच्या कथा लिहिणारे. त्यांच्या लेखनातली उपमा-उपमाने निराळीच व वैशिष्टयपूर्ण अशीच.

उदा. 'ती त्याच्या हातून निसटली– जशी वरणभातावर पिळली जाणारी कागदी लिंबाची फोड.' किती सुंदर वाटते उपमा ?

ग. ल. ठोकळ यांचे उदाहरण बघ. एकदम निराळ्या उपमा. उदा–

'ती इतकी धष्टपुष्ट होती की एका टॅक्सीजवळ दुसरी टॅक्सीच उभी असल्यासारखी वाटली !'

अर्थात हे अलंकार आपण सदोदित जुन्या पेटयातूनच हुडकून काढावे असे थोडेच ? अगदी लेटेस्ट फॅशनच्या तिजोरीकडेही जरा नजर वळवून पाहू या का ? बघ हं. जी. ए. कुलकर्णी कशी उपमा देतात ते–

'चार मिनार' हे सिगरेटमधील संगीत आहे !'

'कट्टींनी त्याचा कटाक्ष डॉजबॉलप्रमाणे परत केला !'

'त्याचे मन त्याच्याचप्रमाणे चिंधी होऊ गेले !' इत्यादी. ह्यांतली प्रतिमाने अगदी वेगळी व नवी आहेत की नाही ?

कमल देसाई यांच्या 'काळा सूर्य' या दीर्घकथेतली ही उपमा– 'ती खूप काम करायची. पण तिच्या हाताचे तळवे ताज्या दुधासारखे !'

'या 'दुधासारख्या' तळव्यांवरून मला एका शाहिराच्या लावणीतली एक अशीच सादृश्याची उपमा आठवते आहे. त्यात प्रेयसीचे रूपवर्णन करताना गालांना 'नरम खवा' म्हटले आहे, व मराठमोळा स्त्रीगीतात मुलाला तर साखरेचा पेढाच म्हटले आहे ! ग्रामीण वाङ्मयात अशा जीवन-निष्ठ उपमांची समृद्धीच तुला आढळेल.

तर अशा या वेगवेगळ्या उपमा देण्याच्या भिन्न तऱ्हा लक्षणीय आहेत. अर्थात उपमा कशा असाव्यात, याबद्दल जास्त लिहिण्याचा माझा हेतू नाही अलका. मी फक्त एवढेच सांगणार आहे की, जुन्या वाङ्मयातून आढळणाऱ्या चंद्र, सूर्य, तारका, फुले, कमळे इत्यादी उपमांच्या सांकेतिकपणातून मराठी कथा आज मुक्त झाली आहे व नवनव्या उपमालंकारांचे लेणे कालानुरूप ती स्वीकारीत आहे. प्रथितयश लेखक एखादी गोष्ट स्पष्ट करताना कशी काव्यमय भाषा वापरतात याचे एक नमुनेदार उदाहरण द्यायचे तर प्र. के. अत्र्यांचे देता येईल. उदा. जग हे चिरतरुण व नित्यनूतनच असते हे सांगताना ते म्हणतात–

> 'सूर्योदय-सूर्यास्ताचे सोने अजून पिवळेधमक आहे, कळचा-फुलांचे रस अजून टवटवीत आहेत. आभाळाचा निळा रंग अद्याप विटला नाही किंवा हिरवीगार हिरवळ अजून जीर्ण झाली नाही !'

किती सुंदर तऱ्हेने सांगितले आहे ना ते तत्त्व यात ? गोष्टीमध्ये सिद्धान्तरूप वाक्ये योजूनही तिला भाषेचे एक नवे लेणे चढवता येते व तसे ते पुष्कळ लेखकांनी चढवलेलेही आहे. कै. खांडेकर हे त्याबाबतीत तर अग्रगण्यच म्हणावे लागतील. उदाहरणार्थ–

> 'सूर्य-चंद्राला माहीत असो नसो, त्यांच्या किरणांनी कळचा फुलतात; आई-बापांना माहीत असो नसो, त्यांच्या कृत्यांनी मुलांच्या जीवनकळचा विकसित होतात.'

पण अशी मी उदाहरणे किती देणार पत्रातून ? गंगानदीचे पाणी ओंजळीने मोजून दाखवण्यासारखेच ते हाताबाहेरचे काम. तुझ्या वाचनात

पुष्कळ पुस्तकं येतात, त्यात तुलाही या उपमा– उत्प्रेक्षा– कोटच्या वगैरे भाषालंकारांचे वैपुल्य आढळेल, त्यावेळी त्या कोणी कशा वापरल्या आहेत, इकडे लक्ष ठेव म्हणजे बस्. मात्र एक महत्त्वाची गोष्ट आहे अलका. आपले तान्हुले बाहेर नेताना आई जसे त्याला प्रेमाने नटवते, त्याला शोभतील, पेलतील एवढेच अलंकार घालते, तीच दृष्टी कथेवर भाषाभूषणे चढवताना लेखकानेही ठेवायला हवी ! हे अलंकार प्रमाणशीर तर हवेतच पण ते मोजकेही असले तरच खरे त्यात औचित्य ! नाहीतर काही प्रसिद्ध लेखकांबाबत उपमालंकारांचे त्या निवेदनाला डोईजड ओझे झालेलेही आपण पाहतो, तसा प्रकार व्हायचा !

अलके, एक एक शब्द, पण त्याला प्रतिशब्द आपल्या मराठीत किती सापडतात ? ह्याचा लेखनदृष्टीनं विचार तू फारसा केला नसशील ? म्हणून तोही एक मुद्दा सुचवावासा वाटतो. उदाहरणार्थ, पलंग ही एक नित्यपरिचयाची घरातली वस्तू घेऊ. याला पर्यायवाची शब्द पर्यंक, मंचक, चारपाई, चौपाई, खाट, खाटलं, बाजलं, कॉट, सोफा-कम-बेड् ' असे कित्येक आहेत. कथेचे वातावरण व कालखंड यांना उचित दिसेल तो शब्द यातून उचलून तेथे योजावा हे उघडच आहे. पौराणिक कथेत पर्यंक व ऐतिहासिक कथेत मंचक मांडलेला बरा, तर उत्तर हिंदुस्थानी वातावरणात चौपाईच हवी, ग्रामीण कथेच्या अंगणात खाट, बाजलं टाकलेलं असावं, व आधुनिक सुधारणेच्या गृहव्यवस्थेत कॉट व ' सोफा-कम-बेड 'च शोभेल, समजलं ना ?'

अर्थात ही शैली केवळ शब्दरचनेतच असते, असे मात्र नव्हे हं. शब्द हे माध्यम, वर्णनक्षेत्रात स्वतः खुलून वर्णनविषयालाही खुलवीत असते. चिमुकली चांदणी नाही का ? स्वतःही चमचमते व तारकापुंजालाही शोभा देते ! त्यातलाच प्रकार आहे हा. कथाकादंबरीच्या बाह्यसौंदर्यातला एक अवश्य असा घटकच ठरणारी ही ' वर्णने ' आहेत म्हणेनास ? आणि कशाकशाची अशी वर्णने येतात म्हणून काय विचारतेस अलका ? अग, ती कशाची नसतात, असंच विचार उलट ! हे वर्णन व्यक्तीचं असेल, परिस्थितीचं असेल, समाजाचं असेल, सृष्टीचं असेल नाहीतर मनोव्यापारांचं व भावभावनेचं पण असणार ! या वर्णनविषयांना अटक माहीतच नाही, पण स्वतः लेखकाने मात्र औचित्याची अटक या क्षेत्राला घातलीच पाहिजे,

असे आजकालच्या अतिरेकी कामुक वर्णनांच्या कथा वाचून वाटू लागते. पण ते जाऊ द्या. मला मुख्य सांगायचं ते असं की, या वर्णनांनी खरोखरच कथा-कादंबरी कसदार व रसदार होते व लेखक ही वर्णने जेव्हा भाषेचे सारे कौशल्य पणाला लावून करतो, तेव्हा तर वाचक त्यातील वर्णनांवर लुब्ध व मुग्धच होऊन जातो ! हे काही नमुने, व्यक्तिवर्णनाचे पाहा हवे तर... हे अनेक वेगळ्या लघुकथांतून आलेलेच आहेत. उदाहरणार्थ– एखाद्या संस्कारी नव्या घरात सून कशी पाहिजे ? याचे उत्तर 'भावबळ' या कथेत महादेवशास्त्री जोशी असे देतात–

> 'जिचे हात-पाय सारखे फिरत राहतील, जी चंदनासारखी हसत हसत झिजेल, जी वडीलमाणसांना तुच्छ न लेखता त्यांच्याकडून रीतभात समजून घेऊन कुलपरंपरा चालवील व जी वृद्धपणी तुम्हा दोघांची सेवाचाकरी करील अशी सून या घराला पाहिजे.'

लेखकाने या चार वाक्यांत एखादी घरंदाज कुलवधू कशी असावी याची कल्पना किती स्पष्टपणे दिली आहे ! ग. दि. माडगूळकरांनी एके ठिकाणी अस्सल खानदानी युवतीचं वर्णन केलं आहे, ते हवं तर पाहा जरा–

> 'इतर बायकांच्या जोडीने कांचनवैनी चालत होत्या. त्या चालण्याला लय होती. पुष्कळ पक्षी चालतात. राजहंसीही चालते. आम्ही वरून पाहत होतो. त्या जमिनीवरून चालल्या होत्या. आम्हाला वाटले, आम्ही जमिनीवर आहोत. लहान-मोठ्या तारांचा मेळावा आभाळातून चालला आहे, आणि शुक्रतारकेच्या अस्तित्वाने साऱ्या चांदण्यावर निळाई आली आहे.'

यात प्रत्यक्ष 'कांचनवैनी'चं वर्णन करण्याऐवजी, सूचकतेनं त्यांचं सौंदर्य व तेही इतरांपेक्षा विशेषत्वाने नजरेत भरणारं, असं प्रकट केलं आहे ते अधिक कलात्मक वाटते.

स्त्रीसौंदर्याचे वर्णन असे अप्रत्यक्ष पण अतिशय वेधक तऱ्हेने केल्याचे आणखी एक उदाहरण हवे तर सांगते. ते चिं. त्र्यं. खानोलकर यांनी आपल्या 'चानी'मधील नायिकेचे केले आहे, व हे निवेदन 'चानी'शी दोस्ती जमलेला

एक तरुण करीत आहे अलका, पहा–

> 'आज या वयात माझ्या डोळ्यांसमोर जेव्हा ते घर येते, तेव्हा मी सगळेच विसरून ते घरच पाहत राहतो. त्या घरात निळेभोर डोळे ठुमरीच्या सुरांसारखे फिरत असतात. पोवळ्याच्या रंगाचे ओठ मोठे स्मितहास्य करीत असतात. रसरसलेला घाटदार बांधा तेथे चपळाईने वावरत असतो. एक सूर्यफुलाच्या देशातली राणी तेथे रानचित्रे काढण्यात मग्न असते. तिच्या हाताचे ठसे त्या लालभडक भिंतीवर थरथरत असतात, जगातले सगळे रंग त्या थरथरणाऱ्या हाताच्या ठशाभोवती भुंग्याप्रमाणे पिंगा घालीत असतात.'

येथे चानीच्या घराच्या वर्णनातूनच चानीचे अप्रत्यक्ष वर्णन केले आहे. हे थोडक्यात नसले तरी वेगळेपणाने शोभते आहे ! नाविन्यपूर्ण ठरणारी अशी ही एक सुंदर वर्णनपद्धती आहे, हे तुझ्या ध्यानात आले असेलच ?

गंगाधर गाडगीळांची व्यक्तीवर्णनाची शैली एकदम निराळी. त्यात विनोदही डोकावतो व नाविन्याची छटापण ! 'वारा भरलेले शीड' या कथेतल्या श्री. चितळे या क्लार्कचे (नायकाचे) लेखकाने केलेले हे वर्णन पाहा हवेतर–

> 'त्यांचे शरीरही अघळपघळ होते. विकायला ठेवलेल्या भल्यामोठ्या लोण्याच्या गोळ्याने जर सैल कोट घातला, नाकावरून ओघळणारा चष्मा लावला आणि एक तृतीयांश डोके झाकणारी घडीची टोपी घातली तर तो जसा दिसेल तसे साधारणतः चितळे दिसत आणि सतत उत्साह व धांदल ते व्यक्त करीत असल्यामुळे हा लोण्याचा गोळा वितळत आहे असा भास निर्माण होई.'

आहे ना, या वर्णनपद्धतीचे तंत्र लक्षणीय ? अशा वेगळ्या उपमा, व निराळ्या व्यक्तिवर्णनांनी गाडगीळांच्या कथा अगदी वैशिष्ट्यपूर्ण झाल्या आहेत.

आजकाल ग्रामीणरूपांतही कथा बहरू लागली आहे. तिच्या व्यक्ती-वर्णनाचा जोशच काही निराळा, व ठसठशीत व वेगळेपणानं ध्यानी भरणारा.

उदा. बा. भ. पाटील यांची 'विहिरीचं काम' ही कथा १९७२ दिवाळी 'सुगंध' अंकात आली आहे. त्यातलं 'सुभानराव पाटलाचे' हे वर्णन मोठे झकास वाटणारेच–

> 'चांगला जंक्शन गडी. दारातल्या चौकटीतून शिरताना अंग आकसून आडवं होऊन यावं लागायचं. सकाळी तांब्याभर दुधाशिवाय त्यांच्या पोटात आणि काय जात नव्हतं. न्याहारीला तीन भाकरी त्याही शिळ्या, लसणाची चटणी, साईच्या दह्याचा वाडगा, तो नसेल तर लोण्याचा दांडगा चेंडू! सुभानराव म्हणजे अशी बुरुजागत असामी. बोलणं, वागणं, राहणं, खाणं, पिणं, सगळंच असं जंक्शन होतं!'

काय? एका मजबूत धिप्पाड मराठमोळा पाटलाचं रूप तुझ्या नजरेसमोर आलं की नाही या चार वाक्यांतच? तर ग्रामीण व्यक्तिवर्णनाची बाजू ही अशी 'जंक्शन' असावी!

आणि हे वर्णन फक्त व्यक्तीचेच कथेत येते वा यावे, असे थोडेच? एखादी इमारत, एखादा समारंभ, रेल्वेप्रवास, निसर्गशोभा, संध्याकाळ–सकाळची वेळ, ऋतुमान, इ. वाटेल त्याचे हे वर्णन असते. हे सारे नमुने मी लिहून दाखवू लागले, तर, तू कंटाळूनच जाशील. तेव्हा फक्त एकच नमुना नमुन्यादाखल दिला आहे, हा बघ. सरिता पदकींच्या 'कोंडी' नावाच्या कथेतले हे मुलींच्या वसतिगृहातील एका सायंकाळचे वर्णन हं अलका! बघ बरे कसे वाटते ते?–

> 'एक भुरीकबरी संध्याकाळ, रोजच्यासारखीच, त्या कॉलेज-शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या वसतिगृहाच्या दगडी इमारतीतून उतरली आणि सवयीने इथेतिथे रेंगाळू लागली, खोल्यांतून मंद पिवळसर दिवे लावू लागली, मरगळलेले चेहरे धुऊन पुसून त्यांना कुठे सोज्वळ, कुठे छचोर सिनेमानटयांचे रूप देऊ लागली. उसन्या उत्साहाची पिसं फुलारू लागली.'

अलका, हरि ना. आपटयांच्या साहित्यातील सायंशोभेचे पूर्वीच्या जागोजाग आलेले वर्णन व ही संध्या, यांच्या वर्णनांची तू जरा सहज मजेने सांगड घालून बघ एकदा! तर वर्णितविषय तोच, पण दरेक लेखक त्याला

स्वत:च्या खास स्वतंत्र भाषाशैलीनेच, वेगळेपणा आणतो. अर्थात या वर्णनातही दोन तऱ्हा, एक जशी वर्णनवस्तू दिसते तशीच रंगवणे. उदा. आकाश-वर्णन घेऊ या– हे एक साधेसीधे वर्णन–

> 'आकाशाचा रंग निळाशार दिसत होता. पांढरट विरळ ढगाचा एक तुकडा पश्चिम क्षितिजावर चोरटेपणाने उभा होता, त्याखेरीज आभाळ अगदी नितळ होते व अमावास्येमुळेच की काय, आज चांदण्याही अधिकच लखलखत आहेसे वाटले, मनात आले येथेच थांबून क्षणभर ही शोभा पाहावी.'

आता हेच वर्णन सांगण्याची, ही दुसरी तऱ्हा बघ हं– अलंकारांनी सजलेली आहे ही–

> 'इतके निळेभोर आकाश, अन् त्यावर चांदण्यांचा लखलखाट! जणू आकाशसुंदरीने निळा, जरीचे ठिपके असलेला मुलायम शालूच नेसल्यासारखे वाटले. कोपऱ्यात एक पांढराशुभ्र कापसाच्या पातळ थरासारखा चिमुकला ढग होता. तो तर जणू या सुंदरीचा इवलासा हातरुमालच वाटत होता.'

या दोन तऱ्हांपैकी आपल्या कथेत वस्तुमात्राचे साधे पण हृद्य वर्णन द्यावे की उपमाउ त्प्रेक्षांनी ते सजवून द्यावे, हा ज्या त्या लेखकाच्या मर्जीचा प्रश्न. तू कोणती पद्धत घेणार आहेस ? का दोन्ही मिश्र करून? कसंही घे; कथानकाची आकर्षकता वर्णनांनी वाढलीच पाहिजे, हा मूळ संकेत कधी दृष्टीआड होऊ देऊ नकोस इतकेच.

वर्णनाबाबत आणखीही एक महत्त्वाचं कलम सांगायचं राहिलंच ! ते म्हणजे ही सारी वर्णने सुंदर असतील, समुचित असतील, पण ती कथेतलाच एक घटक असायला हवीत. हे विसरता कामा नये. नायकाची अगर नायिकेची भावना अगर मनस्थिती, परिस्थिती किंवा, कथेत येणारे प्रसंग, त्यांची पार्श्वभूमी, कथेतले विचारसौंदर्य, याशी त्यांचा सांधा, कुठे ना कुठे तरी जुळायलाच पाहिजे ! समजा आकाश अतिसुंदर दिसले, पण ते पाहून कथेत कुणालाही काही एक वाटले नाही, किंवा त्याची दखल न घेता कथेतले सारे प्रसंग आणले तसेच पुढे चालू लागले तर मग ह्या वर्णनांचा उपयोग कोणता ? ती निरुद्देश कथेत आली अगर आणली गेली,

असेच नाही का ठरत ? तशी ती ठरू नयेत म्हणून त्यांना नायकनायिकेच्या अगर इतर कथाव्यक्तीच्या विश्वात दाखल करून घ्यावे लागते. उदा,

> 'आकाश भरून आले. निळे-काळे ढग दाटू लागले. वादळवारा घोंगावू लागला व पावसाच्या टपोऱ्या थेंबांचे मोठमोठे ठिपके जमिनीवर उमटलेदेखील. पण त्या दोन प्रेमिकांना त्याचे मुळीच भान नव्हते. कारण त्या मंगलक्षणीच त्यांना एकमेकांच्या प्रीतीची साक्ष पटली होती ! आकाश काळे झालेले असेना ? त्यांच्या हृदयात मात्र हर्षाची सोनकिरणे चकाकत होती. भान विसरून ते दोघं पावसाप्रमाणेच होणारा सुखाचा वर्षावही झेलून घेत होते !'

सांग, आता हे आकाशवर्णन कारणी लागलंसं वाटतं ना ? बरोबर, वर्णन हे ठिगळासारखे कथावस्त्रावर वेगळे जोडले आहे, असे वाटता कामा नये, हे यातले तत्त्व. आणखी एक उदाहरण घेऊ. समजा तुझा कथानायक काश्मीरला गेला. तेथले वर्णन तू, काश्मीर अगदी स्वतः पाहिल्याइतकेच सरस केलेस, भाषेने ते शोभिवंत केलेस, सगळे खरे. पण या काश्मीरट्रीपने कथेतल्या कुठल्याही घटनेला नवा आकार, नवा पैलू, प्रेरणा अगर गती मिळत नसेल तर ही ट्रीपही व्यर्थ व त्यावरचे ते वर्णनही (सुंदर असले तरीसुद्धा !) अनावश्यकच ! या दृष्टीनं तू ७२ च्या 'मेनका' दिवाळी अंकातली 'पाषाणपुष्प' ही लैला महाजन यांची कथा वाच. यात नायक दुसऱ्या तरुणीबरोबर काश्मीर ट्रीपला गेला म्हणून, सायकीक वृत्तीच्या त्याच्या प्रियतमेचे माथे फिरले अशी एक घटना आली आहे ! तर वर्णनानी कथेला अशाप्रकारची कोणतीतरी पूरकता दिली पाहिजे हे तत्त्व लेखकाच्या मनासमोर नित्य नांदत असावं.

आता बांधेसूदपणा. कथा केवढी लांब असावी हे आधी ठरलेले असले पाहिजे, पन्नास पृष्ठे झाली तरी कथा आपली पुढेपुढेच वाहत चालली आहे, असे होता कामा नये. कुंडी जेवढी असेल त्याच प्रमाणात त्या फुलझाडाची वाढ झाली पाहिजे हे उघड आहे. मनातून खूप सांगावस वाटत असलं तरी ते किती व कोणत्या मर्यादेपर्यंत सांगावं ? यालाही 'मर्यादा' हवीच. कारणावाचून उगीच जास्त वर्णने करण्याची प्रवृत्ती होत असेल

तर ती वर्णने पाचोळ्यासारखी समजून वेळीच झटकावी लागतील ! आणि यासाठी कथेची व्याप्ती कोठून कोठपर्यंत आहे याची आखणी व पक्का अंदाज लेखकाला प्रथम हवा ! उघडच आहे की, कथेची व्याप्ती कादंबरीच्या केवळ एखाद–दुसऱ्या प्रकरणाएवढीच फार तर असणार, तेवढेच मोजके कथानक उचलून निवडले तर हा बांधेसूदपणा कथेत कायम राहू शकेल.

तू मनात मला हसत असशील अलका, 'प्रतिभेलाही आखणी अन् मोजमाप ? कमाल आहे तुझी ताई !' असे तुझे चेष्टेचे शब्द जणू आताही कानी ऐकू येताहेत माझ्या ! पण माझे सांगणे विनोदी वाटले ना, तरी महत्त्वाचे जरूर आहे. स्वतंत्र प्रतिभेला अशी बंधने घालावीत का ? हीच तुझी शंका ना ? अग, ती जरूर हवीतच ! अगदी उत्कृष्ट गीत म्हटलं तरी त्याची रेकॉर्ड सर्वसाधारपणे तीन मिनिटांचीच असते. छानदार नाटक असलं तरी तीन तासाचं बंधन आहेच त्याला. उत्तम व मोठ्या विस्तृत भूभागाचं चित्र रेखाटायचं असे ना ? चित्राचा फलक व चौकट बेतशीर व आकारसूदच लागते. तसंच प्रतिभेचं. बागेतली झाडं सुंदर असली तरी ती वेडीवाकडी वाढू लागली तर माळी एक मोठी कात्री घेऊन येतो व त्यांचा अस्ताव्यस्तपणा सफा करून टाकतो. बघतेसच ना ? हेच सूत्र कथा लिहितानाही हवे. वर्णने सहजसुंदर असतील, आकर्षक असतील, मान्य, पण ती प्रमाणाबाहेर होऊ लागतील तर नाटकसिनेमात 'पाहुण्या' कलाकारामुळे जसे नायकनायिकेचेच काम बिघडावे तसे व्हायचे ! संसारात शजारणीचे महत्त्व पत्नीने जिवाच्या दोन गोष्टी तिच्याशी बोलण्याइतकेच, तसे या कथेच्या संसारातही वर्णनाचा बेतशीरपणेच वापर व्हावा, हे उचित.

तसेच कथा कोठून कोठपर्यंत लिहायची आहे याची देखील स्पष्ट कल्पना कथा सुरू करण्यापूर्वीच हवी. समज की सुरेशच्या आयुष्यातल्या पाच वर्षांच्या मुदतीत तुझ्या कथेचे एकंदर कथानक खेळणार आहे, तर त्याची लांबण सुरेशच्या आज्या-पणज्यापासून का करायची ? कथेतली प्रधान व जिच्याबद्दल तुम्हाला काही महत्त्वाचं सांगायचं आहे ती व्यक्ती आणि तिच्या वैशिष्ट्यात भर घालील एवढ्याच मोजक्या प्रसंगाचा कालखंड आखन घेणे अवश्य आहे. दुसरे, तुम्हाला समजा, कोल्हापूर येथे कथा

घडलेली दाखवायची आहे तर ह्या कथेत पुणे ते कोल्हापूरची अगर रत्नागिरी ते कोल्हापूरची सारी स्टेशने वा गावे आणायचे काय प्रयोजन ?

किंवा समज, तुला 'नंदिनी' या विवाहित तरूणीबद्दल कथा लिहायची आहे. यावेळी तिच्या माहेरच्या-सासरच्या सगळ्या गोताला तू आग्रहाने 'कथेत चला !' म्हणून जर बोलावून आणलेस, तर 'नंदिनी'च्या भावदशेनाला अगदी कमी क्षेत्र राहील ! तुला आठवते का ? फोटोग्राफरने जेव्हा आपल्या मनोहरच्या लग्नात आपल्या नात्याच्या पन्नास मंडळींचा ग्रूप फोटो घेतला होता तेव्हा प्रत्येकाचा चेहरा तुरीच्या डाळीएवढाच छोटा दिसत होता ! तेच तत्त्व यात. उलट मनोहर व त्याची पत्नी या दोघांचाच दुसरा एक फोटो त्याने घेतला, त्यात त्या दोघांचेही स्वतंत्र व्यक्तिमत्व कसे खुलून स्पष्ट दिसत होते. तेव्हा नंदिनीची कथा लिहिलीस तर त्यातील पात्रांबद्दल 'नंदिनी व कथेतले प्रसंग घडवणारी थोडी पात्रे' एवढी मर्यादा पुरे. मग गोष्ट सुटसुटीत होईल !

यातला मुख्य मुद्दा असा की, कथालेखनात काटकसर शब्दांची, वर्णनांची पात्रांची व मनोविश्लेषणाचीदेखील– असावी हेच आकर्षक नेटक्या कथेचे सूत्र व यानेच तिला प्रमाणबद्ध बांधा लाभतो ! नाहीतर एखाद्या छोटूला भला मोठा गुरुशर्ट घालावा तशीच छोट्याशा कथानकावर मोठमोठी वर्णने लादण्याने कथेचा एकंदर डौलच बिघडून जाईल. बांधेसूदपणा हे व्यक्तीच्या प्रमाणे कथेचेही एक सौंदर्यलक्षणच असते. अलके, यावेळी तुझा न विचारलेला प्रश्नही तिथून माझ्या कानाशी गुणगुणतो आहे की, 'पुष्कळसे लोक आजघडीलाही पाल्हाळ लावून लिहिताना दिसतात त्याचे काय ?' खरा आहे हा प्रश्न. आजचे काही नामवंत लेखक अशा गोष्टीवेल्हाळपणानं कथा लिहितातही पण त्यांच्या कथा लांब असूनही काही वेळा कंटाळावाण्या वाटत नाहीत याचं कारण त्यांची शैली (–कथनाची) अतिशय वेधक व चित्तचोर असते, व हा त्यांचा लेखनगुण लांब–रुंद कथेलाही आकर्षक बनवतो. पण सगळ्यांना तशी किमया सुरुवातीला थोडीच जमणार आहे ? तेव्हा कथा आटोपसर असावी हाच कित्ता निदान नव्या लेखकांनी गिरवलेला बरा ! आणि कथा लहान असली तर त्यात कथाविष्काराला मुळी वावच राहणार नाही. अशी तुला शंका येत असेल तर, त्याचं उत्तर एवढंच की, जागेची, वा क्षेत्राची

लांबीरुंदी कमी असली तरी काय झालं ? त्यातही कलाविष्कार उत्कृष्ट तऱ्हेने दिसू शकतोच ! म्हैसूर राजवाड्यात तांदुळाच्या दाण्यांवरून कोरलेले दशावतार आहेत ! ते पाहयचे, ते दुर्बिणीतूनच ! छान कोरलेले दिसतात. फार काय ? अग, जोंधळ्याच्या दाण्याएवढ्या हस्तिदंतात कोरलेले हत्ती मी पाहिले आहेत ! चिमुकल्या अंगठीच्या खड्यात बसवलेली नाजुक पण कार्यक्षम घड्याळे तू पाहिलीच आहेस ? तेव्हा कलेचा उत्कृष्टपणा क्षेत्रावर अवलंबून नाही, तर कलाकाराच्या कसवावर आहे, ही यातली महत्त्वाची गोष्ट तू नोटवहीत टिपून ठेवायला हरकत नाही. पण बांधेसूदपणाबद्दल एवढंच पुरे. नाहीतर मीही नको तो पाल्हाळ लावून या मुद्याचा बांधेसूद. पणाच बिघडवल्यासारखं व्हायचं उगीच, खरं ना ?

तर आता पुरेच. आता पुढल्या पत्रात ' कथेचे अंतःसौंदर्य ' याबद्दल पाहू. तोपर्यंत आमच्या छोटच्या लेखिकेला गुड्बाय्.

तुझी–
सौ. ताई.

११. कथेचे अंतःसौंदर्य

(अ) कथावस्तु

प्रिय अलका,

आवडले का माझे मागले पत्र ? लांब कंटाळवाणे तर वाटले नाही ना ? नाहीतर आणखी थोडक्यात त्रोटक असे लिहीन. तुला मागे मी 'वाङ्मयीन कात्री'बद्दल उदाहरण दिले होते ना, ती कात्री लेखणीबरोबरच माझ्या हातात्राशी असते नेहमी, तेव्हा मोकळचा मनानं पत्र कशी वाटताहेत ते कळवायला काही हरकत नाही हं.

मागल्या पत्रात कथेच्या बाह्यसौंदर्याबाबत आपण पुष्कळसा साधकबाधक विचार केलाच आहे. आता तिच्या आंतरिक सौंदर्याकडेही जरा लक्ष देऊ या. मागल्या पत्रात मी बाह्यसौंदर्याला लघुकथेच्या देहाची उपमा दिली होती त्याच भाषेत सांगायचं, तर, अंतःसौंदर्याला लघकथेचा आत्मा म्हणायला हवं. ही चैतन्याची चित्कला लघुकथेत नसेल, तर तिची किंमत दुकानातल्या नटवलेल्या सुंदर बाहुलीएवढीच !

या अंतःसौंदर्याचे मी मनानं कल्पिलेले प्रमुख घटक दोनच:—

१) प्रभावी कथावस्तु

२) भावदर्शन.

पैकी 'प्रभावी कथावस्तू' या पहिल्या मुद्याचा आपण या प्रकरणात विचार करू. मला एकदा मी तिथे असताना तू विचारलं होतंस, की

'कथानके कशी सुचतात तुला ? लेखनाला विषय कुठे मिळतात ताई ?' ते प्रश्नचिन्ह माझ्या स्मरणातून उठून आता नजरेसमोर येऊन खडे झाले आहे. अलका, तू मोठा मार्मिक व कठीण प्रश्न विचारला होतास, 'कथा-वस्तू कुठे मिळते ?' हा ! आज त्याचे उत्तर तुला, कथेच्या अंतःसौंदर्याच्या अनुषंगानं नीट द्यावं असा विचार केला आहे.

मला तुझ्याप्रमाणेच लेखनोत्सुक असा काही तरुणींचे प्रश्नही आठवताहेत–

'तुमचे लेखनोद्यान चांगले बहरले आहे. पण बीजे कुठे मिळाली ? अन् ती कशी फुलवलीत ? या व्यक्ती खऱ्याच पाहिल्यात ? की काल्पनिकच सगळ्या ? पाहिली तशीच घटना लिहिता की बदल करता त्यांत ? करीत असाल तर का ? अन् कोणते ? शेवटी तुम्ही मुळात होता तसाच दाखवता की फरक करता त्यांत ? एक ना दोन ! दिसायला सोपे पण समजावून द्यायला बरेच कठीण असे हे प्रश्न आहेत सारे. अलका, तसे पाहशील, तर, ही कथाबीजे कधी कथेच्या छोट्या कुंडीत रुजली तर कधी कादंबरीच्या मोठ्या बगीच्यातही त्यांची मी रुजुवात केली. पण ही मिळवली कोठून ? याला एका शब्दात उत्तर द्यायचे तर ही समाजातूनच मिळालेली सारी संपत्ती आहे ! आपल्या भोवतालचा समाज, हे एक हजारो पृष्ठांचे रंजक पुस्तकच आहे म्हणेनास ? येथे व्यक्ती तेवढ्या वृत्ती, अन् वृत्ती तेवढ्या भिन्न कृती, पावलोपावली निरीक्षकाला पाहायला मिळतात. कोणाचे रूप, कोणाची अतिरेकी मते, कोणाची परिस्थिती, कोणाची सुजनता, कुणाची लालसा, कोणाची महत्त्वाकांक्षा, सारी अनंत रूपांनी या पुस्तकात चित्रित झालेली असतात. बंगाली श्रेष्ठ लेखक शरदच्चंद्र चटर्जी, यांचे याबाबतीतील अतिशय मार्मिक उद्‌गार सांगण्याजोगे आहेत. ते म्हणतातः–

> 'काही लेखक 'आम्हाला तुमच्यासारखे संविधानक मिळत नाही, यामुळे लिहिता येत नाही !' असे म्हणतात, तेव्हा मला आश्चर्यच वाटते. इतके विशाल विश्व आहे, त्यात इतके वैचित्र्य आहे आणि यांना कथानक मिळत नाही !! वस्तु-स्थिती अशी आहे की, हे लोक मानवी जीवनाचा अभ्यासही करीत नाहीत किंवा त्याचे ज्ञान मिळविण्याचीही त्यांची इच्छा

नसते.'

तर, ध्यानात आलं ना ! सामाजिक कथेची बीजे आपल्या सभोवतीच कुठेतरी समाजात नांदत असतात, त्यांना ओळखून काढणारी शोधक नजर लेखकाला जरूर व आधी पाहिजे ! या निरीक्षणाच्या तऱ्हांचे मी मागे एका पत्रात विस्ताराने वर्णन केलेले आहेच. ह्या कथावस्तूला मी, छोटं बीज, म्हणते आहे. पण एक महत्त्वाची गोष्ट अशी की लेखकाचं मन म्हणजे एक यक्षभूमीच आहे, ही गोष्ट तू नित्य ध्यानी ठेव अलके. कोणाचा तरी एखादा ठाशीव शब्द, कुठलातरी इतकासा पण वेधक प्रसंग, कानावर आलेली एखादी विचित्र पण मन हलवून सोडणारी घटना, किंवा मुंगीएवढी कोणाची तरी, वैशिष्ट्यपूर्ण वा चमत्कृतीपूर्ण हकीगत, हे सारे प्रकार या यक्षभूमीत नवी–नवी रूपे घेतात, वस्तुनिष्ठतेला कल्पकता मोहकतेचा साज चढवते, व भाषाभूषणे तिला अलंकृत करतात आणि मग ? मग कथा रूपवती होते, चैतन्यमयी व चित्तवेधकही होते. ती केवळ लेखकाच्या कलमाच्या कलामय स्पर्शानेच काय ? प्रतिभेला केवळ एखाद-दुसऱ्या शब्दाने, वाक्यानेही प्रेरणा मिळते ?' हीच तुझी शंका होय ना ?' अलका, कुणाच्या एखाद्या वाक्यानेदेखील कथेस प्रेरणा मिळावी हा चमत्कार दोन-चारदा खरे तर मीही अनुभवला आहे. एक उदाहरण, तुला सांगण्याजोगे आहे. बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. मागे एकदा ' ह्यांना ' कोणी चाफ्याची फुले पाण्यात घालून हवाबंद केलेली बाटली भेट दिली. देताना तो गृहस्थ म्हणाला,

' अशी ही फुले वर्षानुवर्षे टिकतात. पण बाहेरची हवा लागली की खराब होतात.'

बस् बस्. एवढ्या मोजक्या शब्दांनी बंदिस्त, सुखासीन स्त्रीजीवनाचे व बाटलीतल्या त्या फुलांचं साम्य मनात पाय रोवून उभे राहू लागले माझ्या ! कर्तृत्वशून्य सुशिक्षित गृहिणी म्हणजे वास विसरलेलं हवाबंद फुलच !!' ही कल्पना मनात घोळू लागली व नंतर मी ' बाटलीतली फुलं ' याच कथेत ती स्पष्टही केली.

असंच आणखी एक वाक्य माझ्या मनात आजमितीलाही घोळत आहे. ' काय बिघडलं ?' हेच ते द्विशब्दांचं वाक्य ! ऐकायला अगदीच साधे. पण त्यातून मला एका पूर्ण कथेचे साहित्य मिळाले. एकदा एका गरीब, मराठ-

मोळा व झकास मुलीचे लग्न तिच्या बापाने पाऊणशे वर्षांच्या श्रीमंत म्हाताऱ्याशी लावून दिले आपले खुशाल ! हा 'बाप' आमच्या घरी नोकरच होता. जेव्हा मी खूप संतापले, चिडून विचारले त्याला,

'अरे, हा वर्षा-दोनवर्षांत देवाघरी जाणारा माणूस, अर्ध्या गोवऱ्या स्मशानात गेल्या आहेत, अशाशी तुझ्या कोवळ्या मुलीचं लग्न लावून दिलंस ? काही वाटलं नाही जिवाला तुझ्या ?'

आणि तो थंडपणे म्हणाला होता–

'अवं, तो दोन-चार वर्षांत मरणार ह्ये दिसतया, म्हून तर लगीन लावून पोरगी दिलीया बाई ! खूप पैसा आहे, आम्हालाबी त्यानं दिलाया. आनखी असं बगा, माजी पोरगी बी दोन–चार वर्सात, हा म्येला म्हंजी मोकळीच व्हईल, पैसेवाली व्हईल, अन् मग एकांदा ह्याक जवान बघून पाट लावील ! काय बिघडलं ?'

आणि यावर मी उत्तर देऊ शकले नाही. पण नंतर ते वाक्य कथारूपाने सजीव झाले हे खरेच.

प्रभावी शब्दाप्रमाणे प्रभावी व्यक्तिमत्त्व हेही पुष्कळदा कथेचे उगमस्थान होऊ शकते. अलके, समाजात अनेक व्यक्ती, त्यांची भिन्नभिन्न वैशिष्टये लेऊन, आपल्या नजरेसमोरून नित्य जा–ये करतात. पण अशा शेकडो व्यक्तींतून एखादी व्यक्तीच आपल्या नजरेत भरते, ती का ? सांग बरं ? त्याचं कारण असं की, या व्यक्ती कोठल्या ना कोठल्या गुणविशेषाने वा रूपविशेषाने इतरांहून वेगळ्या उमटून पडत असतात. या व्यक्तींचे वेगळेपण काही वेळा त्यांच्या स्वभावातही दिसते. कोणी संसारनिष्ठ, कोणी कलंदर वृत्तीच्या, कोणी स्त्रिया रूपगर्विता तर कोणी शालीन व्यक्तिमत्त्वाने मन वेधून घेणाऱ्या; कोणी कीर्तिमान वा कर्तृत्ववान व्यक्ती इतक्या अहंभावी की, वाशिळ्या तूपाप्रमाणे त्यांच्या बोलण्याला सदैव मीपणाचाच वास मारीत असतो ! तर कोणी बरोबर याउलट म्हणजे कर्तृत्व असूनही त्याबद्दल उच्चार न करणाऱ्या... तर अशा विशिष्ट व्यक्ती लेखकाच्या पाहण्यात आल्या की, काल्पनिक कथानकाचे अगर सत्यदर्शी घटनांचे धागे लेखकाचे मन त्यातील निवडक प्रतिमांभोवती गुंफू लागते. तेव्हा प्रत्यक्षातील प्रभावी व्यक्तिमत्व, हेच कथाबीज देणारे एक प्रमुख केंद्र आहे, असे तुला समजायला

हरकत नाही. सभोवतीच्या वातावरणातूनही पुष्कळदा कथेची उत्कृष्ट सामुग्री हाती येते. जगात माणसागणिक वेगळे जीवन आहे व असते. पुष्कळ लोक म्हणतातही,

' माझं आयुष्य म्हणजे एक कादंबरीच होईल लिहिली तर.' काही माझ्या मैत्रिणींनी तर आपण होऊन घरी येऊन सांगितलं आहे मला.

' पाहा ना. किती विचित्र घटना माझ्या जीवनात घडल्या ! अगदी कादंबरी लिहिण्याजोग्या. पण आम्हाला लिहिता कुठं येतंय ? याचं तुम्हीच चित्रण करा ना ?'

आणि ही खरी कथानके मी कल्पनेच्या शोभिवंत कोंदणात बसवून काही कथा लिहिल्याही आहेत. तर सांगायचे असे की, दरेक व्यक्तीचे जीवन म्हणजे अनेक तऱ्हेच्या प्रसंगांची एक साखळीच ! त्यात कथानुकूल असेही दुवे काही आढळतात. त्यांचे लेखकाने मनन करायला हवे, आणि हे साध्य कसे व्हावे ? अलका सांग बघू ?

अर्थात, तू आपण होऊन कोणाकडे अशा चौकशा करू लागलीस, तर तुला ही माहिती नीटपणी मिळणेही कठीण, कदाचित, दूषणही लावले जायचा संभव फार. पण स्नेहाने मनोवेदनेची बंद कुलपे खट्कन निखळतात. हे मी तुला पूर्वी लिहिले आहेच. तसेच व्यवहारात मंडळी एकमेकांना नित्य अशा वैशिष्ट्यपूर्ण लोकांच्या जीवनकथा सांगतही असतातच. त्यातूनही ऐकणाराला लक्षवेधी कथानक सापडू शकते. अर्थात लेखनाची ही कच्ची सामुग्री मोठ्या कौशल्याने व कणाकणाने लेखकाला जमा करावी लागते. तेव्हा कोठे कथा जन्म घेते !

याबाबत आणखीही काही सांगायचं आहे. शब्द, परिसर, व्यक्ती याप्रमाणेच उत्तम अशी कथावस्तू, समाजातील भिन्नभिन्न परिस्थितीही देऊ शकते अलका ! उदा. दांपत्यजीवन ही स्थिती, हा तर अनेक प्रसंगांच्या लाटांनी डहूळणारा एक महासागर आहे म्हणेनास ? यावर कितीतरी कथा लिहिल्या गेल्या आहेत ! आणि त्याही अगदी पूर्वीपासूनच. मला एक जुनी गाजलेली गोष्ट आठवते, ती वि. वि. बोकिलांची ' तारेचा संसार ' या नावाची. चाळीस वर्षांपूर्वी, नवविवाहित जोडप्याच्या नव्या प्रणयाकुल मनांची दहा माणसांच्या घरात कशी कुचंबणा होत होती व मागल्या पिढीशी त्यांचे

या पति-पत्नीचे कसे खडाष्टक रंगत होते हे त्यात इतक्या समरसतेने दाखवले होते की मला तर तारा व तिचा अधिरा उतावीळ पती नाना, हे त्याकाळचे प्रातिनिधिक स्वरूपाचेच व्यक्तिचित्रण वाटत असे. तुलाही ती कथा आज पाहायला कुठे मिळाली तर अवश्य वाच.

आणि आजचे संसार ? त्यातही खडाष्टके नाहीत असं थोडंच ? अतीव महागाईपायी गृहिणीला आज नोकरी करावी लागते, हीही एक आज अटळ अशी 'परिस्थिती 'च झालेली आहे. अलीकडच्या खूपशा कथातून विवाहित पत्नी तिच्या बॉसची प्रियतमा झाल्याची घटना वर्णिलेली असते– अगदी 'सुरस, सरस गुलगुलीत वर्णनांनी ! तेही तुझ्या वाचनात असेलच. काय ? एकदिलानं चालणाऱ्या संसारात ही 'बेदिली' इष्ट व स्वागताहंच ठरत असेल ? मध्यमवर्गीय सुखी संसारांखाली पेरले जाणारे हे सुरुंगच ! यावरून पति-पत्नीचे बिनसल्यांची खूप उदाहरणे ऐकिवात आहेत. पण ही 'परिस्थिती' किती व कशा तऱ्हेने जाचक होते व तरीही ती अटळ का मानली जाते, याबद्दलच्या दोन-चार सुंदर गोष्टी माझ्या ध्यानात राहिलेल्या आहेत. एक श्री. ज. जोशांची कथा. त्या कथेतला प्रसंग वेगळ्या वाणाचा होता. बॉसची अधिक्षेपी व प्रसंगी अधिक वागणूक सुरुवातीलाच पत्नीने पतीला स्पष्टपणे सांगितली होती व 'हे सहन करून नोकरी करू की राजीनामा देऊ ?' म्हणून त्यालाच विचारले होते. त्या गृहस्थाने बराच विचार करून नाइलाजानं 'राजीनामा देऊ नये' असा निर्णय घेतला होता. हा निर्णय वाचकांना पटणारा नसला, तरी आर्थिक परिस्थितीपुढे माणूस लाचार कसा होतो याचे ते एक चित्र होते.

'आर्थिक परिस्थिती' साठी पत्नीला नोकरी केलीच पाहिजे, करावीच लागते, याचे चित्रण आणखी एका कथेत व. पु. काळचांनी केले आहे. त्या कथेचे नाव 'हे स्वप्न जपायला हवे' असे आहे व तेथे नवदंपतीच्या संसाराचीही, नोकरी, मूल व संसार हे तिहेरी सूत्र संभाळताना कशी ससेहोलपट होते, याचे एक सत्यदर्शी व हृदयस्पर्शी चित्र त्यांनी रेखले आहे. असेच आणखी एक उदाहरण याच परिस्थितीत नौकरदार पत्नीच्या संसारनिष्ठ व पतिनिष्ठ वृत्तीला कसे चोहीकडून अंकुश बोचतात, लोकलमध्ये सर्वांगाला

इतरांचे धक्के लागतात, नोकरीतही 'स्त्रीत्वा'कडे लोकनजर कशी बंदुकीच्या छर्‍याप्रमाणे देहावर सतत लागत असते, ह्याचे मार्मिक वर्णन 'मंजुळा' या प्रसिद्ध कथेत अरविंद गोखले यांनी केलेले आहे. या तिन्ही कथा त्या त्या परिस्थितीत जगणाऱ्या अनेकाच्या विचारप्रणालीचे व भिन्न-भिन्न दृष्टिकोनाचे दर्शन घडविणाऱ्या, आणि म्हणूनच प्रतिनिधीरूप ठरतील इतक्या महत्त्वाच्या वाटतात.

अलका, समाजातील भिन्न परिस्थिती असे कथाविषय देऊ शकते, हे तर खरेच, पण त्यातही कथावस्तू पुष्कळदा समाजातली विसंगती अगर दुर्दैवी घटना पाहूनच सुचते, हे मला वाटतं, मी तुला आवर्जून सांगितलं पाहिजे.

पुष्कळदा विजोड जोडपी आपल्या पाहण्यात येतात. लावण्यसुंदर व रसिक पत्नी अन् सदा शेअरबाजारातल्या आकडयावरच ज्याचे मन चिकटून बसले आहे असा रूक्ष पती, किंवा अत्यंत मधुर आवाजी असलेला पती व पत्नी कर्कश बोलणारी, पती देखणा, सुदृढ, बांधेसूद, कुणाचेही डोळे क्षणभर गुंतावेत, एवढया आकर्षक व्यक्तिमत्वाचा, तर, पत्नी चांगली स्थूल 'वजन-दार' व कशीशीच दिसणारी...थोडक्यात म्हणजे, ब्रह्मदेवाला नेहमी अशा विरोधाचीच गाठ घालायची हौस आहे की काय कुणाला ठाऊक ! पण अशा विजोड जोडया पाहूनही मला त्यांच्यावरून कथानकाचे धागे पुष्कळदा मिळाले आहेत व त्या विसंगतीतूनच काही काल्पनिक कथाबीजे सुचली आहेत ! खरेतर याहून मोठमोठी विसंगत दृश्ये नित्य आपल्या पाहण्यात येतात. लहान मुलाना घरी कुलुपात बंद ठेवून नोकरीला जाणारी आई अगर सुंदर पत्नीला कुणाकडे एक शब्दही बोलता येऊ नये म्हणून घरच्या उंच भिंतीआड कैदेतच ठेवणारा मत्सरी पती, ही उदाहरणे डोळ्यासमोर-चीच. थोरल्या मुलीचं वेळेवारी लग्न करून देण्याऐवजी तिच्या पगारावर जगणारे व त्यासाठी सक्तीचं कौमार्य पोरीच्या माथी मारणारे आई-बाप, घटस्फोट घेतल्यानंतर पोरांना बोर्डिगात अगर असंच कुठे दूर ठवून दुसरा प्रियकर शोधणारी आई, किंवा सोन्यासारख्या बायकोला घरी तळमळत ठेवून बाहेर दुसरीच्या गळ्यात हात टाकणारा कुटुंबवत्सल 'घरंदाज' पती, तसेच कुटुंबात एखाद्या होईजड व्यक्तीचं रिकामं व कायमचं माजलेलं स्तोम, ही अनेक प्रकारच्या विसंगतीचीच सारी समाजातली उदाहरणे. ती

पाहून प्रत्येक सहृदय माणसाला चीड येते, खेद वाटतो, लेखकाचं मन तर अधिकच संवेदनशील, त्याला स्वतःचे हे भावप्रत्यय आपल्या कथाकादंबरीतून व्यक्त करावेसे वाटतातच व मग निरनिराळ्या कथांचा जन्म होतो.

जाणत्या लेखकासमोर समाज, नित्य, असे का ? तसे का ? अशी कोडी घालीत असतो. अर्थात या असल्या प्रश्नांचे स्वरूप सामाजिक असते व त्या प्रश्नातून सूचित झालेल्या बाबती बहुधा समस्यात्मकच असतात. अशा सामाजिक समस्येवरही पुष्कळ कथा लिहिल्या जातात. उदाहरणार्थ उपवर मुलींच्या विवाहाचा प्रश्न घे, (तू स्वतः याच वर्गात नाव घातले आहेस अगर घालणार आहेस, म्हणून तर हा अधिकच तुला जवळीकेचा व महत्वाचा !) तर लग्न करणे या, ना त्या कारणाने शक्यच होत नाही म्हणून 'तशाच' राहणाऱ्या काही प्रौढ कुमारिकाची गोष्ट घे. दोन्ही गोष्टींचे स्वरूप सामाजिक आहे, तसे, घरगुती पण आहे. अर्थात् या जिव्हाळ्याच्या विषयावर बैपुल्याने कथा लिहिल्या जाव्या, यात नवल थोडेच ?

आणि आजच्या सुशिक्षित कन्येचे लग्नपूर्व जीवन ? त्यात तरी कमी गुंतागुंत असते का, सांग बघू ? प्रणयीजीवन, प्रेमभंग, मनाविरुद्ध लग्न करणे, मिश्रजातीच्या तरूणावर मन जडणे, हुंड्याचे (अगर, देणगी म्हणू वाटल्यास) जीवखाऊ प्रश्न, कोवळ्या तरुणीचे स्वैर वर्तन वा नीतीचे निर्बंध झुगारून वाटेल त्याच्या सहवासात राहणे, क्वचित लग्नपूर्व मातृत्वही वाटणीस येणे, पालकाशी वैमनस्य लग्नापायी येणे, भोळसटपणाने फसलेल्या व फसवलेल्या अजाण मुलींचे भवितव्य...ही कमी प्रश्नचिन्हे आहेत का ? अलका, अविवाहित मुली दिवंगत बापाचा घरप्रपंच सांभाळण्यासाठी अगर आर्थिक परिस्थितीमुळेही नोकरी करतात, त्यांना कोणकोणत्या दिव्याला तोंड द्यावे लागते, तुला कल्पना आहे का ? लीला श्रीवास्तव यांनी या विषयाचा ऊहापोह अनेक कथातून चांगल्या प्रकारे केला आहे. पुष्कळदा शीलाचे मोल देऊन देखील नोकरी टिकवण्याचा प्रसंग या मुलींवर येतो. त्यांची वर्षापूर्वी किर्लोस्करमध्ये प्रसिद्ध केलेली 'सेल्सगर्ल' हा एकच गोष्ट वाचून बघ, म्हणजे या अशा मुलींच्या मनाची तडफड, तळमळ सारे काही तुझ्या ध्यानात येईल. हा विषय आता जनतेच्या जिव्हाळ्याचा झालेला

आहे.

सांग अलका, कथाबीजे मिळवण्याच्या दृष्टीने हे क्षेत्र थिटे पडणारे आहे काय ? तुझ्या कल्पकतेला मोठेच आव्हान देणारे हे आजचे सत्याश्रयी व नव्या जाणीवाचे कन्याचरित्र; हे तुझ्या आसपासही आहेच ? ह्यातून वाटेल तेवढी कथाबीजे तू घे निवडून खुशाल, अन् लाग कामाला.

काय म्हणतेस, या समस्या फक्त लग्नाच्याच मुलींना असतात का म्हणून? छे छे ! अग. तसं कसं होईल ? समाजातल्या सगळ्याच वयाच्या भिन्न घटकाच्या समस्या आज, वेगवेगळ्या तऱ्हेने 'आमचं काय भवितव्य ?' असे विचारीत लेखकासमोर उभ्या ठाकल्या आहेत जशा, पण वरील कुमारिकांच्या समस्य तुला समवयीन म्हणून अधिक जवळच्या वाटणाऱ्या आहेत.

आणखी एक; मुलांच्या संसारात वृद्धांचे स्थान ? आज बऱ्याच ठिकाणी ते अत्यंत दयनीय होत चाललेले तूही पाहिले असशीलच ? हा वृद्धांचा प्रश्न आताच नव्यानं उद्भवला आहे की काय ? पूर्वीही– म्हणजे मागल्या पिढीच्या वेळीही– वृद्ध माणसे तरुणांच्या संसारात नांदत होतीच. त्याचा नवा प्रश्न आत्ताच काय ? असा 'नवा प्रश्न' तुझ्याही मनात उद्भवणारच त्याला उत्तर असे की, पूर्वीची सामाजिक परिस्थितीच निराळी होती मुळी. आताइतका जागेचा आणि महागाईचा प्रश्न राक्षसी झाला नव्हता. अगर कुटुंबासाठी गृहिणीनं नोकरी केलीच पाहिजे, हा कठोर धडा समाजाने अजून नीटसा गिरवलेलाही नव्हता, घरे लहान असली तरी बेताच्या भाड्यात तीन-चार खोल्याही, राहायला मिळत होत्या पूर्वी. अशावेळी वृद्धांना आसरा, निवारा, विसावा देणे कुटुंबचालकांना, मुला-सुनेला डोईजडही होत नव्हते. मग आताच हे वृद्धाश्रम का निघताहेत ? त्याचेही कारण हेच. जागेचा प्रश्न व सेवा-सुश्रुषा करणाऱ्या गृहिणीच्या वेळाचाही प्रश्नच ! या नव्या परिस्थितीच्या चक्रात सापडलेल्या वृद्ध स्त्री-पुरुषांच्या कथा आज पुष्कळच प्रसिद्ध होतात व त्याही निरनिराळ्या दृष्टिकोनातून. 'गोष्ट एका राणीची' या कथेत विजया वाड यांनी मुंबईच्या एकाच खोलीत राहणाऱ्या सासु-सुनेच्या दांपत्यजीवनाचे किती व कसे हाल होतात व नव्या पतिपत्नीला एकान्तासाठी रोज एखाद्या हॉटेलात कसे जावे लागते, याचे विदारक पण सत्यदर्शी वर्णन केले आहे. येथेही वृद्ध सासू-सासऱ्यांनी

मराठी ग्रंथ संग्रहालय

तरी पाहावे कोठे मग ? होच खरी समस्या ! काही वर्षापूर्वी मंदा बोडस यांनी स्त्री बालवाडी दिवाळी अंकात 'आजी, मी तुझ्या बलोबलचीच आहे !' ही एक मनसुंदर कथा लिहून वृद्धाश्रमात ठेवलेल्या घरातल्या आजीचे व छोटचा नातीचे भावविश्व कसे तुटले, हे फारच चांगल्या तऱ्हेने सूचित केले आहे अर्थात ही गोष्ट आज एकाचीच राहिलेली नव्हे, तर अनेकांची होऊ पाहते आहे. तिला समस्यारूप येत आहे. मात्र दर ठिकाणी तरुणपिढीकडेच दोष असतो, असा ग्रह करून घेणे बिलकुल इष्ट नव्हे हं ! लेखकाचा दृष्टिकोण असा एकांगी कधी नसावाच.

तर सांगायचे असे की समाजातल्या अशा समस्या निर्माण होतात त्या मूळ कुटुंबातूनच आणि ही मूळ कथाबीजे अनेक घरांच्या उंबरठ्यात अगर अंगणातच सांडलेली तुला सापडतील ! मग कथावस्तूला तोटा थोडाच ? तेव्हा लक्षात आले ना ? प्रभावी व्यक्तींप्रमाणेच सामाजिक समस्याही उत्कृष्ट कथाची अनेकविध सामुग्री देऊ शकतात, अलका. अर्थात तू नेहमी कथेसाठी समस्यात्मकच कथानक घेत जा, असं मला मुळीच सुचवायचं नाहो आहे बरं का, खरी तर ही कथानकं पेलायला जड व कथाच काय, पण कादंबऱ्याही लिहिता येण्याजोगी मोठ्या व्याप्तीची ! (यावर बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या जातही आहेत !) तर तू जेव्हा ही कथानके पेलण्या-एवढी समर्थ होशील, तेव्हा तिकडे अवश्य नजर वळव. मात्र कथावस्तूंची निर्झरणी यांतून नित्य खळखळत असते, एवढे मनात आज नोंदवून ठेव म्हणजे पुरे.

काही दैवी अगर सार्वजनिक आपत्तीतूनही कथाबीजांचा जन्म होतो. उदा. बांगला देशात युद्धक्रांती झाली तत्पूर्वी तेथील जनतेवर पाकसैन्या-कडून अत्यंत अनन्वित अत्याचार झाले, व स्त्रियांवरही पाशवी बलात्कार झाले. इतके की सारा देश दुःख, करुणेने हादरून गेला. त्या पाशवी वासने-वर आधारित अशा कथा त्या वर्षात किती प्रसिद्ध झाल्या, पाहिल्यास ना ? हवे तर त्या तू एकदा वाचून बघ, उत्कृष्ट कल्पना देतात त्या तेव्हाच्या परिस्थितीची. मागेही नौखालीचे हत्याकांड झाले किंवा देशाची फाळणी झाली तेव्हाही मराठी कथाप्रवाहात या वेगळ्या वाणाच्या कथांचा ओघ मिसळला होताच. या आपत्ती थोड्याच ? पुण्याला पानशेत झालं व मोठा पूर आला

त्याच्या किंवा कोयनानगरला दहा-बारा वर्षांपूर्वी भूकंप झाला त्यात सापडलेल्या लोकांच्या हकीगतीही बहुसंख्य कथांतून, नाटकांतून व्यक्त झाल्या आहेतच. समाजात जे विशेष काही घडेल त्याचे प्रतिबिंब कमीअधिक प्रमाणात वाङ्मयात उमटणे साहजिकच.

पण याबाबतही एक-दोन गोष्टी तू अवश्य ध्यानात ठेवाव्यास अशी माझी तुला खास प्रेमाची सूचना आहे. एकतर या परिस्थितीचा प्रत्यक्ष दृकप्रत्यय नसेल, किंवा हे प्रसंग डोळ्यांनी समक्ष पाहिलेल्या अगर त्या प्रसंगात प्रत्यक्ष सापडलेल्या व्यक्तींचे अनुभव जर तुझ्या संग्रही नसतील, तर केवळ कल्पनेने या कथा नीट वा यथातथ्य उभ्या राहातच नाहीत ! दुसरे असे की यांचे महत्त्व तसे तात्कालिकच असते. हे ओळखून, अशा घटना जोवर लोकांच्या मनात ताज्या आहेत तोवरच अशा कथा लिहायला घेण्यात खरे औचित्य !

अर्थात असे मी तुला लिहितेय खरी, पण या कथांना मुळीच महत्त्व नाही असे मात्र नव्हे हं ! देशातल्या, दैवी, सामाजिक वा राष्ट्रीय अशा उग्र, भयंकर परिस्थितीबद्दलचे लेखकाचे विचार, त्याचा प्रक्षोभ, त्याला त्या परिस्थितीवर सुचणारे उपाय इत्यादिकांचा आविष्कार, या कथातून जरूर होतो व एकप्रकारे समाजातील विचारजागृतीचे कार्य त्या त्या वेळी या कथा करू शकतात. हीच खरी व मोठी उपयुक्त ठरू शकेल त्या कथांची.

अलका, इतर लेखकांच्या कथा वाचूनही आपल्या प्रतिभेला पुष्कळदा काही नवी दिशा मिळते, किंवा त्यावरून अगदी वेगळीच कथाकल्पना सुचते, असे मी म्हटले तर तुझा विश्वासही कदाचित बसणार नाही ! पण माझा स्वतःचाच अनुभव असा आहे खरा. 'लागेबांधे' ही माझी कथा तुला आवडली होती, आठवते ना ? त्या कथेची कल्पना मला कै. ग. दि. माडगूळकरांच्या एका गोष्टीच्या वाचनानेच आली. मुळात त्यांची कथा अगदीच निराळी. पण 'कथेतून हरवलेल्या व्यक्तिमत्त्वाचा शोध कथानायकानं अगर नायिकेनं घेणं' ही त्यातली कल्पना माझ्या मनास फार आली व मी ती एका नव्याच कथेत शब्दरूप केली. तर, असेही आहे, पुष्कळदा इतर ज्येष्ठ व श्रेष्ठ लेखकांच्या ग्रंथवाचनाने आपल्याही स्फूर्तीला नवी जाग येते, जाण येते, प्रतिभा कार्यक्षम होते, विचारू लागते, 'अरे, ही गोष्ट अशीच कशी घडली ? अशी अशी, वा तशी तशी, का घडू नये ?

आपण असेच अमुक तमुक उदाहरण समक्ष पाहिले होते. त्यात तर वेगळ्याच घटना घडल्या होत्या. मग ? लेखकाने हेच पर्यवसान का योजले ?

चालली विचारधारा वाहात ! व हीच ती प्रतिभेला मिळणारी नवी दिशा. अलका, एक प्रसिद्ध पाश्चात्य कथालेखक लॉरेन्स डयूरेल, हा गमतीने एका मुलाखतीत म्हणतो, 'मी इतरांची पुस्तकं वाचतो, ती केवळ स्वानंदासाठी नव्हे, तर एखाद्या प्रवाशाप्रमाणे त्यातल्या उत्कृष्ट परिणाम करणाऱ्या बाबींचा मी अभ्यास करतो, आणि त्या माझ्या लेखनात आणण्याचा मी प्रयत्न करतो. मी ज्येष्ठांच्या वाङ्मयातून अशी 'उचलेगिरी' करीत असतो !' अर्थात लॉरेन्सचे शेवटचे वाक्य विनोदाने सांगितले गेले आहे खरे, पण एक मोठे तत्त्वच त्यात त्याने स्पष्ट केले आहे. 'उचलेगिरी' खरी. पण ती परिणामकारक अशा एका बाबतीची– म्हणजे लेखनगुणांचीच, कथानकाची नव्हेच नव्हे, हा मुद्दा विसरण्याजोगा नाही.

अलका, या विषयातला एक अति महत्त्वाचा मुद्दा मी तुला अजून सांगितलाच नाही. तो म्हणजे दरवेळी प्रत्यक्षावरूनच लेखकाच्या मनात कथाबीज उमलते असे नसून कल्पनेतूनही ही कथाबीजे केव्हा केव्हा लेखक उत्पन्न करीत असतो, हा होय. लेखक म्हटला, की त्याला कल्पकतेचीही फार मोठी दैवी देणगी प्राप्त झालेली असतेच. कल्पिताची केवढी मोठी विश्वमित्री सृष्टी तो निर्माण करतो ! मोहरीएवढ्या बीजातून कथेचे मोठे फुलझाड अगर कादंबरीचा महावृक्ष निर्माण होतो, तो केवळ लेखकाच्या कल्पकतेने प्रतिभेच्या साहाय्यानेच ! आणि ऐकून ठेव, अलका, हे मोहरीएवढं बीजही पुष्कळदा कल्पनेनेच बनवलेले असते !! फक्त केव्हातरी मनात काही विचार वाऱ्याच्या झुळकेप्रमाणे येतात–'असे असले तर? तसे नसले तर ? अमूक घडले नाही तर ? अमुक जर घडून आले तर ? 'तो' नायक असाच असायला हवा, अन् 'ती ? वेगळ्या नमुन्याची ! उघडच आहे ते. मग, संघर्ष ? तो कसा हवा बरे ?' चालले विचारांचे विणकाम वाढत. लेखक ही वाढ स्वतंत्रपणे करण्याएवढा समर्थ प्रतिभेचा असतो व असायला हवा. कल्पित सृष्टीचे हे भावरंग कसे असतात व कसे वर्धित होऊ शकतात, याचे सविस्तर वर्णन मी पूर्वी केले आहेच, ते तुझ्या लक्षात असेलच.

अर्थात पूर्णतया कल्पित कथानकालाही कुठे ना कुठेतरी सत्याच्या बीज-

छडीचा स्पर्श झालेला असतोच, असे मला वाटते, नुसते वाटते असेही नाही, तशी माझी श्रद्धा आहे. एका पाश्चात्य साहित्यिकाने म्हटले आहे की, लिटरेचर इज लाईफ रिमेंबर्ड.' तेच खरे मानते मी.

कल्पकतेचे आणखीही एक प्रकारचे कौशल्य असते. कथावस्तू लेखकाला कुठेतरी समाजात, रस्त्यात रुपयाची नोट पडलेली सापडावी तशी, सहज व अचानक दिसते. मग प्रत्यक्ष त्या कथावस्तूचा परिसर, ती व्यक्ती, स्वभाव इ. चे आकर्षण उत्पन्न होते. मग थोडीबहुत माहिती कळते आणि मग त्यातली कोठलीही प्रभावी व्यक्ती म्हणा, घटना म्हणा, स्वभावरेषा म्हणा, कल्पनेने उचलून घेऊन लेखक त्यावर कल्पिताचे स्वतंत्र मिनार उभारू शकतो ! अर्थात् या कल्पिताच्या मनोऱ्याचा पाया अगदी छोट्याशा अशा एखाद्या सत्यघटनेचाही असू शकेल !

मात्र अलके,प्रत्यक्ष हकीगतीतली ही छोटी मोठी कथावस्तू जशीच्या तशी घेऊच नये असे मला स्वतःला वाटते– कारण त्यात ललित्य असेलच असे नाही. आणखी त्या दिसलेल्या कथावस्तूचे सगळेच पैलू लोकांसमोर कला-दृष्टया मांडण्यासारखे असतील असेही नाही ! कथाकारांचे कसब मोत्याच्या चिमुकल्या दाण्याला वेज पडून त्याला मनोहर व भूषणायोग्य बनवण्यासारखे असते. खाणीतल्या सोन्याचा हिणकस भाग काढून शुद्ध सोन्याचे नाजूक घडाईकाम करण्याचं तत्त्वच कथाकाराने स्वीकारले पाहिजे ! तर मुळात बिंदुमात्र सत्यता असेना ? तिला प्रतिभेचा कलात्मक स्पर्श होताच या बिंदूचा ' कथासिंधू ' व्हायला उशीर लागत नाही. कोठे कोठे तर हे ' बिंदू-मात्र कथाबीज ' सुद्धा अगदी स्वतंत्रपणेच लेखकाच्या मनात जन्म घेते. मात्र ते सुचलेले असेल बहुधा प्रत्यक्षावरूनच !

कथावस्तू कशी सुचते ? या प्रश्नाचे उत्तर आणखीही एका जरा वेगळ्या प्रकाराने देता येण्याजोगे आहे, पुष्कळांनी ते दिलेलेही आहे, ते म्हणजे चिंतनशीलतेने वेगळ्या सखोल वैचारिकपणानेही ही कथावस्तू मनात अवतीर्ण होते. उदा. माणसाचा जन्ममृत्यु निश्चित करणारी, नियती, हीच एक फार मोठी शक्ती आहे, ती सदैव अदृश्यरूप असते हे सृष्टीतले एक, प्रत्येक विचारशील माणसाला जाणवलेले कठोर सत्य आहे. या शक्तीपुढे मानव हतबल आहे ; या विषयावर ज्या कथा लिहिल्या जातात त्या प्रत्यक्ष

दर्शनातून थोड्याच ? त्या सर्व वैचारिक चवुतऱ्यावर उभ्या असलेल्याच व म्हणूनच फार सुंदर वाटतात. या अनोख्या प्रकारात आदर्श अशी कथा-वस्तू मला दोन-तीन ठिकाणी आढळली आहे. ग. दि. माडगूळकर यांची 'एक अंगुली लिहीते !' ही कथा या दृष्टीने फारच वेधक आहे. तू जरूर वाच. दि. बा. मोकाशी यांनीही 'आमोद सुनांसी आले' ही कथा अशा आशयावरच लिहिली आहे. त्यातही जननमरणावरचे नियतीचे स्वामित्व किती हृद्यतेने प्रकट झाले आहे. कथावस्तूच्या रूपांत अलीकडे आणखी एक नाविन्य आले आहेसे वाटते. उदा. अलका, तुला आश्चर्य वाटेल, पण डोके ठिकाणी नसलेल्या माणसांचे विचारप्रवाह कसे असतील ? याची कल्पना करूनही कथावस्तू शब्दरूप घेताना मी पाहते आहे आज ! 'काळा सूर्य' ही कमल देसाईंची एक दीर्घकथा या दृष्टीने खूपच गाजली आहे आणि चंद्र सावली कोरतो' ही सदानंद रेगे यांचीही कथा याच आशयाची आहे. वेडसर माणसांचे संज्ञाप्रवाह व त्यांचा वैचारिक दृष्टिकोन हे यात फार सूक्ष्मपणे दाखवले आहेत.

अर्थात कथावस्तूच्या या नव्या अवताराकडे मी बोट दाखवते आहे ते मला वेडसर माणसांचे ते विचारविश्व आवडले व म्हणून खरे वाटले, म्हणून नव्हे हं ! तर या प्रकारचे लेखन किती अवघड असते हे मनात जाणवून त्या लेखकांच्या या निर्मितीकडे मी पाहते. दुसरे, यात शब्दललित्य उपमा, भाषेची सहजता किती ? तीच माझा चिंतनविषय होऊन बसते. आधी मात्र कथावस्तूचे हे वेगळे अनोखी रूप तूही वाटलं तर नीट पाहून ठेव– पण एक वेगळा आविष्कार म्हणूनच तिकडे पहा हं ! याचे अनुकरण मात्र तुला एवढ्यात जमायचे नाही, पुढेही कदाचित जमणे मुश्किलच ! तथापि आजकाल मराठी कथाप्रांतात येणाऱ्या नवनव्या प्रवाहांचा तुला परिचय असावा म्हणून आपली थोडी माहिती सांगितली, आहे इतकेच...

कथावस्तू कुठे मिळते याच प्रश्नाचा उत्तरार्ध 'कथानक सुचते कसे ?' असाही होऊ शकतो. हे तुझ्या ध्यानात आलेच असेल ? त्याचंही आता स्पष्टीकरण मला वाटतं नीट झालेलं आहे. कथा नीट सुचण्याचे अनुभूती, परानुभूती व कल्पिताची सृष्टी हे तीन प्रमुख प्रकार आहेत ते पूर्वी तुला सुरुवातीच्या एका स्वतंत्र प्रकरणात सांगितल आहेतच मी, तेव्हा पुनरुक्तीची

आवश्यकता नाही.

तर अलका, शब्द, व्यक्ती, घटना, परिस्थिती, व जीवनपरिसर यात सामावलेली व कल्पिताचे पंख लेऊन परीप्रमाणे मनोहर झालेली कथावस्तू ही अशी असते. समाजात ही राजस्थानच्या नववधूप्रमाणे घुंघट अगर ओढणी घेऊन वावरत असते. या प्रच्छन्न कथावस्तूला सगळ्या परिसरातून, गजबजलेल्या जीवनातून नेमके हुडकून काढायला लेखकाचीच शोधक व सराईत दृष्टी हवी. ती तुला हळूहळू साध्य होईलच. मग ' कथावस्तू, कुठे मिळते ?' ही विवंचना कधीच पडायची नाही, अशी आशा करते. पुढच्या पत्रात ' कथेतील भावदर्शन ' याबद्दल लिहीन बरे का !

अच्छा, बाय् बाय् अलकनंदा–

तुझी

सौ. ताई

१२ कथेचे अंत : सौंदर्य
(ब) भावदर्शन

प्रिय अलका,

आतापर्यंत 'कथा'विषयक अशी चार पत्रे तुला मी लिहिली, नाही का ? खरं म्हणजे हा विषय नीट, सविस्तर समजावून सांगायचा तर आणखीही कितीतरी पत्रे लिहावी लागतील. पण वाचकाला कंटाळा येता कामा नये, हे लेखनातले एक प्रमुख तत्त्व, या पत्रलेखनातही माझ्या नजरेसमोर उभे आहेच, ते नाकावर बोट ठेवून 'बेतशीर लिही' असे मला बजावते आहे ! तेव्हा आता हे एवढे एकच पत्र लिहून कथाविषयाची ही पंचारती मी पुरी करणार आहे पोरी.

गेल्या पत्रात कथेच्या अंतःसौंदर्याची, प्रथम क्रमांकाची बाब 'उत्कृष्ट कथावस्तू'ही कशी व कोठून मिळते ? व नंतर लेखकाचे मन त्या वस्तूला वेगळा परिवेष कसा देत असते याबद्दल सर्व दृष्टीने आपण विचार केला, आता दुसरा, या अंतःसौंदर्याचा जो महत्त्वाचा विभाग आहे त्याचा या पत्रात विचार करायचा आहे. तो म्हणजे, कथेतील भावदर्शन हाच, त्याकडे जरा वळू.

अलका, हे जग म्हणजे केवळ जडमूढ व्यक्तींचेच नव्हे, तर भावनाशील व्यक्तींचेही आहे, हे प्रथम ध्यानी घ्यायला हवे. ज्या ज्या व्यक्तींची चित्रे आपण रेखाटतो अगर रेखाटणार आहोत. त्या त्या व्यक्तीचे एक स्वतंत्र

भावविश्व तिच्या आयुष्याभोवती जन्मभर रुंजी घालीत असते, त्यातही किती तऱ्हा ? काम, क्रोध, लोभ, दंभ, मोह, इत्यादी षड्विकारांनी वा वासनांनी अनेक माणसे प्रेरित झालेली असतात. त्याबरोबरच प्रेम, सहानुभूती, दया, माया, ममता, जिव्हाळा वात्सल्य, इत्यादींचा मनोहर विलासही मानवी मनात नित्य चाललेलाच ! ही मानवी भावभावनांची सृष्टी, हीच लेखनाची एक प्रकारची महत्त्वाची व खरी सामुग्री आहे म्हटले तरी चालेल. कथेला काही वेळा तर 'भावकथा' ही म्हटले जाते, हे मला वाटतं मी तुला पूर्वी एकदा सांगितले आहेच.

यातही महत्वाची गोष्ट ही की, हे भावभावनांचे विश्व लेखकाइतकेच वाचकांच्याही पुरेपूर परिचयाचे ! त्यामुळेच की काय, एखाद्या भावनेवर आधारित अशी रम्य कथा रचली गेली तर वाचकांना ती अधिकच हृद्य वाटते, मग तेथे सत्याश्रयी कथाबीज असो की कल्पित असो ! आपल्या कथेतून भावनांचा उत्कट विलास दाखविण्याचे कसब लेखकाला साधले की बस् बस् ! मग तो एकदम यशस्वी कथाकार होऊन बसेल. पण हे वाटते तेवढे सोपे काम नसते– एवढेच काय ते !

या भावदर्शनाच्या बाबतीत 'वडीलांनी' काय काय म्हटले आहे तेही 'पुढीलांनी' पाहून ठेवलेले बरेच. प्रा. फडके या संदर्भात म्हणतात,

> 'मनातील विचारविकारांची जी गर्दी उसळते त्यातच संसाराच्या मनोहारित्वाचे सार. हे ज्यात प्रतीत होते त्या ललितकथा टिकाऊ होतात.'

किती थोडक्यात व समर्पक भाषेत हे 'सार' त्यांनी सांगितले आहे ! उत्कृष्ट भावदर्शी कथा लिहायची असेल तर सृष्टीतील मानवी भावभावनांचे पुस्तक तुम्हाला मनोदृष्टीने वाचता आले पाहिजे. तेव्हाच त्यातून तुम्ही काही मजकूर लिहू शकाल, होय की नाही ? आणि यासाठीदेखील निरीक्षण, कल्पकता व अभ्यास याच आपल्या मूळ अभ्यासपाठांची तुम्हाला जरूर लागणार ! या दृष्टीने भावभावनांची सृष्टी तू जरा लक्ष देऊन पाहू लाग म्हणजे तुलाही या मानससागरात सुंदर व मोलवान् मणि-मोती मिळू शकतील.

काय ? कसं पाहायचं म्हणतेस ? अग त्यात काही फारसं कठीण नाही

आहे. जे भाव मानवी मनाला परिचित असतात, त्यांचं दर्शन कुठेही झालं तर एका निमिषात ते आपण ओळखू शकतो, हीच यातली फार मोठी सोय ! उदाहरणार्थ– मोहाचे अनंत प्रकार घे. आपण त्या मोहाच्या वाटेला जात नसलो, तरी त्याचं स्वरूप तरी नीट जाणतो की नाही ? त्या निसरड्या पायवाटेवरून अनेक कोवळ्या वयाची मंडळी जाताना तुला पाहशील तेथे दिसतील. कनक आणि कामिनी यांच्या लोभात गुंतलेली जगात काय कमी माणसे असतात ? आपल्या भोवतीच्या इवल्याशा परिसरातही ते नमुने भडक रूपाने उघडउघड अगर प्रतिष्ठेच्या पांघरुणाआडून वघणारे असे दिसतातच की. कोठे तृप्त जिवलग मैत्री असते तर कुठे त्या स्नेहाच्या हिरवळीतच स्वार्थ अगर मत्सर नागासारखा सळसळत असतो, हे तुला ठाऊक नाही का ? तर असे हे सर्व मनोविकार, त्यांबद्दलच्या घटना लिहिणे, म्हणजेच भावसुंदर कथेचे निर्माण. तेथे व्यक्तीला महत्त्व नाही, भावनेला आहे. आपण, प्रीतिसारखी दिव्य हृद्य भावना घेऊया– हवी तर उदाहरणादाखल. पुराण कालापासून प्रीतिकथा रचल्या गेल्या आहेत व त्या, सगळ्या जगाच्या दैवतकथांतही अमर होऊन बसल्या आहेतच. जगन्माता पार्वतीने शिवासाठी मोठी तपश्चर्या केली ती या प्रीतीच्या बळावरच ना ? इतिहासातूनही प्रेमकथा चालत आल्या, शशीपुन्नू, लैला-मजनू, रूपमती-बाजबहाद्दर, हीर-रांझा...पण अंशी नावे किती द्यायची ? प्रेम विशेषतः तारुण्यसुलभ प्रीती ही मनोहर भावनाच मुळी अशी मानवव्यापी आहे तेव्हा त्यावर असंख्य कथा व्हाव्या हे साहजिकच. त्यामुळेच की काय, आजतागायत या प्रेमकथांचीच व्याप्ती आपल्या कथावाङ्मयात जास्त असलेली तुला आढळेल.

प्रीती ही भावना दिव्य तर खरीच, पण ती व्यक्त करण्याचे दरेक लेखकाचे कसब अगदी वेगवेगळे असते व त्या कसबातूनच त्या त्या लेखकाची कला अजमावली जाते. कोणी या प्रीतीच्या अनुषंगाने कामुक वा लैंगिक वर्णनेच सारखी करीत बसला तर कला त्या कथनाजवळून कोसभर दूर पळून जाईल ! पण प्रीतीचा नाजूक पदर, अहंकार, सहसंवेदना, अभिमान, मत्सर, जिव्हाळा, उदात्तता अगर सूड, राग इत्यादी हजार तऱ्हेच्या रंगच्छटांनीही रंगलेला असतो. त्यातले भाव, रम्य शैलीने सूचित केले तर,

प्रेमकथा अतिशय आकर्षक होते. मी चाळीस वर्षांपूर्वी 'प्रेम आणि मरण' नावाची कथा वाचली होती– मला वाटतं, वि. सी. गुर्जरांची. त्यात एक बुद्धसंघातली तरुण भिक्षुणी एका आसन्नमरण युवकाची शुश्रुषा करीत होती. तो तरुण प्रियेच्या धिक्काराने आजारी होऊन मरण ओढवून घेतलेला व बेशुद्धच. त्या बेहोषीत तो सारखा आपल्या त्या निष्ठुर प्रियेला उद्देशून 'शेवटचे एकच चुंबन' लडखडत्या शब्दात मागत होता, त्याचे प्राण घुटमळत होते, ती तडफड न पाहवून अखेर त्या निर्मोही संन्यस्त भिक्षुणीने त्या बेशुद्ध रोग्याच्या ओठावर ओठ टेकले ! लगेच त्या मृदु स्पर्शाने त्याचे ओठ हसले, क्षणभरच ! पुढल्या क्षणी त्याने मान टाकली आणि भिक्षुणीने 'बुद्धं सरणं गच्छामि' म्हणून अश्रू टिपून देवाची क्षमा मागितली, अशी ही गोष्ट. किती छान लिहिलेली व प्रीतीचे अगदी वेगळेच असे एक उदात्त दर्शन घडवणारी, म्हणून अवीट गोडीची.

पण अलका, प्रेमाचा प्रकार फक्त प्रणयीप्रेम अगर पति-पत्नी प्रेम एवढाच आहे का ? सांग. पुष्कळ लेखकांना सुरुवाती सुरुवातीला तसं वाटतं हे खरं, मलाही एकदा कधी तसंच वाटलं होतं ! पण लवकरच समजलं, की या प्रेमाचेही अपत्यप्रेम, बंधु-भगिनीप्रेम, मातृ-पितृप्रेम, मातृभूमीचे वा देशप्रेम, बालकांवद्दलचे प्रेम असे अनंत प्रकार आहेत व तेही असेच आजवर हजारो गोष्टींतून व्यक्त झालेले आहेत. त्या सर्वांची उदाहरणे देण्याची मुळीच आवश्यकता नाही. तुझ्या समोरच्या अफाट कथावाङ्मयात जागोजाग हे नमुने प्रकट झालेले आहेत. अर्थात तेथे प्रीती कोणत्या तऱ्हेची होती ही महत्त्वाची गोष्ट नव्हे, प्रश्न आहे तो ती प्रीती कशा प्रकारे कलात्मकतेने व्यक्त केली गेली ? याचाच. हा कलात्मकतेचा स्पर्शच सर्व प्रकारच्या भावकथांना चैतन्य देत असतो.

अशा प्रकारे प्रेम ही अतिव्यापक मनोभावना आहे. वर दर्शविल्याप्रमाणे ते माणसामाणसात तर प्रत्ययाला येतेच पण स्वतःचे पाळीव पशुपक्षी, फार काय, स्वतःचे घर, झाडे, जडवस्तू यांवरही काही माणसांचा जीव जडतो ! हाही जिव्हाळ्याचा भाव अनेक लेखकांनी फार मनोज्ञतेने व्यक्त केला आहे. उदा. दि. बा. मोकाशी यांनी 'इंदुताई कपाट घे' नावाची एक भावसुंदर कथा लिहिली आहे. त्यात कित्येक वर्षे एकाच

घरात राहिल्यावर ते भाड्याचे घर सोडून गेलेल्या एका गृहिणीचे मानस-चित्र रंगवले आहे. परत कधीतरी ती गृहिणी त्या घरी जाते. तेथल्या एका कपाटाला वारंवार चाचपून उघडून पाहाते व अखेर तेथल्या दुसऱ्या परक्या भाडेकरूंना सांगते की, 'आमच्या संसारातल्या अनेक प्रसंगांच्या साक्षी या कपाटानं जतन केलेल्या आहेत, ते आमच्या जीवनाचाच एक भाग झाले होते; म्हणून मला याची ओढ वाटते!'

सुधा नरवणे यांची 'झोपाळा' ही एक कथा घेऊ या. एका मागल्या पिढीतल्या गृहिणीच्या आयुष्यातले अनेक प्रसंग पाहणाऱ्या या पाहणाऱ्या या झोपाळ्याची नव्या पिढीच्या संसारात अडगळ झाली! तो सरळ नंतर माळ्यावर टाकला गेला व आपणही आता या घरात 'अडगळ' आहोत हे त्या वृद्धेला जाणवले, अशी ही फार कौशल्यानं भावदर्शन केलेली कथा, तू अवश्य वाचून पाहा. पु. भा. भावे यांची 'एका झाडाचा मृत्यू' ही कथाही याच प्रकारची. तेथ एका झाडाचा एका गृहस्थाशी इतका घनिष्ठ संबंध आलेला की ते झाड तोडले गेले, तेव्हा स्वतःचेच अवयव तुटल्यासारखे त्याला वाटले आहे. असे मनोभाव 'जडावर' जडलेले असतात हे तुला कदाचित विश्वासार्ह वाटणार नाही म्हणून एक लहानशी गोष्ट नमूद करते. शांताबाई शेळक्यांच्या कविता वाचतेस ना तू? त्यात एका कडुलिंबाच्या झाडाचा वारंवार उल्लेख येतो, हे लक्षात आले आहे का तुझ्या? 'लिंब' या कवितेत एके ठिकाणी तर त्या स्पष्टच म्हणतात...'

'स्नेहभाव आम्हातील नाही कोणा कळायाचे।
ज्ञात आहे आम्हालाच, मुग्ध नाते हे आमुचे.'

मला वाटतं याबद्दल आता आणखी काही जास्त लिहिण्याची जरूर नाही.

कथेच्या अंतःसौंदर्यातील प्रसाधनांपैकी भावदर्शन हे कसे असते. ते लेखकाच्या मनात प्रवेश करते कोठून? याची चिंता करायचे कारण नाही. लेखकाचे शोधक मन, पूर्वी मी म्हटल्याप्रमाणे समाजातून त्याची नोंद करीत असतेच– अगदी स्वतःलाही नकळत. तूच बघ. भावभावनाचे खेळ, जे आपण नित्य या जगात पाहतो त्यायोगे घडणारे लहानमोठे प्रसंगही आपल्या लक्षात येतातच. या प्रसंगातला एखादा भावतरंग अगदी वाऱ्याच्या सुगंधी

झुळकेसारखा आपल्या मनात नकळत शिरतो, नांगरलेल्या जमिनीत पाखरांनी पंखावरून बीज आणून टाकावे तसा मनोमनी रुजतो, योग्य समय येताच ह्या भावबीजाला अंकुर फुटतो व एक भावदर्शी कथा साकारू लागते. तू आमची ती खाष्ट घरमालकीण पाहिली होतीस ना मागे ? ज्याच्या त्याच्याशी कठोर व ओरडून बोलायची. कपाळाला आठी व रागीट दिठी हा तिचा स्थायीभावच होता असे मला वाटत होते. आणि काय नवल सांगू ? एक दिवस तिच्या माजघरातून अगदी मृदू शब्द, गोड हास्य ऐकू आले, डोकावून पाहिले तर एका चार वर्षाच्या चिमणीशी ती अगदी तल्लीन होऊन, अतिशय मधुर स्वरात बोलत होती. स्वतःचे मूल या बाईला नव्हते, पण तिच्या कठोर पहाडी स्वभावात कुठेतरी वात्सल्याचा सुंदर निर्झर खळाळत होता ! हे दृश्य माझ्या मनात शिरून बसले आहे. तसेच प्रभावी आहे ते ! आणि यासारख्याच दुसऱ्याही अनंत भावना मानवी जीवनाचा भावपट विणतात, त्यातल्या कोठल्याही भावनेचे शब्दरूप पण प्रभावी असे भावदर्शन कथेत लेखक घडवू शकतो, व हे क्षेत्र कधीच लेखनाला उणे पडणारे नाही ! व्यक्ती तितक्या प्रकृती अशी म्हण आहे ना ? तीत थोडासा फरक करून ' व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती ' असेही म्हणता येईल !! चांगले कथाकार यातल्याच एकाद्या व्यक्तीची (बहुधा नायक-नायिकेची) एखादीच भावना प्रकर्षाने रंगवतात, अशी की, वाचकाच्या काळजाला रेघ पडावी ! मग अशी कथा या विशिष्ट स्वभावदर्शनामुळे भारी उठून दिसते ! या बाबतीत प्रा. फडक्यांनी म्हटले आहे त्याची मी तुला परत एकवार आठवण करून देते. ते म्हणतात–

' लघुकथेत वाचकांच्या मनावर एकच एक संस्कार उत्कृष्ठ तऱ्हेने करणे हे लेखकाचे ध्येय हवे. '

बरोबर. एकच एक संस्कार, किंवा एकच एक भाव, सूर्यफुलाच्या प्रत्येक रोपांतून एकच ठळक फूल मान उंचावून उभे असावे, तसा त्या कथेतून एकच एक भाव प्रकट करता आला तर ती कथा केव्हाही अधिक प्रभावी होते.

आणखी एक. अशा अभ्यासात स्वनिर्मिती हे जसे एक महत्त्वाचे कलम, तसेच इतरांनी हे व्यक्तिचित्रण कथेतून कसे साकार केले हे वारंवार अभ्यासून पाहाणे हेही दुसरे महत्त्वाचे कलम असते. व्यक्तीच्या स्वभावाची एखादीच झलक, पण ती किती परिणामकारकतेने दाखवता येते याचे ते प्रात्यक्षिकच म्हणेनास ? याचे एक उत्कृष्ट उदाहरण पाहायचे असेल, तर मागल्या एका किर्लोस्कर दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेली व पु. काळे यांची 'सहन' ही कथा वाच. एका तरुणाची, विलक्षण स्वच्छता व टापटीपीची आवड असलेला स्वभाव व त्याचबाबतीत पत्नीकडून त्याला हरघडी जीवनात पत्करावा लागलेला पराभव, याचे हे एक अति-कुशल चित्रण आहे बघ.

खरंच, अलके, हा कथानायक 'सातवळेकर' साकार करताना काळघांनी प्रथम परिच्छेदापासूनच किती काळजी घेतली आहे म्हणून सांगू ? बारीक तलम रेषांनी चित्रकाराने चित्राला उठाव द्यावा, तशा अगदी छोटयाछोटया बाबींचे रंग काळघांनी या स्वभावलेखनात भरून ते जणू सजीवच केले आहे...हा कथानायक ऑफिसांत नव्याने येतो. येताच तेथल्या बंद खिडक्या उघडतो, मग आपल्या टेबलावर स्वतः आणलेले एक स्वच्छ टेबलक्लॉथ घालतो व पूर्वीचे टेबलाच्या खणांतले रद्दी कागदाचे बोळे काढून टाकू लागतो...

पाहिलंस ? सुरुवातीपासूनच या व्यक्तिचा विशिष्ट स्वभाव कथेत व्यक्त व्हायला लागला की नाही ? पुढे याची नवविवाहिता पत्नी पातळ चापून चोपून नेसत नाही, वा तिच्या कमरेला काळा कच पडलेला दिसतो, ते सर्व याच्या दृष्टीला खुपते. वाढता वाढता ती पदार्थ सांडते– मग याच्या भुवया चढतात ! त्याच्या 'सर्व काही अत्यंतिक स्वच्छ व नितळ, औचित्यपूर्ण असावे' या स्वभावविशेषाला ठायीठायी जखमा होतात, व अखर तो हे सारे 'सहन' करायला शिकतो. अशी ही कथा. विजय तेंडूलकरांचाही एक बरीच जुनी कथा 'मित्रा' नावाची होती, ती मला या संदर्भात आठवते आहे. त्यातल्या नायिकेचा स्वभाव अगदी वैशिष्टपूर्ण होता. या मुलीत स्त्रीत्त्वापेक्षा पुरुषीपणाच्याच भावना जास्त होत्या व त्या प्रबल होत्या आजकाल या अशा लोकविलक्षण विषयांना लैंगिक कथेचे रूप देऊन बाष्कळ

झुळकेसारखा आपल्या मनात नकळत शिरतो, नांगरलेल्या जमिनीत पाखरांनी पंखावरून बीज आणून टाकावे तसा मनोमनी रुजतो, योग्य समय येताच ह्या भाववीजाला अंकुर फुटतो व एक भावदर्शी कथा साकारू लागते. तू आमची ती खाष्ट घरमालकीण पाहिली होतीस ना मागे ? ज्याच्या त्याच्याशी कठोर व ओरडून बोलायची. कपाळाला आठी व रागीट दिठी हा तिचा स्थायीभावच होता असे मला वाटत होते. आणि काय नवल सांगू ? एक दिवस तिच्या माजघरातून अगदी मृदू शब्द, गोड हास्य ऐकू आले, डोकावून पाहिले तर एका चार वर्षाच्या चिमणीशी ती अगदी तल्लीन होऊन, अतिशय मधुर स्वरात बोलत होती. स्वतःचे मूल या बाईला नव्हते, पण तिच्या कठोर पहाडी स्वभावात कुठेतरी वात्सल्याचा सुंदर निर्झर खळाळत होता ! हे दृश्य माझ्या मनात शिरून बसले आहे. तसेच प्रभावी आहे ते ! आणि यासारख्याच दुसऱ्याही अनंत भावना मानवी जीवनाचा भावपट विणतात, त्यातल्या कोठल्याही भावनेचे शब्दरूप पण प्रभावी असे भावदर्शन कथेत लेखक घडवू शकतो, व हे क्षेत्र कधीच लेखनाला उणे पडणारे नाही ! व्यक्ती तितक्या प्रकृती अशी म्हण आहे ना ? तीत थोडासा फरक करून ' व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती ' असेही म्हणता येईल !! चांगले कथाकार यातल्याच एकाद्या व्यक्तीची (बहुधा नायक-नायिकेची) एखादीच भावना प्रकर्षाने रंगवतात, अशी की, वाचकाच्या काळजाला रेघ पडावी ! मग अशी कथा या विशिष्ट स्वभावदर्शनामुळे भारी उठून दिसते ! या बाबतीत प्रा. फडक्यांनी म्हटले आहे त्याची मी तुला परत एकवार आठवण करून देते. ते म्हणतात–

' लघुकथेत वाचकांच्या मनावर एकच एक संस्कार उत्कृष्ठ तऱ्हेने करणे हे लेखकाचे ध्येय हवे. '

बरोबर. एकच एक संस्कार, किंवा एकच एक भाव, सूर्यफुलाच्या प्रत्येक रोपांतून एकच ठळक फूल मान उंचावून उभे असावे, तसा त्या कथेतून एकच एक भाव प्रकट करता आला तर ती कथा केव्हाही अधिक प्रभावी होते.

आणखी एक. अशा अभ्यासात स्वनिर्मिती हे जसे एक महत्त्वाचे कलम, तसेच इतरांनी हे व्यक्तिचित्रण कथेतून कसे साकार केले हे वारंवार अभ्यासून पाहाणे हेही दुसरे महत्त्वाचे कलम असते. व्यक्तीच्या स्वभावाची एखादीच झलक, पण ती किती परिणामकारकतेने दाखवता येते याचे ते प्रात्यक्षिकच म्हणनास ? याचे एक उत्कृष्ट उदाहरण पाहायचे असेल, तर मागल्या एका किर्लोस्कर दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेली व पु. काळे यांची ' सहन ' ही कथा वाच. एका तरुणाची, विलक्षण स्वच्छता व टापटीपीची आवड असलेला स्वभाव व त्याचबाबतीत पत्नीकडून त्याला हरघडी जीवनात पत्करावा लागलेला पराभव, याचे हे एक अति-कुशल चित्रण आहे बघ.

खरंच, अलके, हा कथानायक ' सातवळेकर ' साकार करताना काळ्यांनी प्रथम परिच्छेदापासूनच किती काळजी घेतली आहे म्हणून सांगू ? बारीक तलम रेषांनी चित्रकाराने चित्राला उठाव द्यावा, तशा अगदी छोट्याछोट्या बाबींचे रंग काळ्यांनी या स्वभावलेखनात भरून ते जणू सजीवच केले आहे...हा कथानायक ऑफिसांत नव्याने येतो. येताच तेथल्या बंद खिडक्या उघडतो, मग आपल्या टेबलावर स्वतः आणलेले एक स्वच्छ टेबलक्लॉथ घालतो व पूर्वीचे टेबलाच्या खणांतले रद्दी कागदाचे बोळे काढून टाकू लागतो...

पाहिलंस ? सुरुवातीपासूनच या व्यक्तिचा विशिष्ट स्वभाव कथेत व्यक्त व्हायला लागला की नाही ? पुढे याची नवविवाहिता पत्नी पातळ चापून चोपून नेसत नाही, वा तिच्या कमरेला काळा कच पडलेला दिसतो, ते सर्व याच्या दृष्टीला खुपते. वाढता वाढता ती पदार्थ सांडते– मग याच्या भुवया चढतात ! त्याच्या ' सर्व काही अत्यंतिक स्वच्छ व नितळ, औचित्यपूर्ण असावे ' या स्वभावविशेषाला ठायीठायी जखमा होतात, व अखर तो हे सारे ' सहन ' करायला शिकतो. अशी ही कथा. विजय तेंडूलकरांचाही एक बरीच जुनी कथा ' मित्रा ' नावाची होती, ती मला या संदर्भात आठवते आहे. त्यातल्या नायिकेचा स्वभाव अगदी वैशिष्टपूर्ण होता. या मुलीत स्त्रीत्वापेक्षा पुरुषीपणाच्याच भावना जास्त होत्या व त्या प्रबल होत्या आजकाल या अशा लोकविलक्षण विषयांना लैंगिक कथेचे रूप देऊन बाष्कळ

वा चावट वाटणाऱ्या कथाही पुष्कळ लिहिल्या जातात. पण ही 'मित्रा' त्या दृष्टीने लिहिली गेली नाही. उलट त्या विलक्षण मुलीचे हे स्वभावव्यंग अतिशय सहानुभूतीने तिच्या मैत्रिणीच्या हकीगतीतून व्यक्त झाले आहे म्हणून या कथेला जास्त मार्क. स्वभावविकृतींवर वा वैचित्र्यावर आधारलेल्या अशा काही कथा वसुंधरा पटवर्धन यांनीही लिहिल्या आहेत, त्याही. वाचकांच्या लक्षात राहण्यासारख्या सुरेख व ठसठशीत आहेत, 'बाबी' ही त्यांची कथा या दृष्टीने तू अवश्य वाच.

असे हे कथेतले भावदर्शन निरनिराळ्या दृष्टिकोनांनी अनेक लेखकांनी ही व्यक्त केले आहे. त्यांचीही तुला ओळख करून घ्यायला हवी. उदा. अरविंद गोखल्यांनीही वेश्याजीवनावर काही कथा लिहिल्या आहेत, त्या एकदा तू चाळून बघ. येथे कामुक वर्णने हा कथेचा उत्कट वर्णनबिंदूच नव्हे! उलट या वर्गातल्या स्त्रीचे नित्याचे दैनंदिन जीवन, किती दयनीय असते व त्यांत गुरफटलेली त्यांची सुखदुःखे किती तीव्र असतात हेच दर्शवण्याचा त्यांचा अभिप्राय दिसतो.

तसेच आजकालच्या मध्यमवर्गीय कुटुंबजीवनात अनेक तऱ्हेची वादळे येताहेत, ते लहानमोठे मानसिक भावनेचे संघर्ष समतोलपणे रंगवणे हे श्री. ज. जोशींच्या कथांतले उद्दिष्ट मला तर कितीदांतरी जाणवून येते...

पण असे मी किती सांगणार ? मी कितीही उदाहरणे दिली तरी अखेर भावसुंदर कथाशिल्प घडवणार आहेस ती, तुझी तूच– एकटीच ! शिल्पाला लागणारी सामुग्री, किंवा मूर्तिकलेची तत्त्वे, बांधा, प्रमाणशीरता, इत्यादी गोष्टींबाबत त्यांतले गुरुजन बरेच सांगू शकतील पण दगडी मूर्तीची चर्या व आकृती मनोहर बनायला स्वतः शिल्पकाराचीच बोटे झिजावी लागतात व घडाईची मेहनतही त्यालाच पडते हे तर खरे? तेव्हा कथानिर्माणाच्या वाटेवरच्या या साऱ्या पाऊलखुणा मी सांगते आहे खरी, पण ही वाटचाल, अखेर प्रत्यक्ष तुझी तुलाच करायला हवी ! तर तू धीराने या प्रगतिपथावर चालत राहा, मग एक दिवस तू कथेचे यशोमंदिर अवश्य गाठशीलच गाठशील ह्यात कसला संदेह ? उत्तर जरूर येऊ दे ! बाय् बाय्

तुझी–
सौ. ताई.

□ □

विभाग तीन : कादंबरी

१३ कादंबरीचे क्षेत्र

प्रियतम अलका,

या पत्राला उशीरच झाला आहे, कारण आज ललित लेखनातल्या एका अतिव्यापक व अत्यंत अवघड प्रकाराची ओळख या पत्रातून तुला करून द्यायची आहे. असा लिहायला अवघड, तरीही वाचकांना सर्वाधिक प्रिय, लेखनप्रकार कोणता, तू ओळखलंच असशील ? कादंबरी, हाच तो महत्त्वपूर्ण वाङ्मयप्रकार !

कादंबरी कशी लिहावी लागते याबद्दल माझ्या अल्पमतीने मी तुला थोडेबहुत अनुभवाचे बोल ऐकवू शकेन, पण ते नंतर ! त्याआधी आज प्रारंभीच्या संबंधित अशा दुसऱ्याच काही बाबींबद्दल लिहावे असे म्हणते.

अलके, मागे मी पुण्यास आले होते ना, त्यावेळी तुझी 'स्टडी-रूम' मी पाहिली. ती अभ्यासखोली होती की रंजक कादंबऱ्यांचं एक चिमुकलं ग्रंथालयच होतं, असा संभ्रम व्हावा, इतक्या कादंबऱ्या तेथे होत्या ! त्याही सगळ्या प्रकारच्या जुन्या, नव्या, अद्‌भुतरम्य, ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक अन् रहस्यकथासुद्धा ! जणु विविध कादंबरीप्रकारांचे ते एक छोटेसे संमेलनच होते.


फारच छान अलका, कादंबरीचे प्रकार कोणकोणते, व मुळात ते कोणी कोणी अभ्यसले; ते विकसित कसे झाले व कोणी केले, ह्याच विषयापासून

आपण आपल्या कादंबरीमय पत्रावलीला सुरुवात करू या.

तू म्हणशील, कादंबरीची एवढी पूर्वपीठिका कशाला हवी ? आजची कादंबरी कशी लिहावी ? ते बोल आधी ! एकदम मान्य. पण अलके, तूच बघ, ज्या क्षेत्रात आपल्याला उत्तम कार्य करायचं आहे, त्या क्षेत्राचा प्रथम पूर्ण परिचय नको का स्वतःला ? सेनापती लढाईपूर्वी संभाव्य रणक्षेत्राचा पूर्ण नकाशा अभ्यासतो, गायक रागदारीच्या परंपरेचा अभ्यास केल्याविना मैफलीत गात नाही ! तसेच हे. तुला कादंबरी लिहायची आहे, तेव्हा तिचे क्षेत्र पूर्णपणाने माहीत असले पाहिजेच. तिची पूर्वपरंपराही जाणिवेत असायला हवीच.

आज जी तू मराठी कादंबरीची रूपे वा प्रकार पाहतेस, ते सगळे सुमारे शंभर वर्षांपूर्वीपासूनच सुरू झाले आहेत. दर पिढीला वेशभूषेची फॅशन बदलते ना ? तसे हे जुनेच प्रकार नवा मुखवटा घालून नव्या नव्या नावांनी आज रसिकांसमोर येतातसे दिसते. ही स्थित्यंतरे कसकशी झाली हे आपण थोडेसे बघू.

कै. वासुदेव गोविंद आपटे, आनंद मासिकाचे आद्य संपादक, ह अशा प्रकारे लेखनकलेसंबंधी विवेचनात्मक लिहिणारे पहिले लेखक. त्यांनी 'लेखनकला' नावाच्या पुस्तकात (सुमारे ५० वर्षांपूर्वी) कादंबरीचे एक वर्गीकरण मांडले होते, त्यात त्यांनी कादंबरीचे प्रमुख प्रकार दर्शविले ते असे होते–



हे वर्गीकरण थोडेसे अधिक व्याप्तीचे असले तरी चांगले आहे व त्यावरून अर्धशतकापूर्वीच्या कादंबरीतले प्रचलित प्रकार ध्यानी येतात. आपण क्रमाने त्या प्रकारांचे तत्कालीन रूप व त्यांचे आज घडीचे बदललेले स्वरूप अशा तुलनात्मक पद्धतीने परामर्ष घेऊ या, कसे ? त्यामुळे हे वर्गीकरण तुझ्या मनात बऱ्याप्रकारे ठसेल असे वाटते.

यातल्या दोन-तीन वेगळ्या प्रकारांचा मी प्रथमच उलगडा करून टाकते. हे 'भविष्य कथनात्मक' प्रकरण काय ? मला आठवते, लहानपणी मी एक 'आजपासून ५० वर्षांनी' नावाची कादंबरी वाचली होती (ती इंग्रजी-वरून रूपांतरित झालेली होती.) तसेच, नुकत्याच काही दीर्घकथा माझ्या वाचनात आल्या, त्यातही यानंतर दोन-चारशे वर्षांनी आपली राहणी कशी संपूर्ण यांत्रिक वा अतिशयच वेगळी असेल या कल्पना मांडल्या होत्या. या संदर्भात एक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण हिंदी पुस्तक मला आठवते. ते राहूल सांकृत्यायन याचे 'बाविसावे शतक' हे आहे. त्याचे, मला वाटते, मराठी-करणही झाले आहे. त्यात कल्पना अशी होती, आजच्या शतकातल्या एका माणसाला कशाने तरी दीर्घ निद्रा लागली व तो एका संग्रहालयात सुरक्षित काचेच्या पेटीत ठेवला गेला होता, तेथे बरोबर शंभर वर्षांनी जागा झाला ! मग त्याला हे जग कसे दिसले, वगैरेंचे वर्णन त्या पुस्तकांत फार सुरेख आहे. लेखकाच्या द्रष्टेपणाची अशा तऱ्हेच्या पुस्तकात जणू कसोटीच लागत असते, परंतु या प्रकारच्या कादंबऱ्या अगदी थोडयाशाच. या बाबतीत आणखी एका इंग्लिश लेखकाचे नाव नजरेसमोर येते, ते जूल व्हर्न याचे.

अलका, अग, गंमत अशी की, याने खूप अद्‌भुतरम्य पुस्तके लिहिली, पण त्यातली चंद्रलोकच्या सफरीबद्दलची एक काल्पनिक कादंबरी या दृष्टीने अगदी 'ए वन्' ठरणारी निघाली ! पुस्तक मूळ लिहिले गेले ते पाऊणशे वर्षापूर्वी ! पण त्यात त्याने कल्पनेने रंगवलेली कित्येक अनुमाने, अगदी सत्यरूपात आज अनुभवास येत आहेत ! कारण आज चंद्रलोकची सफर प्रत्यक्ष सत्यसृष्टीत आलेली आहे व त्या अनुमानाचा पडताळा घेता येत आहे. भा. रा. भागवतांनी या पुस्तकाचे 'चंद्रलोकची सफर' नावाने मराठीकरणही केलेले आहे, तेही जमल्यास वाचून बघ तू. अलका, जूल व्हर्न-इतके अचूक भविष्यवादी कादंबरीलेखन फारच थोड्यांना जमते आणि म्हणूनच की काय, या प्रकाराचे विकसन कादंबरी क्षेत्रात अल्प आहे, पण, हा वेगळा कादंबरीप्रकार म्हणून तू ध्यानात ठेव एवढेच म्हणते.

आपल्या वर्गीकरणांत आत्मचरित्रपर कादंबरी हा एक वेगळा प्रकार कै. आपट्यांनी कल्पिला आहे. त्यावेळेला 'पण लक्षात कोण घेतो, ठगाची जबानी, मी, वाईकर भटजी, ही चांगल्यापैकी रंजक पुस्तके आत्मचरित्रपर तऱ्हेने लिहिली गेली होतीच व ती वाचकांची आवडतीही झालेली होती.

पण आज तू बघतेसच की पात्रमुखी कादंबरीतच ह्यांचा समावेश केला गेलेला आहे व ही पात्रमुखी पद्धत आज फक्त सामाजिक कादंबरीपुरती मर्यादित राहिलेली नाही तर ऐतिहासिक, पौराणिक कादंबरीतही आली आहे. उदा. मृत्युंजय, ययाति वगैरे कादंबऱ्या त्यामुळे किती वेधक झाल्या आहेत, जाणतेसच तू ?

पण माझ्या मनात जो विचार येतो तो थोडासा निराळा आहे. आत्मचरित्रात्मक न म्हणता केवळ चरित्रात्मक कादंबरी म्हणून जर या प्रकाराकडे आज लक्ष पुरवले, तर मात्र यात आपल्या मराठी कादंबरीचा अलीकडे खूपच विकास झाल्यासारखं तुला दिसेल. उदा. दुर्दम्य ही गाडगीळांची लो.टिळकाच्या जीवनावरील कादंबरी घे,अगर डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनचरित्रावर आधारित 'आनंदी–गोपाळ' ही श्री. ज. जोशांची कादंबरी पाहा. कर्तृत्वशाली व्यक्तींची चरित्रे, विशेष अगत्याने वाचणारा वाचक वर्ग मर्यादित संख्येचा असतो, पण त्यांच्या चरित्रावरच्या कादंबऱ्या मात्र निश्चित कितीतरी जास्त प्रमाणात वाचल्या जातात !! म्हणूनच कदाचित कादंबरी लेखकानी हा नवा प्रकार अवलंबिला, असेही म्हणता येईल. चरित्रात्मक कादंबरी आज पौराणिक, ऐतिहासिक, राजकीय व सामाजिक अशा चतुर्विध क्षेत्रात आपला जम उत्तम प्रकारे बसवीत आहे हे अनुक्रमे, ययाति, राधेय, श्रीमान योगी, स्वामी, दुर्दम्य, आनंदी गोपाळ इत्यादी उदाहरणावरून तुझ्या सहज ध्यानात यावे. हा प्रकारही सोपा नाही, अलके! आनंदी–गोपाळ जसे यथातथ्य व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने प्रभावी व स्मरणीय झाले तसे भा. द. खेरांचे शास्त्रीजींवरचे 'अमृतपुत्र' झाले नाही ! 'मृत्युंजय'ची सर , राधेय'ला आली नाही. पण याबद्दलचा ऊहापोह इथे या प्रकरणात करायला नको. कारण एकंदरीतच अशी कादंबरी स्थलकालादि परिस्थितीचा अंदाज घेऊन वा तत्कालीन राहणी, समाजाचे विचार अशाही दृष्टीने अभ्यास करून लिहावी लागते. व ते एक कौशल्याचे व कष्टसाध्य लेखनकसव आहे इतकेच म्हटले की बस्. कादंबरीच्या वरील विभागणीतल्या दुसऱ्या तात्त्विक ऊर्फ तत्त्वचिंतनपर विभागाकडे जरा नजर वळवूया अलका. आज अशा कादंबऱ्या आवडणारा वाचकवर्ग फार अल्पसंख्य असेल; असेना ? पण साठएक वर्षांपूर्वी वा. म. जोशांची 'रानिणी'

कादंबरी अवतीर्ण झाली तेव्हा तिने अनेक रसिकाची मने जिंकली होती हे अगदी खरे! त्या कादंबरीचे नावच मुळी 'रागिणी ऊर्फ काव्यशास्त्रविनोद' असे होते, व यात कादंबरीच्या कथानकाएवढेच किंबहुना त्याहूनही जास्त महत्व तात्त्विक चर्चांनाच दिलेले तुला दिसेल! आगगाडीचे दोन रुळ सारखे समांतर एका दिशेला जात असावे तसे कथानक व त्याच्याशी कायम फटकून दोन हात दूर राहणारी काव्यशास्त्रचर्चा यांचे हे अखंड साहचर्य! पण ही चर्चा अत्यंत वैचारिक भूमिकेवरून केलेली, व रंजक होती हे मान्य केलेच पाहिजे. वा. गो. आपट्यांनी या कादंबरीवरूनच तत्त्वचिंतनपर कादंबऱ्या हा स्वतंत्र प्रकार कल्पिला असावा! त्यावेळी 'माझे रामायण' नावाची आणखीही एक प्रचंड कादंबरी प्रसिद्ध झाली होती त्यातही या अशा चर्चा खूपच! श्री. व्यं. केतकरांच्या तत्कालीन कादंबऱ्यातूनही आंतरप्रांतीय विवाह वगैरेच्या चर्चा आहेतच, पण एवढेच की, त्यातून काव्य वा विनोद गळून गेलेला असून राहिलीय ती रूक्ष, सौंदर्यहीन तात्त्विक चर्चाच.

पण आज कादंबरीचा हा स्वतंत्र प्रकार मुळीच मानला जात नाही! सामाजिक, पौराणिक, ऐतिहासिक, राजकीय अशा कोठल्यातरी एका कादंबरी घराण्यातच तो सामावून गेलेला आहे जसा काही! या प्रकाराबाबत प्रा. फडक्यांचे मत उलटच आहे. ते म्हणतात.

> 'तुमच्या मनाला घटकाभर अनुपम आल्हाद देण्यासाठी
> गोष्ट सागायची, त्याभोवती तत्त्वसिद्धीची कटकट कशाला?'


तर दुसरे, एक कादंबरीशास्त्रज्ञ मा. का. देशपांडे आपल्या 'साहित्यसाधना' ग्रंथांत अगदी उलट मत देतात—

> 'लेखकाची तात्त्विक भूमिका कादंबरीतील पात्रांच्या द्वारे प्रकट झाली पाहिजे. आपले जीवनविषयक तत्वज्ञान लेखकाने स्पष्ट जाणीव ठेवून कथांतून ओतले पाहिजे असे नव्हे,तर, कथेत जे स्त्री-पुरुष वावरतात, त्यांचे चित्रण ज्या तऱ्हेने लेखक करतो, त्यांतूनही त्याचा स्वतःचा जीवनविषयक दृष्टिकोन स्पष्ट व्हावा.'

ही तात्त्विक भूमिका 'जीवनविषयक' दृष्टिकोनाशीच संबंधित असली तर अधिकच महत्त्वाची ठरते, हे खरेच, पण वर वर्णित केलेल्या सगळ्याच कादंबऱ्यांतून असा प्रकार नाही. शिवाय या तात्त्विकतेची एकच बाजू

म्हणजे त्या लेखकाला जी प्रिय असते, तीच फक्त– रंगवली जाते, पण त्याला दुसरी विरोधी मतप्रणालीही काही असतेच. तीही कादंबरीत मांडण्यात आली, तरच या 'विशिष्ट हेतुमूलक' कादंबऱ्यांचे सर्वांगीण परिशीलन करणे सोपे होईलसे वाटते. उदा. श्री. ज. जोशांचे 'चार्वाक' नावाचे एक पुस्तक मी नुकतेच वाचले. महात्मा गांधींच्या सर्व तत्त्वांची व ध्येयाची आजन्म जोपासना करणाऱ्या एका गृहस्थाचा भग्न संसार, उपेक्षित भावजीवन व त्यामुळेच, राखेतून फुललेल्या निखाऱ्याप्रमाणे मान वर करून पाहणारे या गृहस्थाच्या सुनेने अंगिकारलेले चार्वाकाचे तत्वज्ञान, यांचा एक प्रभावी चित्रपट यात पाहायला मिळेल ! तर सांगायचे असे की विशिष्ट तत्वप्रणालीचा उद्घोष करणाऱ्या कादंबऱ्या काळाच्या कसोटीवरच खऱ्या पारखल्या जातात. पण उगीच मी इतक्या मोठ्या गहन वादात पडणे बरे नाही ! तू थोडीच तात्त्विक कादंबरी लिहिणार आहेस ? तेव्हा इथेच थांबणे बरे.

यानंतर पाचच वर्षांनी मराठी कादंबरीच्या वर्गीकरणाचा दुसरा एक नाव घेण्यासारखा आलेख श्री. वि. सी. सरवटे यांनी आपल्या 'मराठी साहित्य समालोचन' या ग्रंथात केला आहे, तो पाहूया. आपटयांच्या कादंबरीवर्गीकरणाचे जे विभाग मी वर वर्णित केले, ते वगळता, बाकीच्या प्रकाराचे यात नवे नामकरण झाले आहेसे दिसते. सरवटयांचे वर्गीकरण असे आहे–



हे वर्गीकरण जरा निराळे आह. पण 'विशिष्ट हेतुमूलक' असा आपटयांनी जो स्थूल स्वरूपाचा भाग कल्पिला आहे, त्यापेक्षा कादंबरीचे तीन 'सरळ हेतू' सरवटयांनी दाखवले आहेत ते अधिक समुचित वाटतात, (हे 'हेतू

प्रकरण ' महत्त्वाचेच, त्यावर मी परत केव्हा तरी सविस्तर लिहीणार आहेच म्हणा.)

वा. गो. आपटचांनी नमूद केलेला आणखी एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे अद्‌भुतरम्य कादंबरीचा. अर्थात सरवटचांनी तो वेगळा विभाग गृहीत धरलेला नाही. 'काल्पनिक कादंबरी 'असा जो त्यांनी आपल्या वर्गीकरणात उल्लेख केला आहे, त्यातच या अद्‌भुतरम्य कादंबऱ्या अंतभूत करता येण्याजोग्या आहेत हे खरे, पण त्यात दुसरीही केवळ काल्पनिक अशी कथानके येऊ शकतील. अर्थातच, त्यात अद्‌भुताला इतर सर्व प्रकारात बरोबरीने मानाची खुर्ची मिळेलसे नाही, पण तरी, हा प्रकार महत्त्वाचा मानायलाच हवा. कारण मराठी कादंबरीला मुळात सुमारे १२५ वर्षांपूर्वी जी सुरुवात झाली तीच मुळी अद्‌भुतरम्यतेचा परिवेष धारण करून वाचकासमोर आलेल्या कादंबऱ्यांनीच !! सुरुवातीच्या या वेळच्या मंजुघोषा, विचित्रपुरी, रत्नप्रभा इत्यादी कादंबऱ्या आज दुर्मिळ आहेत, पण त्या मी संदर्भग्रंथालयातून आणून वाचल्या होत्या. त्यांचा उल्लेखनीय विशेष म्हणजे, त्या चमत्कारपूर्ण व अघटित घटनांनी अगदी परिपूर्ण असायच्या हाच ! याचे कारण असे, की हा मराठी कादंबरीचा जन्मकालच होता. तोपर्यंतचे गद्य वाङमय म्हणजे पुराणकथा, देवकथा किंवा संतवाङमय आणि लोककथा हेच होते व ते हस्तलिखित पोथ्या वा पुराणे वा हस्तलिखित ग्रंथ यांतून लिहिलेले असे. यांपैकी बरेचसे साहित्य बहुजनसमाजातले खरेखुरे 'वाङमय ' म्हणजे तोंडोतोंडी चालत आलेले, एकाने दुसऱ्याला सांगावे, दुसऱ्याने तिसऱ्याला असे पाठांतराने वाटचाल करीत आलेले, कथावाङमयच होते. त्यातलीच बहुतांश सामुग्री या पहिल्यावहिल्या छापील अद्‌भुतरम्य कादंबरीतून प्रवेशली होती. उदाहरणार्थ लोककथेत पोपट-मैना व इतर पक्षी नेहमीच बोलत असतात. त्यांचाच जणू भाऊबंद असलेला एक बोलका पोपट 'वसंतकोकिला' नावाच्या तत्कालीन कादंबरीत अवतीर्ण झालेला आहे ! इतकेच नव्हे तर कालांतराने त्यालाही मनुष्यदेहही प्राप्त झाला आहे !! थोडक्यात म्हणजे बाणाच्या कादंबरीतलेच काही अद्‌भुत कधानकधागे उचलून हे असे कथानक रचले गेले असावेसे दिसते, पण असेना तसे ? जनमनात कादंबरीची आवड उत्पन्न करण्याचं पहिलं महत्त्वाचं कार्य या अशाच पुस्तकांनी केलेले आहे, हे

ध्यानात घ्यायला हवं.

अर्थात् मराठी कादंबरी इथेच पावले रुतवून उभी राहिली नाही अलका. तिची प्रगती चालू होतीच. या प्राथमिक अवस्थेतून बाहेर पडून हळूहळू तिने नवा आकार घेतला व याही विभागाला एक निश्चित वेगळे, वेधक रूप येऊ लागले. रेनॉल्डस्च्या इंग्रजी गूढ कादंबऱ्यांचीही हलके हलके इकडे रूपांतरे होऊ लागली. या कादंबरीसमूहाचे नावच मुळी 'लंडन येथील बडच्या लोकांची गुप्त कृत्ये' असे होते व कादंबऱ्यांचा विषयही या नावाला अनुषंगिक असाच होता. ह्या कादंबऱ्यांची, कलिकामूर्ती, शापविमोचन, इंद्रभुवनगुहा इत्यादी मराठी रूपांतरे पन्नास वर्षापूर्वीच मी कितीदातरी वाचली आहेत. कारण त्यातले गुंतागुंतीचे मनस्वी कथानक व मानवी स्वभावाच्या अनंत तऱ्हा ह्या मोठ्या वेधक अशाच होत्या. (त्या दहा-अकराच्या वयातही ही गोष्ट मला वरचेवर जाणवली होती अलके !) आता एक मजा बघ हं. अग, बडच्या 'लोकांची दुष्कृत्ये' फक्त लंडनमध्येच घडतात असे थोडेच ? त्यांना संपूर्ण महाराष्ट्रीय रूप दिले गेले तेव्हा ही गुप्त दुष्कृत्ये इकडच्या मध्ययुगीन कालातही कधी कधी घडलेली वा घडणारीच दिसू लागली !

या पुस्तकातून थोडीबहुत ऐतिहासिक पार्श्वभूमी पण असे. रहस्यमय गडकोट, किल्ले, चोरवाटा, भुयारे व श्रीमंत सरदार लोकांची दुष्ट, कुटील कारस्थाने ही सामुग्री बंदुकीच्या नळीत भरलेल्या दारूप्रमाणे यांत ठासून भरलेली असे. मग काय विचारता ? या सामुग्रीच्या कादंबऱ्या तत्कालीन वाचकांना एकदम आवडल्या ! हा प्रकार अद्भुताहून जरा दूर सरकलेला व वास्तवाशी काहीशी अधिक जवळीक करणारा होता म्हणेनास ? या पद्धतीच्या चांगल्या कादंबऱ्या आजही लेखक लिहितात. श्री. शशी भागवत यांची 'मर्मभेद' ही दोन भागातली कादंबरी अशी आहे.

अलके, तुला नवल वाटेल, पण मराठी कादंबरीने या अद्भुतरम्यतेतून पुढे गूढ भूतकथा, अमानुष सृष्टी, मृतात्म्यांनी आजच्या जगात उडवलेला कहर, इकडेही आपला मोर्चा वळवला ! याचे एकच तत्कालीन व ठसठशीत उदाहरण म्हणजे नाथमाधवांच्या 'वीरधवल' या गाजलेल्या कादंबरीचे ! भुताखेतांच्या लीला वर्णन करणाऱ्या या कादंबरीच्याही सात आवृत्त्या

निघाल्या होत्या एवढी एकच गोष्ट या प्रकारची लोकप्रियता सिद्ध करायला पुरेशी आहे. मध्यंतरी काही वर्षे हा प्रकार जणू झोपा काढीत होता ! पण अलीकडे परत या 'भूतरम्य' कादंबरीप्रकाराला जाग आली आहे. या प्रकारचे लेखन करणारे आजचे लोकप्रिय लेखक म्हणजे नारायण धारप, रत्नाकर मतकरी, द. पां. खांबेटे, यशवंत रांजणकर, ग. रा. टिकेकर, इ. आहेत. पूर्वी मी तुला यांच्या कथांबद्दल पुष्कळच लिहिलेले आहे, तेव्हा पुन्हा ते लिहायला नको. यांच्याही अनेक कादंबऱ्या आज लोकप्रिय झाल्या आहेतच. का म्हणून काय विचारतेस ? तूच सांग आधी, ड्राकूला, हंचबॅक ऑफ नोत्रदाम, इ. भुतांचे चित्रपट लोकप्रिय होतात ! का ? त्याचे जे कारण तेच या पुस्तकांच्याही लोकप्रियतेचे कारण ! अद्‌भुताची, गूढाची, अतींद्रिय शक्तीने घडणाऱ्या चमत्कारांची, मरणोत्तर होणाऱ्या जीवात्म्यांच्या स्थित्यंतरादि माहितीची मानवी मनाला एक विचित्र ओढ असते, त्यामुळेच या प्रकारच्या कादंबऱ्या आवडीने वाचल्या जातात. दुसरे काय ?

या कादंबरी विभागात 'काल्पनिक' हा आणखी एक स्वतंत्र कल्पिला गेलेला प्रकार ! अलके, तसं पाहिलं तर साऱ्याच कादंबऱ्यांना 'काल्पनिक' हे सामान्यनाम जोडता येण्याजोगं आहे. कारण कादंबरी ही बोलूनचालून कल्पिताचीच सृष्टी ! पण या वर्गीकरणात एवढ्या स्थूलार्थाने हा विचार दिसत नाही, तर आपण असं समजू की, केवळ काल्पनिक, पण भूत, प्रेत खून, भयंकर घटना इत्यादींपासून दूरदूर असलेल्या कादंबऱ्यांचा एक नवा वर्ग इथे कल्पिलेला आहे. अर्थात ह्या दृष्टीनेही काही नमुने मला तुला सांगता येतील. जूल व्हर्नच्या कादंबऱ्या अशा प्रकारच्या अद्‌भुत व सामाजिकाचे वेगळेच मिश्रण असलेल्या म्हणून अत्यंत रोचक अशाच झालेल्या आहेत. द. इनव्हिजिबल मॅन, पाताळयात्रा या कादंबऱ्या वाचकांना आवडतात त्या केवळ त्यातल्या कल्पकतेचे लोकविलक्षण रूप पाहूनच की नाही ? वि. वा. शिरवाडकरांचे 'कल्पनेच्या तीरावर' हे नावाप्रमाणेच 'कल्पनासुंदर' पुस्तक या दृष्टीने अगदी अप्रतिम आहे. कोठे तुला मिळाल्यास पाहा, अवश्य वाच. यात तर कल्पकतेच्या आडोशाने चालू राजकारण आणि सामाजिक जीवन या दोन्हीतली विसंगती फारच सुरेख दाखवली गेली आहे. अशा अद्‌भुत व नवलपूर्ण अशा काल्पनिकतेचे दर्शन

घडवणाऱ्या कादंबऱ्या फार थोड्या, तेव्हा या क्षेत्रात नव्या लेखकांना पुष्कळच वाव मिळण्याजोगा आहे हे ध्यानी यावे.

'पौराणिक' कादंबरी हा प्रकार आपटयांनी स्वतंत्रपणे नमूद केला नाही, पण सरवटयांनी मात्र त्याला अवश्य स्थान दिले आहे; तेही योग्यच म्हणा, कारण वा. गो. आपटयांच्यावेळी पौराणिक कादंबऱ्या होत्याच कुठे जास्त ? त्या काळी मराठी रंगभूमीचा विकास पौराणिक नाटकांमुळे फार वेगाने व समर्थपणे झालेला होता. स्वयंवर, सौभद्र, शाकुंतल, विद्याहरण, कीचकवध इत्यादि पौराणिक नाटके, रसिकांचे लक्ष वेधून घेत होती आणि त्याचवेळी बिचारी मराठी पौराणिक कादंबरी, उपेक्षितेसारखी कुठे तरी साहित्याच्या कोपऱ्यात दीनवाणी उभी होती अलके ! मला तर या विभागात दोनच जुन्या कादंबऱ्या आठवताहेत वाचलेल्या– एक नारायण हरि आपटयांची 'भाग्यश्री' व दुसरी सानेगुरूजींची 'आस्तिक.' एकंदरीतच पौराणिक कादंबरीची त्या वेळेला वाणच होती म्हणेनास ? पण आता मात्र तिला ऊर्जित काल आल्यासारखे दिसते आहे. कै. वि. स. खांडेकर यांची ययाति, मृणालिनी देसाईंची भगवान् परशुराम, सुमती क्षेत्रमाडे यांची मैथिली, शिवाजी सावंतांची मृत्युंजय, रणजित देसाईंची राधेय इत्यादींनी, हे उपेक्षित दालनही आज समृद्ध झाले आहे. येथे जाताजाता थोडेसे कादंबरीच्या पौराणिकतेबद्दलही सांगावेसे वाटते आहे अलके मला. या कादंबऱ्यांची संख्या अशी एकाच हाताच्या बोटावर मोजण्याइतकी काय म्हणून कमी ? खरे म्हणजे पुराणातून कथानके वा कादंबरीची इतर सामुग्री कमी थोडीच आहे ? मग असे का ?

अलकाताई, मला एक दोन कारणे विचारान्ती दिसताहेत. एकतर, त्या कालखंडाचा, त्या माणसांचा, त्यावेळच्या सामाजिक राहणीचा, नीती-नियमांचा, आणि तत्कालीन देशप्रदेशांचा व भाषेच्या घडाईचासुद्धा पुरा व स्वतंत्र अभ्यास केल्यावाचून अशी कादंबरी लेखकाला लिहिता येणे महा-मुष्कील व दुसरे म्हणजे त्या कालाचं. व्यक्तीचं व कथासूत्राचं वर्णन आज-घडीच्या चोखंदळ वाचकांना पटेल अशा प्रकारे करणे, हे तर, त्याहून अवघड. अगदी लेखकाची लेखन कसोटी बघणारेच असते ते ! तूच बघ जरा, पुराणातले मूळ वर्णित चमत्कार तुम्ही जर या आजच्या 'पौराणिक

कादंबरीत दाखल केले तर ? तर तुमची कादंबरी एकदम अद्‌भुतरम्य ठरेल व तिचे सामाजिक दृष्टीचे महत्त्व शून्यांशावर येईल, खरे ना ? तर मग त्या-वेळचे मूळ कथानकांतले अद्‌भुत चमत्कार, शाप, वर वाटेल त्याच्या पोटी (प्राणी, पक्षी यांच्याही !) मानवोत्पत्ती, इत्यादी गोष्टींची उपपत्ती, व संगती तुम्ही कशी लावणार, ते सांगा पाहू ? अलीकडची एक उत्कृष्ट पौराणिक कादंबरी मृत्युंजय ही उदाहरणादाखल घेऊया हवी तर. यातही द्रौपदीवस्त्रहरणाचे वेळी कृष्णाने अदृश्यरूपाने हजारो वस्त्रे द्रौपदीला नेसवली हा अद्‌भुतदैवी चमत्कार लेखकाला दाखल करावाच लागला आहे ! 'ययाती 'तही राजा ययाति शापाने जख्ख म्हातारा झाल्याचे व परत कचाने त्याला तरुण केल्याचे अत्यंत चमत्कारपूर्ण वृत्त आलेले आहेच, कारण हा एक ययातीच्या जीवनातीलच महत्त्वाचा प्रसंग असल्याने लेखकाला तो चुकवता आलेला नाही !

तर अशा प्रकारच्या कादंबऱ्यांतून हे ' अपरिहार्य ' चमत्कार कसे निभावून नेले आहेत, हे तू मुद्दाम पाहात जा अलके. सांगायचं एवढंच की, पौराणिक कादंबरीचे कथानक अद्‌भुतरम्य असलेच तर तेथे तो चमत्कार वा ती अद्‌भुतता ' अपरिहार्य ' एवढीच थोडक्यात योजून बाकीची कादंबरी सुंदर भावपूर्ण भाषेत लिहिता येते हे या नव्या कादंबऱ्यांनी जरूर सिद्ध केलेले आहे.

आणखी एक. त्या वर्णित व्यक्ती पुराणातल्या असल्या म्हणून काय झालं ? त्याही आजघडीच्या मानवासारख्याच विचार–विकाराधीन व्यक्ती होत्या, हे तर खरे ? त्यांचे मानसिक संघर्षही अगदी मानवीच होते व हेच प्रकर्षाने दाखवल्यामुळे ही त्यातली भाववर्णनेच, चमत्कारांहून अधिक महत्त्वाची वाटतात. हेच खरे ! कथानकाच्या सोईसाठी पुराणकथेतल्या प्रमुख अशा घटना ' तशाच ' ठेवून तपशीलात बदल केला तरीही चालतो. उदा. ययातीचे शापित वृद्धत्व पुराणात बराच काळ टिकले होते, पण ' ययाति ' कादंबरीत, राजा शापाने वृद्ध होतो न होतो, तोवर कचाने त्याला तरुण केले आहे ! तेव्हा ध्यानात ठेवायचं असं की, इतिहासाप्रमाणेच पौराणिक कथेतल्या महत्त्वपूर्ण घटनेत वाटेल तो बदल लेखक करू शकत नाही, हे खरे, व ते ' मूलधन ', आहे तसेच घ्यावे लागते, हेही सत्यच, पण उपकथानकात जरूर

बदल करता येतो व व्यक्तिदर्शन, वातावरणनिर्मिती, भावचित्रण, इत्यादीत तर लेखकाला आपले कौशल्य दाखवायला पूर्ण स्वातंत्र्य आहे ! 'मृत्युंजय' या तिन्ही दृष्टीने किती सरस उतरले आहे, तू वाचून बघ एकदा. हातचं पुस्तक खाली ठेववत नाही.

हिंदीमध्ये पुराणकालीन कादंबऱ्या मला मराठीहून जास्त आढळल्या. पैकी एक उदाहरण तर इथे उद्धृत करण्याइतके सुरेख आहे. ते 'श्री निधी-सिद्धांतालंकार' ह्यांच्या 'पौलस्त्य' नावाच्या कादंबरीचे. पौलस्त्य म्हणजे पुलस्त्य ऋषींचा नातू. म्हणजेच रावण ! रावण नायक ? म्हणून तू नाक मुरडणारच ? कारण आपल्याला जो रावण माहीत आहे तो सीतेला पळवून बंदीत ठेवणारा राक्षस व रामाचा दुष्ट शत्रू म्हणूनच ! पण स्वतःच्या पूर्वजांनी घालवलेले राज्य असामान्य पराक्रमाने जिंकून मिळवणारा, आदि-वासींत वाढलेला ह्या कादंबरीचा नायक– पोरका तरुण रावण ? त्याची आपल्याला नाममात्र ओळखही नाही ! ती या कादंबरीने दिली आहे; त्याच्या व्यक्तिमत्त्वाने मोहित होऊन अतिसुंदर राजकन्या, मंदोदरी हिने आपण होऊन त्याला वरले आहे, हा सर्व वृत्तान्त या 'पौलस्त्या'मध्ये अतिशय वेधक लेखनशैलीत आला आहे. मुख्य म्हणजे तत्कालीन चमत्कारांना आधुनिक व आज सहृदय मनाला पटेल असे रूप देण्यातले लेखकाचे कसब इथे जरूर बघावे ! उदा. दग्ध हिरोशिमाची आठवण देणाराही एक प्रसंग यात आहे. हे विशेषच. आणि अलके, आचार्य चतुरसेन यांची 'वयम् रक्षामः' ही हिंदी कादंबरीही रावणाच्या चरित्रावरच आधारलेली आहे बरं का. एकदा वाच हवी तर ती.

पुराणकथांवर पूर्वीपासूनच कादंबऱ्या कमी असल्या तरी नवलाची गोष्ट अशी की ऐतिहासिक कालावरच्या कादंबऱ्या मात्र वा. गो. आपटच्यांच्याही आधीपासून भरभराटीला आलेल्या आहेत. हा ऊर्जित काळ निर्माण केला हरि नारायण आपटच्यांनीच. त्यांच्या उषःकाल, सूर्योदय, चंद्रगुप्त, कालकूट इत्यादि ऐतिहासिक कादंबऱ्या एकामागोमाग एक प्रसिद्ध होत होत्या, इतकेच नव्हे तर त्या अफाट लोकप्रियताही मिळवीत होत्या त्या काळात ! तसेच दुर्दैवी रंगू, लालन बैरागीण वगैरे ऐतिहासिक कादंबऱ्या त्या काळा-पूर्वीही प्रसिद्ध झालेल्या, त्याही बऱ्यापैकी होत्या.

अलके, तू मनात म्हणत असशील की अशी इतिहास-कथांवरची कादंबरी लिहायला कसली कठीण ? कथानक, त्यातले प्रसंग, व्यक्ती, त्यांचे स्वभाव व परिणाम, सारे काही येथे ठरवलेलेच. सारे काही एकदा घडून गेलेले, सगळे काही तय्यार ! हॉटेलातून उन्हून आयते जेवण मागवून पाहुणचार करावा तसे हे लेखन– 'सोप्पेच !' पण असं खुषीखुषीनं हसण्याजोगं हे प्रकरण सोपं नाही, म्हटलं; फार अभ्यास लागतो याही कादंबऱ्यांना ! पहिली गोष्ट, यातले स्थलनिर्देश ही तर नेमकी पाय घसरायसारखी निसरडी जागा ! तुम्ही ह्यांतली घटित घटनांची स्थळे वर्णन करू पाहाल तर त्या जागी कालांतराने तुम्हाला जमीनअस्मानाचा फरक पडलेला दिसेल– किंवा असे म्हणू की, तेथे फक्त जमीन व अस्मानच काय ते त्या पूर्वीच्या स्थलकाला-पैकी शिल्लक असेल ! पूर्वीच्या इमारतींच्या जागी भग्नावशेष, अगर केवळ रानही माजलेले दिसेल आज अशा ठिकाणी.त्यावर कल्पनेने तुम्हाला 'तत्कालीन' वाटणारा सुंदर इमला बांधायचा आहे. कल्पना कर, हे सोपे आहे का ? वा. गो. आपटचांनी या बाबतीला 'स्थलौचित्य' असे एक संयुक्तिक व चतुर नाव दिले आहे. ऐतिहासिक घटना घडलेली स्थळे शक्य तर लेखकाने एकवार नजरेखालून घालावी व मगच त्याबद्दल लिहावे हे बरे, नाहीतर कादंरीतली एखादी घटना 'नदीकाठी शिवालयात घडली' असे लेखकाने दाखवावे व त्या गावी ते शिवालय तर जाऊद्याच पण नदीही नसायची, अशी विसंगती होण्याची शक्यता फार !!

खरे सांगू , अलके ? ऐतिहासिक कादंबरी लिहिणे सामाजिक कादंबरी लेखनाहून अधिक कठीण आहे. बघ तूच. ही कादंबरी रंजक तर असायलाच हवी, हे एक टोक, तर लेखकाला ऐतिसासिक सत्यांचा कोणताही विपर्यास करताच येत नाही हे दुसरे टोक ही दोन्ही टोके नीट जुळवताना लेखक फार श्रमी होतो आणि म्हणूनच कांही ऐतिहासिक कादंबऱ्या आज कंटाळवाण्या वाटतील अशा झाल्या आहेत, हे कटु सत्य दृष्टीआड करता येत नाही· उदाहरणार्थ वि. वा. हडपांनी संपूर्ण पेशवाईवर अशी कादंबरीमाला लिहिली ती ऐतिहासिक सत्यावर आधारित असूनही लेखनात पुरेशी आकर्षकता वा रंजकता नसल्यानेच लोकप्रिय झाली नाही. उलट नाथमाधवांनी कादंबरीमय शिवाजीचरित्र लिहिले. त्यात रंजकतेसाठी उपकथानकेच इतकी जास्त

योजली गेली की, मूळ महत्त्वाच्या व्यक्तीपेक्षाही गौण व्यक्तिप्रसंगांना वा वस्तूंनाच अधिक महत्त्व प्राप्त झाले. उदाहरणार्थ, एका कादंबरीत पूजेच्या एका बाणाचे इतके वर्णनाधिक्य आले आहे की तेथे कथानायक, राजा शिवाजी की तो बाणच ? असा संदेह पडावा ! असे होता कामा नये. उपकथानक हे ऐतिहासिक कादंबरीत तर अवश्य असावेच लागते. लेखकाला मूळ महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनात बदल करताच येत नाही, पण उपकथानकात त्याला आपले सगळे लेखनकसब दाखवण्यास उत्तम संधी व वाव मिळतो, पण म्हणून उपकथानकाने प्रमुख कथानकालाच बाजूला ढकलून देणे म्हणजे, दासीची मिजास राणीहून जास्त असल्याचे दाखवण्यासारखे अप्रस्तुत, रसहानिकारकच ठरेल ! ही उपकथानके, कथानकाला पूरक स्वरूपाची असूनही किती सुंदरतेने रंगवता येतात याचे उदाहरण म्हणून ह. ना. आपट्यांच्या उषःकालमधली, चंद्रराव मोऱ्यांची सूडानं पेटलेली मुलगी, अगर त्यांच्याच ' गड आला पण सिंह गेला ' या कादंबरीतली देवलदेवी यांच्या हकीगती वाच. ह. ना. आपटे हे लेखक जुन्या काळचे, मान्य. पण त्यांची मते ? ती जुन्या सोन्याप्रमाणे आजही याबाबतीत मोलाची ठरतील. ते म्हणतात–

' हा इतिहास नव्हे. ही कथा आहे. केवळ हे ऐतिहासिक सत्य नव्हे तर सत्याभास आहे ! '

मला वाटतं, या थोडक्याशा शब्दांनी तुला माझा वरील मुद्दा आता जास्त लक्षात ठसला असेल !

होय अलका, ऐतिहासिक कथानक असले, तरीही, अखेर ही एक ललित कथाच आहे, या गोष्टीचा लेखकाला कधी विसर पडता कामा नये आणि कथा म्हटली की व्यक्ती आल्याच. प्रीतीवाचून व्यथा नाही आणि व्यक्तीवाचून कथाही नाही ! आता व्यक्ती म्हटल्या की त्या ऐतिहासिक असोत की, पौराणिक असोत, त्यांचे स्वभावधर्म, भावविभाव, मनोविकार सर्वकाली सारखेच असायचे. काल बदलतो, जमानाही बदलतो,– पण मानवी मनाची घडण बदलत नसते, आणि म्हणूनच या व्यक्तिदर्शनाने, वा त्यांतल्या मनोविश्लेषणाने ऐतिहासिक कादंबरीत अगदी अनुपम, सुंदर रंग भरू शकतात! अगदी अलीकडची उदाहरणे याबाबत बघण्याजोगी आहेत, नुसती बघण्या-

जोगीच नव्हेत तर अभ्यासण्याजोगी आहेत ! उदा. रणजित देसाईंच्या 'स्वामी'ने या कादंबरीतलेही 'स्वामीपद' आज सर्वच दृष्टींनी मिळवलेले; तू वाच ते एकदा परत. त्यातले थोरले माधवराव पेशवे व रमाबाई, हे एक परस्परांवर अतिशयित प्रीती करणारे दांपत्य. पण त्यांची आपसातली प्रेम भाषणे पाहशील तर ती अत्यंत कमी. कोठेही 'माझे तुमच्यावर जिवाविशेष प्रेम आहे' हा उच्चार नाही आढळायचा तुला ! पण नंदादीपाचा सोज्वळ प्रकाश अबोल असला तरी तेजस्वी असतोच, तद्वत हे मूक पण शब्दातीत प्रेम शेवटपर्यंत वाचकाला मुग्ध करीत राहते. स्वभावदर्शनाचे इतके संयमित तरीही आकर्षक रूप निदान ऐतिहासिक कादंबरीत तरी अभावानेच आढळेल. स्वभावदर्शनाची ही बाजू ना. सं. इनामदारांच्या 'झेप' मध्येही त्रिंबकजी डेंगळ्याच्या बाबतीत चांगली यशस्वी झाली आहे. आज ऐतिहासिक कादंबरी लेखनाचे खरे कौशल्य त्या काळच्या व्यक्तीचे स्वभाव दर्शन व एकंदर व्यक्तित्त्व त्या परिस्थितीचा परिसर ध्यानी घेऊनही, आजघडीच्या दृष्टिकोनाने कितपत व कसे संयुक्तिक वा सदोष ठरेल हे दर्शविण्यातच तर आहे !

उदाहरणार्थ संभाजी ऐतिहासिक प्रसिद्ध व्यक्ती घे. आजवर 'धर्मरक्षणार्थ आत्मबलिदान' या गुणापलीकडे संभाजीच्या मानवसदृश गुणदोषात्मक व्यक्तिमत्त्वाकडे जनतेचे लक्ष गेले नव्हते. आज 'जेव्हा रायगडाला जाग येते' या नाटकामध्ये कौटुंबिक प्रेमसमाधानाच्या दृष्टीने जन्मभर उपेक्षित ठरलेला उदात्त संभाजी नजरेसमोर येतो व मग पाठोपाठ नयनतारा देसाई यांच्या अर्घ्य कादंबऱ्यातून हे नवे गुणग्राही जीवनदर्शन विस्ताराने सन्मुख येते, ऐतिहासिक कादंबऱ्यांबाबत हा दृष्टिकोन एकदम नवा आहे व तो प्रकट करण्यास फार समर्थ असा लेखक हवा, हे तुला कबूल करावेच लागेल ! या दृष्टीने इनामदारांच्या 'राऊ' मधले पहिले बाजीराव पेशवे याच्या स्वभावदर्शनाचा नमुना जरूर पाहा तू एकदा सवडीने.

सांगायचं असं की आज ऐतिहासिक कादंबरी तेजीत आहे. तर पाहा एखादी तू लिहिणार असशील, तर ! आताच त्याबद्दल एक छोटंसं पथ्य सांगून मी हे लांबवलेलं इतिहासाचं विवेचन आवरतं घेते. ते पथ्य असं की लेखक ज्या ऐतिहासिक व्यक्तीला नायक अगर नायिका ठरवून कादंबरी

लिहितो, तिला तो आदर्श बनवू पाहतो ! इतिहासात जरी त्या व्यक्तीचे जीवन लोकापवादास पात्र झालेले, अन्यायी वा दुर्गुणाने व्याप्त झालेले वर्णित झाले असले तरीही लेखक ते इतिहाससाक्ष (पण नायकाविरुद्ध असलेले) पुरावे, एक तर विचारात घेत नाही अगर घेतलेच तर त्यांचे समर्थन करण्याकडेच त्याची प्रवृत्ती दिसते ! इनामदारांच्या ' मंत्रावेगळा ' कादंबरीत दुसऱ्या बाजीरावाबद्दल अशी तरफदारी झालेली आहेसे दिसून येते आणि म्हणूनच अलीकडचे एक विचक्षण टीकाकार भालचंद्र फडके याच्या शब्दांतच सांगायचे तर ' वकिलाची भूमिका हीच मुळी कादंबरीकाराला अपायकारक आहे, तसेच इतिहासातले व्यक्तींची भव्य चित्रे रंगवून एक प्रकारे त्यांची पूजा बांधण्याची भक्ताची भूमिकाही बाधकच !' तर असा हा ऐतिहासिक कादंबरीक्षेत्राचा वेधक, पण अवघड प्रपंच.

रूपांतरित व भाषांतरित कादंबरी हाही एक प्रकार, तेव्हापासून आतापर्यंत चालत आलेला. पण येथे परभाषेत सगळी कादंबरीच तयार असते, त्याचे वेगळे असे शास्त्र सांगण्याजोगे नाही. फक्त लेखनाला हाही प्रांत खुला आहे व आवड असल्यास यातही वाव आहे इतकेच म्हणते.

अलकाताई, आतापर्यंत आपण कादंबरी क्षेत्राचे बरेच अवलोकन व परिशीलन केले, आता राहिला एकच विभाग, तो म्हणजे वा. गो. आपटे ज्याला ' वस्तुस्थितीदर्शक ' किंवा सरवटे ज्याला ' सामाजिक ' म्हणतात तोच आणि हा प्रांत लहानसहान थोडाच ? त्यांत ग्रामीण, प्रादेशिक वगैरे पोट विभाग येतात. रंजनपर, कलाविलासपर, ध्येयात्मक, हेतुपर असे वेगवेगळे प्रकारही अंतर्भूत होतात. शिवाय या प्रांतात आजवर कमालीची ग्रंथनिर्मिती पण झालेली आहे, तेव्हा, त्याबद्दल थोडक्यात कसे सांगणार ? मी त्याचे स्वतंत्र प्रकरणच पत्ररूप करीन म्हणते आहे, कशी काय कल्पना ? पुढचे पत्र मी (सामाजिक) कादंबरीचे कथानक याबद्दलच लिहीन बरं का ! अर्थात थोडे सावकाशीने. विषय अवघड व विचेचन अनेक तऱ्हेचे, तेव्हा थोडा अवधी हा लागणारच ! तोपर्यंत बायबाय !

' हं, एक लिहायचं राहिलंच, पत्रं कितपत आवडली ? फार कठीण तर वाटत नाहीत ना हो पत्रं तुला ? तेही मनमोकळेपणानं लिही बरं का–

तुझी–

सौ. ताई

१४. कादंबरीचे कथानक

प्रिय अलका,

मागल्या पत्रांत तुला मी कादंबरी व तिचे प्रकार, यांची अथपासून इतिपर्यंतची नीट ओळख करून दिलीच आहे, आता आपण आजघडी-पर्यंतच्या कादंबरीकडे जरा वळून पाहणार आहोत. यात मी कादंबरी हा जो वाङ्मयातला सर्वांत अवघड लेखन प्रकार आहे याबद्दलचे काही अनुभवाचे विचार तुला सांगावे म्हणते. अर्थात एक कादंबरीलेखन असे आपण चटकन् म्हटले तरी या लेखनाचेही कथानक कसे असावे, वा नसावे, त्याची गुंफण वा रचना कशी करावी, ते व्यक्तिवरच खास करून लिहिलेले असावे की वातावरणालाच व्यक्तिपेक्षा प्राधान्य देऊन लिहिलेले जास्त चांगले ? असे अनेक विषय मनासमोर प्रश्नरूप होऊन उभे राहतात बघ ! खरे म्हणजे कादंबरीकाराला या सर्वच बाबींचा नीट विचार करायला हवा, तो असा थोडक्यात वा सगळा एकाच पत्रात लिहून टाकता येण्याजोगा चिमुकला थोडाच आहे ? तर अलका, या प्रत्येक विषयासाठी मी एकेक स्वतंत्र पत्रच तुला लिहिणार आहे, ते जास्त सोईचे, खरे ना ? तेव्हा आजचे हे पत्र 'कादंबरीचे कथानक' याचबद्दल लिहायला घेते आहे हं.

●

अलका, 'कथानकाबद्दल' लिहिण्यापूर्वीही कादंबरी म्हणजे काय व

तिची व्याख्या काय ? हे पाहायला हवे. 'लेखनशास्त्र' या विषयावर अनेक नामांकित लेखकांनी विस्तृत विवेचनाचे ग्रंथ लिहिलेले आहेतच. पैकी, प्रा. ना. सी. फडके यांनी कादंबरीची अतिशय सुटसुटीत व समर्पक व्याख्या केलेली आहे ती ही :–

> 'अनेक प्रसंगांची चतुराईची गुंफण किंवा मांडणी म्हणजे ललितकथा होय.' (फडके कादंबरीला 'ललितकथा' असे म्हणतात.)

अशीच, पण जरा वेगळ्या शब्दांतली व्याख्या प्रा. मा. का. देशपांडे यांनी केलेली दिसते, ते म्हणतात–

> 'जीवनाचे कलात्मक व विस्तृत गद्य चित्र म्हणजे कादंबरी.'

मुन्शी प्रेमचंद हे हिंदीतले प्रख्यात लेखक, त्यांनी लघुकथा व कादंबरी यांची तुलना करताना एके ठिकाणी व्याख्येप्रमाणेच एक सिद्धांत लिहिलेला आहे– ते म्हणतात–

> 'लघुकथा म्हणजे, जिच्यात एकच एक फुलझाड आकर्षकपणे वाढवलेले असते अशी कुंडी, तर कादंबरी म्हणजे अनेक प्रकारची फुलझाडे व लता-वेली असलेले एक रमणीय उद्यान होय !'

या सर्व व्याख्या आपापल्या परीने सुबोध व चांगल्या आहेत. त्या सर्वांतुनच कादंबरीचे 'स्थूल' अगर विस्तृत स्वरूपाचे क्षेत्र सूचित होत आहे हे तुझ्या लक्षांत आले ना ? अगदी असेच आहे ते. कादंबरी म्हणजे अनेक व्यक्ती व अनेकानेक प्रसंग यांच्या वर्णनांनी गुंफण करून सांगितलेली 'एक मोठी गोष्ट' असते.

अलका, कादंबरी म्हणजे एक मोठी गोष्ट असे वर आपण म्हटले, पण त्याहीबाबत एक महत्त्वाचे सूत्र अँथनी ट्रोलोप नावाच्या एका पाश्चात लेखकाने अगदी थोडक्या पण मार्मिक शब्दांत सांगिले आहे. तो म्हणतो–

> 'लेखक कादंबरी लिहायला घेतो, तो केवळ 'एक गोष्ट सांगावी' म्हणून नव्हेच, तर 'सांगण्यासारखी काही महत्त्वाची गोष्ट' त्याचेजवळ असते म्हणूनच !'

पाहिलेस ना ? कादंबरी ज्या कथानकावर तुम्ही रचणार, ते कथानक,

म्हणजे केवळ एकदा अमुक तमुक झाले बरे का !' अशी साधी गोष्ट नसून इतरांना सांगण्याजोगी वैशिष्ट्यपूर्ण अशीच गोष्ट असलेलं हवे, हे कसे या लेखकाने ठासून सांगितले आहे ते ?

होय अलका, कादंबरी नेहमी गोष्टच सांगते ! अमुक व्यक्तीची तमक्या नावाची, कोठल्या तरी घराची, किंवा विशिष्ट कालखंडाची अगर विशिष्ट राजकारणाची, कुणाच्या तरी कर्तृत्वाची, किंवा तारुण्यसुलभ प्रीतीची, अगर सुखा-दुःखांची– पण एक मोठी कहाणीच ! कथानक, हेच, कादंबरीचा मूलाधार असते, देहाला जसा पाठीचा कणा आधार देतो, त्याप्रमाणेच म्हणेनास? पण आजकालच्या पुष्कळ नवकादंबऱ्यांतील कथानकात हा मजबूत कणाच नसतो, त्या मला तरी अगदी दुबळचा वाटतात. त्या दृष्टीने तूही अलीकडच्या नवकादंबऱ्या वाचून बघ एकदा.

एक मात्र आहे हं यात. कथानकाला पाठीच्या कण्याची उपमा आपण दिली खरी, पण कणा हा हाडांचा असतो आणि त्याला त्वचेप्रमाणे भाव-संवेदना अगर कोमल कठीण स्पर्श जाणण्याची पात्रता असत नाही ! त्या दृष्टीने, कथानकाने कादंबरीला आधार दिला. तरी, तिच्यात भावमाधुर्य व सौंदर्य आणायचे असेल तर तेथे प्रभावी व्यक्तिदर्शन हवे, व्यक्तीच्या उलटसुलट भावनांचे योग्य वर्णन हवे व भाषाशैलीची त्याला उचित, व सुंदर जोडही असली पाहिजे. हे सूत्र विसरायजोगं नव्हे.

हे कथानक सुचते कसे ? व त्याची प्रेरणा लेखकाचे मन कोठून घेते याबद्दल मला वाटतं, मी तुला कथाविभागाच्या 'कथावस्तू' या पत्रात सारे काही मागेच नीट सांगितलेले आहे. लघुकथेचे कथानक ज्या तऱ्हेने समाजदर्शनातून लेखकाच्या मनात साकारते, त्याच पद्धतीने कादंबरीचेही कथानक मनात जन्म घेते. फक्त, हे सुचलेले कथानक कादंबरी करण्याइतके मोठे आहे की, छोटचा लघुकथेपुरतेच आहे याचा लेखकाने प्रथम अंदाज घ्यावा हे बरे ! कादंबरी हा लघुकथेहून केव्हाही अधिक मोठ्या व्याप्तीचा प्रकार असतो, त्याला कथानकही चांगले लांबरुंद लागते, हे न ओळखता लघुकथेच्याच ओढून ताणून मोठ्या केलेल्या काही कादंबऱ्या आजकाल दिसतात, त्याही तुझ्या पाहण्यात असतीलच ? अलके तूच बघ, आपला ब्लाऊजपीस अवघा पाऊण वाराचा. त्यात एखाद्या छोटीचं झबलं आरामाने

शिवता येईल, पण कॉलेजकुमारीचा 'कुर्ता' त्यात कसा होऊ शकेल ? तसेच हेही कलम. अशा कथेचं एक उदाहरण हवं तर बघू या. एका नव्या नवलाईचा संसार मांडलेल्या मनिषा नावाच्या तरुणीची ही गोष्ट. या नायिकेची नणंद पंधरा दिवस या नव्या संसारात राहायला येण्याची तार येते, तेव्हा या मनिषेच्या आत्मनिष्ठ वृत्तीला हे विघ्न नकोसे वाटते व ती एकदम आगगाडीने आपल्या माहेरी, भावाकडे निघून जाते ! पण तेथेही ह्या 'नणंदेचे' विघ्न तिच्या स्वतःच्या भावजयीलाही नकोसे होते ! कारण ते दोघे पति-पत्नी जॉली ट्रीपवर पंधरा दिवस काश्मीरला निघालेले असतात व त्यात हिच्या आगमनाने विक्षेप आल्यासारखे त्यांना वाटलेले दिसते. मग ते ओळखून चतुर मनिषा तावडतोब घरी परत येते, आपल्या नणंदेचे उचित स्वागत करते !'

बस्. कथानक हे एवढेच. कथानक कसले, हा त्याचा एक चिमुकला धागाच म्हणेनास ? हा एका लघुकथेला पुरेल, पण याची मोठी कादंबरी होऊ शकेल का ? तर कादंबरीला कथानक भरघोस व भरपूर व्याप्तीचे लागते ही महत्त्वाची पहिली गोष्ट. मात्र कथानकाचा नकाशा असा विस्तृत क्षेत्राचा असला, की त्यातून एक नवाच दोष उद्‌भवण्याची फार मोठी शक्यता असते, तो म्हणजे, कथानकापासून दूर दूर जाऊन विषयांतर करून कादंबरीत इतर काही आवश्यक मजकूर लिहीण्याचा लेखकाला होणारा मोह हा होय ! एका पाश्चात्य लेखकाचे उद्‌गार यावेळी मला आठवतात, त्याचे नाव, स्टर्न लॉरेन्स. तो आपल्या एका जिवलग मित्राला पत्र लिहीताना म्हणतो– 'मी पुष्कळदा विषयांतर करतो. (ते खूप छान उतरते, तुम्ही जाणताच ?) मी माझ्या पात्रांपासून उडून इकडेतिकडे जातो आणि पुष्कळदा दूरदूरही जातो ! हे खरे, पण मी नेहमी एक काळजी घेतो, ती ही की, माझ्या या गैरहजेरीत माझे मूळ कथन निश्चल वा स्तब्ध राहता कामा नये !'

अर्थात आपल्याकडेही पुष्कळ लेखकांच्या बाबतीत ही 'कथानकाची वाट सोडून इकडेतिकडे भटकण्याची वृत्ती' त्याच्या कादंबऱ्यांतून आढळतेच. पण तेथे 'मूळ कथन मात्र स्तब्ध व निश्चलच' बनून राहिलेले दिसते ! जुन्या मागल्या पिढीच्या लेखकांच्या काही कादंबऱ्यांचा उद्देश त्याकाळी

काही विशिष्ट मतप्रणालीचा प्रचार व प्रसार हाच असे, तेथे तर कथानकाला धाब्यावर बसवून ठेवून ही प्रचाराची गाडी कादंबरीतून खुशाल हिंडत राहायची आपली ! वरेरकरांच्या अनेक सामाजिक कादंबऱ्यांतून तुला याचे प्रत्यंतर दिसेल कुठे मिळाल्यास पहा हवंतर.

कादंबरीच्या कथानकाबाबत, सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती ती सांग बघू ? अगदी चार शब्दात उत्तर. ते 'वाचकांना चित्तवेधक वाटायला हवे !' हा वेधकपणा लेखनशैलीचा तर असतोच– पण कुरूप स्त्रीवर कितीही दागिने घातले तरी तिच्या रूपाचे दारिद्र्य जसे कमी होतच नाही, तसे या कथानकाचेही आहे बरं का ! तुमची कथावस्तूच मूळ आकर्षक, वेधक नसेल तर तुम्ही कितीही समृद्ध, अलंकारिक भाषेची मुलायम वस्त्रे तिजवर चढवली, तरी, तिच्या रूपाचे दारिद्र्य नष्ट होणार नाही ! याउलट कथावस्तूच जर एकदम वाचकाच्या मनाचा वेध घेणारी निवडून घ्याल, तर, साध्या भाषेतूनही तिचे मनोहारित्व आरशावरच्या प्रकाश किरणांसारखे चमकताना दिसेल ! तेव्हा कथावस्तू म्हणजेच कथानकाचा गाभा,– तो एकदम सुंदर व चित्तचोर असावा हा पहिला मुद्दा.

पण गंमत अशी की ही कथावस्तू सुचते तेव्हा प्रथम असते थेट खाणीतल्या सोन्यासारखी ! तिला शुद्ध करावी लागते, उजळा देऊन तिचे हीणपण काढून टाकावे लागते व मग नाजूक घडाईने तिला इच्छित आकार, रंग, रूप यांचा मनोहर साज चढवावा लागतो. तेव्हा, मूळ कथानक जरी चांगले असले, तरी त्यात वेधकपणा येण्यासाठी त्यावर अनेक प्रकारचे संस्करण, लेखकानेच करणे अवश्य आहे. या कथावस्तूला 'वेधक बनवण्याच्या काही खास क्लृप्त्यापण आहेत व त्यांचा उपयोग अनेक जुन्या-नव्या लेखकांनी आजवर केलेलाही आहे, त्यासंबंधी थोडीफार माहिती तुला सांगून ठेवते. पुढे-मागे कदाचित् तुलाही त्यांचा उपयोग आकर्षक कादंबरी लिहिताना होऊ शकेलसे वाटते. या बावतीत ई. एम. फॉर्स्टर नावाच्या लेखकाने एक सिद्धान्त सांगितलेला आहे तो लक्षणीय आहे. तो म्हणतो–

> 'तुमची 'गोष्ट' यशस्वी होईल, पण केव्हा ? तो वाचकवर्गाला, 'आता पुढं काय झालं असेल ?' पुढे काय ?' अशी ओढ लावणारी असेल तेव्हाच !'

कादंबरीत असं हे कुतूहल, ही जिज्ञासा शेवटपर्यंत खेळती ठेवणे, ह कादंबरीकाराचे मोठे यश समजावे. ही उत्कंठा कशी वाढवावी याचं एक अगदी साधं उदाहरणही त्यानं दिलंय्. तो म्हणतो–

'राजा मृत्यु पावला व नंतर राणीही मरण पावली' ही झाली साधी गोष्ट ! पण...

'राजा मृत्यु पावला व नंतर राणी दुःखाने मरण पावली.' हे मात्र (असं) कथानक होऊ शकेल.'

बघ अलका, केवळ, 'राणी 'दुःखाने' मरण पावली' हे वाचताच वाचक मनात विचार करू लागतो. 'दुःखानं झालं, तरी एकदम ती मरण पावली ? कशी ? का ? तिला कुणी आकसानं ठार केलं असेल का ? की, विषप्रयोग झाला असेल ? की अपघातानेच ती मेली ? अन् दोघेही मृत्यु पावले ? त्यांना मुलं कोणी होती का ? त्यांचं काय बरं झालं असेल पुढे ?'

एक ना दोन ! कित्येक प्रश्नचिन्हे वाचकांच्या मनात डोकावू लागतात– केवळ एका सूचक शब्दाने ! बस् बस्, अशी ही जिज्ञासा वाचकाच्या मनात निर्माण करण्याचे कार्य साधले, की, ती कादंबरी लोकप्रिय होणारच, हे सांगायला कोण होराभूषण नको ! गोष्टी साध्यासाध्याच. पण त्याही उत्कंठावर्धक तऱ्हेनं सांगता येतात, हा यातला महत्त्वाचा मुद्दा. हे उत्कंठा-वर्धनाचे तत्त्व, दुसऱ्याही प्रकारच्या साहित्यात म्हणजे नाटक-चित्रपटांच्या कथानकांच्या नावातसुद्धा वापरले गेलेले तुला दिसेल 'सांगा, पप्पा कुणाचे?' अगर 'मलाही काही सांगायचंय' ही नाटकाची कुतूहलजनक नावे बघ, अगर 'वह कौन थी ?' अशा सारखी चित्रपटाची नावे, गूढता व रहस्य-मयता यांचे एक आवरण पांघरून बसलेली आहेत की नाहीत ? यांनी प्रेक्षकांची जिज्ञासा जागी झाली नाही तरच आश्चर्य. काही जुन्या अनुभवी लेखकानी याबाबत स्पष्टच म्हटले आहे की, एखादे छोटेसे रहस्य जर कथा-नकात लेखकाला गुंफता आले, तर तर 'या रहस्याचा उलगडा पुढे तरी झाला आहे की नाहीच ? अन् केव्हा आता होणाराय तो मग ?' अशा ओढीने वाचक शेवटपर्यंत कादंबरी उत्कंठेने वाचीत जातो. या रहस्यमय सूत्राचा अवलंब जुन्या म्हणजे ३०–३५ वर्षांपूर्वीच्या कादंबऱ्यांतून काही

नामांकित लेखकानीही वारंवार केला आहे. उदा. हरि ना. आपटे यांनी आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या कथानकात या गूढ रहस्याची युक्ती वापरून मोठीच उत्कंठा निर्माण केली होती. त्यातली 'सावळ्याने काय सांगितले ?' किंवा 'बलभीमाच्या आसनाखाली' अशी उत्कंठावर्धक प्रकरणाची नावे तर मला अद्यापही स्मरतात ! बलभीमाच्या आसनाखाली ? काय असेल ते ? मूर्तीच्या आसनाखाली द्रव्याची कळशी तर असेल ? की, गुप्त हत्यारे ? की, कुणाचा मृतदेह ? असे निराळेच कुतूहल वाचकात उत्पन्न करून, पुढे लेखकाने उलगडा केला आहे की, तेथे आसन सरकताच एक गुप्त भुयार दिसत होते ! पण हा उलगडा होईतो, वाचकाचे मन डिंकाने चिकटल्याप्रमाणे कथानकास चिकटूनच बसून राही जसे ! अर्थात् रहस्य खूप मोठेच हवे किंवा ते ऐतिहासिक कादंबरीतच चपखल बसते, असेही नाही बरे का. एखाद्या चिमुकल्या रहस्याची झलकही कादंबरीला जिज्ञासेचा मुलायम शेला प्राप्त करून देऊ शकते व ही युक्ती सामाजिक कादंबऱ्यांतून आजही उपयोगात आणली गेलेली काही वेळा आढळते. बाकी आजची पुस्तके माझ्यापेक्षा तुझ्याच वाचनात अधिक येतात आजकाल, तेव्हा तुला त्याची उदाहरणे जास्त आढळण्यांत आली असतील.

अर्थात् दर कथानकात कसले ना कसले रहस्य हे हवेच त्यावाचून कादंबरी रंगतच नाही, असा मात्र याचा अर्थ मुळीच नाही हं ! या रहस्याच्या वाटेला चुकूनही न गेलेल्या– पण तरीही अतिशय लोकप्रिय ठरलेल्या अशा यशस्वी कादंबऱ्याही बहुसंख्य आहेत व असतात.

तेव्हा, कादंबरीत रहस्य खेळते असो वा नसो तिचे कथानक नाट्यपूर्ण घटनाचे मात्र अवश्य हवे, ही एक खूणगाठ तू मनाशी बांधून ठेव, सरळ साधे आपले 'एक नायिका होती आणि एक तिला अनुरूपसा नायक होता, दोघांचे प्रेम जमले आणि काय आश्चर्य ? कसलाही अडथळा कुणाचाही विरोध आड न येता किंवा खलनायिका, व खलनायक याचेकडूनही संकटे न येता तिचा विवाह इच्छित प्रेमिकाशी झाला, व ती दोघे मोठ्या सुखात नांदू लागली !' असले कथानक लिहिण्यात किंवा वाचण्यात तरी मजा काय ? ते मिळमिळीतच वाटणार ! पुष्कळदा माणसाच्या आयुष्यात आकस्मिक घटना घडतात, होत्याचे नव्हतेसे घडून जाते, संकटे

येतात, मनाविरुद्ध प्रसंग घडू लागतात, अगर ध्येयसिद्धीत हजारो अडथळे येतात. पण त्यातूनही माणूस धडपडत पुढेच जात असतो. त्याचे वर्णन करणे, म्हणजेच, मानवी जीवननाट्य रंगवणे. हे असे नाट्य मात्र कथानकात जरूर हवेच, नाही तर तुमचे कथानक बेचव व अळणीच ठरेल! तेव्हा नाट्यपूर्ण घटनांचा समावेश करणे हा कथानक आकर्षक करण्याचा एक चांगला उपाय आहे म्हणेनास ?

आणि कादंबरीत जीवननाट्य हवे, याचाच साधा सरळ अर्थ, विविध प्रकारच्या मानवी भावनाचे दर्शन त्यातून व्हावयास हवे, हाच ! तूच बघ, पांढऱ्या कागदावर कोणी पेन्सिलीने रेखाचित्राची बाह्यरेषा काढली तर ती यथातथ्य असूनही फारशी नजरेत भरत नाही, पण त्याच आऊटलाईनमध्ये बारीक रेषांनी छाया-प्रकाशाची रंगत दाखवली तर हे चित्र बोलके होते ! आणि यात जर तऱ्हतऱ्हेचे रंग भरले तर ?मग तर त्याचे स्वरूप कितीतरी अधिकच रम्य भासते, खरे ना ?तोच सिद्धांत या बाबतीतही लागू करायला हरकत नाही.

तेव्हा अलका, कादंबरीत विविध भावनाचे रंग असले पाहिजेत. होय, सुष्ट भावनाबरोबर दुष्ट भावनाचेसुद्धा ! अंधार असल्यावाचून उजेडाची किंमत काय ? जगात सुजनाशेजारीच दुर्जनही असतात, प्रेमळ माणसाच्या सहवासालाच कैकवेळा पाषाणहृदयीही राहतात, नैतिक मूल्ये जपणाऱ्यांच्या बरोबरीने कनक, कांता व सत्ता या त्रयीसाठी नीतीच्या चिंध्या करणारेही काहीजण असतातच ! तर या भिन्नभिन्न मनोरचनेचे दुवे एकमेकास नीट जोडले जाणे, हीच कादंबरीच्या कथानकात रंगत भरणारी एक महत्त्वाची गोष्ट, हे नीट ध्यानात ठेव. उदाहरणार्थ, रावणाची दुष्टता व कारस्थान याचे वर्णन वगळले तर रामकथेत काही रामच उरणार नाही, संभाजीची स्वधर्मनिष्ठा तुला वर्णन करायची असेल तर तुला औरंगजेबाची धर्मांध प्रेरित तर्कदुष्टता ही वगळता येणारच नाही ! खलनायक वा खलनायिका हेच आपल्या कारवायांनी पुष्कळदा कादंबरीच्या कथानेकाला वैचित्र्य व वैविध्य आणीत असतात, कधीकधी तर नायकनायिकाहूनही जास्तच ! हे पाहिलंयस ना तू कादंबरीक्षेत्रात? या भावनाच्या विरोधालाच प्रा.फडक्यांनी ' समर प्रसंग ' असे एक समुचित नाव दिले आहे– नुसतं नावच

नव्हे, त्यांनी ' समर प्रसंग हा ललित कथेचा आत्मा होय ' असेही म्हटले आहे बघ ! अन् एका अर्थी तेही खरेच. जगात विविध तऱ्हेचा संग्राम चाललेला आजही, पाहू तेथे, आपणास दिसतोच आहे ना ? सुंदर तरुणी व त्यांचा घास घ्यायला टपलेली कामुक माणसे अनादि कालापासून आजच्या घडीपर्यंत चहूकडे आढळताहेत, पापभीरू माणसाना छळणारे राक्षस आजही जगात आहेतच ! तर ह्या, व अशा अनेक प्रकाराच्या विरोधी भावसंघर्षांचा उपयोग तू तुझ्या कथानकात अवश्य करावास असे मला वाटते. आणि हे मी तुला उगीच काहीतरी सांगत नाही आहे, बरं का ! दगडाचासुद्धा संघर्ष झाला तर आगीच्या ठिणग्या उठतात, तद्वत् या भावनांच्या उलट-सुलट आघातानी माणसाच्या मनातील चैतन्याची ज्योत फुलते व तीव्र विरोधाने माणसाचे कर्तृत्व अधिकच धारधार व निश्चयी होते, हे यातले सर्वसामान्य असे एक तत्त्व आहे. मघाशी मी म्हटले ना, की, कादंबरीकथानकात नाट्य जरूर हवे, म्हणून ? ते नाट्य विरोधी भावनाच्या संघर्षातून घडून येत असेल, तर, तुमचे हे कथानक एकदम आकर्षक होणार, प्रश्नच नाही !

या ' समरप्रसंगा 'बद्दल पुष्कळच लेखकांनी ऊहापोह केलेला आहे, तेव्हा या पत्रातून अधिक मी लिहीत नाही, पण एक सूचना मात्र अवश्य मला द्यावीशी वाटते आहे बघ, ती म्हणजे नव्या लेखकांना समरप्रसंग कथानकात योजायचा असेल तर ' तो प्रसंग ' हीच कथानकातली प्रमुख व मध्यवर्ती घटना हवी, तेच केंद्रस्थान हवे, तरच त्याला खरे महत्त्व चढणार ! समजलं ना ? आणि अशीच कादंबरी ' समर्थ ' होण्याची शक्यता केव्हाही अधिक.

पण अलका, हे सारं मी तुला लिहिताना मनाच्या कोपऱ्यातून कुणी हळूच मला डिवचतं आहे, सांगतं आहे, की तू हे ' समरप्रसंग ' वगैरे सांगितलेस, ते आजच्या कादंबऱ्यांतून तुला आढळतात का ? तेही एकदा बघ ना जरा ! माझ्या मनाच्या तळातून उठलेली ही कुशंका आहे खरीच विचारणीय, होय, हीही गोष्ट मान्य केली पाहिजे की, आजचा कादंबरीचा जमाना एकदम बदललेला आहे. फडक्यांनी हे सुंदर समर्पक सिद्धांत बांधले ते तीस चाळीस वर्षांपूर्वी. त्यावेळच्या लेखकांना त्यामुळ उत्कृष्ट मार्गदर्शनही

अवश्य झाले असेल, एकदम कबूल. पण आजचे कादंबरीचे तंत्र मात्र वेगळे झाले आहे व त्यात 'समरप्रसंग हवाच' असा नियम पाळला जातही नाही! उदा. भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' वाचली आहेस का? त्यात जणू 'काही सांगण्यासारखं व्यक्तीच्या आयुष्यात न घडणं' हेच एक कथानक आहे! संग्राम वगैरे नाही, किंवा तो 'आत्मसंग्राम' आहे एक प्रकारचा, असे वाटल्यास म्हण. हा माणसाच्या मनातला संग्राम नित्य तलवारी परजून भावनांची लढत मनातच लावीत असतो, त्याचे चित्रण आजकालच्या अशा मनोविश्लेषणात्मक कादंबऱ्यांतून तुला ठायीठायी आढळेल. एकच प्रमुख गोष्ट यात तू लक्षात घे, ती ही की, हया आत्मसंग्रामाचे रूप उघड, दृश्य वा ओबड-धोबड नाही, तर सूक्ष्म, व नाजूक आहे. म्हणूनच ते दर्शविण्यास अधिकच कसब हवे, अधिक काळजी घ्यावी लागते.

आता ओघाने आणखी काही आठवलेय ते पण सांगून टाकते इथेच. अलके, एक माहीत आहे ना? कादंबरीच्या कथानकातच उपकथानकही गुंफलेले असते– ते का? तर मुख्य कथानकाला उठाव देण्यासाठी. पूर्वीचे फोटोग्राफर फोटोसाठी स्टुडिओत काळा पडदा मागे घालून मग त्या व्यक्तीचे फोटो घ्यायचे, कारण विरोधी रंगाच्या पार्श्वभूमीवर फोटो स्पष्ट येतात. तेच तत्त्व इथे आहे. कादंबरीत नायक व नायिका प्रमुख, त्यांचे विचार, वर्तन व व्यक्तिमत्त्व यांना बरोबर विरोधी व्यक्तिमत्त्वाची उप-नायिका वा नायक दाखवूनही विरोधी पार्श्वभूमी लेखकाला तयार करता येते, याची उदाहरणे पाहशील त्या कादंबरीत सहज सापडणारी आहेत तुला.

या उपकथानकाचे उपयोग काय? कशासाठी कथानकाच्या गळ्यात हे उपकथानकाचे 'लोढणे' बांधावे? असा तुझा वात्रट प्रश्न मला कानाशी जरा ऐकूच येतोय बघ. तेही सांगते हं, ऐक मुख्य हेतू वर दिलेला– कथा-नकांतील मुख्य पात्राला उठाव देण्याचा. दुसरे म्हणजे कादंबरीत असंख्य प्रसंग घडत असतात, ते सारे केवळ नायक-नायिकाच बनवीत असतात का, ते सांग बरे? नाही अलके, हे अनंत प्रसंग घडवायला विविध व्यक्ती, विविध प्रकारच्या त्यांच्या कृती हया अवश्य असतात आणि त्या उपकथानकातून सहज उचलता येतात, ही फार मोठी सोय आहे व ती नव्या कादंबरी-

काराला खास दिलासा देणारी आहे. अशा गौणपात्रांच्या संवाद कृतीतूनच कथानकाला गती मिळू शकते.

उपकथानक हे कथानकाबरोबर त्याच्या हातात हात व गळचात गळा घालूनच चालत असते म्हणेनास ? जणू दोन विरोधी स्वभावाचे मित्रच या उपकथानकाचा आणखी एक महत्त्वाचा उपयोग हा की, मूळ कथानकातील काही घटना कालांतर संभाळून आटोपशीरपणे यातून सांगता येतात व तेही वर्ण्यविषयाला धक्का न लावता. एक छोटे उदाहरण घे. बीना ही एक सुस्वभावी नायिका. हिने उपकथानकातील मैत्रीण लीना हिच्याशी अबोला धरला आहे का ? त्याबद्दल लीनाचे विचारच पाहाना ?

> 'बीना अशी रागावलीय काय म्हणून माझ्यावर ? मुंबईला गेली तर चार महिन्यांत ना फोन, ना पत्र. काय कारण ? तिचा प्रियतम रमेश माझ्याबरोबर सिनेमाला एक-दोनदा आला हेच की काय ? की आम्ही कॉलेजच्या नाटकात पति-पत्नीच्या भूमिका अगदी बेस्ट केल्या म्हणून का हा घस्सा ? येऊ दे खुशाल राग; उमेश मलाही फार आवडतो. मी त्याच्यासाठी तळमळते हा माझा गुन्हा थोडाच ? 'प्यार किया है, कोई चोरी नही की !' ती सुरेख आहे– असेल, मीही वाईट नाहीये, बघू आता कोण रेस जिकतं ते !

यात उपनायिकेच्या विचारातून, शब्दांतून नायिकेच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव मिळतो की नाही ? सांग पाहू ? किती गोष्टी स्पष्ट झाल्या बघ हं–

(१) नायिका नायकावर रागावून चार महिने दूर गेली.

(२) तिच्या प्रेमातली प्रतिस्पर्धी तिची मैत्रीणच आहे.

(३) बीनाचा प्रियकर कॉलेजमध्ये आहे. नाटकात उत्कृष्ट कामे करणारा व तरुणींना आवडेलसा आहे.

(४) आणि तो नायिकेखेरीज इतर मुलींबरोबरही खेळीमेळीने वागणारा, त्यांना सिनेमालाही नेणारा असा आहे.

(५) उपकथानकांची ही नायिका मत्सरीही बरीच दिसते. घोटाळा करणारच पुढे.....

पाहिलेस ? या सर्व गोष्टी एकत्र कळून कथानकाचा धागा वेगळचा

रंगात विणला जातो ना ? बस् तेच आपले उद्दिष्ट. मात्र यात तुला एक धोक्याची सूचना देऊन ठेवते. अग, ' धोका ' शब्द वाचून तुला एवढं दचकायला काय झालं ? हा धोका व्यवहारातला नव्हे, कथानकातला आहे, वाङ्मयीन आहे. तर धोका असा की काही वेळा उपकथानकातली पात्रेच डोईजड होऊन कथानकातल्या प्रमुख पात्राचे महत्त्व फिकेफिके करून टाकण्याइतकी तेजस्वी निपजतात. लेखकाकडून असे होणे म्हणजे स्वैपाकीण-बाईने मालकिणीच्या वरताण होऊन मालकाचे लक्ष ओढून घ्यावे, तशा-सारखेच ! कदाचित लेखकाला नकळतही खलनायक वा खलनायिकेचे रंगचित्र नायक–नायिकेहून अधिक प्रभावी कधी कधी होत असेल, नाही असे नाही, पण असे घडले तर, कथासूत्राची रंगत बिघडते हे निश्चित. मी म्हणते तो धोका हाच. तुला एक उदाहरण देते हवं तर. आपण दोघांनी पु. भा. भाव्यांचं ' पद्मिनी ' नाटक पाहिले आहे. त्यातली पद्मिनीही खरी नाट्यनायिका. पण तिच्यापेक्षा अल्लाउद्दीन खिलजीशी नाइलाजाने लग्न केलेली कमलकुमारीच प्रभावी भावनांनी व सुयोग्य अभिनयाने आपले लक्ष वेधून घेत होती, आठवते ना ? तर असं होऊ नये. तू ही कादंबरी लिहिताना हे नीट लक्षात ठेव बरे का. उपकथानकातल्या व्यक्तींना कथानकातील प्रमुख पात्राहून जास्त महत्त्व मिळता कामा नये व किती केलं तरी राणी ती राणी व दासी ती दासीच हे सूत्र विसरायचे नाही. हे मी पूर्वी एका पत्रातही तुला लिहिलं आहेच ! तर अलके, प्रा. फडक्यांनी या बाबतीत केलेली एक अमोल सूचना मला यावेळी स्मरते आहे ती अशी की, कथानकात कोणत्या पात्राला किती महत्त्व द्यावयाचे याची लेखकाने कादंबरी लेखनापूर्वीच एक नोंद करून ठेवावी. तुला जरूर भासल्यास अशी नोंद तू कर.

अलका, मागल्या पत्रात तू एक चांगला प्रश्न विचारला आहेस. कादंबरीचे कथानक सुखान्त असावे की दुःखान्त ? कोणते जास्त प्रभावी ? तर याचे उत्तर देणे जरा अवघडच, पण काय सांगता येतं ते पाहते. एकतर लेखकाच मनोधर्म व प्रवृत्ती असेल, त्यानुसारच कथानकाचे रूप व शेवट बनत असतो. मला स्वतःला ट्रॅजेडी मनापासून नको वाटते. त्या दुःखातूनही माणसांनी काही शर्थीचे उपाय शोधून काढले व जीवनात परत आनंद आणण्याचे प्रयत्न केले असाच शेवट (ट्रॅजेडी लिहायची ठरली तरी) मला

रुचतो व सुचतो. पण काही कथानकेच अशी की, ती 'दुःखान्तिका'च बनणे अपरिहार्य असते. 'वास्तू' या माझ्या कादंबरीतले कथानकच, 'एका माणसाचे जीवनसर्वस्व– त्याचे घर १९४८ च्या महाराष्ट्रात उद्‌भवलेल्या जातीयवादात जळून खाक झाले.' या एक सत्य घटनेवर आधारित होते ! येथे अपरिहार्यतेने 'ट्रॅजेडी' मला दाखवावीच लागली !

उलट काही लेखिका मला अशाही माहित आहेत की, त्यांची मनःप्रवृत्ती शोकांतिकेकडेच अधिक दिसते. मागल्या पिढीतल्या सौ. वसुंधरा पटवर्धन व आजकालच्या लेखिका, सौ. जोत्स्ना देवधर या कादंबऱ्या-कथा या पुष्कळशा शोकांतिकाच आहेत. अर्थात त्या फार समर्थभाषेत लिहिल्या गेल्याने अधिक प्रभावीही ठरलेल्या आहेत, शिवाय 'कॉमेडीपेक्षा ट्रॅजेडी' ही नेहमी वाचकांना अधिकच परिणामकारक वाटते हेही सत्य मान्य करायला हवे. तर तुझी मनःप्रवृत्ती व अभिरुची या दोन्हींतून कोणत्या प्रकारच्या लेखनाकडे आहे, हे तुझे तूच एकदा नीट तपासून बघ व मग ठरव, कथानक सुखान्त करायचे की दुःखान्त ते ! कसे ?

अलका, वर मी म्हटले की, ट्रॅजेडी नेहमी अधिकच परिणामकारी ठरते, मान्य. पण म्हणून एकेका कादंबरीत विदारकता किती प्रमाणात यावी यालाही सीमा नको का ? एक-दोन उदाहरणे घेऊ. नुकतीच एक 'दैव जाणिले कुणी'नावाची कादंबरी (लेखक अशोक आघारकर) वाचनात आली. प्रारंभी त्यातला नायक नुक्ता डॉक्टर झालेला एक बुद्धिमान तरुण, व नायिकाही डॉक्टर व सुंदर ! आता थोड्याफार अडचणी येऊन का होईना, पण यांचा विवाह होईल असे वाचक मनात म्हणतो न म्हणतो, तोवर खलनायक या डॉक्टरला पकडून एका 'भानामती' करणाऱ्याच्या बारा वर्षे ताब्यात देतो. नायिकेशी मग खलनायकच स्वतः लग्न करतो ! पण एवढीच संकटे ? नाही ! शोकांतिकेला अपुरी वाटूनच की काय, नायक बारा वर्षांनी सुटून नायिकेला भेटायला निघतो तो अपघातात सापडून, पांगळा व थोटा होऊन तिच्या हॉस्पिटलातच मृत्यू पावतो !! तेव्हा कुठे ही दुःखपरंपरा संपते !!

मला मान्य आहे अलके, जगात दुःखे अनंत प्रकारची आहेत व त्यांतली काही नायक-नायिकांच्या वाट्याला येणेही अपरिहार्य आहे, जगात मृत्यू,

अपघात नित्य घडतच असतात, निर्मल तारुण्यसुलभ प्रीती पुष्कळदा हे घाव पडून मोडून पडते, दुष्ट माणसे सज्जनांच्या सुखात नित्य काटे पसरायला सज्ज तर चहूंकडे दिसतात, आकस्मिक संकटे– जसे दुखण्याने अपंगपण येणे, वेड लागणे किंवा मुलगा घर सोडून परांगदा होणे हेही येतात कुणाकुणाच्या आयुष्यात ! सारे खरे, पण असल्या अनेक दुर्घटना एकवटून एकाच नायक-नायिकेवर कोसळू लागल्या की वाचक बेजार, त्रस्त होऊन म्हणतो–

'अहो ! आता बस की या बापडघा दोघांवर येणारी संकटं ! जरा तरी आशेचा, सुखाचा किरण दिसू द्या ह्या तुमच्या नायक-नायिकांना !'

वर अशा अतिरंजित, अतिरेकी, दुःखांतिकेची उदाहरणे मी दिलेली आहेत, त्यातून काय बोध घ्यायचा, तो तू घेशीलच !

मात्र एक सूचना आधीच दिलेली बरी, ती ही की, कादंबरीतील विदारकता योग्य प्रमाणात दाखवली गेली, व तीही जर प्रभावी घटना, समर्थ भाषाशैली व परिणामकारक कथानक यांच्या कोंदणात असली तर समाजाची दृष्टी अशा दुःखांकडे अवश्य वळते व विचारवंताच्या जागृतीचे कार्य करू शकते ! उदा. ह. मो. मराठे यांची 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' 'ही बेकारीच्या पार्श्वभूमीवरची कादंबरी आणि त्र्यं. वि. सरदेशमुख यांची 'बखर एका राजाची' ही कादंबरी या दोन्ही शोकांतिका या दृष्टीने अभ्यसनीय ठरतील. या 'बखर एका राजाची 'बद्दल विस्ताराने मी पुढल्या एका पत्रात लिहिणारच आहे. तुला, तेव्हा तूर्त नुस्ता उल्लेख पुरे आहे.

आता दुसरी याच्याशीच संबंधित अशी एक लहानशी गोष्ट म्हणजे जे सांगायचे आहे, त्याचा शेवट केव्हा व किती अंतराने दाखवायचा याबद्दल-चाही ठाम निश्चय कादंबरीच्या प्रारंभीच लेखकाने मनाशी केला पाहिजे. नदीचा ओघ थांबत नाही, मन मानेल तशी वळणे घेत घेत नदी सारखी वाहत राहते, कितीही अंतर असो, ती आपली वाहतच राहते. आपले कथानक नदीसारखे वेगवान व स्वतंत्र गतीचे जरूर असावे, पण तिच्या-प्रमाणे अनिर्बंध नको, तर ते रेल्वेप्रमाणे असले पाहिजे. रेल्वेला आपले प्रमुख लक्ष्य, पक्के माहीत असते व त्याच दिशेने तिचा प्रवास होतो. तद्वत आपल्या कथानकाचे थांबण्याचे ठिकाण जरूर निश्चित असले पाहिजे व तिकडेच कथानकाची गती वा ओघ पुढे जात राह्यला हवा. शिवाय आणखी

एका दृष्टिकोनानं या बाबतचा विचार अवश्य आहे अलका. रेल्वेप्रमाणे कालप्रवाहाची गाडीही ठराविक स्टेशने घेत घेतच पण फार लांबपर्यंत चाललेली असते... पण आपल्या कथानकाचा प्रवास यात लहानसा व मर्यादित केलेला असाच असावा. उगीच गाडी चाललीच आहे, चला वाटेल तेवढं दूरवर हे नाही उपयोगाचं. तेव्हा कथानक किती व्याप्तीचे आहे व त्याला पूर्णविराम कोठल्या ठिकाणी द्यायचा हा सगळा अंदाज लेखकाने सुरुवातीला मनाशी बांधून टाकावा हेच उत्तम ! नाही तर मग कादंबरीचा शेवट लेखकाला नीट माहीत नसल्याने मनःपूत पसरत व वाहवत गेलेल्या अनेक कादंबऱ्या तुझ्या पाहण्यात असतीलच ? त्या रटाळ होतात व वाचताना वाचक 'पुरे बाबा, ह्या नाही त्या कटकटी कशाला सांगता ? शेवटी नायक-नायिकांचं काय झालं, ते चटकन सांगा ना ?' असा वैतागतो, त्यात काय अर्थ ? तेव्हा कथानकाचा शेवट दाखवतानाही औचित्याचे अवधान ठेवायला हवे इतकंच मी सुचवीन.

आता पुढचे पत्र कादंबरीची रचना याबद्दलचे लिहीन बरे का ?

अच्छा, बाय अलका, पत्रं आवडताहेत ना तुला ?

तुझी,
सौ. ताई.

□ □

१५ कादंबरीची रचना

माय डिअर अलका,

गेल्या अनेक पत्रांतून मी तुला लेखनाबद्दल खूप काही सांगितलं. आपला विषय फक्त कथा व कादंबरीपुरताच मर्यादित असल्याने आणखी दोन-तीन पत्रांतच मी तो संपवणार ! तुला याचा उपयोग होतो आहे ना पण लेखनात ? होतच असला पाहिजे, कारण तू तंत्रासाठी अडून न बसता कादंबरी लिहायलादेखील घेणार असल्याचं लिहिलं आहेस ! छान, छान• आता मात्र घाईनं तुला हे पत्र पाठवायलाच हवं, कारण कादंबरीचे कथानक कसे असावे हे मी तुला लिहिलं असलं, तरी त्याची गुंफण अगर रचना कशी करावी, हाही भाग अतिशय महत्त्वाचा आहे व तो तू तुझ्या कादंबरी-लेखनापूर्वी एकवार नजरेखाली घालावास, असंही वाटतं आहे, तर तेच आज आवर्जून लिहिते.

अलका, कादंबरीचे कथानक कशाकशाचे बनते ? याचे अगदी छोटेसे उत्तर 'ते अनेक घटनाप्रसंगांनी बनते' असे द्यावे लागेल. आणि ह्या घटना रंगतात कशाने ? तर विविध व्यक्तींचे भावदर्शन, त्यांचे संवाद, त्यांच्या कृती यांनी. याच्या जोडीला स्थलकालाची उचित वर्णने असतात, तीही हवीतच. नाटक रंगायचे तर रंगमंच सजवलेला लागतो ना ? तर, व्यक्तिदर्शन, संवाद व वातावरणाची वर्णने यांनी ह्या कथानकाच्या घटना

बनतात, या अनेक भिन्नभिन्न घटनांची मनोहर जुळणी म्हणजेच कादंबरीची गुंफण !

गुंफण हा शब्द मनात आला, की एक सुंदर प्रतीक आधी नजरेसमोर उभे राहते ते, तऱ्हेतऱ्हेची, विविधरंगी फुले एकत्र गुंफण्याचे. खरे म्हणजे फुले एकापुढे एक ओवीत जाणे ही किती साधी गोष्ट ? त्याला गुंफणी म्हणण्यापेक्षा ओवणी म्हटलेलेच बरे, नाही का ? त्यात एकसूत्रता जरूर आहे, पण गुंफणीचे कौशल्य काहीच नाही. पण बरं का अलके, मराठी कादंबरीच्या त्या उषःकालात अगदी हीच सोपी ओवणी पद्धत स्वीकारून अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. कादंबरीकाराने निर्माण केलेले प्रसंग ओळीने सरळ एकापुढे एक जोडून सांगण्याचे तत्त्व त्यात प्रमुख होते.

धाकटचा सूनबाई, सरस्वती, माणिक बाग, दुःखान्ती सुख इ. (ही नावे कदाचित तुला माहीतही नसतील !) त्यावेळच्या त्या पहिल्यावहिल्या 'प्रसंग ओवलेल्या' कादंबऱ्या लोकप्रियही झालेल्या होत्या, कारण दुसऱ्या कुठल्याही तऱ्हेच्या गुंफणीची वाचकवर्गाला कल्पनाच नव्हती, व हा दृष्टिकोण तर नव्हताच नव्हता. या ठरीव रचनापद्धतीला पहिला जोरदार धक्का दिला हरि नारायण आपटचांनी. कादंबरी रचनेत कौशल्याइतकेच वैचित्र्यही अवश्य आहे, याची जाण ठेवणारे पहिले मराठी लेखक तेच. त्यांच्या कादंबरीतले प्रसंग असे एकावर एक चौकोनी ठोकळे रचल्यासारखे अगर शिपायांच्या पलटणीप्रमाणे रांकेने एकापुढे एक असे कधीच दिसत नसत– तर दहा भिन्न ठिकाणी या प्रसंगांचे धागे सुरू होऊन ते, मूळ कथाकेंद्राकडे धावत येताहेत असे मनात येई. विशेषतः चंद्रगुप्त, उषःकाल इ. ऐतिहासिक कादंबऱ्यांत तर या पद्धतीचा आविष्कार फार नमुनेदार झाला आहे. हे भिन्न धागे– होय धागेच ! त्यावरून मला अशा गुंफणीला आणखी एक छानदार उपमा द्यावीशी वाटते, ती म्हणजे अष्टरंगी गोफाची. बरं का अलका, माझ्या लहानपणी आमच्या शाळेत संमेलनप्रसंगी हा, गोफ विणण्याचा, एक खेळ योजीत. आठ मुलींनी हातांना आठ वेगवेगळचा रंगीत कापडांचे लांबलांब तुकडे अडकवून टिपऱ्या खेळायच्या हे आठही भिन्नरंगी तुकडे मध्ये एका उंच जागी स्तंभाला अडकवलेले असायचे व मुलींच्या हालचाली अशा योजलेल्या की, ते, आठही रंगीत पट्टे एकमेकांत

गुंफले जाऊन सुंदर अष्टरंगी गोफ व्हायचा– बस् बस ! त्याच तऱ्हेची ही कादंबरीची विविधरंगी गुंफण. हरि नारायणांना आज पाऊणशे वर्षे झाली, तरी अद्यापही हा प्रकार शिळा वा कालबाह्य ठरलेला नाही, हे विशेष. ॲगाथा ख्रिस्ती हिच्या रहस्यमय कादंबरीतूनही हा प्रकार पुष्कळदा आढळतो प्रथम दूरदूरची ५–७ माणसे काय काय करताहेत याचे वर्णन येते. ते वाचून तर, घटनांचा एकमेकांशी संबंध काय ?' हेच वाचकाला कळणे मुश्किल होते, पण मग ह्या सर्व मंडळींशी संबंधित अशी प्रमुख मध्यवर्ती घटना घडलेली दिसली की, त्या सर्व व्यक्तींच्या हालचालींना एक सुसंबद्ध रूप आलेसे वाटते !

हे रचनेचे चित्र ख्वाजा अहंमद अब्बास यांच्या तीन पहिये (तीन चक्रे) या हिंदी कादंबरीतही कुशलतेने वापरले गेले आहे. यात तर केंद्रस्थान आहे ती केवळ एक कचऱ्याची गाडी !! किती कुतूहलजनक घटना ? या गाडीत कचऱ्यातल्या काही विशिष्ट वस्तु येतात, त्या प्रत्येक वस्तूची एकेक स्वतंत्र गोष्ट आहे. एक अपशकुनी टब, एक जुना पांगुळगाडा, इत्यादींच्या त्या दर्दभरी कहाण्या– त्या एकत्र येऊन शेवटी गाडीवाला हमाल भिकू याच्या कहाणीत मिसळलेल्या दिसतात. यातले दरेक प्रकरण ही एकेक स्वतंत्र कथा आहे व त्या सर्वांची मिळून ही एकसंध कादंबरी झाली आहे. हा रचनेचा प्रकार यापूर्वीही आणखी काही लेखकांनी अमलांत आणला आहे. वि. स. खांडेकरांची 'पारिजातकाची फुले' कादंबरी अशा सुटया कथांची एकत्र गुंफण केलेलीच आहे. कठीण असली तरी ही गुंफण आकर्षक ठरणारी आहे, मात्र भारीच कष्टसाध्य !

तर रचनेच्या दोन प्रमुख तऱ्हा आपण पाहिल्या, पण रचनेत कौशल्य व वैचित्र्य हवे, तसे नाविन्यही असेल तर फारच उत्तम. वसंत वरखेडकरांची 'प्रतिनिधी' ही कादंबरी अशा प्रकारचे एक छान उदाहरण ठरू शकेल. येथे, भिन्न व्यावसायिक अशी पाच-सहा मंडळी एकत्र येऊन सहल करतात. हा प्रारंभ, या वेळी प्रत्येकजण आपले पुढले जीवनध्येय काय व कसे आशादायी आहे ते इतरांना सांगतो. आणि मग, खूप वर्षांनी यांतलाच एक गृहस्थ, सहलीतल्या त्या प्रत्येकाची स्वतंत्र गाठ घेऊन त्या त्या व्यक्तीच्या तत्कालीन ध्येयकल्पनेत व आजच्या त्याच्या प्रत्यक्ष जीवनात किती अंतर

पडले आहे हे कसे जाणून घेतो, ह्याचेच 'प्रतिनिधीरूप'दर्शन लेखक वाचकांना घडवतो असे हे कथासूत्र. या कादंबरीची रचना जरा विस्कळीत वाटते खरी, पण वरील गुंफणीचे नाविन्य जरूर लक्षात भरणारे आहे. 'कृष्णचंदर' यांची 'बोरबन क्लब' हीही एक अशीच नाविन्याची रचना दर्शविणारी कादंबरी. यात वरील क्लबातल्या दरेक सभासदाचे वेगळे व चमत्कृतिपूर्ण चारित्र्य वर्णिले आहे व त्या सर्व वेगवेगळ्या घटना घडण्याचे स्थळ म्हणजे तो क्लबच ! प्रसंगरचनेला या नाविन्यपूर्ण योजनेने अधिकच सौंदर्य प्राप्त झालेले आहे. मात्र एक आहे. अशी कादंबरी लिहिणारानं एक दक्षता अवश्य घेतली पाहिजे, ती ही, की हे अगदीच वेगवेगळे प्रसंग रंगवले तरी अखेरीस ते एकाच कादंबरीचे विभाग दिसले पाहिजेत व असलेही पाहिजेत !! 'हेन्स जोन्स' नावाच्या एका ग्रंथकारानेही नवोदित लेखकांना हाच इशारा दिला आहे. तो म्हणतो–

> 'कादंबरी ही एक चैतन्यमय वस्तू आहे, एकजिनसीपणा व एकसूत्रता असलेली अशी आहे ती ! तिच्या कोणत्याही लहान मोठ्या भागाचा सर्व कादंबरीशी दुवा जुळलेला असलाच पाहिजे.'

तर स्थूलार्थाने यांतून हाच बोध घ्यावयाचा, की कादंबरीची रचना व प्रसंग कितीही नाविन्यपूर्ण आणि वैचित्र्यपूर्ण रचायचे ठरवले तरी 'कादंबरीतून हा वजा केला तरी चालेल !' असा अनवश्यक किंवा मूळ कथानकाशी बांधिल न राहणारा प्रसंग, अगर असे प्रकरण, लेखकाने कधीही योजता कामा नये !!

* * *

आणि एक महत्त्वाचा मुद्दा ध्यानात ठेव नेहमी. कादंबरीची गुंफण मनोहर केव्हा होते ? तर या भिन्न भिन्न प्रकारच्या व्यक्ती, प्रसंग, वर्णने, संवाद याचा नीट मेळ घातला गेला तरच ! हा मेळ घालण्याचे, अगर कथानकातील विविध धाग्यांचे एकमेकाशी संतुलन राखण्याचे कसब फार नाजूक. प्रत्येकाला ते नीट जमेलच असंही नाही. पण प्रयत्नाने लेखकाला हे जमू शकते, हेही तेवढेच खरे ! तूच बघ अलका, सुरुवातीला मी गोफाचे उदाहरण दिले. त्यातले सर्वच रंग एकमेकांना खुलणारे व सारखेच सुंदर

होते. पण व्यवहारात असे थोडेच असते ? समाजात माणसे अशी परस्परांच्या आयुष्यात 'फिट्' बसून जीवनसौंदर्यच निर्माण करताना दिसतात का ? फारच क्वचित ! अन् म्हणूनच लेखकाची येथे अगदी परीक्षाच होते ! कशाची ? तर त्याच्या योजकतेची ! व्हर्जिनिया वुल्फ नावाच्या एका पाश्चात्य ग्रंथकर्त्रीने तर या संयोजकतेला कथानकाच्या रचनेत सर्वात अधिक महत्त्व दिलं आहे. ती म्हणते,

'कादंबरीकाराला जर एखादी दैवी देणगी असेल तर ती
म्हणजे सर्व बाबींचा मेळ कथानकात नीट घालण्याचीच !'

खरेच दैवी देणगी ! लेखकाच्या प्रतिभेतून सहजगत्या ही अशी सुरेख जुळणी जमतही जाते. पण असे प्रतिभावान लेखक थोडे, त्यांची गोष्टच निराळी ! इतर प्रयत्नशील होतकरू लेखकांनी ही कठीण गोष्ट अभ्यासाने व मेहनतीनेच साध्य करून घ्यायला हवी ! तूच बघ अलका, मानवी जगाच्या अनेक भल्याबुऱ्या तऱ्हा आपण पाहतो, त्यांतल्या भिन्न व्यक्तींचे, स्वभाव उत्तम वा वर्णनीय असतील असंही नाही, तरीही हे स्वभावविशेष खुबीने नीट एकत्र गुंफण्याचे काम कादंबरीकाराला करावेच लागते ना ? मुलांचा झिगझॅग नावाचा चित्रांचे तुकडे जुळवण्याचा एक खेळ आहे, तो तू पाहिलाच असशील ? एकाच चित्राचे अनेकानेक वाकडेतिकडे तुकडे कापलेले असतात त्यात. आणि गंमत ही की, यातला एकही तुकडा दुसऱ्यासारखा आकाराने असत नाही ! पण तरी ते सारे तुकडे एकाच चित्राचे सुटे भाग असतात. मूळ पूर्ण चित्र नमुन्याला पुढे ठेवून हे वाकडे-तिकडे लहान-मोठे तुकडे योग्य जागी बसवून चित्र पुरे करावे लागते या खेळात. बसबस ! अगदी असेच कथानकाचे लहान-मोठे पण वेडेवाकडे दिसणारे विभाग वा प्रसंग तुमच्या मनासमोर विखुरलेले असतात व त्यांचा तुम्हाला सुरेख मेळ घालायचा असतो ! 'योजकस्तत्र दुर्लभः' ही म्हण येथे अगदी समर्पकतेने लागू पडते की नाही ? सांग.

कादंबरीची गुंफण करण्यात आणखीही दोन-तीन पथ्ये ध्यानात ठेवण्याजोगी आहेत. तिच्यातले सगळे प्रसंग मूळ कथानकाशी इमान ठेवणारे हवेत व त्यांचा उत्कृष्ट मेळ घातला गेला पाहिजे हे तर आपण पाहिलेच ? पण हे सारे प्रसंग एकाच आकाराचे, वा सारख्याच तोंडावळ्याचे किंवा

त्याच त्याच रंगारूपाचे हवेत की काय ? असंही तुझ्या मनात येईल, येणारच. कारण मोठमोठ्या नामांकित पाश्चात्य लेखकांनी यावाबतच्या रचनेला 'स्ट्रक्चर ऑफ ए नॉवेल' असं नाव देऊन टाकले आहे ! आता, 'बांधकाम'च म्हटलं की तिथे सारख्या रंगारूपाच्याच विटा, एकसारख्या आकाराचे दगडाचे चौकोन हे येणारच ! काही वर्षांमागे सरकारतर्फे प्रौढ-साक्षरांसाठी साहित्यलेखकांचे एक शिबिर घेतले गेले व त्यात लेखकांना सूचना देऊन काही विशिष्ट प्रकारची शैक्षणिक रंजक पुस्तके लिहून घेण्यात आली होती, त्या शिबिराचे नावही 'लिटररी वर्कशॉप' असेच होते, तेव्हाही माझ्या साहित्यिक मनाला तो 'वर्कशॉप' शब्द बराच खुपला होता. पण विचारान्ती लक्षात आले की फक्त 'स्फूर्ति, प्रतिभा' इत्यादींचे बांधकाम हाच केवळ अर्थ यात अभिप्रेत नसून कथानकाच्या रचना-पद्धतीलाच ही नावे योजली जाताहेत ! मग ठीक, कारण या दृष्टीने इमारतीचे आणि कादंबरीरचनेचे तत्त्व दोन्हींत सारखेच. ते म्हणजे 'सामुग्रीची सुसंगत मांडणी करून उद्दिष्टाची उंची, सुशोभितपणा व सौंदर्य वाढवण्याचे ! मग हे नाव स्वीकारायला कोणती हरकत ?

या कादंबरीप्रसंगांच्या जुळणीतही एक नवे अवधान लेखकाला अवश्य ठेवावेच लागणार, ते म्हणजे कादंबरीतले हे सुटे सुटे प्रसंग तुम्ही एकत्र गुंफणार, ते एकमेकांना खुलून दिसणारे असेच तुम्हाला योजावे लागतील. चित्रकलेत तू पाहातेसच ? दोन विरोधी रंग एकमेकांच्या सान्निध्यात विरोधानेच की काय, फार खुलून दिसतात, तसेच हेही कलम आहे बरं का. एकाच तोंडावळ्याचे, एकाच, 'टाईप'चे प्रसंग तुम्ही वारंवार रचीत गेलात, ते एकापुढे एक मांडून त्याच तऱ्हेने जुळवीत राहिलात तर तुमच्या कादंबरीत तोचतोपणा व कंटाळवाणेपणा येईल, हे नक्की. म्हणून प्रसंगरचना करताना एक लक्ष्यांत ठेवावे, ते हे की, विरोधानेही कादंबरीत जरूर मोहक रंग भरता येतो, अधिक आकर्षकता (वर्णनशैलीची) आणता येते, म्हणून विरोधी भावनांचे, पण दर ठिकाणी काही वेगळेपणा दाखवणारे, असेच प्रसंग मधूनमधून योजावे. त्याने कादंबरीचे देखणेपण वाढते. तसेच वेग-वेगळ्या ठिकाणची स्थलदर्शनात्मक पार्श्वभूमी सुचवणारे प्रसंग ? त्यांचीही जुळणी कुशलपणाने अवश्य करायला हवी, तूच बघ, आपल्या महाराष्ट्रीय

होते. पण व्यवहारात असे थोडेच असते ? समाजात माणसे अशी परस्परांच्या आयुष्यात 'फिट्' बसून जीवनसौंदर्यच निर्माण करताना दिसतात का ? फारच क्वचित ! अन् म्हणूनच लेखकाची येथे अगदी परीक्षाच होते ! कशाची ? तर त्याच्या योजकतेची ! व्हर्जिनिया वुल्फ नावाच्या एका पाश्चात्य ग्रंथकर्त्रीने तर या संयोजकतेला कथानकाच्या रचनेत सर्वात अधिक महत्त्व दिलं आहे. ती म्हणते,

'कादंबरीकाराला जर एखादी दैवी देणगी असेल तर ती
म्हणजे सर्व बाबींचा मेळ कथानकात नीट घालण्याचीच !'

खरेच दैवी देणगी ! लेखकाच्या प्रतिभेतून सहजगत्या ही अशी सुरेख जुळणी जमतही जाते. पण असे प्रतिभावान लेखक थोडे, त्यांची गोष्टच निराळी ! इतर प्रयत्नशील होतकरू लेखकांनी ही कठीण गोष्ट अभ्यासाने व मेहनतीनेच साध्य करून घ्यायला हवी ! तूच बघ अलका, मानवी जगाच्या अनेक भल्याबुऱ्या तऱ्हा आपण पाहतो, त्यांतल्या भिन्न व्यक्तींचे, स्वभाव उत्तम वा वर्णनीय असतील असंही नाही, तरीही हे स्वभावविशेष खुबीने नीट एकत्र गुंफण्याचे काम कादंबरीकाराला करावेच लागते ना ? मुलांचा झिगझॅग नावाचा चित्रांचे तुकडे जुळवण्याचा एक खेळ आहे, तो तू पाहिलाच असशील ? एकाच चित्राचे अनेकानेक वाकडेतिकडे तुकडे कापलेले असतात त्यात. आणि गंमत ही की, यातला एकही तुकडा दुसऱ्यासारखा आकाराने असत नाही ! पण तरी ते सारे तुकडे एकाच चित्राचे सुटे भाग असतात. मूळ पूर्ण चित्र नमुन्याला पुढे ठेवून हे वाकडे-तिकडे लहान-मोठे तुकडे योग्य जागी बसवून चित्र पुरे करावे लागते या खेळात. बसबस ! अगदी असेच कथानकाचे लहान-मोठे पण वेडेवाकडे दिसणारे विभाग वा प्रसंग तुमच्या मनासमोर विखुरलेले असतात व त्यांचा तुम्हाला सुरेख मेळ घालायचा असतो ! 'योजकस्तत्र दुर्लभः' ही म्हण येथे अगदी समर्पकतेने लागू पडते की नाही ? सांग.

कादंबरीची गुंफण करण्यात आणखीही दोन-तीन पथ्ये ध्यानात ठेवण्याजोगी आहेत. तिच्यातले सगळे प्रसंग मूळ कथानकाशी इमान ठेवणारे हवेत व त्यांचा उत्कृष्ट मेळ घातला गेला पाहिजे हे तर आपण पाहिलेच ? पण हे सारे प्रसंग एकाच आकाराचे, वा सारख्याच तोंडावळ्याचे किंवा

त्याच त्याच रंगारूपाचे हवेत की काय? असंही तुझ्या मनात येईल, येणारच. कारण मोठमोठ्या नामांकित पाश्चात्य लेखकांनी यावाबतच्या रचनेला 'स्ट्रक्चर ऑफ ए नॉवेल' असं नाव देऊन टाकले आहे! आता, 'बांधकाम'च म्हटलं की तिथे सारख्या रंगारूपाच्याच विटा, एकसारख्या आकाराचे दगडाचे चौकोन हे येणारच! काही वर्षांमागे सरकारतर्फे प्रौढ-साक्षरांसाठी साहित्यलेखकांचे एक शिबिर घेतले गेले व त्यात लेखकांना सूचना देऊन काही विशिष्ट प्रकारची शैक्षणिक रंजक पुस्तके लिहून घेण्यात आली होती, त्या शिबिराचे नावही 'लिटररी वर्कशॉप' असेच होते, तेव्हाही माझ्या साहित्यिक मनाला तो 'वर्कशॉप' शब्द बराच खुपला होता. पण विचारान्ती लक्षात आले की फक्त 'स्फूर्ति, प्रतिभा' इत्यादींचे बांधकाम हाच केवळ अर्थ यात अभिप्रेत नसून कथानकाच्या रचना-पद्धतीलाच ही नावे योजली जाताहेत! मग ठीक, कारण या दृष्टीने इमारतीचे आणि कादंबरीरचनेचे तत्त्व दोन्हींत सारखेच. ते म्हणजे 'सामुग्रीची सुसंगत मांडणी करून उद्दिष्टाची उंची, सुशोभितपणा व सौंदर्य वाढवण्याचे! मग हे नाव स्वीकारायला कोणती हरकत?

या कादंबरीप्रसंगांच्या जुळणीतही एक नवे अवधान लेखकाला अवश्य ठेवावेच लागणार, ते म्हणजे कादंबरीतले हे सुटे सुटे प्रसंग तुम्ही एकत्र गुंफणार, ते एकमेकांना खुलून दिसणारे असेच तुम्हाला योजावे लागतील. चित्रकलेत तू पाहातेसच? दोन विरोधी रंग एकमेकांच्या सान्निध्यात विरोधानेच की काय, फार खुलून दिसतात, तसेच हेही कलम आहे बरं का. एकाच तोंडावळ्याचे, एकाच, 'टाईप'चे प्रसंग तुम्ही वारंवार रचीत गेलात, ते एकापुढे एक मांडून त्याच तऱ्हेने जुळवीत राहिलात तर तुमच्या कादंबरीत तोचतोपणा व कंटाळवाणेपणा येईल, हे नक्की. म्हणून प्रसंगरचना करताना एक लक्ष्यांत ठेवावे, ते हे की, विरोधानेही कादंबरीत जरूर मोहक रंग भरता येतो, अधिक आकर्षकता (वर्णनशैलीची) आणता येते, म्हणून विरोधी भावनांचे, पण दर ठिकाणी काही वेगळेपणा दाखवणारे, असेच प्रसंग मधूनमधून योजावे. त्याने कादंबरीचे देखणेपण वाढते. तसेच वेग-वेगळ्या ठिकाणची स्थलदर्शनात्मक पार्श्वभूमी सुचवणारे प्रसंग? त्यांचीही जुळणी कुशलपणाने अवश्य करायला हवी, तूच बघ, आपल्या महाराष्ट्रीय

जेवणात देखील मिष्टान्नाबरोबर खमंग चटण्या-लोणचीही लागतात, की नाही ? तसा चटकदारपणा या प्रसंग वैचित्र्याने कादंबरीच्या 'रंगतीत' येऊ शकेल, तो स्वागतार्हच आहे अलके.

अर्थात एकामागोमाग एकेक प्रसंग रचून, ते रंगवून लेखकाला कथानकातली गोष्ट सांगायची असते, हे तर आपण पाहिलेच. कथानकाच्या रचनेचे सुटेसुटे अवयव म्हणजे हे प्रसंगच. हे कशा अनुक्रमाने रचावेत ? असं तू विचारणार असशील ? खरं सांगायचं तर अलके, त्याचा ठरीव असा एखादा नियम सांगणं अशक्य आहे. ते सगळे प्रसंग मूळ कथानकाला गती देणारे व मूळ कादंबरीची कोणती ना कोणती घटना सूचित करणारे हवेत, हे, आपण पूर्वीच माहीत करून घेतले; पण त्यांचा अनुक्रम ? तो कसा हवा ?

मला वाटतं अलके, तुम्ही कथानक जे निवडणार, त्याच्या स्वरूपावर प्रसंगरचनेचं तंत्र पुष्कळसं अवलंबून असतं. तुमचं कथानक लांबरूंद, बऱ्याच मोठ्या व्याप्तीचे असेल, तर हे प्रसंग बहुसंख्य किंबहुना असंख्य लागतील व ते मोठमोठे योजले तरी सहज शोभून जातील ! या उलट 'प्रेमत्रिकोणांवरील' आटोपसर कथानक बघ. तेथे तर फक्त तीन प्रमुख व्यक्तींची गोष्ट असते. पति-पत्नी व प्रेयसी अगर प्रियकर ! एवढ्या तीन पावलांच्या वामनमूर्तीवरच सगळ्या कादंबरीची रचना अवलंबून ! येथे प्रसंग सुटसुटीत, लहान व मोजकेच योजावे लागणार व जास्त प्रसंगांना 'नो व्हेकन्सी'ची पाटी दाखवून कथानकातून घालवून द्यावे लागणारच ! पूर्वी मी गोफासारखी रचना म्हटली, त्याचा असा चिटुकल्या कथानकात उपयोग करणे फार कठीण. येथे तर अवघे तीन रंग ! पण तीन रंगी गोफाची किंवा वेणींची वीणही तू स्वेटर्समध्ये वगैरे पाहिली असशीलच, तीही छान रंगीत विणली तर नेत्रसुंदर दिसू शकते व गुंफणीच्या दृष्टीने अधिक सोपी पण असते ती. यातल्या प्रसंगांची निवड मात्र फारच चोखंदळपणे करावी लागते अलका, कारण कादंबरीत यांमुळेच लेखकाला नाजूक मनोविश्लेषण व उत्कट भावदर्शन घडवता येते !

अलके, ही प्रसंगांची चोखंदळ निवड तू कशी करशील ? सांग पाहू ? समज की तुला एक सुरेख साडी घ्यायची आहे दुकानात, काय ? तू एक

नमुना मागितलास की, दुकानदार पंचवीस साड्यांच्या सुळसुळीत मनोहर घड्या उघडून तुझ्या पुढ्यात मांडतो ! पण तुझ्या हातात रक्कम मोजकी आहे व साडी फक्त एकच घ्यायची आहे, मग ? साडीची किंमत व तिचं रंगरूप, पोत, रंगसंगती व डिझाइन, इत्यादींचा सर्वांगीण विचार करून तू निवड करतेस, होय ना ? बस्. अगदी हाच प्रकार कथारचनेत प्रसंग निवडून घेण्याचा. ' मोजकेपणा 'चे ' बजेट ' यांतही हवेच व तेवढ्याच मर्यादेत निवडक पण वेचक प्रसंगांची योजना करण्याचेही कसब पाहिजे. या योजनेबद्दलच आणखीही एक गोष्ट मला इथेच सांगायला हवी, ती म्हणजे प्रसंगांची जुळणी करताना त्यांचा क्रम वा अनुक्रम कसा असावा म्हणजे गुंफण मनोवेधक ठरेल, त्याबाबतची.

अलके, एक महत्त्वाची गोष्ट आधी ध्यानी घे, ती म्हणजे लेखकाच्या मनात कादंबरीतील महत्त्वाच्या घटना जरूर संकल्पित असतात– (निदान माझ्या मनात तरी त्या कादंबरी लिहिण्यापूर्वीच प्रकटलेल्या मला स्मरतात.) असे मी मागे तुला म्हटले होतेसे वाटते. तर या एकेक महत्त्वपूर्ण घटनेला अधिक प्रभावी करण्यासाठी तिच्याभोवती छोट्या छोट्या अनेक प्रसंगांची योजना असावी. थोडक्यात म्हणजे फुलांच्या मोठ्या गुच्छाप्रमाणे ही रचना अधिक सोईची. गुच्छात मध्यभागी मोठी फुले व बाजूंनी छोटीछोटी भिन्न आकाराची, वेगळ्या रंगांची फुले गुंफली जातात, तेच तत्त्व या छोट्या मोठ्या प्रसंगांच्या जुळणीतही ठेवता आल्यास ती वेधक ठरेल ! उदा. कल्पना करू, की बाबासाहेब हे एक सधन गृहस्थ, अति निर्दय व कपटकारस्थानी आहेत व ' त्यांनी पुढे घराच्या संपत्तीचा वारस ठरणाऱ्या आपल्या अनाथ, मातृपितृहीन पुतण्याला हात धरून घराबाहेर काढले ',ही आगामी प्रमुख घटना कादंबरीत पुढे लिहिली जाणार आहे– तर चतुर लेखक ही महत्त्वाची घटना आधीच सांगून तिची मजा घालवणार नाही ! तो त्या गृहस्थाच्या उग्र निर्दय स्वभावाची चुणूक वाचकांना आधी दाखवून त्यांना थोडे ' सजग ' करील व यासाठी दोन-तीन छोटुकले प्रसंग दाखवील. उदा. एक प्रसंग असाही योजता येईल..... ' पूजा करताना या छोट्या मुलाच्या हातून एक चांदीचे लहानसे निरांजन हरवले तेव्हा या बाबासाहेबांनी

त्याला फरफर ओढीत नेऊन खुशाल ऐन मुसळधार पावसात दोन तास उभ केले !'

तर कादंबरीच्या रचनेत छोटे मोठे प्रसंग कसे योजावे, हे माझे सांगणे आता तुझ्या ध्यानी आलेच असेल ? तुम्ही ते कसेही रचा, त्यांची जुळणी मनोरमच दिसायला हवी, हे यातले अतिशय महत्त्वाचे सूत्र विसरू नकोस ! फडक्यांच्या व्याख्येची याबाबतची मी परत एकदा तुला आठवण देते. ते म्हणतात–

' ललितकथा ही कथाच असली पाहिजे. कथा (म्हणजे) गोधडी असून भागणार नाही '

समजलं ना ? तेव्हा यांचा क्रम, तोही नीट व वाचकांना पसंत पडेल असा सुसंगतच नको का अलका ? समजा की, कुठे तरी अचानक विद्युत्पात झाला अशी एखादी घटना तू वर्णन केलीस. छान ! ही घटना वेधक आहे व कथानकाला धक्का (व गतीसुद्धा !) देणारी आहे हे एकदम मान्य. पण या महत्त्वपूर्ण घटनेने नायकाला वा नायिकेला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, असा कोणता Shock बसला वा नुकसान झाले, याचे वर्णन तू नंतर कुठे तरी छोट्या प्रसंगातून अवश्य द्यायला नको का ? आणि ही त्या कादंबरीची मध्यवर्ती घटना आहे की तिच्या एखाद्या कानाकोपऱ्यातली ? हेही बघायला हवंच. कानाकोपऱ्यातली असली तर प्रश्नच नाही, मग, ' शेखरच्या इमारतीच्या एका भितीला वीज चाटून गेली, पण सुदैवानं फार हानी झाली नाही, फक्त घरदुरुस्तीसाठी त्याला नायिकेच्या गावाहून तिकडे जलदीने निघून जावे लागले ' इतका उल्लेख बस्; पण ही मध्यवर्ती घटना असली तर ? तर ती वेगळी दाखवावी लागेल, समजा की, विद्युत्पाताने नायिकेचे वडीलच जर एकाएकी दुखावले अगर अपंग झालेले दाखवले तर ? तर मग कादंबरीतील ही मध्यवर्ती घटना असल्यास कादंबरीचा एकंदर नकाशाच पार बदलून जाईल. नायिकेवर मग बापाची आर्थिक वा आरोग्यविषयक जोखीम येऊन पडेल व तिचे पहिले फुलपाखरी आयुष्य एकदम निराळे होऊ शकेल ! होय की नाही ?

तर अलका, घटनेचा क्रम, तुम्ही ती घटना मध्यवर्ती व केंद्रस्थानी योजणारी घेणार की सर्वसामान्य अशीच घेणार, यावरच अवलंबून राहतो.

वरील उदाहरणांत नायिकेची अवघडलेली मनःस्थिती, एकाएकी तिच्यावर पडलेल्या नव्या कुटुंबभाराने तिची बदललेली वृत्ती, तिच्या आर्थिक परिस्थितीचा बदल ही येणारच व त्यामुळे नायकावर काय काय प्रतिक्रिया घडली, हीही दुसरी, पण तितक्याच महत्त्वाची घटना ठरणारच ! तेव्हा कथानकातील महत्त्वाच्या घटना कोणत्या व पूरक छोट्या कोणत्या ही स्वतः लेखकानेच स्वतःशी विचार करून निश्चित ठरवण्याची गोष्ट आहे व एकदा ते ठरल्यावर त्यांचा क्रम कसा लावावा हे तिसऱ्याने मुळीच सुचवायला नको !

वर्णित घटनांच्या क्रमावद्दल आणखी एक निराळाच मुद्दा मला सुचतो आहे, तो म्हणजे, एका घटनेतून दुसरी घटना निर्माण व्हायला हवी, हाच. अशी रचना असेल तर त्यांत सहजता येते म्हणजेच कृत्रिमता राहत नाही, वाचक संतुष्टपणे मनात म्हणतो, 'होय, हे असंच होणार बुवा ! कारण पूर्वी अमुक झालेलं आहे, त्यातून पुढे ही घटना क्रमप्राप्त दिसते खरीच.'

उदा. समजू की, ' नायकानं प्रणयाराधन करून प्रेयसीशी लग्न ठरल्यावर एकाएकी काही कारणाने नायिकेशी लग्न करायला साफ नकार दिला आहे व हे कारणही त्याला नायिकेला सांगता येण्याजोगे नाही आहे !' ही मध्यवर्ती घटना. आता यापुढे या दोघांचे परस्परांशी वागणे कसे होईल ? नायिका क्षुब्ध होईल, चिडेल, रडेल, उदासीन होईल, कदाचित संतापाने सूडाकडेही तिची प्रवृत्ती वळेल, कदाचित आमरण अविवाहितही राहायचं ती ठरवील– अनंत प्रकार कल्पिण्याजोगे नाहीत का असा मोठ्या प्रसंगातून ? आणि उलट तो नायक ? त्याची मनःस्थिती ? हा नकार त्याला कोणाच्या मानसिक दडपणाने, अगर कोणाच्या अंतिम इच्छेसाठी अगर परिस्थितीच्या आकस्मिक फरकामुळे अगर स्वताच्याच एखाद्या रोगाच्या आकस्मिक प्रदुर्भावामुळेही, मनात नसताना द्यावा लागतो आहे, अशीही शक्यता असू शकेल ! मग त्याच्याही मनाची, आयुष्याचे श्रेय व प्रेय यांना दूर झिडकारून टाकण्याने कमी तगमग झाली असेल काय ? या सर्व परिस्थितीचे अनुसूचन करायला छोटे मोठे प्रसंग तुम्ही योजाल तेवढे कमीच आणि भावदर्शन कराल तेवढे थोडेच ! येथे मध्यवर्ती घटनाच कृष्णकमळाच्या फुलासारखी आहे, म्हणजे मध्यातून अनंत बारीक पण स्वतंत्र पाकळ्या

फुटणारी. यापेक्षाही ' नायक पैशाच्या अगर सौंदर्याच्या लालसेने खुशाल दुसऱ्या युवतीशी लग्न ठरवतो असाही एक अगदी भिन्न पर्याय तुम्ही योजू शकता ! आपल्या कथानकाचे निर्माते आपणच आहात ! याउलट नायिकेचं प्रियकरावर अत्यंतिक प्रेम असूनही काही ना काही विचित्र परिस्थितीमुळे तिला त्याला नकार द्यावा लागतो आहे असेही कथानक असू शकेल. शकेल का ; असतेच. अगदी अलीकडचे ताजे व सुरेख उदाहरण पाहायचे असेल तर डॉ. सुमती क्षेत्रमाडे यांच्या ' युगंधरा ' कादंबरीची नायिका ' युगंधरा ' हिचे पाहावे. या संबंधीचे जुने पाहण्याजोगे उदाहरण वसुंधरा पटवर्धन यांच्या ' प्रीतिस्वप्न ' कादंबरीतलेही असेच– फार चटका लावून टाकणारे आहे. तुला लायब्ररीत ही कादंबरी मिळू शकेल, एकदा या दृष्टीने तू ती वाचून पाहा.

आणखी एक अलकाताई ! या प्रसंगांच्या निवडीबद्दल कटाक्षाने लिहिण्याचाही ' प्रसंग ' हाच ! मी मोजके प्रसंग म्हटले पण याचा अर्थ प्रत्येक प्रसंग अती महत्त्वाचा, व मोठा असाच पाहिजे असे मात्र मुळीच नाही अलके ! लेखक कादंबरी लिहायला बसतो, त्यामुळी या ढोबळ ऊर्फ स्थूल प्रसंगांची रूपरेषा त्याला मनोमनी निश्चित करता येते, पण कथेतले बारीक सारीक प्रसंग ? त्यांनीच तर कथेतला सूक्ष्म तपशील भरला जातो, कथानकाला मोहकतेचा साज चढतो आणि कोमल नाजूक भाव-भावनांचे लेणे प्राप्त होते. आणि अलकाताई, नेमकं हेच नव्या लेखकांना सुरुवातीला जमत नाही ! हे सर्व छोटुकले प्रसंग, माळेतल्या छोट्या मण्यासारखे. कदाचित ते वेगळ्या रंगरूपाचेही असू शकतील. व त्यांचे उद्दिष्टही, कधी व्यक्तिदर्शन, कधी वातावरणाचे सूचन, कधी स्वभावचित्रण किंवा कधी भावविश्लेषण असे वेगवेगळेही असू शकेल– नव्हे, नव्हे ते तसे असावेच लागते, तरच ललित कादंबरीला मनोहरित्व व लालित्य दोहोंचीही कांती चढते !

हे छोटे प्रसंग कशानं चैतन्यमय होतात अलके ? तर, एका शब्दात उत्तर म्हणजे वर्णनांनी. या वर्णनांनी लेखकाच्या लेखनगुणांची साक्षच पटते असे म्हणेनास ; त्याची कमावलेली, सराईत भाषा, त्या भाषेवर त्याने चढवलेले उपमालंकार व उत्प्रेक्षांचे लेणे हळुवार भावदर्शनाचे कसब व त्याने केलेले

परिस्थितीचे सूचक व यथायोग्य वर्णन यांनीच ! अर्थात् एकदम हे सारे तंत्र जमणारे नव्हे, पण सराईतपणाने हळूहळू जमू लागेल तुला.

आणखी एक गोष्ट. 'गुंफण' म्हटली की जशी रंगसंगती व सौंदर्य यांची जाण मनात उद्भवते तशीच 'रचना' म्हटली की प्रमाणबद्धता व व्याप्ती यांचेही विचार मनात येतात. लेखकाने आपल्या कादंबरीला या चारी गुणांनी तेज चढवले पाहिजे. प्रथम व्याप्तीबद्दल थोडसे पाहू.

अलके, लेखकाला आपली कादंबरी केवढी, म्हणजे साधारण किती पृष्ठांची, केवढ्या व्याप्तीच्या कथानकाची होणार आहे याचा अंदाज स्पष्टपणे व कादंबरी लेखनापूर्वीच हवा ! प्रकरणे किती येणार ? केवढाली, हासुद्धा ! तू म्हणशील की 'अमुक पृष्ठांची कादंबरी होणार हे आधीच कसे सांगता येईल ? लिहिण्याच्या ओघात पाने किती होतील ती होतील ! कदाचित सवाशे अगर चारशेही ! काय सांगावं ?'

एकदम मान्य. पण इतका सूक्ष्म अंदाज करायला मी कुठे सांगतेय् तुला ? तुझी कादंबरी सव्वाशे-दीडशे पानांची होणार, की चारशे-पाचशे पृष्ठांची होणार, हे स्थूल-ढोबळ, अनुमान तर तुला सहज करता येईल ना ? मग झालं तर. म्हणणे इतकेच की त्या मानाने तू प्रसंग किती व कसे योजायचे, याचा एक संकेत मनाशी करून ठेव. वाटल्यास महत्वपूर्ण घटना (त्या सुप्तरूपाने लेखकाच्या मनात घोळत असतातच) एका कागदावर नोंदून ठेव, छोट्या प्रसंगांची नोंद नको, ते आपोआप सुचतात लेखकाला.

●

अलके, मागे एका पत्रात (मला वाटतं, 'कथेचे बाह्य सौंदर्य' या विषयीच्या) मी कथेच्या बांधेसूदपणाबद्दल लिहिलं आहे तोच बांधेसूदपणा आणि प्रमाणबद्धता कादंबरी रचनेबद्दलही अवश्य असायला हवा. अडगळीच्या खोलीसारखी आपली कादंबरी, होऊ नये. कितीही प्रसंग घुसडून दिल्याने व प्रकरणे लांबचलांब नाहीतर अगदीच चिटुकली करण्याने कादंबरीचे बाह्य-सौंदर्य पार बिघडते ! – पण हे बिघडू नये म्हणून एक फार सोपा उपाय आहे. तो असा की, कादंबरी लिहून झाली की, स्वतःच एकवार तटस्थतेने ती परीक्षकाच्या, समीक्षकांच्या निःस्पृहतेने लेखकाने एकवार चाळून पाहावी, वाचून पाहावी. महत्त्वाच्या परीक्षेचा पेपर लिहिल्यावर दक्ष विद्यार्थी तो नीट

तपासल्याविना वरिष्ठांच्या हाती देत नसतो तशीच ही तऱ्हा. मी तर ही तटस्थता 'मनी आणण्यासाठी कादंबरी लिहून महिना-दोन महिने अगदी दृष्टीआड ठेवून देते ! मगच पुऱ्या तिऱ्हाईत दृष्टीने मी ती वाचू शकते व किरकोळ दुरुस्त्या करू शकते–'

अर्थात् ह्या दुरुस्त्या कथानकाच्या आशय विषयाबद्दल मात्र नसतात तर त्याचा प्रमाणशीरपणा, बांधेसूद आकार व सुडौल बांधा असावा, दिसावा, या दृष्टिकोणानेच केलेल्या असतात. चित्र पूर्ण झाल्यावर चित्रकारही 'फायनल टचेस्' चित्राला देतो म्हणून ऐकते, तसेच हेही. काय होते अलका, लेखक कादंबरी अंतःस्फूर्तीने लिहीत जातो ना ? त्यावेळी त्यात काही प्रकरणे अगदी त्यालाही नकळत भली मोठमोठी होत जातात-- ती काही अगदीच चिटुकली होतात ! हे व्यस्त प्रमाण कादंबरीचा बांधा बिघडवणारे ठरेल ! प्रकरणे किती व केवढचा व्यक्तीची हवी ह्यांचाही एक स्थूल अंदाज लेखकाने आपल्या मनाशी कादंबरी लिहीत असताना करून ठेवावा असे मला मनापासून वाटते. आणि हा मुद्दा मोठमोठचा लेखकांनीही आवर्जून सांगितलेला आहे. नुकतेच या विषयावरचे एक रंजक पुस्तक हाती आले. त्याचे नाव 'Novelists on the novel.' या पुस्तकात अनेक लेखकांची स्वतःच्या लेखनाबद्दलची मते, अनुभव, सिद्धान्त व खासगी पत्रे, वगैरे सारे (पत्ररूपांतच) प्रसिद्ध झाले आहे. या पुस्तकांत 'प्रकरणांची प्रमाणबद्ध आखणी' करण्याबद्दलचाही मजेदार उल्लेख मला आढळला. अर्नोल्ड बेनेट हा एक प्रसिद्ध व उच्च दर्जाचा पाश्चात्य लेखक, त्याने आपल्या मित्राला लिहिलेल्या एका पत्रात म्हटले आहे–

> 'मध्यरात्री हे प्रकरण संपवले. छान झाले आहे. पूर्वीचे एक प्रकरण व शेवटची ही प्रकरणे छान उतरली आहेत दोन प्रकरणे मात्र लांबचलांब झाली, अप्रत्यक्ष निवेदनाचा (कदाचित चौथ्या दर्जाच्या !) प्रभाव यावर दिसतो, पण इथे तिथे पडलेले संवाद, व व्यक्तींच्या हालचालींची सूक्ष्म वर्णने मात्र खात्रीलायक सुरेख व सूक्ष्म उतरली आहेत. '

पाहिलेस ना अलका ? हा थोर लेखक आपली कादंबरी लिहून पूर्ण झाल्यानंतर स्वतःच तिच्यातील प्रकरणांचा तटस्थ व चिकित्सक परीक्षक कसा

झाला आहे ते ? आपली कादंबरी बांधेसूदपणानेही आकर्षक व्हावी म्हणून, ही काहीशी वेगळ्या प्रकारची दक्षता घेण्याचे उदाहरण नव्या लेखकांनी जरूर चिंतनीय मानायला हवे. तुला पटते ना हे ?

कादंबरीची रचना ऊर्फ गुंफण या संबंधातील एका निराळ्या मुद्द्याची काळजीही लेखकाला घ्यावी लागतेच ! तो मुद्दा सारखा डोक्याशी किट्किट् करणारा– अगर टिक्टिक् करणारा, म्हणजे घडयाळाचाच आहे ! गोष्टीत घडयाळ ? अन् त्याची काळजी कसली ? असं नवल तुला वाटणारच ! तेच तर सांगतेय आवर्जून .

अलके, आपल्या कादंबरीतील प्रसंगरचनेला कालमापन व कालसूचन ही दोन्ही अगदी आवश्यक आहेत, हेच पुष्कळसे लेखक विसरलेले दिसतात व त्यामुळे त्यांच्या कथनांत चांगलाच घोटाळा उडालेला वाचकाला दिसतो. कसा ? पहा हं !

समजा अलकाताई, तुम्ही सतराव्या अगर अठराव्या शतकातल्या घटनांवर कादंबरी लिहिता आहा. आता त्याकाळी अस्तित्त्वातच नसलेल्या अनेक बाबी– म्हणजे कागदी नोटा, चिरूट, निषेधसभा, इंग्रजी वर्तमानपत्रे, फार काय, रेल्वेही त्याकाळी नव्हती व मोटारही नसे तर ह्या सर्वांचे उल्लेख तुमच्या कादंबरीत नजर चुकीने आले (तूर्त आपल्या मनाला ही दृश्ये, हे शब्द, व या चिजा अगदी चिकटलेल्याच असतात म्हणून चुकून त्या लेखनातही उतरण्याचा संभव आहे, आहे ना ?) तर कादंबरी लेखनातल्या यशाचे, शेकडा दहा मार्क झटक्यानें उतरतील. असे होता कामा नये !

हे कालाचे भान विसरून निर्माण झालेले काही चित्रपटही मला आठवत आहेत. जुना ' संत तुकाराम ' हा एक नावाजलेला चित्रपट. त्यातली हकीगत व परिस्थिती तीनशे वर्षांपूर्वीची होती व तरी एका विहिरीला लोखंडी आधुनिक गर्डर्स बसवलेले दृश्य दिग्दर्शकाची नजर चुकवून तेथे उमटले होते ! अनेक ऐतिहासिक कादंबऱ्यांतून प्रसंग जुन्या काळचे, वर्णन आजच्या जीवनाचे अशी विसंगती मी पाहिली. या संदर्भात, मला एकदा स्टेजवर प्रत्यक्ष घडलेला एक विनोद स्मरतो आहे बघ. नाटक मृच्छकटिक. शर्विलक व त्या वसंतसेनेची दासी, या प्रेमिकांचा प्रवेश चालू होता. वसंतसेनेच्या घरात शिरून शर्विलक आपले काम करून परत येणार होता.

दासी त्याला एकदम म्हणाली,

'पण तू लवकर परत ये हं. मला एकटीला व्हरांड्यात इथे अगदी 'ऑकवर्ड' होतं !'

अन् मग त्या प्रसंगाचे गांभीर्य मोडून सारे थिएटर हास्याने दुमदुमून गेले होते ! मला वाटतं, या उदाहरणाने, जुन्या काळच्या हकीगतीत दृश्यांत, संवादांत, एखादा आधुनिक शब्दही रसिकांना किती खुपतो, किती विसंगत दिसतो व केवढी रसहानी करू शकतो हे तुझ्या निश्चित ध्यानी आले असेल !

कालमापनाच्या दृष्टीने आणखी एक गोष्ट तुम्हाला सुरुवातीलाच मनाशी ठरवावी लागणारी अशी आहे ती म्हणजे, तुमचे कथानक किती मुदतीचे व केवढ्या कालखंडाचे आहे ही निश्चिती, प्रथम मनाशी करणे ! काही कादंबऱ्या पिढ्यानुपिढ्यांची हकीकत सांगतात. बी रघुनाथ यांचे 'आडगावची माणसे' हे एक चाळीस वर्षांपूर्वीचे पुस्तक अशा तऱ्हेचे आहे, मिळाल्यास वाच. अशा हकीगती सांगताना दर पिढीला समाजात जो बदल होतो व जीवनात जे नवे आचारविचार वा व्यवहार उदित होतात त्यांचे यथातथ्य व कालक्रमाला अनुषंगिक असे वर्णन करता आले पाहिजे. आणि निश्चित ते समर्थ लेखकांचेच काम ! पण याउलट कादंबरीतला कालखंड हा अगदी लहान– म्हणजे चाळीस-पन्नास वर्षांचा, अगर केवळ पाच वर्षांचाही असू शकतो, फार काय फक्त वर्षभरातही घडलेल्या घटना जुळवून संपूर्ण कादंबरी झालेली दृष्टीस पडते. हे प्रकार पुष्कळच असल्याने तुला निवड करायला वावही जास्तच सापडेल. सुमारे तीस वर्षांपूर्वी वाचलेली नारायण हरि आपटे यांची 'पाच ते पाच' नावाची एक कादंबरी आठवते मला. केवळ चोवीस तासांत कथानकातले प्रसंग घडल्याची हकीगत त्यात होती व तरीही ती पूर्ण कादंबरी होती. तर कालखंड केवढाही असेना ? तो कालसापेक्ष मजकुराने यथातथ्य चित्रित व्हावा, एवढेच मुद्द्याचे सांगणे.

एका इंग्रजी लेखकाने मला वाटतं गुस्ताव फ्लॉबरने, आपल्या 'ॲस्पेक्टस ऑफ द नॉव्हेल' या पुस्तकांत याबद्दल आणखी एक महत्त्वाची गोष्ट सुचवली आहे. तो म्हणतो की–

'लेखकाने वाचकांच्या आठवणीची बाजूही विसरता कामा नये ! समजा की राजाराणीची गोष्ट आहे, अन् राणी मृत्यू पावली आहे, हे तुम्ही सांगितलंत. तर राणीच्या दुःखद मृत्यूनंतर त्या राजाच्या अस्तित्त्वाचाही तपशील तुम्ही देणं जरूर आहे ! ते विसरलात तर वाचकांचा वाचताना घोटाळाच उडेल ! कादंबरीत अशी शेवटे लोंबकळत राहू नयेत हीच वाचक लेखकाकडून अपेक्षा करतो.'

खरे तर, ही सूचनाही किती योग्य आहे ! रचनेच्या हव्यासाने, समजा, तुम्ही बरीच पात्रे निवड करून त्यांना जर कादंबरीत प्रवेश दिलात, तर त्या प्रत्येक पात्राचं त्या कादंबरीतलं जीवन किती मुदतीचे व कशासाठी हे, तुमचे तुम्हीच निश्चित ठरवलेले असे कलम असायला नको का ? जेवढी कालखंडाची कक्षा तुम्ही आखून घ्याल, त्या क्षेत्रांत तुम्ही निर्माण केलेल्या पात्रांना योग्य तेवढीच जागा मिळाली पाहिजे ! तेव्हा, कादंबरीच्या वर्णनक्षेत्रात कालमापनाची ही बाजू उपेक्षित समजता येत नाही, हे आता तुझ्या नीट लक्षात आलंच असेल ?

अलका, रचनेच्या बाबतीत अनेक गोष्टी मी तुला सांगितल्या, त्यातून मोठे प्रसंग– किंवा महत्त्वपूर्ण घटना व पूरक घटना, यांचे आपसातले नाते तुझ्या लक्षात आले असेलच ? तरी पण हे मनासमोर नित्य सारांशरूपाने यावेसे तुला वाटत असेल तर मग आपण त्याबद्दलची एक छोटी नियमावली करू. म्हणजे ती ध्यानात राहू शकेल तुझ्या. ते नियम असे :

१)दरेक घटना मोठ्या व्याप्तीची नको, मात्र लहानसहान प्रसंग पुष्कळ योजले जावे व ते विविधतेने नटलेले असावे.

२) ही विविधता संवाद, निसर्गवर्णने, भिन्नभिन्न व्यक्तिवर्णने, मनोविश्लेषण, वातावरणाचे सूचन इत्यादी अनेक लेखनपैलूंनी आकर्षक करता येते.

३) दरेक महत्त्वपूर्ण घटनेच्या आसपास छोट्या रचनेच्या घटना असलेल्या बऱ्या. माळेतले मधले पदक असते तशी महत्त्वाची घटना केंद्ररूप, व पदकाभोवती जे मणिमोती जडवलेले असतात, तशा छोट्या घटना, हेही सूत्र

उत्तम ठरेल.

४) छोट्या घटनांचेद्वारेही व्यक्तिदर्शन, स्वभावदर्शन व मनोदर्शन अधिक प्रभावी सूक्ष्म तपशीलाचे घडवता येते. मोती छोटा असेना, तो पाणीदार तेजस्वी असू शकतो हेही ध्यानी घ्यावे.

५) दरेक छोटी घटना मोठ्या घटनेला पूरक हवी, अगर एकूण कथानकाशी तरी ती संबंधित पाहिजे, कोठेही ती बांडगुळाप्रमाणे कथानकातून वेगळी पडलेली दिसू नये !

*

मला वाटतं, कथानकाच्या रचनेबद्दल मी मला सांगता येण्याजोगं होत ते बहुतेक तुला सांगितलंच, तरीपण तुझा एक मिस्किल प्रश्न मला इथेही ऐकू येतो आहेच. 'रचनेत, प्रसंगांचं प्रसंगावधान व प्रकरणाचा प्रमाणशीरपणा कसा ठेवावा हे आता लक्षात आलं ग, पण कादंबरीत घटनाच जास्त महत्त्वाच्या ? की पात्रे ? यावद्दल मात्र मिठाची गुळणी धरून बसल्याप्रमाणे तोंड मिटून तू काहीच कसं मला सांगत नाहीयेस अजून ?'

छान. तुझा आक्षेप मला एकदम मान्य. मी आता पुढच्या प्रकरणात तिकडेच वळणार आहे, कारण व्यक्ती हाच तर कथानकाचा (अन् कथा रचनेचासुद्धा !) पाया, शरीरातला आत्माच म्हणेनास ? ज्योतच नसली तर दिवलीचं महत्त्व नाही, त्याप्रमाणे व्यक्तीवाचून कथानकही अंधारलेलेच. तेव्हा आता 'कादंबरी दोनच प्रकारांची' या पुढल्या प्रकरणात मी व्यक्ती, व वातावरण या दोहोंचाही प्रत्येकी स्वतंत्र विचार ओघाने करणारच आहे. आधी घर बांधावे तेव्हा मग त्यात व्यक्ती राहायला येतात हेच सूत्र इथे ! तर तू आता त्यासाठी पुढच्या पत्राची वाट बघ हं ! अच्छा, बाय् बाय् डिअर–

तुझी,
सौ. ताई

□ □

१६ व्यक्तिप्रधान कादंबरी--

अलका,

या क्षेत्रातल्या एका महत्त्वाच्या विभागाकडे आपण आज वळत आहोत. मागे आपण कादंबरीचे वर्गीकरण दोन-तीन तज्ज्ञांनी केलेले पाहिले. आजघडीला असे वर्गीकरण करू म्हटले तर 'वर्गीकरण' नावाचे एक स्वतंत्र पुस्तकसुद्धा होऊ शकेल, इतके याचे 'वर्ग' पडतील. तूच बघ, एक सामाजिक कादंबरी म्हटली तरी, आज तिचे ग्रामीण, प्रादेशिक, नवकादंबरी, मनोविश्लेषणात्मक राजकीय, प्रचारात्मक, कौटुंबिक असे कितीतरी प्रकार झाले आहेत. या सर्व वर्गांचे 'वर्गमूळ' काढण्याची खटपट करीत बसण्याऐवजी या सर्वांचा समावेश होईल, असे एक सोपे व साधेसे वर्गीकरण मी योजित आहे. त्यानुसार, कादंबरी दोनच प्रकारांची ! वातावरणप्रधान व व्यक्तिप्रधान. स्थूल व्याख्याच हवी तर अशी–


> 'कादंबरी दोनच प्रकारांची; सर्व कथनातून जी व्यक्तींबद्दलच प्रामुख्याने काही ना काही सांगते, ती व्यक्तिप्रधान कादंबरी व ज्यात व्यक्तीहून वातावरणालाच अधिक महत्त्वाचे स्थान असते, व त महत्त्व व्यक्तवण्यासाठी व्यक्ती निर्माण केल्या जातात ती वातावरणप्रधान कादंबरी.'

अलके, 'नव्या लेखकाने कादंबरी व्यक्तिप्रधान लिहावी की, वातावरण-

प्रधान ?' हा तुझा प्रश्न खरोखरच मार्मिक व चांगला आहे. त्याचे उत्तर तसे कठीण नाही. खरे सांगायचे तर ह्याची निश्चिती इतर कोणाहीपेक्षा स्वत: लेखकच अधिक योग्य तऱ्हेने करू शकतो ! लेखकाला एखादे कथानक जर एकादा व्यक्तीविशेष पाहून सुचलेले असेल तर त्यावरची कादंबरी ' व्यक्तिप्रधान 'तेनेच रंगेल ! उलट हे कथानक, एकादी सामाजिक विषम घटना अगर समस्या पाहून सुचले किंवा कोठली तरी लक्षणीय परिस्थिती, (स्थलकालाशी, राजकीय घडामोडी, ऐतिहासिक परिसर वगैरेशी संबंधित असलेली) पाहून त्याच्या मनात कादंबरीविषय स्फूर्त झाला असेल तर ते कथानक वातावरणप्रधानतेनेच खुलेल, हे उघड आहे. मात्र या ठिकाणी वातावरण व परिस्थिती यांचे एकामेकाशी अहिनकुलाप्रमाणे विरोधी वा विसंवादीच स्थान असते असे नाही हं ! उलट ते तसे नसावेच ! कादंबरी-तील वर्णनविषयाचे ' व्यक्ती व वातावरण ' असे दोन स्वतंत्र व सारख्याच महत्त्वाचे भाग असले तरी ते एकमेकांनी कोंदण व हिरकणी याप्रमाणे पूरक व सुसंवादी असावे लागतात, हा महत्त्वाचा मुद्दा तू नोंद करून ठेव आधी !

तर आपल्या कादंबरीत कोंदण कोणते व मधला हिरा कोणता हे स्वत: लेखकच निश्चित करू शकतो हे समजले ना ? थोडक्यात म्हणजे जेथे सर्व कादंबरीचे धोरण एखाद्या प्रमुख व्यक्तीबद्दलच आदरून व आवर्जून काहीतरी सांगण्याकडेच दिसते, तेथे हिरकणी ती व्यक्ती व कोंदण हे तिच्या भोवतीच्या परिसराचे वा वातावरणाचे स्थान ! याउलट जेथे परिसर वा परिस्थितीच कादंबरीचे महत्त्वाचे वर्णनकेंद्र व त्यामानाने त्यांतल्या व्यक्ती दुय्यम ठरतात तेथे व्यक्ती कोंदणरूप व हिऱ्याचे स्थान वातावरणाकडे जाते, हे तुझ्या ध्यानात आले असेलच आता ? तर आज या पत्रांतून तुला व्यक्तीप्रधान कादंबरीबद्दलच मी बरेच काही सांगणार आहे.

अशा कादंबरीचे सारे यश केवळ लेखकाने घडवलेल्या व्यक्तिदर्शनाच्या सरसतेवरच अवलंबून असते. हे व्यक्तिदर्शन कोणकोणत्या प्रकारे करता येते ? हा प्रश्न तुझ्या नजरेत उमटलेला इथूनही मला दिसतो आहेच. त्याचे उत्तर म्हणून एक छोटासा त्यासंबंधीचा आलेखच मी लिहीत आहे तो असा—




वरील आलेखाचा थोडासा विस्ताराने असा विचार करू आपण. व्यक्ती दिसते कशी ? तिचे रूपरंग, बांधा, चर्येची ठेवण, प्रकृती, कपडे, बोलण्याची पद्धत, काही ठराविक सवयी इत्यादीतूनच त्या व्यक्तीचे बाह्यरूप दर्शन वाचकांना घडते. पण मला वाटते, यासंबंधी मी पहिल्या पहिल्या पत्रांपैकी 'निरीक्षण' या पत्रांतून तुला पुष्कळच सविस्तरपणे सांगितलं आहे, तेव्हा पुनरुक्ती कशाला ? दुसरा विभाग, व्यक्ती कशी आहे, याबद्दलचा. यांत त्या व्यक्तीच्या स्वभावाच्या सर्व स्थूल वा सूक्ष्म छटा प्रकट व्हावयाच्या असल्याने व तो स्वभावही त्या व्यक्तीचे शिक्षण, संस्कार व वातावरण यांच्यातूनच बनत असल्याने, या तीन गोष्टींच्या आधारानेच, हे स्वभावदर्शन हळुवारपणे करावे लागते, तर ते यशस्वी होते ! आणि तिसरा, सर्वांत अवघड प्रकार, त्या व्यक्तीच्या मनोदर्शनाचा किंवा मनोविश्लेषणाचाच ! त्याच व्यक्तीचे बोलणे, वागणे विचार व तदनुरूप त्याकरवी घडणाऱ्या कृति या सर्वांचा सुंदर व समुचित मेळ घातला गेला तर मनोदर्शन एकदम 'मनोज्ञ' होते अलके ! पाहिलेस ना ? एक व्यक्तिदर्शन म्हटले तरी त्यासाठी वरील तिहेरी तऱ्हेची सांगोपांग माहिती लेखकाने मनाशी निश्चित केली पाहिजे, त्या सर्वांतून या तिन्हीचे एकवटलेले सुंदर शब्दचित्र साकार होऊन वाचकांच्या नजरेसमोर उभे राहायला हवे ! असे काळजीपूर्वक केलेले व्यक्तिदर्शनच खरे प्रभावी ठरेल !

अर्थात, अलकाताई, व्यक्तिप्रधान कादंबरीबाबत मी इतक्या गोष्टींची

प्रधान ?' हा तुझा प्रश्न खरोखरच मार्मिक व चांगला आहे. त्याचे उत्तर तसे कठीण नाही. खरे सांगायचे तर ह्याची निश्चिती इतर कोणाहीपेक्षा स्वत: लेखकच अधिक योग्य तऱ्हेने करू शकतो ! लेखकाला एखादे कथानक जर एकादा व्यक्तीविशेष पाहून सुचलेले असेल तर त्यावरची कादंबरी ' व्यक्तिप्रधान 'तैनेच रंगेल ! उलट हे कथानक, एकादी सामाजिक विषम घटना अगर समस्या पाहून सुचले किंवा कोठली तरी लक्षणीय परिस्थिती, (स्थलकालाशी, राजकीय घडामोडी, ऐतिहासिक परिसर वगैरेशी संबंधित असलेली) पाहून त्याच्या मनात कादंबरीविषय स्फूर्त झाला असेल तर ते कथानक वातावरणप्रधानतेनेच खुलेल, हे उघड आहे. मात्र या ठिकाणी वातावरण व परिस्थिती यांचे एकामेकाशी अहिनकुलाप्रमाणे विरोधी वा विसंवादीच स्थान असते असे नाही हं ! उलट ते तसे नसावेच ! कादंबरी-तील वर्णनविषयाचे ' व्यक्ती व वातावरण ' असे दोन स्वतंत्र व सारख्याच महत्त्वाचे भाग असले तरी ते एकमेकांनी कोंदण व हिरकणी याप्रमाणे पूरक व सुसंवादी असावे लागतात, हा महत्त्वाचा मुद्दा तू नोंद करून ठेव आधी !

तर आपल्या कादंबरीत कोंदण कोणते व मधला हिरा कोणता हे स्वत: लेखकच निश्चित करू शकतो हे समजले ना ? थोडक्यात म्हणजे जेथे सर्व कादंबरीचे धोरण एखाद्या प्रमुख व्यक्तीबद्दलच आदरून व आवर्जून काहीतरी सांगण्याकडेच दिसते, तेथे हिरकणी ती व्यक्ती व कोंदण हे तिच्या भोवतीच्या परिसराचे वा वातावरणाचे स्थान ! याउलट जेथे परिसर वा परिस्थितीच कादंबरीचे महत्त्वाचे वर्णनकेंद्र व त्यामानाने त्यांतल्या व्यक्ती दुय्यम ठरतात तेथे व्यक्ती कोंदणरूप व हिऱ्याचे स्थान वातावरणाकडे जाते, हे तुझ्या ध्यानात आले असेलच आता ? तर आज या पत्रांतून तुला व्यक्तीप्रधान कादंबरीबद्दलच मी बरेच काही सांगणार आहे.

अशा कादंबरीचे सारे यश केवळ लेखकाने घडवलेल्या व्यक्तिदर्शनाच्या सरसतेवरच अवलंबून असते. हे व्यक्तिदर्शन कोणकोणत्या प्रकारे करता येते ? हा प्रश्न तुझ्या नजरेत उमटलेला इथूनही मला दिसतो आहेच. त्याचे उत्तर म्हणून एक छोटासा त्यासंबंधीचा आलेखच मी लिहीत आहे तो असा—



वरील आलेखाचा थोडासा विस्ताराने असा विचार करू आपण. व्यक्ती दिसते कशी ? तिचे रूपरंग, बांधा, चर्येची ठेवण, प्रकृती, कपडे, बोलण्याची पद्धत, काही ठराविक सवयी इत्यादीतूनच त्या व्यक्तीचे बाह्यरूप दर्शन वाचकांना घडते. पण मला वाटते, यासंबंधी मी पहिल्या पहिल्या पत्रांपैकी 'निरीक्षण' या पत्रांतून तुला पुष्कळच सविस्तरपणे सांगितलं आहे, तेव्हा पुनरुक्ती कशाला ? दुसरा विभाग, व्यक्ती कशी आहे, याबद्दलचा. यांत त्या व्यक्तीच्या स्वभावाच्या सर्व स्थूल वा सूक्ष्म छटा प्रकट व्हावयाच्या असल्याने व तो स्वभावही त्या व्यक्तीचे शिक्षण, संस्कार व वातावरण यांच्यातूनच बनत असल्याने, या तीन गोष्टींच्या आधारानेच, हे स्वभावदर्शन हळुवारपणे करावे लागते, तर ते यशस्वी होते ! आणि तिसरा, सर्वांत अवघड प्रकार, त्या व्यक्तीच्या मनोदर्शनाचा किंवा मनोविश्लेषणाचाच ! त्याच व्यक्तीचे बोलणे, वागणे विचार व तदनुरूप त्याकरवी घडणाऱ्या कृति या सर्वांचा सुंदर व समुचित मेळ घातला गेला तर मनोदर्शन एकदम 'मनोज्ञ' होते अलके ! पाहिलेस ना ? एक व्यक्तिदर्शन म्हटले तरी त्यासाठी वरील तिहेरी तऱ्हेची सांगोपांग माहिती लेखकाने मनाशी निश्चित केली पाहिजे, त्या सर्वांतून या तिन्हीचे एकवटलेले सुंदर शब्दचित्र साकार होऊन वाचकांच्या नजरेसमोर उभे राहायला हवे ! असे काळजीपूर्वक केलेले व्यक्तिदर्शनच खरे प्रभावी ठरेल !

अर्थात, अलकाताई, व्यक्तिप्रधान कादंबरीबाबत मी इतक्या गोष्टींची

वर एक यादी दिली, म्हणून बिचकायला नको. त्यातल्या व्यक्तिचित्रणाची मी तुझ्यासाठी एक छोटी, सोपी व्याख्या हवी तर करते, ती अशी–

> 'अमुक एका व्यक्तीचे स्वरूप व अंतःस्वरूप कसे होते, कसे बनत व घडत होते व त्यानुसार त्या व्यक्तीचे विचार व कृती कशीकशी होत गेली, यांचा एक सलग आलेख म्हणजेच व्यक्तिचित्रण !'

अशा प्रकारे ज्या कादंबरीतून प्रमुख व्यक्तींचे रूपविशेष, स्वभावविशेष, आणि त्यांना सुसंगत अशी वृत्ती व कृती ही प्रभावी तऱ्हेने व्यक्त झाली असतील, तीच खरी यशस्वी व्यक्तिप्रधान कादंबरी ! या दृष्टीने पाहशील तर आजवरच्या जुन्या नव्या कादंबरीतल्या कित्येक प्रधान व्यक्ती कादंबरी-विश्व गाजवून गेलेल्या दिसतील तुला. उदा. कै. हरी नारायण आपटचांच्या 'पण लक्षात कोण घेतो 'मधली कथानायिका यमू व त्याच सुमारास रंगभूमीवर अवतरलेली कै. देवलांची नाटचनायिका 'शारदा' ह्यांचे व्यक्तिदर्शन इतके सर्वांगसुंदर उतरले आहे की पाऊणशे वर्षे उलटली तरी त्यांचा रसिकांना विसर पडत नाही !! त्या दृष्टीने तू, ही पुस्तके मिळवून, एकदा अभ्यासू दृष्टीने ती वाच. अशी अलीकडची उदाहरणे तर पुष्कळच आहेत ! ती विवेचनाच्या ओघात येतीलच हळूहळू तुझ्या नजरेसमोर !

व्यक्तिचित्रणाचा पहिला प्रकार लेखकाने पात्रांची माहिती देण्याचा. ही पद्धत आजही सर्वमान्य व सोपी अशीच आहे. मनोविश्लेषण करतांना लेखक त्या व्यक्तित्त्वाशी जेव्हा अगदी तादात्म्य पावतो तेव्हा कुठे ते त्याला उत्तम शब्दरूप करता येते. पूर्वापार लेखकांपासून ही पद्धत चालत आलेलीच. पण यात एक महत्त्वाचा नियम लेखकाने कटाक्षाने ध्यानात ठेवायला हवा, तो म्हणजे लेखकच ही वर्णने लिहितो हे खरे, पण या कथनात त्याची भूमिका मात्र अगदी तटस्थ राहायला हवी, तो कुठेही प्रकटरूपात दिसू नये किंवा पात्रांआडून तो स्वतःच बोलतो आहे असा संशयही वाचकांना येता कामा नये ! आपल्या जुन्या जमान्याच्या कादंबरीतून ही रसहानीकारक पद्धत पुष्कळ प्रमाणात असायची. कादंबरीतला प्रसंग अगर संभाषण चांगले रंगत असावे अन् तेथे मध्येच स्वतः तो कादंबरी-लेखकही तेथे उपस्थित होऊन बोलू लागे– अगदी वाचकांना साद घालून !! उदाहरणार्थ 'वीरधवल'

या जुन्या प्रसिद्ध कादंबरीतली ही वाक्ये पाहाः–

'वाचकहो ! आपल्या कथानायकाला वाटले, त्याप्रमाण, युवराजांचा देहान्त झाला असे तुम्हालादेखील वाटले असेल, नाही बरे ? पण थांबा ! क्षणभर आपण मागे जाऊ म्हणजे आपोआप सर्व गोष्टी आपल्या लक्षात येतील.'

असली वाक्ये कादंबरीच्या ओघात मधेमधे आली तर गुलाबांच्या ताटव्यात कॅक्टस् अचानक उगवल्यासारखे अनुचित वाटते. एक पाश्चात्य लेखकाने लेखकांना उद्देशून म्हटलं आहे–

'अहो, तुम्ही स्वतः तुमच्या कादंबरीतून अदृश्य व्हा बरं जरा ? मग बघा तुमची पात्रं कशी खुल्या दिलानं वागतात, बोलतात ती ?'

तर हाही एक छोटासा नियम नव्या लेखकांनी नोंदून घेणे योग्य. सुदैवाने आज ही पद्धत खूपच कमी झाली आहे खरी, पण कादंबरीत मोठमोठी प्रवचनवजा वर्णने अगर कंटाळवाणी रूक्ष, तात्विक चर्चा दिसू लागते तेव्हा मात्र त्याआडचा लेखकच स्वतः प्रकटल्याचा वाचकांना स्पष्ट भास होतो, त्याचे काय ? तसे होता कामा नये.

व्यक्तीच्या स्वभावदर्शनाची दुसरी तऱ्हा, इतरांच्या शब्दां-संवादांतून एखाद्या नियोजित व्यक्तीचे स्वभावधर्म प्रकट करण्याची. मागे मी तुला 'कथानिवेदन' या पत्रांत एकाच घटनेबद्दल निरनिराळ्या संबंधित व्यक्तींची पत्रे दाखवली होती, आठवते का ? त्या पत्रांतून जसे एकेका घटनेचे सर्व कोन दर्शवले गेले होते तद्वत् स्वभावदर्शनाची ही संवादनिष्ठ पद्धत आहे– फक्त एखाद्या घटनेऐवजी येथे वर्णनकेंद्र एखाद्याचा स्वभाव हेच असते, एवढाच फरक. उदा. बाबा कदम यांची 'बदला' ही एक अलीकडची कादंबरी बघ. यात 'खासेराव' हे एक ठसठशीत पात्र आहे . पण हा 'ठसठशीतपणा' इतरांच्या त्रोटक संवादांतूनच अधिक प्रभावीपणे कादंबरीत व्यक्त झाला आहे. या गावचे एक सुस्वभावी महंत शिष्यांशी गप्पागोष्टी करीत आहेत, त्यांचा संवाद ऐक–

महंत– माझ्या आजवरच्या आयुष्यात मी इतका चांगला व इतका वाईट माणूस पाहिला नाही !

शिष्य– आँ ?

महंत– चांगला अशासाठी, की माणुसकी, मनाचा मोठेपणा दातृत्व, याला तोड नाही. आणि वाईट अशासाठी की मोठा ईर्ष्येबाज. ही ईर्षाही एकवेळ परवडली असती पण त्या एका नादाने घसरला–

शिष्य– नाद कसला ?

महंत– बायकांचा !

अगदी सात-आठ वाक्यांचा एक सीधासाधा संवाद. पण त्यांतून खासेराव पाटलाचे व्यक्तीविशेष कळताहेत की नाही ? सांग !

व्यक्तीच्या स्वभावचित्रणाच्या या बाजूला अप्रत्यक्ष दर्शनाची तऱ्हा म्हणता येईल. कादंबरीत नेहमीच प्रमुख व्यक्तीभोवती अनेक मंडळींचे वर्तुळ असते. ही आजूबाजूची माणसे जो संवाद करतात वा प्रकट उद्‌गार काढतात ना, त्यांतूनच नायक वा नायिकेचे स्वभावपैलू सहजपणे प्रकट होतात. याबद्दल आणखी एक सुंदर उदाहरण 'गारंबीचा बापू' या गाजलेल्या कादंबरीचे आपण वाटल्यास घेऊ. 'गारंबी' खेड्याचा हा परिसर तोही वर्णनाजोगाच. (पुढे आपण त्याचाही उहापोह करूच). या 'बापू'च्या भोवतीची सगळी माणसे बापूबद्दल कसे वेगवेगळे उद्‌गार काढताहेत बघ हं. राधा– त्याची प्रेयसी– त्याला 'गांजा चिलीम ओढू नको' सांगताना म्हणते–

'तुझं शरीर पाहिलं अन् मला वाईट वाटलं. या पिळदार, बाळसं असलेल्या शरीराचा पिंजरा होईल काही दिवसांनी, तसं होऊ नये असं मला वाटतं.'

त्याची रागीट उग्र आई म्हणते,

बाई ठेवूनसुद्धा बापू जेवढा पुण्यवान् आहे तेवढा हा संसार मांडून बसलेला अण्णा नाही. वेडावाकडा प्रकार व्हायची वेळ आली तेव्हा भडवा (अण्णासाहेब) मला पारा देऊ लागला ! बापू पाऱ्यावर वाढलेला आहे, म्हणून असा तेजस्वी आहे.'

बापूचा मित्र दिनकर हा तेथल्या निंदक गावकऱ्यांना बजावतो–

– 'किती निंदाल ? किती निंदाल ? लक्षांत ठेवा–बाप्या-

जवळ जी माणुसकी आहे ती तुमच्या आमच्याजवळ नाही !'

सांग अलका, वाचकांच्या दृष्टीसमोर 'बापू' नावाचा एक रंगेल आणि रंगेल, सच्चा मनाचा पण लोकनिंदेला बिलकुल भीक न घालणारा ठसठशीत व्यक्तित्वाचा अविवाहित तरुण उभा राहतो की नाही इतरांच्या शब्दांतून ? आणि एक. मी दिलेल्या या दोन्ही उदाहरणांतला एक फरक तुझ्या लक्षात आला ? 'खासेरावा'बद्दल एकच मनुष्य जास्त माहिती देत आहे, तर 'बापू' बद्दल अनेक व्यक्ती केवळ दोन-तीन वाक्यांत त्याचे वर्णन करीत आहेत. अशा दोन्ही तऱ्हांच्या संवादातून अप्रत्यक्ष व्यक्तिचित्रणाचा हेतू सारखाच साध्य होऊ शकतो. हेच आपण ध्यानी घ्यावयाचे.

*

या अप्रत्यक्ष व्यक्तिदर्शनाचा आणखीही एक प्रकार आहे. तो म्हणजे प्रमुख व्यक्तीच्या वर्तुळात येणाऱ्या इतर व्यक्तीही या व्यक्तिसंबंधाने मनोमन आठवणी काढीत राहतात वा चिंतन करीत राहतात. येथे प्रत्यक्ष संवाद नाहीत व नसतात तर हे इतर जवळीकीच्या व्यक्तींच्या विचार-विश्वांत उमटणारे त्या प्रधान व्यक्तीचे रेखाचित्रण असते. अर्थात कुणाच्या मनांतले विचार कसे कळायचे प्रत्यक्ष शब्द वा कृतीवाचून ? तर कुशल कादंबरीलेखकच अशावेळी स्वतः निवेदकाची भूमिका घेत असतो, तोच इतरांच्या भावविश्वाचे शब्दरूप दर्शन आपणास घडवीत असतो !

याबाबत तुला मी एकच प्रमुख उदाहरण देते तेवढे बस् होईल. श्री. शिवाजी सावंत यांची मृत्युंजय ही कादंबरी अलीकडच्या कादंबरी क्षेत्रांत पुष्कळच लोकप्रिय ठरली. ती तू वाचली आहेसच. ही महाभारतातील 'कर्ण' या बहुचर्चित व्यक्तीवर आधारलेली. आहे व सर्व कादंबरी निर-निराळ्या व्यक्तींच्या आत्मनिवेदनांतून साकार झालेली आहे. अशा प्रकारच्या कादंबरीला पात्रमुखी पद्धतीची म्हणतात.

तर अलका, येथे कर्ण स्वतःबद्दल पुष्कळच सांगतो, पण तरीही त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग त्याच्या निकटवर्तीयांनी जे आत्मनिवेदन केले आहे त्यांतून तर अधिकच बारकाईने चित्रित झाले आहेत. उदा. श्रीकृष्ण, दुर्योधन, कर्णाचा भाऊ, कुंती व पत्नी वृषाली यांची आत्मनिवेदने या दृष्टीने अभ्यस-नीय आहेत व ती तू मुळातूनच वाचू शकलीस तर अधिक चांगले. एखाद्या

आरशात दुसऱ्या एका आरशाचे प्रतिबिंब उठून दिसावे तसा हा प्रकार नाही का ? स्वतः लेखक तर येथे कादंबरीतील विशेष व्यक्तींचे वर्णन करतोच जागोजागी पण त्याच्या कथानकातल्या व्यक्तीही त्या विशिष्ट व्यक्तीदर्शनाचे कार्य परस्पर करताहेत ! कसे ? तर, कधी आत्मचिंतनातून तर कधी त्या व्यक्तीच्या आठवणी काढतानाही ! ती विशिष्ट व्यक्ती इतरांना कशी वाटत होती याबद्दलची कल्पना वाचकाला त्यावरून अगदी स्पष्टपणे येऊ शकते. अनेक पात्रमुखी पद्धतीच्या कादंबऱ्यात या प्रकारची सरस उदाहरणे दिसतील आणि पात्रमुखी पद्धतीतल्याइतके विपुल नसले तरी साध्या कादंबऱ्यातूनही याचे नमुने आढळतातच. उदा. नायक व नायिका एकमेकांचे चिंतन करीत असतातच तेव्हा, स्वतःला नकळत ते त्या चिंतनविषय झालेल्या व्यक्तिमत्वाला स्पष्ट आकार देतात व त्याच्या स्वभावविशेषांवर विजेरीचा झोत पाडीत असतातच ! थोडक्यात म्हणजे, मागे मी खासेराव पाटलाचे वा गारंबीचा बापूचे उदाहरण दिले त्यात इतरांचे प्रकट उद्‌गार होते तर येथे ते रूप अप्रकट विचाराचे असते एवढाच काय तो फरक ! तर लक्षात आले ना ? या प्रकारांचा अवलंब करूनही कादंबरीतील व्यक्तिदर्शनाला समर्थ रूप देता येते ! अर्थात एक आहे बरंका अलके. या प्रकारच्या अप्रत्यक्ष व्यक्तिदर्शनात व्यक्तीच्या स्वभावाचे काही पैलू प्रकट होऊ शकतात खरे, पण कादंबरीकाराला पात्रांचे पूर्णतया स्वभाव-दर्शन घडवायचे असते ! तेव्हा त्यासंबंधीचे आणखीही काही संकेत आहेतच, तिकडे आपण वळू.

पहिली गोष्ट, आपल्या कादंबरीतील पात्रांचे स्वभाव विशिष्ट आकार घऊ लागतात, त्यावेळीच लेखकाने हा यांचा स्वभाव 'असाच' का बनतो आहे ? याचा विचार आवर्जून केला पाहिजे. व्यवहारात आपण पहातो की व्यक्तीचा विशिष्ट स्वभाव त्याच्या भोवतीच्या माणसांच्या वर्तनातून, बाळपणापासूनच्या वातावरणातून व परिस्थितीतून संस्कार घेऊनच तयार होत असतो व त्याच्या जाणतेपणी त्या स्वभावाला एक निश्चित व ठाशीव आकार येतो. हेच सूत्र कादंबरीतल्या स्वभावदर्शनाबाबत पाळलें गेल्यास ते अधिक कलात्मक व 'स्वाभाविक' वाटेल. अर्थात मुख्य सांगायची गोष्ट अशी की नायक वा नायिकेचा स्वभाव वैशिष्ट्यपूर्ण असू शकतो, वा होऊ

शकतो, पण या स्वभावविशेषाची पार्श्वभूमी आपल्या कादंबरीत लेखकाने अवश्य कोठेतरी सूचित केली पाहिजे तर ह्या विशिष्ट स्वभावदर्शनाला रंगत चढेल ! उदा. 'तुझे आहे तुजपाशी' या पु. ल. देशपांडयांच्या गाजलेल्या नाटकातील उपनायिका गीता हिचे स्वभावदर्शन पाहा, ही एक ऋजू मनाची तरुणी. पण यौवनसुलभ हौसेमौजेला, नव्या राहणीलाही ती भिते आहे ! का ? तर हा भित्रेपणा, तिचे बाल्य एका कडक शिस्तीच्या ब्रह्मचारी आश्रमात एका गुरुजींच्या धाकातच गेले आहे, व नाटकात ही परिस्थिती प्रथम एका जागी सूचकतेने व्यक्तही झाली आहे.

याचे दुसरे एक उदाहरण हवं तर पाहा, ते माझ्याच 'तपश्चर्या' कादंबरीतील नायक 'गुणचंद्र' याचे आहे; हा गुणी नायक आहे पण अत्यंत स्त्रीद्वेष्टा आहे असे मी दर्शवले आहे, पण नुस्ताच हा 'स्त्रीद्वेष्टा' होता एवढेच सांगून मी थांबले नाही, तर तो तसा का झाला होता, हेही मी स्पष्टतेने सांगितले आहे. तूच बघ अलका, एखाद्या अत्यंत बुद्धिमान मुलाला दहाव्या वर्षापासूनच जर आपल्या आई-बापांचे वैमनस्य वा त्यांचे विस्कटलेले, किंवा विरोधी, विचित्र, दांपत्यजीवन दिसू लागले तर त्या मुलाच्या मनावर कठोर अपघात नाही का होणार ? येथे तर आईने दुसऱ्याशी अवैध संबंध ठेवून नवऱ्याच्या नाकावर टिच्चून त्या प्रियकराला घरात आणलेले ! हे हा मुलगा मूकतेने व नाइलाजाने बारा-चौदा वर्षे सहन करीत राहिला व त्यामुळे त्याचा स्वभावच अबोल व स्त्रीद्वेष्टा झाला आहे. आता हे नायकाचे विचित्र स्वभावचित्रण वाचकाला सुसंगत वाटेल की नाही ?

या स्वभावदर्शन प्रकरणात आणखीही एक छटा मी तुला दाखवू इच्छिते. व्यवहारात आपण काही वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती पहातो, त्या स्वतःच आपले एक विशिष्ट जीवनध्येय ठरवून बसतात, व मग जन्मभर त्या ध्येयाच्या जोपासनेतच तन-मन-धन वेचतात. इतकेच नव्हे तर त्यांची ही वेगळी निष्ठा जवळजवळ त्या व्यक्तीच्या स्वभावाचाच एक समर्थ पैलू होऊन बसते. ह्या नमुन्याचे स्वभावदर्शन ललित साहित्यातही अनेक कादंबऱ्यांतून प्रकट झाले आहे. ते अतिशय कलात्मक व साहजिकतेने सजलेले असेच आहे. उदाहरणार्थ, 'आनंदी-गोपाळ' या श्री. ज. जोशांच्या कादंबरीतले गोपाळरावही

असेच ध्येयवेडे गृहस्थ. 'स्त्रीशिक्षण व त्याची उन्नती हे त्यांचे आयुष्याचे ध्येय ठरले, त्या दृष्टीने आनंदीबाईला शिक्षण देऊन तिला त्यांनी अमेरिकेस डॉक्टर होण्यासाठी पाठवले ही त्या ध्येयाची सिद्धीच म्हणा ना? हे गोपाळराव एरवी स्वभावाने विक्षिप्त होते– पण त्या विक्षिप्तपणालाही उजळा देणारा हा त्यांच्या स्वभावाचा वेगळा कोन केव्हाही त्यांच्या जीवनात बदललेला नाही, की, पुसटलेला नाही, हे ध्यानी घेण्याजोगे आहे.

या संदर्भात मला आणखी एक यशस्वी व्यक्तीचित्रण आठवते आहे, ते म्हणजे कॉनन डाइल या लेखकाने 'शेरलॉक होम्स' ही जी एक अमर व्यक्तिरेखा निर्माण केली आहे ना, तिचे. येथे तर एकच कथा-कादंबरी नव्हे तर अनेक कथा, दीर्घकथांचाही, हाच एकमेव नायक. पण त्याच स्वभाव सुरुवातीला लेखकाने जो दर्शवला, त्यात पुढे कधीही बदल झालेला नाही. मुख्य म्हणजे नवी गुन्ह्याची केस आली की फक्त 'सायंटिफिक' ऊर्फ शास्त्रीय दृष्टीकोनानेच शेरलॉक त्या केसकडे पाहायचा, शोध घ्यायचा. तेथे मृताबद्दल शोक-कारुण्य, अगर खुनी डाकू व्यक्तींबद्दल तिरस्कार इत्यादी सर्वसामान्य भावभावनांना थारा क्षणभरसुद्धा दिसायचा नाही! आणि हे त्याचे स्वभावसूत्र पहिल्या कथेत आले ना, तेच शेवटपर्यंत कायम! किती अवघड आहे, नाही? पण हे वैशिष्ट्यपूर्ण स्वभावचित्रण इतके काही प्रभावी व लोकमानसाचा ताबा घेणारे ठरले की एकदा कॉनन डाइलने 'शेरलॉक होम्स' मरणार असल्याचे जाहीर केले तेव्हा लोकांनी तारा पत्रे पाठवून 'त्याला मारू नका!' अशी लेखकाला विनंती केली!

तेव्हा, व्यक्तीच्या स्वभावाचा आलेख लेखक घडवतो तो स्वभाव कादंबरीत एकाएकी अगर वरचेवर बदलला गेला तर अनेक प्रकारे विसंगती उत्पन्न होते हे व्यक्तीचित्रणातले एक महत्त्वाचे कलम तू दृष्टीआड करू नकोस!

अलके, आता आपण व्यक्तीचित्रणाची तिसरी पण सर्वात अवघड तऱ्हा बघू. या पद्धतीत व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते ते केवळ इतरांच्या शब्दासंवादांतूनच नव्हे तर कादंबरीत योजलेल्या प्रसंगानुसार त्या व्यक्तीच्या स्वतःच्या शब्दांतून विचारातून व कृतीतूनच! कधी हे व्यक्तिमत्व बोलके असते– कधी व्यक्तीची कृतीच शब्दावाचून बोलते! दोन्ही प्रकारची उदा-

हरणे मी तुला दाखवणार आहे, म्हणजे ती तुला नीट पटतील. उदा. आपण गो. नी. दांडेकरांच्या 'शितू' या कादंबरीच्या नायिकेचे म्हणजे शितूचे व्यक्तिदर्शन पाहू.

शितू ही कोकणखेड्यांतली एक गरीब कुणबाऊ पोर. पण मोठी दुर्दैवी. वयाच्या सातवे वर्षीच हिचा नवरा मरतो व ही पांढऱ्या कपाळाची पोर, बापाचा मार खातखातच कादंबरीत प्रकटते आणि त्यावेळीच तो बाप शिव्या देतो आहे. 'घो–खाई? हडल!' अशा! हिचे बाह्यरूपदर्शनही लेखकाने, : 'गोरीपान, नितळ, म्लान मुद्रा, भला थोरला अंबाडा, गळ्यात पिवळे, तांबडे बटबटीत मणी, अंगी नवसर चोळी-साडी ल्यालेली' अशा मोजक्या शब्दांत केलेले दिसते व त्यामुळे कोकणातली एक लहानशी, नुक्ते 'लग्न झालेली' सुरेख पण विधवा झालेली खेडूत पोर. वाचकांच्या नजरेसमोर उभी राहते! पण मुख्य सांगणार आहे ते हिच्या बाह्यरूपवर्णनाबद्दल नव्हे, तर तिच्या विचारांबद्दल ज्यातून तिचा स्वभाव उत्कृटतेने प्रकट होतो त्या तिच्या कृतीबद्दलच.

हिचे प्रेम गावप्रमुख खोतांचा मुलगा विसू याच्यावर जडलेले आपणास दिसतेच आहे. तो ब्राह्मण. ही कुळवाडी. तो मालक, ही नोकराची पोर. तो नेमनिष्ठावंत अशा घरचा, ही दोनदा विधवा झालेली! हे अडथळे पहाडासारखे या प्रेमिकांच्या मधे उभे होते. शितू अशिक्षित असेल पण मनाची सुसंस्कृत, ऋजु व सरळ जरूर आहे, तिला हे आपले अशक्यप्रेम दर्शवायचीही चोरी! तेव्हा त्याचे दिग्दर्शन घडण्यासाठी लेखकाने योजलेल्या घटना बघ जरा–

'एकदा विसूच्या बंदुकीच्या छऱ्यांनी हिचा हात चुकून रक्तबंबाळ होतो तर ही त्याच्या वडिलांना 'वानरानं हात फोडलंन्' म्हणून सांगते.

एकदा तो झोपेत असताना नुस्तं त्याच्याकडे ही पाहात राहिली. क्षणभर, तरी तिला चोरट्यासारखं वाटलं! कोठेही या प्रेमाला शब्दरूप मिळालेले नाही अलके. फक्त एकदाच हे मुग्ध प्रेम बोलके झाले आहे. विसू भाववश होऊन तिला आलिंगन देतो तेव्हाच. त्यावेळी ती म्हणते–

'मी दुसऱ्यानं वास घेतलेलं फूल. विसूदादा, लग्न करून एखादी लक्ष्मी घरांत आणा तुम्ही. मी पाहत्ये मुली.'

अन् तरीही तो आक्रमक होण्याचे लक्षण दिसतांच ही अश्राप मुलगी त्याच्या आयुष्याला आपल्यामुळे डाग लागू नये म्हणून रातोरात दूर आत्याकडे निघून जाते.

शितूच्या या मुग्ध प्रीतीचा कोठेही उच्चार नाही, की तिच्या सुजनपणावर स्वभावाच्या 'दुरतिक्रमा'चा डाग पडलेला नाही. तिची वागणूक किती ऋजू व किती जिव्हाळ्याची होती ह्याचा हा आलेख भारी नमुनेदार वाटतो.

आता, बोलके व्यक्तिमत्व मी प्रथम म्हटले आहे ना, त्याचाही एक उत्कृष्ट नमुना मी तुला दर्शविणार आहे, तो रणजित देसायांच्या स्वामी या सुंदर कादंबरीचे नायक थोरले माधवराव पेशवे ह्यांचाच. यांचे ठळकपणे उठून दिसणारे दोन विशेष. एक म्हणजे महाक्रोधी, रागरुद्र स्वभाव, व दुसरे राजकारभारात मुत्सद्दी म्हणून दिसणारे बुद्धिमंत विचारशीलतेचे रूप. पैकी रागीट स्वभाव तर जणू त्यांच्या पाचवीलाच पुजलेला! मात्र हा राग अकारण वा केव्हांही अयोग्य ठरणारा नसे हे जरूर ध्यानी घेतले पाहिजे. त्या क्रोधशब्दांत जरब, धाक दरारा, भीती, सर्व काही असे. हा स्वभावविशेष प्रथम त्यांच्या मुद्रेत, नजरेत, आवाजात प्रकट होऊ लागे, व नंतर त्यांचे शब्द रागाने कडाडून येत. खालील छोटी वाक्ये त्या दृष्टीने पाहा–

'माधवरावांची करडी नजर उभी पेटत होती, कपाळीचे गंध आठ्यांत मिटले गेले होते.'

'त्या संतप्त मुद्रेकडे पाहातच खंडेराव दरेकराच्या घशाला कोरड पडली.'

'खामोष!' माधवराव कडाडले. त्यांची नजर गर्रकन नानांवर स्थिर झाली. त्यावरोबर नानांचे शब्द आटले. बापू व नाना एकमेकांकडे पहात होते. काही बोलण्याचा धीर दोघांनाही होत नव्हता.'

'प्रत्येक वाक्याबरोबर माधवरावांचा आवाज तिखट होत होता व राघोबांच्या अंगातून झिणझिण्या येत होत्या.' इ.

इतरांच्या दृष्टीला माधवरावांचा क्रोधी स्वभाव कसा दिसत होता, जाणवत होता, हे यावरून कळतेच, पण प्रत्यक्ष पेशव्यांची कृती? ती याहून

प्रखरपणे ' स्वामी 'त जागोजाग उठून दिसते. आपले सख्खे मामा मल्हारराव रास्ते यांना त्यांनी राजद्रोही गुन्ह्यासाठी भला मोठा दंड ठोठावला आहे, राघोबादादांनी राज्याची वाटणी मागितली तेव्हा या अन्यायी मागणीला उत्तर त्यांनी या चुलत्याशी प्रत्यक्ष युद्ध करूनच दिले. आणि होळकरांचे सरदार गंगोबातात्या याने उपमर्दकारक भाषा वापरली, कृतघ्न उत्तरे दिली म्हणून त्यांनी चिडून स्वतः त्याची पाठ आसूडाने फोडली आहे. फार काय ? शेवटच्या आजारातदेखील त्यांचा हा शीघ्रकोपी स्वभाव उठून दिसतो. वेदनेपायी आत्महत्त्या करण्याचा त्यांचा विचार, पण त्यांचा इच्छाराम हा सेवक, खंजीर आणून देईना म्हणून त्यालाही चाबकाने झोडपले आहे व सतीची वस्त्रं आणणाऱ्या सेवकाचे तर हातच ते तोडायला निघाले आहेत !

सुरुवातीपासून अखेरपर्यंत एखाद्या स्वभावविशेषाचे दर्शन घडवणे, व तेही व्यक्तीच्या बोलण्यातून, हालचालींतून, मुद्रेवरून, कृतीतून– सर्वांतूनच साहजिकतेने घडविणे, हे खरोखरच लेखकाच्या व्यक्तिचित्रणाच्या सर्वंकष लेखन-कुशलतेची साक्ष देणारेच ! तर असे हे सर्वतन्हेने उत्कृष्ट झालेले व्यक्तिदर्शन. अर्थात माधवराव हे केवळ ' संतापीरामच ' नव्हते, त्यांचे कर्तृत्व हा तर या संतापालाही जिंकून घेणारा त्यांच्या स्वभावातला एक प्रभावी पैलू होता, हे विसरण्याजोगे नाही. तोही त्यांच्या राजकारणी वृत्ती-तून व मुत्सद्दीपणातून वारंवार व्यक्त झालेला आहेच– पण ती कादंबरी तू कितींदा तरी वाचली आहेस म्हणून मी त्याचे आणखी वर्णन इथे करीत नाही, कारण मग मला स्वतंत्र लेखच लिहावा लागेल इतके ते कर्तृत्व मोठे आहे !

तर अलके, व्यक्तिप्रधान कादंबरीची सारी वैशिष्ट्ये व लिखित–अलिखित संकेत आता तुला नीट समजले असतीलच ? पुढचे पत्र ' वातावरणप्रधान ' कादंबरी याबद्दल लिहीन म्हणते आहे, तोपर्यंत जरा विसावा घेऊ म्हणते. अच्छा, बाय, बाय !

तुझी
सौ. ताई.

□ □

१७ वातावरणप्रधान कादंबरी

प्रिय अलकनंदा,

मागल्या प्रकरणात व्यक्तिप्रधान कादंबरीबद्दल मी तुला बरेच काही सांगितले. एखाद्या इंटर्व्हलपर्यंतचा भाग उत्तम वाटला तरी तो अपुरासाच वाटतो, तसं ते विवेचन उत्तरार्धावाचून अपुरे आहे, आज तो उत्तरार्ध म्हणजे वातावरणप्रधान कादंबरीबद्दल लिहून हे जोड प्रकरण मी पुरे करीन.

मागल्या पत्रात आपण कोंदण व हिरकणी यांचा दाखला घेतला होता, आठवते ना ? तोच परत येथे घ्यावयाचा. फरक इतकाच की, या प्रकरणात अनेक ठिकाणी व्यक्ती ही कोंदणरूप म्हणजे दुय्यम ठरून ' परिस्थिती व वातावरण ' हेच हिऱ्याच्या प्रमुख स्थानी बसवलेले दिसते ! हीच वातावरण-प्रधान कादंबरी, याही कादंबऱ्यांची संख्या वाङ्मयप्रांतात कमी नाही अलके, आणि नुस्ती संख्याच जास्त आहे असेही नाही तर वैपुल्याएवढेच वैविध्यही त्यातून आढळते हे विशेष.

हा वैशिष्ट्यपूर्ण प्रकारही तुला नीट अभ्यासला पाहिजे, कारण कधी अशीही कादंबरी तुला लिहावीशी वाटेल ! म्हणून आज त्या विषयाचं सांगोपांग विवेचन मी लिहिते आहे. ' वातावरणप्रधान कादंबरी ' असं मी म्हणते आहे खरी, पण यातही दोन ठळक प्रकार आहेत, हेही प्रथम मला स्पष्ट केलं पाहिजे, ते असे,–

(१) उत्कृष्ट वातावरणनिर्मिती असलेली म्हणजेच परिसरप्रधान कादंबरी.

(२) वातावरणातून घटना निर्माण करणारी व त्या घटनांच्या साहाय्याने वर्णित व्यक्तींना योग्य उठाव देणारी कादंबरी.

खरे म्हणजे हे दोन्ही प्रकार नव्या लेखकाने अवश्य जाणले पाहिजेत. कादंबरीत त्याने परिसराचेच वर्णन केले, तरीही त्या परिस्थितीचा अगर त्या वातावरणाचा व्यक्तिदर्शनासाठी किती व कोणत्या प्रमाणात उपयोग झाला आहे, याचीही लेखकाने अवश्य दखल घ्यावी. अर्थात काही ठिकाणी वातावरणनिष्ठता इतकी समर्थपणे व्यक्त झालेली आढळते की, त्यापुढे कादंबरीतील व्यक्तीजीवन थोडेफार गौणच ठरते. याचे एक अतिशय प्रभावी उदाहरण म्हणजे गो. नी. दांडेकरांच्याच ' दर्याभवानी ' या ऐतिहासिक कादंबरीचे. खरे तर ही कादंबरी शिवाजी महाराजांच्या जीवनावरची. पण गंमत अशी की, त्यांना या कादंबरीत नायकत्व नाही ! ते आहे त्यावेळच्या कोकणपट्टीतल्या वातावरणालाच. ' दर्याभवानी 'च्या प्रस्तावनेत व. मो. पुरंदरे यांनी तर स्पष्टच म्हटले आहे;–

' कोकणची परिस्थिती हीच या कादंबरीची खरी नायिका, व ही कादंबरी उभी आहे कोकणकिनाऱ्यावर.'

दांडेकरांच्या या शिवशाहीच्या कादंबऱ्या एकूण पाच आहेत, त्या सर्वांतच ही स्थलप्रधानता उमटून दिसते हे ध्यानी घेण्याजोगे आहे. असेच या दुसऱ्या प्रकारचे उदाहरण, ऐतिहासिक व तेही शिवाजीमहाराजांच्याच जीवनावरचे, ब. मो. पुरंदरे यांनी लिहिलेले ' शिवछत्रपती ' या दीर्घकादंबरीचे. त्यातही गडकोट किल्ले, नद्या, रानेवने इत्यादी वातावरण त्यांनी सुंदर वर्णिले आहेच, पण त्यातून निर्माण होणाऱ्या सगळ्या घटना, विचार यांचे केंद्र आहे शिवाजीमहाराज हेच ! उदा. पन्हाळा किल्ल्याचे हे मनोगत लक्षणीयच ठरणारे आहे–

> ' अंधारात महाराज पन्हाळ्याहून निघालेले पाहून तेथल्या तटांबुरूजांचे चिरेही सद्गदित झाले, म्हणत होते, ' आमची चिंता नको, आम्ही फार पक्के आहोत. गड्या, जीव खालीवर

काळोखाची शाल सरकवून उठतेय.'

महानगरी मुंबई जणू काय कोणी निद्रिस्त रमणीच ! ती जागी होण्याचे हे वर्णन जेवढे बारीक तपशीलाचे तेवढेच यथातथ्यही आहे ना ? याच दोन गुणांनी स्थलप्रधान कादंबरी अधिक यशस्विनी होते.

अशा वातावरणनिष्ठ कादंबरीवर्गात ग्रामीण कादंबऱ्यांचा अवश्य समावेश करायला हवा, कारण त्या वेगळ्या वातावरणाचे रंग अशा कादंबरीत फार मोठ्या प्रमाणात आढळतात. आजवरच्या कादंबऱ्यांतून भिन्नभिन्न तऱ्हेने हे वातावरण दर्शवले गेले आहे. 'माहीमची खाडी' यात मुंबईच्या झोपडपट्टीचे वर्णन, तर ग. ल. ठोकळ यांच्या कादंबरीतून शेतामळ्यांचे. व्यंकटेश माडगूळकरांच्या बनगरवाडीमध्ये धनगरवस्तीच्या एका गावाचे वर्णन आहे. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' कादंबरीत आणखी एक वेगळी तऱ्हा दिसते ती, शेतामध्ये असलेल्या व राबणाऱ्या पाळीव प्राण्यांच्या वर्णनांची. ती जरा बारकाईने बघू या. यातला नायक 'नारबा' हा एका शेतकऱ्याकडे काम करणारा गरीब नोकर व याचे सारे विचार-विश्व म्हणजे त्या मालकाची गुरेढोरे, शेळ्या, कोंबड्या यांचेच.या नारबाची या मुक्या प्राण्यांवर विलक्षण माया दिसते. आणि याची म्हणजे कादंबरीचीही भाषा पूर्णपणे खेडूत शेतकऱ्यांच्या खास बोलीची आहे– उदाहरणार्थ मालकाच्या म्हशीला खाटीकखान्यात नेताना पाहून तर ह्या गड्याचं मन हलून गलबलून गेलंय. तो म्हणतो–

> 'म्हैस चालली, कुठं चालली, तिला काय ठाव न्हवतं. मालकानं खाटीकखान्यात न्हेऊन हुबी केली, तरी गप वाट बगत हुबं न्हायाचं. तिच्या हातात कायच न्हवतं– देवानं जनावराला हात एक दिलं न्हाईत, त्ये बरंच हुतं, अवघडली कास दोन्ही पायात घेऊन ती वाट जवळ करू लागली. फटागडी म्हस नी दोन रेडकं तिला बघून वरडली. जिभा लांब करता आल्या असल्या तर त्येंनी एकमेकीला चाटून घेतलं असतं, डोळ्यांत डोळं घालून बोलल्या असत्या.'

मुक्या जनावराचे भावदर्शन अन् तेही या अगदी गावरान पण खास त्यांच्याच बोलीभाषेत करायचं कौशल्य सामान्य थोडंच ? या कादंबरीत

नुस्ती भाषाच ग्रामीण आहे, असं नव्हे, तर म्हणी, दाखले, उपमा सगळं काही ह्याच वातावरणातलं आहे आणि या कादंबरीचे मोठे यश या अनोख्या वातावरणनिर्मितीतच आहे.

स्वतः नारबाची सुखदुःखे, सगळी या प्राणिमात्रांशी, पीकपाण्याशी आणि विहीर-शेतांशी बांधली गेली आहेत! मालकाने, पाळलेला कोंबडा घरीच खाण्यासाठी मारला तेव्हा याचा जीव थोडाथोडा झाला दुःखाने तो स्वतःशी म्हणतो–

> 'वाटत हुतं, धरत्यात, धरू द्यात तिकडं त्येचं त्येंनी. आपण कशाला उगच पाठी लागून आपलं मूल आपल्या हातानं कापायला द्यायचं? म्हून खाली मुंडी घालून खळ्याचा दुंडा झाडू लागलो. तंवर मालकानंच हाळी मारली, लागली. जावं लागलं. पाट झाली. कोंबडा वराडला न्हाई. राभर नीज कसली ते लागली न्हाई.खोप, सुताक आल्यागत बसलेली. पोटात कालवल्यागत झालं व कोंबड्यानं पोटातच खच्चून भांग दिली.'

पाहिलंस ना अलके, नारबा साधा गडी, पण त्याचं जीवन या मुक्या प्राण्यांच्या जीवनाशी किती आपुलकीनं एकरूप झालंय ते? पाळीव पशु मारून खाणे हा शेतमालकाचा दैनंदिन कार्यक्रम, पण त्यामुळे नारबाच्या हृदयावर कसे घाव पडतात याचं हे, वेगळं चित्रण प्रत्ययकतेचा एक चांगला नमुना ठरेल, ग्रामीण कथा कादंबरीतला.

ग्रामीण जग म्हणजे त्यात शेतीवाडीची वर्णनं तर येतातच, पण निसर्ग-सुंदरतेचीही प्रसन्न वर्णने करायला लेखकाला यात खूप वाव असतो, व ते वर्णन चक्षुःवैंसत्यं असेल तर लेखक ते अधिक प्रभावीपणे व्यक्त करू शकतो.

उदा. रा. वा. दिघे ह्यांच्या 'पड रे पाण्या' या ग्रामीण कादंबरीत मोठ्या सुंदर शैलीने ते स्थल, तो परिसर यांचे वर्णन आले आहे, तो नमुना पाहा जरा–

> 'दुर्जल प्रदेशात कोरडवाहू काळचा जमिनीतला जोंधळा म्हणजे छत्रपति! त्याचे दाणे दूध घेऊ लागले. हुरडा खाऊन व गोफणीने ढेकळे भिरकटून शेतकऱ्यांच्या भुजा तयार झाल्या. आकाशाच्या निळ्या पालाखाली अनंतानं धान्यबाजार उघडला

होता. करडईची शेते पण फुलली होती, काही ठिकाणी सर्व्या बाजरीत हातहात कणसे तर काही ठिकाणी गहू पण निघाला होता.'

'गोतावळा' मध्ये नारबाच्या भोवतीचे वातावरण मुक्या प्राण्याचे. तर यात सगळे पीक-पाण्याचे.

अलके, असे विशिष्ट वातावरण नीट रंगवले तरच ते लक्षवेधी होते आणि असे कथानक जर घ्यायचे असेल तर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अशी (म्हणजे कालसापेक्ष, ऋतुकालोद्भव पीके, त्यांची वेगवेगळी दृश्ये यांची) ओळख करून घ्यायला हवीच लेखकाला हे तुझ्या नीट ध्यानी आलं असेल.

तुला वाटेल, असल्या केवळ वातावरणानेच खुलणाऱ्या, कादंबऱ्यात व्यक्ती कसल्या अधिक उठून दिसताहेत ? त्या गौणच ठरणाऱ्या !! तर तसं मात्र या कादंबरीचं नाही हं. ह्या ग्रामीणतेचे रंग यातल्या नायिकेलाही वेगळ्याच रंगानं खुलवतात. 'पड रे पाण्या'ची उपनायिका, शेवंता, हिचे निसुटते वर्णन पाहा बरं जरा हे– 'शेवंता आपल्या एकसरीच्या हिरकण्या चुलीच्या व टमरेलाच्या उजेडात चमकवीत गिदळली.' किंवा 'शेवंता कळ्यांचा खुडा करीत त्या सुगंधित वैभवात गुलछडीसारखी उभी होती.'

अर्थात शेवंतांचे वर्णन छान रंगले असले, तरी ती उठून दिसते ती त्याच वातावरणनिष्ठ उपमांनी, व ही वातावरणनिष्ठ कादंबरी असल्याने 'शेवंतापेक्षाही' यातल्या विविध प्रसंगांनाच जास्त महत्त्व चढलेले तुला दिसेल. शेतामळ्याच्या पार्श्वभूमीवरचेच हे सर्व प्रसंग यात योजण्यात आले आहेत, त्यामुळे ते दिघे यांच्याच वर्णनात सांगायचे तर, 'दुधाला आलेल्या जोंधळ्याच्या दाण्यांसारखे टवटवीत व कसदार' असेच झाले आहेत.

कित्येकदा प्रादेशिक कादंबऱ्यांतूनही ही वातावरणप्रधानता फार वेधक प्रकारे रंगवली गेलेली असते. उदा. कोकणातील गारंबी या एका खेड्याचे वर्णन 'गारंबीचा बापू' यात फारच नेटकेपणाने आलेले दिसते. कशी होती गारंबी ? ऐक हं–

'गारंबीनं आपला चिमुकला संसार डोंगराच्या एक पारव्येवर थाटला आहे. गारंबीसारखं समृद्ध खेडं त्या त्रिकोणात दुसरं नाही. निसर्गानं ज्या उदार हातानं तिच्यावर उधळण केली

आहे, तिचा उभ्या त्रिकोणाला हेवा वाटतो !' तिथली माणसं भलतीच कष्ट करणारी. गुरववाडचात जा, ब्राह्मणवाडचात जा, तुम्हाला उद्योग, कष्ट यांवाचून काही दिसायचं नाही. सारेच घाम गाळणारे. कोणी कोणाचे कौतुक करावे ? घामाचा पैसा खरा, पण किती मिळावा ?'

एखाद्या नायिकेची ओळख करून द्यावी तशी लेखकाने 'गारंबी'ची ओळख करून दिली आहे यात. स्थलवर्णनाची ही एक छानदार व नाविन्यपूर्ण पद्धत आहे. अर्थात ही कादंबरी 'गारंबी'ची आहे तशीच 'बापू'चीही खास आहे. त्याचे व्यक्तिचित्रण वर्णनप्रधानतेच्या या चौकटीत असे खुलते, असे खुलते, की, बस बस ! त्याचा नमुना माझा मागल्या पत्रात आलाच आहे. सुरुवातीला आपण वातावरणातून घटना निर्मिणारी व घटनांतून व्यक्तीला उठाव देणारी कादंबरी हीच वातावरणप्रधान कादंबरीत उत्कृष्ट, म्हटलेले आहे ना ? तशीच ही कादंबरी नमुनेदार ठरेल.

अर्थात फक्त ग्रामीण कादंबरीतच उत्तम वातावरणनिष्ठता असू शकते असे मात्र नाही, तर प्रादेशिक कादंबरीतूनही ती विजेरीसारखीच चमकते. गोवा प्रांत आता भारतीय झाला, तेथल्या वेगळ्या वातावरणाचे पडसादही कवि बोरकर यांची 'भावीण', जयवंत दळवी यांची 'महानंदा', यशवंत कर्णिकांची 'निळा डोह' इ. कादंबऱ्यांतून उठलेले तुझ्या पाहण्यात असतीलच ? अग, एखादा प्रांत लेखकाकरवी बोलका व्हायचा, म्हणजे त्या प्रांताची बोलभाषा, तेथला निसर्ग, तेथल्या लोकांचे रीतीरिवाज, आचार-विचार, तेथली विशिष्ट दैवते व तेथली संस्कृती या सर्वांचे एकवटलेले एक प्रभावी वातावरणचित्र रेखले जायला हवे, खरे ना ? अशा दृष्टीचा एक सुरेख नमुना जयवंत दळवींच्या 'महानंदा' कादंबरीतून साकार झाला आहे. ही कादंबरी गोव्याच्या परिसरातच उभी आहे जणू. यातले भाषा-वैशिष्ट्य पाहा– गोव्यातले खास शब्द आहेत हे, बरे का ? 'मरांदे' (नारळीच्या आतले गोड कोंब) माका, बोवाळ, वेलचीचे बोंड, अडसर, घरकारीण, रवंथ इत्यादी शब्दांचा अर्थ संदर्भाने ध्यानी येतो, व 'सांगतांव, लगीन न्हाणे, येणाजाणा कर' इत्यादी क्रियापदेही, वेगळी रंगीत फुले हारांतून उमटून दिसावी तशीच शोभतात. गोव्याला देवाने सृष्टीसौंदर्य

जसे मुक्तहस्ताने बहाल केले आहे तद्वत तेथले स्त्रीसौंदर्यही अनुपम बनवलेले आहे. महानंदा या रूपवती देवदासीचे रम्य भावचित्रण अतिनाजूक कलमाने यात वर्णित झाले आहे, तेही सत्यदर्शी ठरावे, इतके स्वाभाविक !

हीही कादंबरी गारंबीच्या बापूप्रमाणे वातावरणाच्या प्रभावी पार्श्वभूमीवर आहे. पण त्यातल्या व्यक्तिचित्रणालाच अधिक उठाव देणारी व म्हणूनच अधिक गुणशाली झाली आहे.

आणि जरा वेगळ्या प्रकारच्या वातावरणनिष्ठ कादंबरीचे एक छानदार उदाहरण नजरेसमोरच आहे, ते विमल मित्र यांच्या ' साहिब बिबी गुलाम ' या कादंबरीचे. त्याचा हिंदी अनुवाद मी वाचला. अलके, अग किती वेगळा कालखंड, न् वर्णित परिसरही किती अनोखा ? इंग्रजी राजवट नव्यानं सुरू झाली त्या काळात बंगालमधल्या कुटुंबजीवनात ज्या अनेक सांस्कृतिक व सामाजिक घडामोडी होत होत्या, त्या पार्श्वभूमीवर याचे कथानक रंगले आहे. विशेषतः मोडकळीस आलेल्या एका सरंजामशाही खानदान कुटुंबाची ढासळती प्रतिष्ठा व त्या कुटुंबात शिरलेल्या उच्च राहणीतल्या अनिष्ट प्रवृत्ती यांचं इतकं विदारक व यथातथ्य वर्णन आजवर कोणी केलं नसेल ! अर्थात यातही नायक-नायिका यांची प्रेमकहाणी आहेच, पण ती मुग्धरूपात आहे. ते सूत्र केवळ घटना ओवण्यासाठी घेतलेले वाटते, इतकेच नव्हे तर त्यावेळच्या उसवलेल्या, विस्कटलेल्या उच्चवर्गीयांच्या सामाजिक परिस्थितीचे मणीच मनात ओघळत राहतात ! वातावरणप्रधान कादंबरीचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून तू ही कादंबरी अवश्य वाच एकदा सवडीनं.

वातावरणनिष्ठ कादंबरीचा एक वेगळा प्रकार आजकाल समाजात नव्याने वाढत आहे, तो म्हणजे साधारणपणे पांढरपेशा व सुखवस्तु कुटुंबजीवनाच्या क्षेत्राबाहेर असलेल्या अनोळखी वातावरणावर आधारलेल्या कादंबऱ्यांचा. उदा. माहीमची खाडी, हातभट्टी, गढूळ पाण्यातील मासोळ्या इत्यादी पुस्तकांचा. तू ही पुस्तके वाचली आहेस का ? या प्रत्येक पुस्तकात भिन्न वातावरण दिसते. ' माहीमची खाडी 'मध्ये मधु मंगेश कर्णिक यांनी झोपडपट्टीतले लोकजीवन वर्णिले आहे, तर ' हातभट्टी 'त शंकरराव खरातांनी खेड्यातून ती कशी चालते, व तिच्या संचालनाने आजूबाजूचा ग्रामीण व दरिद्री लोकांचा परिसर– अगदी पोरापासून वृद्धापर्यंतचा– कसा

धुंदावलेला असतो, याचे यथासांग वर्णन केले आहे. 'गढूळ पाण्यातील मासोळ्या' या लीला श्रीवास्तव यांच्या पुस्तकात वेश्याजीवनाचे भडक, तरीही घृणास्पद पण करुण चित्रण त्या वेगळ्या वातावरणाचे रंग घेऊन उभे राहिले आहे. या स्त्रियांच्याही पाठीमागे उग्र जीवनकलह लागलेला आहेच. तथापि वासनांच्या उघड्यानागड्या जीवनदर्शनाआडून केव्हा केव्हा अवचित प्रत्ययास येणारी सहृदय माणुसकी, तिचे या कादंबरीत विशेषतेने दर्शन घडते, ते उत्तम झाले आहे. अर्थात याबद्दल मी जास्त लिहीत नाही, कारण तुला अशा कादंबऱ्यांची आवडही नाही! पण यातून आपणास अनोळखी, तरीही आपल्या समाजातल्याच एकेका भिन्न थराची जीवनचित्रे परिचित होतात, म्हणून मी यांचा उल्लेख केला आहे एवढेच. तू या दृष्टीने ही पुस्तके एकदा वाचावीस असं म्हणते.

तर समजले ना? वातावरण, हा कादंबरीतले नाट्य रंगवणारा रंगमंचच एकप्रकारचा. त्याची विविधता व रंगत कादंबरीच्या विषयानुरोधाने नटलेली असते. त्याचे प्रकार किती म्हणून सांगू? या वातावरणाची व्याप्ती चांगली ऐसपैस असलेली आपण या प्रकरणाच्या सुरुवातीस 'मुंबईच्या महानगरीत' पाहिली पण अशा दर कादंबरीला वातावरण अशा मोठ्या परिसराचे लागते असे मात्र नाही. हं, सर्व महामुंबई नव्हे तर तेथला केवळ एक 'विमानतळ'सुद्धा संपूर्ण कादंबरी घडवणाऱ्या स्थळाची जागा घेऊ शकेल! शकेल का? आहेच त्या प्रकारची एक पाश्चात्य कांदंबरी. तिचं नावच मुळी 'एअरपोर्ट' व लेखकाचे नाव आहे 'ऑर्थर हेले.' यांत कथानकाचे मध्यवर्ती घटनास्थळ 'एअरपोर्ट' हेच आहे व 'या गजबजलेल्या एअरपोर्टवरील एक दिवस' एवढाच या कादंबरीचा छोटासा कालखंड कल्पिला आहे– आणि एक दिवसच कशाला? अलके, नाटककार वसंत कानेटकरांनी 'अश्रूंची झाली फुले' मध्ये तर याहूनही कमी मुदतीत– केवळ काही तासांत विमानतळावर किती रोमहर्षक घटना घडू शकतात याचा प्रत्यय आणून दिला आहे, ते तुला ठाऊक आहेच. तेव्हा स्थळ लहानमोठे कसेही असो, आणि कथानक एका दिवसाचे चिमुकले असो किंवा वर्षानुवर्षांच्या हकीगती सांगणारे दीर्घकालाचे असेना? वर्णनांचे दुर्भिक्ष तेथे असण्याची काय जरूर? येथे तर उलट 'सामर्थ्य

आहे लेखनाचे– जो जो लिहील तयाचे' असेच म्हटले पाहिजे आणि लेखकाला हे सामर्थ्य केवळ कोणा देवतेच्या वरदानाने क्षणात थोडेच प्राप्त होते ? तेथे वर्षानुवर्ष अभ्यास केला पाहिजे, शिवाय लेखनशैलीही त्याच्या जोडीने कमावली पाहिजे ! तसेच निरीक्षणाने वातावरणाचे बारकावे टिपले पाहिजेत ! कठीण तपस्याच ती एक प्रकारची, पण अलके, काही यशस्वी लेखकांनी ती जरूर केलेली आहेच ! या आर्थर हेलेचीच 'फायनल डायग्नोसिस' (अंतिम निदान) या नावाची अशीच एक नमुनेदार कादंबरी आहे, तिचेच उदाहरण बघ ना ? येथे वातावरण अथपासून इतिपर्यंत इस्पितळाचेच आहे. उनेक ठसठशीत व्यक्ती या कथानकांत आहेत व त्यांचे व्यक्तिमत्त्वही उठून दिसणारे आहे, हेही खरे. तथापि सारी पार्श्वभूमी एका इस्पितळाचीच ! ती इतक्या सूक्ष्मतेने, यथातथ्यतेने रंगवली गेली आहे की वाचकाला आपणही त्या इस्पितळात राहायला गेलो आहोत असे वाटू लागते !

वातावरणातून घटना निर्माण होणे व त्या घटनांतून एखाद्या व्यक्ति-चित्रणाला अतिशय प्रभावीपणे उठाव मिळणे या संदर्भात आणखी एका कादंबरीचं एक ठसठशीत व मनावर दीर्घकाळ ठसा उमटवून ठेवणारं उदाहरण आत्ता नजरेसमोरच आहे. ते त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या 'बखर एका राजाची' या पुस्तकातलं. अलके, ही खरेच दक्षिणेकडच्या एका राजाची करुण कथा आहे व ती आत्मनिवेदनपर पद्धतीनं लिहिली गेली आहे, त्यामुळे तर तिच्यातला जिव्हाळा आणखीच मनाला मिठी घालतो बघ. तसे या राजाभोवती एक संपन्न संस्थान आहे, तो तेथला मालक. श्रीमंती तर दोन्हीं हात जोडून पायाशी चोपदारासारखी उभी. पत्नी सुंदर पण कारस्थानी, दिवाण, कारभारी, अधिकारी, रेसिडेंट, प्रजाजन, वैयक्तिक मित्र या भिन्न भिन्न स्वभावी व्यक्तीचे एक कोंडाळे राजाभोवती आहेच व ह्या सगळ्या संस्थानी प्रतिष्ठेच्या, दरबारी श्रीमंतीच्या दडपणां-तून सुटून एका गरीब तरुणीवर सच्चेपणाने प्रीती करण्यासाठी हा राजा– किंवा त्या राजातला सुस्वभावी प्रेमिक तरुण म्हणू या– जन्मभर तडफडत राहिला आहे, याचं हे मनाला चटका लावणारं (व चटका देणारंही !) शब्दचित्र ! वातावरणाच्या निराळेपणाचा तर साक्षात्कार यांत जागोजाग

होतो तो तुझ्यासाठी.'

आणि ह्या वातावरणातल्याच उपमा देण्याचे कौशल्यही असेच–

'महाराज शांत, गंभीर होते. सह्याद्रीच्या शिखरासारखे. राजगडच्या बुरजासारखे, दर्यातल्या जंजिऱ्यासारखे अचल होते.'

या कादंबरीत घटनांनीच नायकाला उठाव दिलेला पानोपानी दिसेल तुला. केवळ स्थलप्रधानतेहून हा प्रकार केव्हांही श्रेष्ठ ठरणार आहे, हे सांगणे नकोच.

पण या झाल्या ऐतिहासिक व काही वर्षांपूर्वीच्या कादंबऱ्या, त्यांतून मन काढून आपण अगदी आधुनिक कादंबरी वाङ्मयाकडे जरा वळू. वातावरणप्रधान कादंबरीचे अगदी ताजे उदाहरण हवे असल्यास अरुण साधू यांचे 'मुंबई दिनांक' हे पुस्तक घे. नावापासूनच स्थलविशेषता दृष्टीस येते व ती सर्व कादंबरीमध्ये एखाद्या गालिच्यासारखी अंथरलेली दिसते ! यात तऱ्हेतऱ्हेच्या व्यक्ती आहेत पण 'मुंबई' हेच त्या सर्वांचे कार्यक्षेत्र व वर्णनक्षेत्र आहे, लेखकाच्या लेखनाचा 'फोकस' मुंबईवरच स्थिरावलेला आहे. फार सुंदर वर्णने आहेत वघ. तू वाच. महत्त्वाच्या, साध्या, कारस्थानी, सरळ, राजकीय व प्रापंचिक अशा अनेक प्रकारच्या भिन्न भिन्न व्यक्तींचे चित्रण यात आले आहे, तेही अप्रतिम जमले आहे व त्यांचा परस्परांशी संबंधही आहे, तरी पण यात बरेच महत्त्व आहे ते 'मुंबईनगरी' लाच ! उदाहरणार्थ खालील वर्णन पाहा–

'पहाटे पाच मुंबई आता हलकेहलके आळसावत झोपेतून जागी होऊ पाहते आहे. लोकल्स धावू लागल्या आहेत. लोकलसची स्टेशनं जागी झाली आहेत, दूधवाले, फेरीवाले, रात्रपाळ्यांचे कामगार व रात्री फर्स्टक्लासमध्ये बसायची भीती वाटणारे काही ऑफिसर्स यांची लोकलमध्ये धमाल आहे. शहर जागं झालं नसेल. पण दूरच्या उपनगरातली घरं केव्हाच जागी झाली आहेत. नोकऱ्या करणाऱ्या बायांची अंघुणी, स्वैंपाक चालू. पुरुषाच्या दाढ्या, धावपळ. ड्यूटीज लवकर असणारांची गाडी पकडण्याची धांदल. मुंबई जागी होतेय,

काळोखाची शाल सरकवून उठतेय.'

महानगरी मुंबई जणू काय कोणी निद्रिस्त रमणीच ! ती जागी होण्याचे हे वर्णन जेवढे बारीक तपशीलाचे तेवढेच यथातथ्यही आहे ना ? याच दोन गुणांनी स्थलप्रधान कादंबरी अधिक यशस्विनी होते.

अशा वातावरणनिष्ठ कादंबरीवर्गात ग्रामीण कादंबऱ्यांचा अवश्य समावेश करायला हवा, कारण त्या वेगळ्या वातावरणाचे रंग अशा कादंबरीत फार मोठ्या प्रमाणात आढळतात. आजवरच्या कादंबऱ्यांतून भिन्नभिन्न तऱ्हेने हे वातावरण दर्शवले गेले आहे. 'माहीमची खाडी' यात मुंबईच्या झोपडपट्टीचे वर्णन, तर ग. ल. ठोकळ यांच्या कादंबरीतून शेतामळ्यांचे. व्यंकटेश माडगूळकरांच्या बनगरवाडीमध्ये धनगरवस्तीच्या एका गावाचे वर्णन आहे. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' कादंबरीत आणखी एक वेगळी तऱ्हा दिसते ती, शेतामध्ये असलेल्या व राबणाऱ्या पाळीव प्राण्यांच्या वर्णनांची. ती जरा बारकाईने वघू या. यातला नायक 'नारबा' हा एका शेतकऱ्याकडे काम करणारा गरीब नोकर व याचे सारे विचारविश्व म्हणजे त्या मालकाची गुरेढोरे, शेळ्या, कोंबड्या यांचेच.या नारबाची या मुक्या प्राण्यांवर विलक्षण माया दिसते. आणि याची म्हणजे कादंबरीचीही भाषा पूर्णपणे खेडूत शेतकऱ्यांच्या खास बोलीची आहे– उदाहरणार्थ मालकाच्या म्हशीला खाटीकखान्यात नेताना पाहून तर ह्या गड्याचं मन हलून गलबलून गेलंय. तो म्हणतो–

> 'म्हैस चालली, कुठं चालली, तिला काय ठाव न्हवतं. मालकानं खाटीकखान्यात न्हेऊन हुबी केली, तरी गप वाट बगत हुबं न्हायाचं. तिच्या हातात कायच न्हवतं– देवानं जनावराला हात एक दिलं न्हाईत, त्ये बरंच हुतं, अवघडली कास दोन्ही पायात घेऊन ती वाट जवळ करू लागली. फटागडी म्हस नी दोन रेडकं तिला बघून वरडली. जिभा लांब करता आल्या असत्या तर त्येंनी एकमेकीला चाटून घेतलं असतं, डोळ्यांत डोळं घालून बोलल्या असत्या.'

मुक्या जनावराचे भावदर्शन अन् तेही या अगदी गावरान पण खास त्यांच्याच बोलीभाषेत करायचं कौशल्य सामान्य थोडंच ? या कादंबरीत

होतोच, कारण राज्य तळहाताएवढं का असेना? तेथे हेवेदावे आहेत, गुंडगिरी आहे, कपटी कावे आहेत, माणसापेक्षाही त्याच्या अधिकाराला, पैशालाच, अधिक महत्त्व हे वारंवार जगात दिसणारं, असंही वातावरण आहे व द्रव्याला, सत्तेलाच अधिक महत्त्व असतं, हे कटू सत्यही यातून जागोजाग प्रकटलेलं दिसतं. त्याचा प्रत्यय आज घडीला समाजात पावलो-पावली येणाराच नव्हे काय?

आणखी एक वेगळ्या प्रकारची वातावरणप्रधानता लेऊन काही सुंदर कादंबऱ्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या आहेत. हे वेगळे वातावरण म्हणजे राजकीय घडामोडींचे होय. या निराळ्या वर्णनक्षेत्राच्या नाविन्यामुळेच ह्या कादंबऱ्या एकदम लोकप्रियतेच्या प्रांतात येऊन उभ्या राहिलेल्या दिसतात. खूप वर्षांपूर्वी मी स. वा. हुदलीकर यांची 'पश्चिम आघाडीवर सामसूम' ही एक युद्धक्षेत्रासंबंधी भाषांतरीत कादंबरी वाचली होती. त्यात कादंबरीचा नेहमीचा मसाला–प्रेमत्रिकोण वगैरे नसूनही ती मला वेगळ्या वातावरणाने एकदम आवडली होती. विश्राम बेडेकर यांची 'रणांगण' ही रोमांचक कादंबरीही तीन तपांपूर्वी लोकांना अतिप्रिय झाली ती नव्या पार्श्वभूमीवरचे रोचक वातावरण रंगवल्यानेच. कै. माडखोलकरांच्या 'नवे संसार, मुक्तात्मा' वगैरे पुस्तकेही त्यावेळच्या राजकीय वातावरणाच्या पार्श्वभूमीवर असल्याने लोकप्रिय झाली होती, असे आठवते. अशाच प्रकारच्या पण एका वेगळ्या तऱ्हेच्या राजकीय रंगमंचावर, दणदणीत पदाघात करीत येणारी अलिकडची एक समर्थ कादंबरी म्हणजे यशवंत कर्णिक यांची 'निळा डोह' ही होय. ही गोव्याच्या मुक्तिसंग्रामात लढत देणाऱ्या एका क्रांतिकारक देशभक्ताची जीवनकथा. पण अलके, येथे गोव्याचा रम्य निसर्ग अगर स्त्रीसौंदर्य वगैरे गोष्टींना अगदी गौणस्थान आहे आणि सारे महत्त्व आहे ते, रिव्हॉल्वर्स, निर्दय, उर्मट पोर्तुगीज अधिकारी, गुप्त कट करणारे हिंदी तरुण व परकीयांशी लढत देणारी त्यांची प्रखर देशभक्ती यांच्या वर्णनाच!

अलके, जरा या 'निळा डोह' कादंबरीची वेगळीच पार्श्वभूमी बघ हं, ती गोव्याचा मुक्तिसंग्राम ही आहे. भारतसरकारशी गोव्याचे युद्ध सुरू झाले व या संग्रामात गोवामुक्तीसाठी अनेक तरुणांनी धडाडीने स्वतःला

संग्रामात झोकून दिले ! 'विश्वंभर कामत' हाही त्यातलाच एक शूर तरुण, व त्याचे हेही एक टोपणनावच. खरे नाव होते मिलिंद कोतवाल. हिंसात्मक वृत्तीने गोव्यातले लष्करी बळ कमी करण्याच्या प्रयत्नात हा अखेर धारातीर्थी पडला आहे. या शोकांतिकेची ही हकीगत 'निळया डोहा'त रंगवली गेली आहे. त्यानुषंगाने गोव्यातली बोली, गोव्यातली गावे, तेथले मध्यमवर्गीयांचे जीवन तसेच परक्यांची तेथे अमानुष सत्ता गाजवणारी निर्दय कारकीर्द, या सगळयांचा एक हृदयस्पर्शी चित्रपट यात प्रकट झाला आहे, पण खरे म्हणशील तर या युद्धाची पार्श्वभूमी हीच यात खरी महत्त्वाची आहे ! विश्वंभर कामत हा नायक देशकार्यापायी स्वजीवन अगदी तुच्छ मानतो; तरी रणांगणातही एखादी नव्या नव्हाळीची फुलवेल कोपऱ्यात उगवावी, तशी एक नाजूक प्रेमलता या पार्श्वभूमीच्या आडोशाला फुललेली आहेच ! दीपा ही अडोल मुग्ध तरुणी विश्वंभरावर प्रेम करते, तोही तिच्यावर जीव जडवतो. पण धगीजवळ, आचेजवळ फुले उमलली तर ती कोळपणारच ! तशी ही जीवाला ओढ लावणारी फुलवेल मुक्यानेच फुललेली व पुढे निःशब्दपणेच कोसळलेली पाहून विश्वंभर कामताची प्रखर देशभक्ती अधिकच मनावर ठसते, तथापि असे असूनही 'निळा डोह' ही कादंबरी वातावरणप्रधानच ठरणारी आहे. जरूर वाच तू एकदा ती.

भारतीय राजकीय वातावरणाच्या अनुषंगाने लिहिलेली व मला आवडलेली आणखी एक कादंबरी म्हणजे प्रभाकर पेंढारकर यांची 'प्रतीक्षा' ही होय. भारत-पाक युद्धाच्या पार्श्वभूमीवर ही लिहिली गेली आहे आणि हे युद्ध १९६५ सालचे. लेखक, पॅरॅशूट ट्रेनिंगवर एक शैक्षणिक चित्र तयार करण्याकरता पॅराट्रपर्सबरोबर दोन महिने राहिला होता. त्यामुळे पॅरॅशूट-इतकाच ते वापरणाऱ्या सैनिकांचा अगदी जवळून त्याला परिचय घडला. या देखलेल्या, अनुभवलेल्या विश्वांतून ही एक रोमहर्षक कादंबरी निर्माण झाली आहे ! त्यातून लेखकाने ही पात्रमुखी पद्धतीने लिहिल्याने तर हिच्यात विलक्षण आत्मीयताही आलेली आहे. मुख्य म्हणजे आपल्या देशातला आजचा तरुण जवान पूर्वीच्या भारतीय वीरांइतकाच किंबहुना अधिकच शौर्याने तळहाती शीर घेऊन शत्रूशी कसा लढत देतो, याची ज्वलंत साक्ष देणारी ही कादंबरी आहे.

हे वातावरण सामान्य वाचकाला अगदीच नवखे. उगीच, ते सुंदर प्रेयसीच्या भेटीने थरथरणारे वा तिच्या नकाराने नायकाचे निराशलेले उद्‌गार किंवा उसासे येथे मुळी नाहीतच ! अर्थात या जवानांना कौटुंबिक पाश नसतात असे थोडेच ? नायकाच्या बरोबरचा सहकारी 'यश', त्याची पत्नी, अन् त्याची मुलगी– छोटी मुन्नी– यांचे छोटेसे प्रेमविश्व यांतही नाजूकपणे सूचित झालेले आहे. नायकाला स्वत:लाही आपल्या प्रेयसीच्या– कल्पनेच्या–पत्रांची आठवण मधूनमधून येते आहेच, पण 'यश' या धुमश्चक्रीत मरतो व नायकही गोळी लागून मृत्युशय्येवर असतानाच त्याला आपल्या आयुष्यातल्या सुखक्षणांची आठवण येते आहे. 'पॅरॅशूट' उघडले जाते आहे– (विचारातले व तंद्रावस्थेतले पण !) व नायक निघतो (महा) प्रयाणाला ! बस्. इथेच या योग्य क्षणाचे टिप्पण साधून कादंबरी संपते ! वाचून झाली तरी पॅराट्रूपर्सची आयुष्यकथा व व्यथा कित्येक दिवस मनासमोरून हलू नये अशा समर्थ व जिव्हाळ्याच्या निवेदनाने यांतील वातावरणनिर्मिती झाली आहे. उदाहरणार्थ विमानांतून जमिनीवर उडी घेतानाची या पॅराट्रूपर नायकाची मन:स्थिती व वातावरण याची कल्पना देणारे हे वर्णन पाहा जरा–

> 'प्रत्येक पॅराट्रूपरच्या जीवनात भीतीचा एक क्षण असतो. कुणाला विमानातच चढताना ती वाटते– कुणाला पॅराशूट बांधताना, तर कोणाला 'ग्रीन ऑन'ची घंटा ऐकली की, मला, ती विमानाच्या दारात येऊन उभं राहिलं की, कोठून-तरी येऊन क्षणार्धात ग्रासून टाकते. बाराशे फूट खाली इतका वेळ चित्रासारखी रमणीय दिसणारी जमीन एकदम मृत्यूचा भयानक जबडा बनते, आणि 'गो' हा डिस्पॅचचा शब्द ऐकला की हृदयाचा एक ठोका चुकतो. शरीर जड होऊन समोरच्या पोकळीतून फेकून देणं अशक्य होतं.'

या कादंबरीत वातावरणातून चमकून उठणारे एका सैनिक व्यक्तीचे जीवनचित्र तर वेधक झाले आहेच पण त्याची राष्ट्रीय वृत्ती त्याहूनही नजरेत भरणारीच आहे. अशी ही कादंबरी, प्रभावी परिसरातून घटनांना

जन्म देणारी व घटनांतून उत्तम व्यक्तिदर्शन करणारी आहे हेच तिचे खरे यश !

मला वाटतं वातावरणप्रधान कादंबरी, व तिचे विविध रूपाविष्कार या पत्राच्या वाचनाने तुझ्या छान ध्यानी आले असतील ? इतके की आता तू चोखंदळ वाचकांच्या दृष्टिकोनाने कादंबरी– वातावरणप्रधान की व्यक्ती-प्रधान ? हा प्रश्न ताबडतोब व सहज सोडवू शकशील, खरे ना ? या दोन्ही प्रकारच्या कादंबऱ्यांची वेगवेगळी प्रकृती, वेगळे रूपरंग व वेगवेगळचा दर्जाची गुणवत्ता यांचा आता तुला जाणिवेने प्रत्यय घेता येईल ! आणि ही तुझी नजर एकदा का तयार झाली, की लेखनाचे (स्वतःच्या) काम किती सुकर होते, हेही तुला अनुभवाला येईल ! बस्, तोच तर ही पत्रं लिहिण्याचा उद्देश आमचा.

*

अलके, हे सत्रावे पत्र ! आता मात्र एकच– अठरावे पत्र लिहून मी ही कधीची चालू असलेली पत्रमाला पुरी करीन म्हणते आहे बरे का ! अच्छा बाय !

तुझी,
सौ. ताई.

□ □

१८ कादंबरी लेखनाचे उद्दिष्ट

प्रिय अलका,

आत्तापर्यंत मी तुला कादंबरीचे प्रकार, तिचे कथानक व त्याचे निवेदन, कादंबरीची रचना, भाषा, व्यक्तिदर्शन वगैरेबद्दल साधक बाधक गोष्टी खूप सांगितल्या, पण कादंबरीला चैतन्य प्राप्त करून देणाऱ्या व तिची प्रत्यायकता ज्या एका बाबतीवर अनेकांशी अवलंबून असते. त्याबद्दल अजून आपला काहीच विचारविनिमय झालेला नाही, ती गोष्ट म्हणजे कादंबरीलेखनाचे उद्दिष्ट कोणते, तिचा हेतू कोणता ? हीच ! ही बाब सर्वांत महत्त्वाची असल्याने ती तुला विस्ताराने आजच्या या पत्रात सांगून मी ही 'अठरा अध्यायांची' पत्रमाला पुरी करते.

*

अलका, अगदी पहिली गोष्ट ही, कादंबरीचा हेतू किंवा ती लिहिण्याचे आपले उद्दिष्ट काय आहे ? याचा लेखकाने कादंबरीलेखनापूर्वीच मनाशी ठाम निश्चय करणे जास्त चांगले. तू नवी कादंबरी लिहिणार लिहिणार म्हणते आहेस त्याचे उद्दिष्ट कोणते, हे तुझ्या मनात आधी पक्के झालेले आहे का ? असेल तर छानच, नसेल तर, हे पत्र तुला त्याबाबत मदतशील ठरू शकेल.

अलका, नवी कादंबरी लिहिण्यास हाती घेण्यापूर्वी स्वतःच्या मनाला तू

काही प्रश्न विचारून पहा, असे मी सुचवीन. पहिला सर्वात महत्त्वाचा प्रश्न– **'मी ही कादंबरी लिहिणार आहे, या लेखनाचा हेतु अगर उद्दिष्ट काय ?'** व दुसरा प्रश्न :

'मी कोणत्या दृष्टीकोनानं हे लेखन करणार आहे ?

दिसायला अगदी 'सोप्पेसे प्रश्न, पण उत्तरे मात्र अशी सोपीशी नाहीत हं यांची, तरी पण ती उत्तरे या पत्रात तुला मिळतील अशी अपेक्षा मी करते. अलका, हे मी लिहिते आहे खरी, पण यावेळी तुझा प्रश्नांकित चेहरा नजरेसमोर वारंवार येतो आहे, व तुझे चेष्टेच्या स्वरातले, कुरकुरीचे प्रश्नही जणू कानावर येताहेत–

'काय ? कादंबरीचा हेतू कोणता ? तो कादंबरीच्या आधीच ठरलेला असला पाहिजे ? फार छान. मग आमच्या स्फूर्तीची वाट काय ? मनात लेखनाची कल्पना उत्स्फूर्त झाली की लगेच मला लिहावेसे वाटते– त्यावेळी मी कादंबरीचे उद्दिष्ट काय ? असला गंभीर विचार करीत बसू ? झकास ! मग स्फूर्ती विरघळून नाही का जाणार आमची या विक्षेपाने ?'

मान्य ! पण एक सांग, या स्फूर्तीच्या क्षणापूर्वीही केव्हातरी आपण अमुक विषयाबद्दल लिहायचे !' अशी प्रेरणा तुझ्या मनात जागी झाली होती ना ? तुझ्या अंतःर्मनाने त्यावर जरूर विचार केलेलाही असेल व कथानक कागदावर उतरण्यापूर्वीच केव्हातरी तुझ्या मनात घोळत राहिलेही असणार ? नक्कीच ! त्याची– त्या कारणाची– आठवण कर बरं एकदा म्हणजे तुझी कादंबरी 'सहेतुक' अशी होणार असेल तर त्या हेतूचा तुला पत्ता लागेल ! पण असा काही हेतू मनात पक्का ठरला नसेल तर मात्र लेखकाने पुढील वेगवेगळे प्रश्न स्वतःच्या मनाला करून पाहावेत, म्हणजे त्या प्रश्नांच्या उत्तरांतून 'कादंबरीलेखनाचे उद्दिष्ट लेखकासमोर स्पष्ट होत जाईल. प्रश्न असे :

१) आजकालचे माणसाचे जीवन घाईगर्दीचे, धकाधकीचे, आर्थिक पेचांनी आवळलेले व नव्या सामाजिक बंधनानी काचल्यासारखे झालेले आहे. अशा वाचकांचे घटकाभर नितळ रंजन, मनोविनोदन व्हावे व त्याच्या थकल्या वृत्तींना थोडा विसावा-दिलासा मिळावा, एवढाच 'साधासा' पण

छान हेतू या कादंबरी लेखनात आहे काय ?

२) केवळ रंजनापेक्षाही त्या रंजनातून समाजाचे काही उद्‌बोधन होईल अशी एखादी बोधप्रद कादंबरी लिहिण्याचीच माझी खरी इच्छा आहे का ?

३) आजच्या नव्या कुटुंबजीवनातल्या समस्या, विसंगती, व दोष या पाहून माझे मन विषण्ण वा जागृत झाले आहे काय ? यातीलच एखाद्या बाबीवर माझी कादंबरी आहे काय ?

५) कादंबरीतून एखादी नायिका वा नायक यांचा उच्च आदर्श रंगवून वाचकांना त्यांद्वारे मार्गदर्शन करण्याचा माझा हेतू आहे का ?

६) कुटुंबापेक्षाही सामाजिक समस्या आज अधिक उग्र कठोर झाल्या आहेत, विषमता, अन्याय, छलकपटांचे प्रकार पाहून माझे मन चिडून उठत आहे. आवारा मुलांचे प्रश्न, देहविक्रीच्या कठोर पाशांत नाइलाजाने वा जुलमाने अडकलेल्या स्त्रिया, जातिभेदाने उत्पन्न होणाऱ्या महासमस्या, आर्थिक ओढग्रस्त, व त्यामुळे येणारी अन्याय्य मार्गाने पैसे मिळवण्याची वासना, इत्यादी साऱ्याच समस्या आज प्रश्नचिन्हांसारख्या वाकड्यातिकड्या रूपात उभ्या राहतात मनासमोर ! यातील एखाद्या प्रश्नावर मी लिहू इच्छित आहे काय ?

७) सध्याच्या बदलत्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवरही सरस व परिणामकारक कादंबरी लिहावी, असे मी मनीमानसी आणले आहे काय ?

पाहिलेस अलका ? आजघडीच्या कादंबरीचे उद्दिष्ट किती तऱ्हांचे असू शकते, ते ? अर्थात या सर्वांबद्दल मी विस्ताराने लिहीन तर ते एक 'पत्र' नव्हे तर माहितीपत्रकच ठरायचे ! तसे नाही उपयोगाचे ! तेव्हा शक्य तेवढ्या त्रोटकपणेच या हेतूंची आपण थोडी छाननी करू हे ठीक.

●

अलका, या हेतुप्रश्नापैकी पहिल्या प्रश्नाचे उत्तर साऱ्यांत सोपे. अग, केवळ नितळ रंजन हेतु ठेवून लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांचे खरेच वाचक-वर्गात अगत्याने स्वागत होते. पुष्कळ लोकांना जीवनाच्या धकाधकीत गंभीर समस्यारूप कादंबऱ्याचा विचार करीत बसायलाही वेळ नसतो, वा डोक्याला उगीच ताण देणाऱ्या अशा कादंबऱ्यांची आवडही नसते. तेव्हा रंजनप्रधान कादंबरी लिहिण्याची प्रेरणा तुला होत असेल तर, तू ती अवश्य लिही. त्यातही

विनोदाचे रंग जर कादंबरीला खुलून दिसत असले, तर वाचकांच्या निर्दोष मनोरंजनाचा हा तुझा हेतू शंभर टक्के साध्य होईल तुझा. विनोद, हे, माणसाच्या मनातील कडवट परिस्थितीचे शल्य विसरायला लावून त्याला क्षणभर हसायला लावणारे साहित्याचे एक अनुपम उपायन आहे. पण अशा विनोदी कादंबऱ्या लिहिणे बहुधा अवघड असले पाहिजे. कारण एकंदरीत कादंबऱ्यांच्या संख्येत त्यांचे प्रमाण अल्प दिसते. अर्थात तुला हा विनोदाचा खमंग मसाला मिळवून कादंबरी लिहिता येईल, तर अवश्य प्रयत्न कर. फक्त हा विनोद पांचट नसावा, तर, तो साहित्यिक अभिरुचीस पसंत पडणारा व मार्मिक असावा इतकेच, तेच नेमके यांत कठीण कलम ! आजही बरेच लेखक विनोदी कादंबऱ्या लिहितात, अशा की त्या वाचताना गंभीर वृत्तीच्या माणसांच्याही ओठी एखादी तरी स्मितरेषा उठवण्याची त्यात शक्ती असते. उदाहरणादाखल काही अलीकडच्या विनोदी कादंबऱ्यांची आठवण करून देते. जमल्यास वाचून पाहा. सुरेश मुळे यांच्या ' काका मला हसवा ' किंवा ' म्हातारे नवरे गमतीला ' या विनोदी कादंबऱ्या मला आवडल्या होत्या. तुला आवडतात का बघ !

अर्थात कादंबरी विनोदानेच रंजक ठरते असे मात्र नाही हं अलके, पुष्कळदा आकर्षक कथनशैली, यथायोग्य गुंफण, व कथानक एकदम रोचक वा लोकांना जिव्हाळ्याचे वाटणारे, असे असले तर, त्या कादंबरीत विनोद नसूनही, ती उत्तम प्रकारे वाचकाचे मनोरंजन करू शकते ! खरे म्हणशील तर वाचकाला कादंबरी हातातून खाली ठेवावीशीच वाटू नये– ती संपेपर्यंत. हीच तिच्या चित्तवेधकपणाची खरी कसोटी.

अलके, आणखी एका हेतूचीही छाननी आताच या रंजकतेच्या विवेचनाबरोबर केलेली बरी, रंजनाबरोबर समाजाला काही बोधप्रद सांगता यायला हवे–' म्हणजेच कादंबरी जेवढी रंजक तेवढीच उद्‌बोधक असावी–हाच तो हेतू होय ! हा हेतू गैर थोडाच ? उलट आमच्या पिढीच्यावेळी तर रंजन व उद्‌बोधन हे दोन्ही हेतु ज्या कादंबरीत यशस्वी तऱ्हेने सफल झालेले दिसतील, तीच उत्कृष्ट मानली जात असे !! पण आज मात्र कादंबरीच्या उत्कृष्ठ दर्जाची कसोटी केवळ, ती रंजनप्रधान आहे, वा चांगली बोधप्रद

आहे याच बाबतीनी मानली जात नाही ! आणि अलके ह्या दोन्ही मुद्यांबद्दल उलट सुलट मते ही अनेक लोकांनी व्यक्त केली आहे तीही मी अगदी थोडक्यात तुला सांगते. उदाहरणार्थ हे एक मत ' कादंबरी रंजक जरूर हवी पण तिच्यात बोधाचे उपायन असलेच पाहिजे असे बिलकूल नाही ! ' ह्या मताचा पुरस्कार कै. ना. सी. फडक्यांनी मोठ्या हिरीरीने केला आहे व तो वरचेवर केलेला आहे. ते म्हणतात–

> ' ललित लेखनाचा हेतू, बोध, नीती पांडित्य, यांपैकी एकही नाही. सत्यप्रदर्शन व सौंदर्यविलास हा एकच त्या लेखनाचा हेतू होय. सरस्वती पुराणिकाच्या व्यासपीठावर बसलेली नसून प्रमत्त मयूरपिच्छांच्या सुबक सिंहासनावर बसलेली आहे ! ! !

आणि या मताप्रमाणेच त्यांच्या कादंबऱ्या रंजनप्रधान आहेत– पण त्यात उपदेशाचा गंभीर रंग तुम्हाला फारसा आढळणार नाही.

पण अलका, त्याही वेळेस फडक्यांच्या या मताला जरूर विरोधक होतेच. ते समीक्षालेखनातून वा सभेतून त्यांच्या या विचारसरणीला कडाडून विरोध करायचे ! ते म्हणत– ' फडक्यांच्या कादंबऱ्या म्हणजे केवळ मधुर स्वप्नरंजन ! आधी जीवनाचा रस्ता एवढा फुलांच्या पायघड्या घातलेला नाही व दुसरे प्रीती, ही जीवनात नेहमी सर्वार्थाने अशी सफल होते, असे तरी कुठे आहे ?'

तरी पण अलके, असे आहे, संसारात प्रेमसाफल्याची म्हणा अगर यशस्वी जीवनाची म्हणा, ही आस प्रत्येक व्यक्तीच्या मनीमानसी कुठे तरी जागृत असतेच, त्यामुळे, व्यवहारात जे लाभणे अनेकदा दुर्मिळ, वा दुष्कर असते, असे प्रणयसाफल्याचे अगर संपन्नसुखी जीवनाचे चित्रण कल्पितात पाहूनही आनंद घेणारे अनेक वाचक असतातच ! त्यांनी मात्र मनापासून फडक्यांच्या कादंबऱ्यांचे केवळ स्वागतच नव्हे तर पारायणेही केलेली आढळतात ! होय त्या कादंबऱ्या (म्हणजेच त्यांच्या पहिल्या पहिल्या कादंबऱ्या) अति लोकप्रिय होत्या. कारण एकच ! आधी प्रणय हीच मुळी एक आनंददायी भावना, प्रत्येकाला प्रिय असणारी, त्यातच ते कथानक उत्कट सुंदर ललित वर्णनांनी व रम्य शब्दशैलीने सजलेले, मग ती कादंबरी वाचून तत्कालीन वाचकांचे मन विलक्षण सुखावत असे, यात नवल कोणते ? ललित लेखन प्रथम

वाचकाला खिळवून ठवण्याएवढे रंजक हवे ह्याची साक्ष फडक्यांच्या पहिल्या काही कादंबऱ्यांनी पटवून दिली आहे याबद्दल दुमत नाही !

रंजनाप्रमाणेच बोधप्रद कादंबरीबद्दलही वाचकांत भिन्न मते आढळतात. अलका, आपल्या कादंबरीचे वाचक अनेक तऱ्हेचे असतात. ते समाजाच्या अनेक थरातले व (बालवय वगळता) सर्वच जाणत्या वयाचे असतात या सर्वांनाच, मधे मधे कादंबरीतून मान वर करून उठून प्रश्नात्मकतेने पाहणारा उपदेश वा बोध आवडेल थोडाच ? ते रंगलेले असतात कथानकात, त्यातल्या रम्य वर्णनात ! त्यात विक्षेप आणणारा बोध वा उपदेशाचा परिच्छेद वारंवार आढळू लागला तर कसे काय ? मग वाचक कंटाळून म्हणतो– 'छे छे ! पुष्कळ झालं. आता बस् करा हे बोधामृत. हा कडू काढा ललित कादंबरीत कशाला मिसळता उगीच ? त्याने कथानकाचीच चव जातेय!'

अर्थात या म्हणण्याचा अर्थ, बोधप्रद लिखाण लेखकाने मुळी करूच नये, असा मात्र मुळीच नाही आहे हं अलका. उलट माझे मत तर असेच आहे, की कादंबरी 'सुबोध' असावीच. मात्र एक पथ्य पाळायला हवे– अगदी कटाक्षाने पाळलेच पाहिजे ! ते हे की, कादंबरीतून सद्वर्तनाचा आदेश अवश्य हवा. पण, तो त्या कादंबरीतील घटनांतून आणि त्यातल्या व्यक्ती-दर्शनांतूनच इतक्या सहजतेने व्यक्त झाला पाहिजे की वाचकाला ते 'बोधामृत' आहे असे न वाटता वर्णित व्यक्ती विचारांचाच तो एक अवश्य सहजभाव वाटावा !

आणि हे सोपे नव्हे अलके, उलट फार कठीण आहे, मात्र ही गोष्ट प्रयत्नसाध्य आहे. मीही त्यासाठी पुष्कळ श्रम घेतले आहेतच ! त्या वरूनच तुला एक तत्त्व सांगून ठेवते ते हे की बोध वा उपदेशाचे उपायन कादंबरीतून वेगळे पडून प्रत्यक्ष अलगपणे वाचकांसमोर कधीही येता कामाचे नाही– तर त कथानकातील पात्रांचे विचार व घडत जाणाऱ्या भल्याबुऱ्या घटना यांच्या अवगुंठनातूनच कळे न कळेसे व्यक्त व्हावे–'

यावाबत मला वाटतं आणखी लिहीत बसायला नको. 'सुज्ञांस' सारेच लिहावे लागते थोडेच ?

अर्थात बोध अगर उपदेशामृत वाचकांना प्रत्यक्ष नको असले तरी या प्रश्नाकडे आंणखी एका दृष्टिकोनाने पाहाणारेही काही वाचक आहेत व

असतातच अलका. त्यांचे म्हणणे असे की–

'तुम्ही प्रत्यक्षपणे उपदेश नका करू, तरी पण तुमच्या हाती असलेली जी लेखनकला आहे ती एक अतिशय प्रभावशाली अशी शक्ती आहे हे तर जाणता ना ? समाजमनावर ती अतिशय परिणाम घडवू शकते ! मग या शक्तीचा उपयोग समाजाच्या उन्नतीकडेच का होऊ नये ?' तुला बरोबर वाटतो ना हा त्या वाचकवर्गाचा विचार ? अग ह्याचा पुरस्कार मोठमोठ्या लेखकांनीही वेळोवेळी केलेला आहे, आपले स्वामीकर्ते रणजित देसाई ? यांनी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलतानाही असेच सांगितले होते– ते म्हणाले होते–

> 'लेखक हा देखील समाजाचा एक घटकच आहे. जीवनाची वास्तवता त्याच्या मनात कल्लोळ माजवते, त्याचवेळी त्याच्या सुप्त मनातील आदर्श जागा होतो, त्यामुळे त्यातून साकारणारे जीवन समाजाला विचार करायला लावते !'

आणि हे तर खरेच ! अलके, मलाही अगदी प्रामाणिकपणे वाटते, की, लेखमाला, कथांनकातील पात्रे व त्यांची वागणूक आणि कथाघटना, यांच्या वर्णनातून समाजाच्या उन्नतीला उपयुक्त असे काही जर सांगता आले तर त्या ललितकृतीची मौलिकता अनेकपटींनी वाढेल ! अशा कादंबरीची सुबोधता कोण नापसंत करील ? सांग !

या पत्राच्या सुरुवातीस आपण उद्धृत केलेल्या कादंबरीच्या उद्दिष्टांमध्ये एक उद्दिष्ट 'राजकारणाच्या पार्श्वभूमीवरची कादंबरी' लिहिण्याचेही होते, तिकडे जरा नजर वळवूया अलका, या बाबतीत अगदी प्रथम लिहिण्यासारखी महत्त्वाची गोष्ट ही की, अशी कादंबरी ज्या नवशिक्या लेखकाला लिहावीशी वाटत असेल त्याला त्या संबंधित राजकारणाचा सर्वांगीण अभ्यास असायला हवा व त्याचा दृष्टीकोणही, ह्या सर्व राजकीय परिस्थितीचा परिणाम काय होत आहे, होतो आहे तो इष्ट आहे की अनिष्ट, याबद्दल विचारशीलपणे, व तटस्थपणे पाहाणारा हवा ! पण मला नाही वाटत, तुझी लेखन प्रकृती राजकारणाला कादंबरीरूप देण्याची आहे आहेशी ! तुझे वयही त्या दृष्टीने कोवळे आहे व अनुभवीपणाची जोड तरी ह्या वयाला एवढ्यात कोठली ? तेव्हा या मद्याबद्दल मी फारसे आज लिहीत नाही. फक्त

एवढेच म्हणते की, अशी कादंबरी लिहावीशी वाटेल तेव्हा अशा विषयावर काही लेखकांनी नमुनेदार यथातथ्य परिस्थिती दर्शवणाऱ्या व मनाचा ठाव घेणाऱ्या कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत, त्यांचे प्रथम तू मनन चिंतन कर. मागल्या पिढीतले कै. माडखोलकर यांच्या कादंबऱ्या अशा तत्कालीन राजकीय वातावरणावर आधारलेल्या असायच्या. मुक्तात्मा, नवे संसार ही पुस्तके त्या दृष्टीने मला आजही हृद्य व रोचक वाटतात. तू जमले तर मुद्दाम वाच ती. आजच्या लेखकांपैकी अरुण साधू यांची दोन लोकप्रिय झालेली पुस्तकेही याच राजकीय पार्श्वभूमीवर उभी आहेत, पैकी मुंबई दिनांकचे वर्णन आपण मागल्याच प्रकरणात वातावरण निष्ठतेच्या संदर्भात केलेले आहे पण याचे कथानकही तेवढेच लोभस आहे व ते राजकीय पार्श्वभूमीवर आधारलेले आहे. सिंहासन, हीही त्यांचीच राजकीय कादंबरी. अलका, या दोन्ही कादंबऱ्या अभ्यासनीय अशाच तुला वाटतील एवढंच लिहिते.

कादंबरीतले नायक-नायिका या व्यक्ती आदर्श दाखवून वाचकांना (जमले तर) मार्गदर्शन करण्याचाही एक हेतू आपण मघाशी उल्लेखित केला आहे नव्हे ? त्याबद्दलही थोडेसे बघू या. आजकाल कथा कादंबरीतल्या व्यक्ती आदर्श दाखवाव्या की नाही हा एक मोठाच कूटप्रश्न ठरून राहिला आहे ! काही लोक म्हणतात :–

> 'समाजात हे असे, अत्यंत सज्जन, सत्प्रवृत्त मनाचे तरुण किंवा अति सुंदर, तरीही अतिशय सुशील सद्गुणी वगैरे वगैरे असलेल्या तरुणी कितीशा दिसतात आज ? अगदी हाताबोटांवर मोजण्याइतक्याच ! मग असे व्यवहारात फारसे न दिसणारे आदर्श कशासाठी निर्माण करता उगीच ? जग जसं आहे, समाजातल्या व्यक्ती जशा आज दिसतात तसेच सत्यचित्रण करा ना ? हे रिकामे स्वप्नरंजनासारखे आदर्श हवेत कशाला आज कादंबरीत ?

एका दृष्टीने हा आक्षेप खरा आहे अलका. कादंबरीत सत्य जगांचे प्रतिबिंब उमटते व ते सत्याभासी ठरू शकेल असे समर्थही असतेंच. प्रतिबिंब म्हटले की, त्यात यथातथ्यता हीच प्रमुख ! मग आदर्श व्यक्ती रंगवाव्या

कशासाठी ? त्याचा काय हेतू ?

मनाची अशी चलबिचल करणारा उत्तरपक्ष नेहमीच ऐकू येतो वाचक-वर्गातून ! प्रथम प्रथम मीही अगदी गोंधळून जायची अशी ही, उलट सुलट मते ऐकून ! पण अलके, मनोधारणा माझ्या लौकरच ध्यानात आली. माझे मत पहिल्यापासूनच वेगळे आहे जरा याबद्दल. कादंबरी हे समाजाचे सत्य-दर्शन सर्वांशी नसते आरशाप्रमाणे, –तर सत्यावर कलासंस्करण घडलेले ते समाजाचे एक परिणामकारक चित्रच असते. पण सत्याभासी चित्र म्हणेनास ? या दृष्टीने पाहताना मला वाटे, की अनेक संस्कारक्षम माणसे आपली कादंबरी वाचणार आहेत, स्वतःलाही नकळत त्यातले आदर्श अभ्यसणार आहेत व त्याच्यांकडून नव्या जीवनप्रेरणाही घेणार आहेत ? मग या प्रेरणा सत्प्रेरणाच नकोत का ? अर्थात त्यासाठी जग कसे असायला हवे ? किंवा एवढ्या व्याप्तीने न बोलता, आजचे तरुण तरुणी कसे असावेत ? यांचे चित्रण कादंबरीकाराने अवश्य करावे, ते इतरांना निश्चित मार्गदर्शकच ठरेल अशी माझी तरी श्रद्धा आहे अलका ! उदाहरणार्थ, संसारात पदार्पण, तपश्चर्या या माझ्या पुस्तकांच्या नायिका बघ. आपल्या घरी येणारी नववधू अशी खंबीर, विचारशील, गुणवती व चतुर हवी, असे तर आज अनेकांनाच वाटते, म्हणून 'संसारात पदार्पणा'ची नायिका सुवर्णा अगर 'तपश्चर्याची' नायिका सविता ह्या अशा आदर्श मी निर्मिल्या त्या जरूर अशा असंख्य नववधूंचं प्रतिनिधित्व करू शकणाऱ्याच आहेत ! नायिकेचे गुण, मी कल्पिलेले हे मान्य, पण सत्यसृष्टीत असे उदाहरणही असू शकेल व असतेही, हे तर खरे ? आणि हेही एक प्रकारे समाजाचे जीवनचित्रणच आहे ना ? त्यानेही वाचकांना मार्गदर्शन होऊ शकेल, असे मला अजूनही वाटते–

होय, अलका, मार्गदर्शनाचा हा हेतु ललित लेखनातून स्पष्टतेने दरवेळी प्रकट होतोच असे नाही, पण रानातली पायवाट दिसली नाही तरी ती नसतेच असं थोडेच ? तसा हा 'सुप्त' हेतू, जाणणारे जाणतात व त्या पासून काय बोध घ्यायचा तो घेतातच, हेही आपण ध्यानी ठेवण्यासारखे कलम आहे.

या मार्गदर्शनाच्याही दोन तऱ्हा आजच्या ललित कादंबऱ्यातून मला अगदी ठळकपणे वेगळ्या उमटून पडलेल्या दिसतात.

काही कादंबऱ्या वाचकांना सांगतात– 'जीवनाचा हा रस्ता सुरक्षित व सरळ आहे याने जा. ते हिताचे. दुसऱ्या प्रकारच्या कादंबऱ्या धोक्याचे लाल कंदील घेऊनच जीवनमार्गात उभ्या ठाकलेल्या ! ! त्या म्हणतात :– 'अहो, हा मार्ग पाहा नीट डोळे उघडून ! अति धोक्याचा आहे. खड्डे खळगे फार, काटेकुटे माजलेले आहेत, निसरडे शेवाळ आहे. वाटेत पाय घसरून पडाल ! जीवजीवाणू, हिंस्त्र श्वापदे यांचीही संकटे यात फार, या मार्गाने नका जाऊ ! फिरा मागे ! '

या दोन्ही मार्गदर्शन पद्धती परिणामकारकतेच्या दृष्टीने सारख्याच योग्यतेच्या ठरणाऱ्या आहेत. उदा. आजच्या प्रौढकुमारिकांच्या समस्येबद्दलच पाहा ना ? आजन्म अविवाहित राहून वडिलांचा संसार संभाळणाऱ्या कन्येबद्दल पुष्कळ पुस्तके लिहिली जातात. आत्मसुखाचा, तारुण्यातील प्रीतीचा होम करून त्या त्यागाच्या वेदना अखेरपर्यंत सोशित राहणारी सालस प्रौढकन्या अनेक कादंबऱ्याची आजही नायिकाच आहे ! ती हे सारे सहन करते पण वाममार्ग पत्करीत नाही, की वृत्तीचे सौजन्य व ऋजुता सोडीत नाही ! उदाहरणार्थ सुमति क्षेत्रमाडे यांची अलीकडची 'युगधंरा' ही कादंबरी तू वाचून बघ. त्याची नायिका अगदी अशीच ऋजु आहे. हे एक तऱ्हेचे चित्रण तर दुसऱ्या प्रकारच्या कादंबरीचे उदाहरण तुला वसुधा माने यांच्या (१९७५ दिवाळी मेनका अंकांत आलेले) पारध कादंबरीचे. यातली नायिका अशीच वडिलांच्या संसारासाठी नोकरी करणारी सालस वृत्तीची कुमारिका. पण हिच्या भोवतालच्या नातेवाईक मंडळीकडूनच तिचा छळ होतो, नोकरीचे सारे पैसे बाप घेतो, व तिचे प्रेमलग्न ठरलेले असते त्यातही हा दुष्ट बाप पत्रे लिहून ते मोडून टाकतो. का तर हिचे लग्न झाल्यावर तिच्या पगाराचे पैसे ह्याला मिळणे शक्य नसते म्हणून ! यातच भोवतीच्या परिसरांतील लोकांचा आपमतलबीपणा, व्यसनांधता व अठरा-विश्वे दारिद्र्य, यांचाही वेढा या नायिकेच्या ऋजुतेभोवती पडलेला. अखेर तिला हिस्टरिक फिट्स येतात, त्यातच ती यौवनाकर्षणालाही बळी पडते व मग घाईने एका मारवाड्याशी लग्न करते– तेही दुःखदच होते तिला ! ' प्रौढ कन्याजीवनाचे किती हे विदारक चित्रण ! हे वाचून कोणाच्याही मनावर घृणा व कीव या दोहोंचीही दाट साय धरण्यासारखेच ! यात

आजच्या सुशिक्षित कुमारिकेभोवती नकळत पाश घालणारे धोके जरूर दर्शवले गेले, खरे, पण हे धोके एका नायिकेच्या मानाने अत्यधिक प्रमाणात आले, एवढे मात्र मला खूप वेळ वाटत राहिले बघ अलका. तरीपण एक गोष्ट निश्चित, प्रौढ कन्येला वेळेवारी लग्न करू दिले नाही, अगर तिच्या घरच्यांनी तिचे लग्न होऊच दिले नाही, तर तिच्या जीवनावर किती अतिरेकी दुष्परिणाम होऊ शकतील याची कल्पना देणारे चित्रण या कादंबरीत अवश्य आहे.

पाहिलेस ? विषय एकच. अगदी तोच. पण कथनाच्या दोन तऱ्हा किती वेगळ्या ? यातली कोठली मार्गदर्शनाची तऱ्हा तुला बरी वाटते, हे तुझे तूच ठरव. आपापल्या वृत्तीच्या आदेशानुसारच लेखक यातली कोणतीतरी एक पद्धत पसंत करतो. व दोन्हीही तऱ्हा सारख्याच प्रभावशाली ठरणाऱ्या आहेत कारण–' समाजात असे, असे या प्रकाराने घडते, ते विचारी वाचकांना दाखवावे, हेच उद्दिष्ट या दोन्ही तऱ्हांतून अभिप्रेत असते.

पण काहींचे म्हणणे याहून थोडे निराळे आढळते. ते म्हणतात,

> ' असे असे जगात घडते, घडतही असेल, हे तर खरेच, पण त्यातूनच त्या नायिकेने (अगर नायकाने) परिस्थितीला नमवून अगर जिंकून वाट कशी काढली, हेही लेखकाने समाजाला सांगावे, दाखवावे, म्हणजे त्यांतून, अशा परिस्थितीत जगणाऱ्या समाजातील व्यक्तींना मार्गदर्शनाची योग्य दिशा मिळेल ! तीही एक तिसरी मार्गदर्शनाची पद्धत आहेच की.'

आणि हे खोटे आहे का ? अलके, मला स्वतःला तर ही तिसरीच तऱ्हा अधिक पसंतीस येते. मी जर अशा नाडलेल्या अगर फसलेल्या कुमारिकेवर कादंबरी लिहिली तर तिचा निराश मृत्यू अगर इतका अधःपात हे न दाखवता ती नायिका त्या तसल्या महासमस्यांशी खंबीरपणे व मनस्वीपणे टक्कर देऊन त्यांतून सुरक्षितपणे कशी पार पडली हेच दाखवीन बघ ! कारण ? एकच. माझी कादंबरी अशा अनेक सालस नडलेल्या कुमारिका वाचणार. त्यांच्यापुढे मला नैराश्याचा, नाशाचा, आदर्श मांडावासा वाटत नाही तर प्रगतीचा, आशेचा संदेशच मला त्यातून द्यावासा वाटतो !

आणखीही एका वेगळ्या दृष्टिकोनाने याकडे पाहता येते अलका, कठीणच

आहे ते, तुला जमेल तर बघ, आपलं सांगून ठेवते. एकदा एका सामाजिक विषयावर मला वाटतं– आवारा मुले व त्या परिस्थितीला जबाबदार असलेले पालक असा काहीसा विषय घेऊन मी एक व्याख्यान दिले होते, ते ऐकून एक चलाख, बुद्धिमती गृहिणी म्हणाली–

> ' नुस्ते असे अनर्थ घडतात, व ते का घडतात, एवढेच सांगून हा विषय संपत नाही कधी !! हे असले अनर्थ होऊ नयेत, म्हणून काय करायला हवे, तेही तुम्ही सांगायला हवं होतं तर ते खरं मार्गदर्शन ! अपाय सांगणाऱ्यानं उपायही सांगायला नकोत का ?'

हा विचार अगदी नवासा व वेगळा, पण मला एकदम पटला ! एखाद्या रोगतज्ज्ञ डॉक्टराने पेशंटचे रोगनिदान फक्त करावे पण रोग मुक्त होण्याचे उपाय मात्र (स्वतःला माहीत असूनही) सांगू नये, त्यामुळे पेशंटची स्थिती किती अनुकंपनीय होईल ? सांग. सामाजिक समस्यांवर लेखन करणाऱ्या लेखकांची भूमिका वरील डॉक्टरसारखी असता कामा नये, समाजातले अपप्रकार दिसतात, त्याची कारणे तर लेखकाने जरूर विशद करावीच, पण त्याबरोबर हे अपप्रकार होऊ नयेत यासाठी आधी लोकांना काय करता येईल हे (त्याला सुचवता आल्यास) त्याने अवश्य कथानकांतून सुचवावे असेच माझे आता मत झाले आहे.

अर्थात अलका, गैरसमज करून घेऊ नकोस हं हे वाचून. मी, ही माझी मते तुला सांगितली ती केवळ वैचारिक दृष्टीने कादंबरीलेखन करण्याबद्दलचा तुझा दृष्टिकोन तयार व्हावा एवढ्यासाठीच ! पण, ' ही माझीच मते उत्तम, तीच श्रेष्ठ मतप्रणाली व तू तीच घ्यावीस ' असा माझा दुराग्रह बिलकूल नाही आहे बरे का ! तुझी लेखनाबाबतची धारणा, मते, वा कादंबरीचा दृष्टिकोन हया अगदी स्वतंत्र तुझ्या तूच ठरवण्याच्या बाबी आहेत, हे मी परत आवर्जून सांगते. फक्त मला इतकंच म्हणायचं आहे की, लेखकाचा दृष्टीकोन कसा हवा ? तर तो नितळ व निकोप हवा ! उदाहरणार्थ, अलके, एक बाब घेऊ. आज जगात स्वैराचाराची भडक उदाहरणे पुष्कळ दिसतात, कानी येतात. कुलीन कन्याजीवनातही पैशासाठी देहविक्रय करण्याची उदाहरणे शहरातून कितीतरी घडलेली आहेत तेव्हा वाङ्मया-

तूनही ती दिसावी हे साहजिकच. श्री. सुरेश खरे यांचे ' मला उत्तर हवंय् ' किंवा सरिता पदकी यांचे ' बाधा ' ही नाटके वाच. यात ही समस्या स्पष्टतेने व प्रखरतेने प्रकट झाली आहे. हे जग नुसते फुलांचे नव्हे तर काटचाचेही आहे, येथे चारित्र्यसंपन्नतेएवढीच कामवासनाही प्रभावी दिसते. त्याची ही भलीबुरी उदाहरणे लेखनास जरूर प्रेरणा देतात, पण एक लक्षात घे अलका, लेखकाने हे स्वैराचार, दंभ अनीतीचे चित्रण करणे गैर नव्हे– पण ' तीच आजच्या समाजाची गरज वा नवी धारणा आहे व स्वैराचारात तरी काय निंद्य आहे बाबा ?' असे समर्थन जेव्हा कादंबरीतून लेखक करू लागतो, तेव्हा मात्र त्या लेखकाचा दृष्टिकोन नितळ, निकोप राहिलेला नाही, असे खुशाल समजावे !! एका नामांकित वक्त्यांनी मला प्रश्न केला होता, तो आठवतो यावेळी. ते म्हणाले होते–

> ' अहो, समाजात काय गटारे किंवा गाळ नाहीच आहे काय ? मग ज्या वाईट गोष्टी समाजात तुम्ही नित्य पाहता, ज्या समाजात नांदत आहेत, त्या कादंबरीनाटकात आल्या तर बिघडले कुठं ?'

मान्य, मी कुठे नाही म्हणते ? माझे म्हणणे एवढेच, की, समाजात गाळ जरूर आहे, पण, सर्व कादंबरीवर त्याचाच लेप चढलेला असू नये, तर या गाळातून म्हणजेच दारिद्र्य, महागाईच्या किंवा चोरटचा मिळकतीच्या वा देहविक्रयाच्या पंकात– जी काही माणसे गळचाइतकी बुडालेली दिसताहेत त्यातूनच कोणी प्रयत्नशील व्यक्ती धडपड करून, परिस्थितीला जिंकून वर आली, व तिने इतरांनाही एक चांगला धडा घालून दिला, याचे चित्रण त्यात असावे ! म्हणजे यांही कादंबऱ्यांना मार्गदर्शनाचे एक वेगळे महत्त्व प्राप्त होईल ! विभावरी शिरूरकरांची ' बळी ' ही कादंबरी त्या दृष्टीनं अभ्यासनीय आहे.

अलका, लिहिण्याच्या ओघात सहजच आपण कादंबरी लेखनाच्या एका संकल्पित पण वेगळचा हेतूकडे वळलो आहोत. सामाजिक समस्यांकडे, समाजातील विषमता व अन्याय याकडे पाहून माझे मन चिडून पेटून उठते. आणखी मग, त्यातील एखाद्या बाबीबद्दलच कादंबरी लिहून सामाजिक जागृती करण्याचा हेतू मी मनी धरला आहे काय ? या लेखकाच्या प्रश्नाकडे !!

अलका यावर विवेचन करणे– तेही सोप्या शब्दात– हे बरंच कठीण आहे, जमेल तसं सांगते. पहिली याबावत लक्षात ठेवायचे ते हे, की समाजाचं रूप जसं कालानुरूप बदलतं, तशाच त्यातल्या समस्याही बदलतात, त्यांचा तोंडावळा निराळा होत जातो ! ही बदलत्या काळाची शिकवण व समाजातील व्यक्तींची आजची वागणूक यांचा तोल संभाळूनच लेखकाला आज समस्यात्मक लिखाण करावे लागेल ! सांग अलका, आज ७५ वर्षांपूर्वीचे हरिभाऊ आपटयांनी कळकळीने वर्णिलेले, बालविवाहाचे अगर बालविधवेचे यमूच्या केशवपनाचे प्रश्न उरले आहेत का समाजात ? वररेकरांनी पोटतिडकिने दर्शवलेले विधवाकुमारीचे प्रश्न कधीच कालाच्या पडद्याआड गेलेत, त्यांबद्दल जर कोणी लेखक आज लिहू पाहील तर तो शिळ्या कढीला ऊत आणण्यासारखा हास्यस्पद प्रकार ठरायचा. आणखी एक उदाहरण घे वाटल्यास ! २५-३० वर्षांपूर्वी अनूढ मातृत्त्व– अर्थात अविवाहित कन्येला मातृपद प्राप्त होण्याचे संकट इतके तीव्र स्वरूपाचे व सामाजिक संकट होते, की त्यावर नाटके व कादंबऱ्या या अनेक लिहिल्या गेल्याची उदाहरणे तुझ्या वाचनात आहेतच ? आज कोठे आहे या संकटातले भय ? ते त्या आधुनिक विचारांच्या कन्येलाही नाही, तिच्या प्रियकरालाही नाही ! या आजघडीच्या परिस्थितीत जर कुणी कुमारी मातेचा प्रश्न दुर्घट समस्यारूप मानून त्यावर कादंबरी लिहू पाहील तर तो विषय शिळा झालेला असल्याने कादंबरीतला 'चार्महीं' नष्टच होईल, हे उघडच नाही का ?

अर्थात् हे एक उदाहरण म्हणून घेतले. इतरही जुन्या स्त्री जीवनाच्या तेव्हाच्या समस्या अशाच कालबाह्य ठरू पाहताहेत. अलके. सांग, नको असलेल्या नवऱ्याचे दुःख आजच्या स्त्रीला सोसावे लागते का पहिल्यासारखे ? नाहीच कारण घटस्फोटाचा कायदा त्यांना उपकारक झाला आहे. जुन्याकाळी परित्यक्त स्त्रियांच्या दुर्दशेवरही पुष्कळ लिहिले गेले. आणि दुसरे लग्न करून सवत उरावर आणून ठेवण्याची करुण प्रकरणेही अनेक कादंबऱ्यांतून कळकळीने चित्रित झाली. आज मुळी प्रथम पत्नी असता नवरा दुसरे लग्नच कायद्याने करू शकत नाही ! मग, सांग, प्रश्नच बदलले ना आज स्त्रीजीवनाचे पुष्कळसे ?

पण हे प्रश्न बदलले असले तरी स्त्री जीवनाच्या समस्या आज खलासच झाल्या, असे थोडेच ? समाजाचा हा रंगमंच, काही व्यक्ती पडद्याआड गेल्या

तरी मोकळा कधीच राहत नाही, तेथे दुसऱ्या व्यक्ती लगेच येतात, तसेच झाले आहे. तूच बघ आज घटस्फोटित स्त्रीचे प्रश्न नव्याने उत्पन्न झाले आहेतच ना ? मुले असलेल्या घटस्फोटितांचीही पुनर्लग्ने लवकर जमत नाहीत ! बरे, काहींची लग्ने झाली, तरी या नव्या संसारात पहिल्या नवऱ्यांच्या मुलांचे जीवन कसे असते ? नवा नवरा या पोराना मायेने वागवून घेतोच, असे थोडेच ? तेथे स्त्रीचे मानसिक हाल होत असणारच ? त्यांची दखल काही कथातूनही घेतली जाऊ लागलेली आहे.

आज स्त्रीला आर्थिक स्वतंत्रता प्राप्त झाली– एकदम सत्य ! पण नोकरीनिमित्त पुष्कळदा पत्नीला महिनानुमहिने पतीपासून दूर राहावे लागते. या वियोगात दुसऱ्या एखाद्या स्त्रीशी पतीचे 'प्रेमसंधान' जमले तर कसे काय ? तू म्हणशील, 'काही झाले तरी आज तो नवरा दुसरे लग्न करू शकत नाही !! पण प्रेम सहवास करायला कोठलाही कायदा आड येत नाही अलका ! किंवा या उलट, स्त्रीच्या नोकरीच्या गावी पतीहून आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा पुरुष तिच्या निकट स्नेहवर्तुळात येणे व त्याकडे ती आकर्षित होणे हे अशक्यच का आहे ? विवाहितेच्या मनात पतीखेरीज इतर पुरुषाचे जबरदस्त आकर्षण उत्पन्न झाल्याची घटना आज अनेक कादंबरीतून वेग-वेगळ्या चेहऱ्याने समोर येत आहे उदा. अगदी ताजे उदाहरण आशा बगे यांच्या 'मनस्विनी' कादंबरीचे घे ! ही समस्या उपेक्षित मानण्याजोगी राहिली आहे का ? अरे, गृहिणी जिथे पतिनिष्ठ, संसारनिष्ठ आहे, तेथे-तरी एखादे 'समस्यारूप' सापडणार नाही अशी तुझी कल्पना असेल, तर तीही खोटीच ? आजचे वाढत्या, जाणत्या कुमारिकेचे जीवन जे घडत आहे ते, किंवा जाणत्या पुत्राच्या मनाची जी वेगवेगळ्या प्रकारची घडण होते आहे, ती, तरी मातापित्यांना सर्वस्वी मान्य होणारी थोडीच आहे ? आजच्या कुटुंबजीवनात अनेक प्रश्नचिन्हे स्त्रीसमोर उभी राहताहेत, त्याबद्दल तुला लिहायचे असेल तर आजकाल अशा कादंबऱ्या ज्या प्रसिद्ध होतात, त्यांचे वाचन तुला करायला हवे ! उदा. १९७८ च्या दिवाळी अंकांतली 'पडझड' ही ज्योत्स्ना देवधरांची कादंबरी जरूर तू वाचून बघ. आजच्या सुशिक्षित कुटुंबिनीची नवी दुःखे, नवे जीवन प्रश्न, यांचे त्यांत तुला उत्तम विवेचन आढळेल ! तसे म्हटले तर, असे आहे की, यांत वर्णित झालेली सारीच दुःखे एकवटून गृहिणीच्या वाट्यास आज येतात असे मात्र नाही व

सारेच संसार असे उद्ध्वस्त झालेलेही दिसत नाहीत तथापि कोणाच्याही संसारात यांतली कोठली दुर्दशा केव्हा उद्भवेल ते कसे सांगावे ?

आणि अलका, केवळ स्त्रीजीवनाच्याच नव्या समस्या आज उग्रप्रखर रूपाने विचारवंतांच्या समोर उभ्या आहेत का ? एक कुटुंब म्हटले, तरी त्यात पुरुषवर्गाच्या, कुमारकुमारिकांच्या जीवनाचेही प्रश्न तितकेच उग्र-कठोर रूप धारण करू लागलेले आहेत, जरा समाजजीवनाकडे तू निरीक्षकाच्या भूमिकेतून बघ म्हणजे तुला दिसेल की पुरुषवर्गापुढेही कठोर जीवनाच्या कटू समस्या आज उभ्या आहेतच. आर्थिक टंचाईचा महाप्रश्न आहे, मुलांच्या महाग शिक्षणाचे प्रश्न आहेतच– पण त्या शिक्षणसंस्थेतून मुलगा लौकर पदवीधर होऊन बाहेर पडेल की, मधे त्यांत अनेक विचित्र विक्षेप येतील ? हे सांगता येत नाही !' तरुण कन्या-पुत्रांच्या केवळ अंतर्जातीय नव्हे तर अंतर्धर्मीय विवाहाचे नवे प्रश्नचिन्ह वाकुल्या दाखवीत उभे आहे, इतकेच नव्हे तर वृद्ध आईवापापुढेही आज, सारे कर्ते मुलगे-सुना परदेशी जाऊन कायमचेच तेथले रहिवासी झाल्याने स्वतःचा उतार-वयातला थारा उडाल्याचे व आधार दूरावल्याचे– दिसायला सन्मान्य गोड चेहऱ्याचे, पण वृद्धांच्या काळजाला कळा लावणारे– संकट उभे आहे !! जयवंत दळवी याच्या 'संध्या छाया' नाटकांतून ते प्रभावीपणे व्यक्त झालेले आहेच ! शिवाय इटुकल्या संसाराची चिटुकली घरे' असण्याचा आजचा जमाना ! पण या आपल्या 'निवासांत' आपल्या वृद्ध मातापित्यांनाही राहायला जागा करून देण्याची सोय, जागेच्या अभावी गृहस्थ मंडळींना करता येत नाही व त्यासाठी त्यांना वृद्धाश्रमांत पोचवावे लागावे, ही समस्या संकटरूप नसली तरी जाणत्या सहृदय पुत्राच्या मनाला चटका लावणारी जरूर आहे याबद्दल मागे मी विवेचन केलेले आहेच, पाहिलंस ? किती या नव्या कौटुंबिक समस्या ? याची नीट पाहाणी करावी, त्याचे वारंवार मनन-चिंतन करावे, त्या समस्यांचे सत्यस्वरूप प्रत्यक्ष निरीक्षणाने जाणून घ्यावे व मगच यांपैकी कोठल्याही समस्येवर लिहायला घ्यावे असे मी म्हणेन. ही वैचारिकतेची पार्श्वभूमी तुझ्या मनात नीट तयार झाली, की, कर एकदम शुभारंभ समस्यात्मक कादंबरी लिहायला !

यांत आणखी एक महत्त्वाची बाब मला सुचवता येण्यासारखी आहे, तीही आताच सांगून टाकलेली बरी.

अलका, वर मी ज्या काही समस्या दर्शविल्या त्या कौटुंबिक होत्या, पण

समाजात काय फक्त कौटुंबिकच समस्या आहे का आज घडीला ? त्याहूनही महत्त्वाच्या अशा सामाजिक समस्याही आहेतच. अर्थात त्या पूर्वकाळीही होत्याच व त्यांबद्दल मागल्या पिढीतल्या लेखकांनीही आवर्जून कादंबऱ्या लिहिल्या आहेत. उदा. पु. य. देशपांडे यांनी 'बंधनाच्या पलीकडे' ह्या कादंबरीत वेश्याकन्येशी लग्न करणारा व त्यासाठी समाजनिंदा पत्करणारा एक नायक उभा केला आहे, हरीभाऊंनी तर केशवपनावर फार परिणामकारक अशी 'पण लक्षात कोण घेतो ?' ही कादंबरी लिहिली. 'विधवा कुमारी' कादंबरी लिहून वरेरकरांनी रूढी भंजक नायिकेचे एक ठसठशीत चित्र समाजासमोर उभे केले.

अलके, आज देवदासीच्या जीवनावर लिहिली गेलेली श्री. जयवंत दळवी याची 'महानंदा' कादंबरी वाचली आहेस का ? प्रेमलग्न करून नितळ-संसार करू इच्छिणारी एक ऋजू वेश्याकन्या यांत आहे व अखेर या इच्छेला तुडवून देवदासीचेच परंपरागत, घृणास्पद जीवन हिच्यावर तिच्या आप्ताकडूनच लादले जाते, याचे हे चित्रण अत्यंत प्रभावी व एक नव्या समस्येबद्दल वाचक मनात जागृती उत्पन्न करणारे आहे. थेट याच नमुन्याचे दुसरे म्हणजे दुसऱ्या टोकाचे– कथानक श्री. सुभाष भेंडे यांच्या 'जोगीण' या कादंबरीत आले आहे. केवळ धर्माभिमानी वडिलांच्या इच्छेसाठी यांतल्या ख्रिश्चन नायिकेने आपल्या तारुण्यसुलभ प्रेमभावनांचा व स्वतःच्या इच्छित सुखी संसाराचा होम केला आहे. व ऐन यौवनात ती 'नन्' होऊन चर्चमध्ये राहावयास गेली आहे. किती करुण तरीही उद्बोधक मानसचित्र आहे हे तिचे ? भारतीय ख्रिश्चन कुटुंबाची ही कथा, असली तरी काय झाले ? तरुणीचे कोवळे रसरशीत मन, प्रणयाकुलता वगैरे मनोजग चहूंकडे सारखेच ना ? या मानवी भूमिकेतून पाहिले की तिचे दुःख अंतराला भिडते व मन जागे होते व मग स्वतःच्या इच्छेसाठी अगर ध्येयासाठी आपल्या पाल्य कन्या-पुत्रांवर हे सक्तीने ब्रह्मचर्य वा संन्यस्त जीवन लादतात. त्याची सत्य उदाहरणे दृष्टीसमोर येतात; ती मनाला जागृत करणारीच. पु. ल. देशपांडे यांच्या अंमलदार नाटकांतली 'गीता' तुला आठवते ना ? अशीच बाल्य हरवलेली व येणाऱ्या यौवनाचा प्रसन्न बहर विसरलेली नायिका आहे ती ! वडीलधारी मंडळी आपली मतप्रणाली– मग ती सामाजिक असो वा राजकीय असो– स्वतःच्या कन्या-पुत्रांवर अगर शिष्यांवर लादून त्यांनाही

स्वतःचे अनुयायी बनवण्याचा हा प्रयत्न किती तरी तरुण मनांच्या सुखाचा बळी घेत असेल कोण जाणे ! अर्थात हे संकट समाजातल्या अनेक तरुण तरुणींच्या आयुष्यात येणारे नव्हे, मान्य. पण आजच्या नव्याने घडत असलेल्या समाज रचनेत अशाही दडपल्या गेलेल्या व्यक्तीचा एक वर्ग नजरेसमोर साकारू लागला आहे, त्याकडे मात्र ही गीता वाचकांचे लक्ष वेधू शकणारी आहे. अलके, तू माझी एक दीर्घकथा 'प्रीती फुलते पाषाणातून !' ही वाचली आहेस ना ? त्यांतही एका जैन धर्मगुरूंनी ऐन तारुण्यात प्रवेशू लागलेल्या आपल्या एका कोवळ्या गुणी शिष्याला जुलमाने संन्यासाची दीक्षा दिल्याची हकीगत आहे. तो 'सोहन' नायकही याच दुर्दैवाचा बळी आहे.

याहूनही वेगळ्या दृष्टीने लिहिली गेलेली व समाजाच्या एका अति उपेक्षित बाजूकडे सहृदय, जाणत्या माणसाचे लक्ष वेधून घेणारी अशीही काही पुस्तके आहेत; व ती मला आवडलेली आहेत. उदा. गो. नी. दांडेकर यांची 'आनंदवनभुवन' कादंबरी पाहा. या कादंबरीत महारोगाने ग्रस्त झालेले नायक–नायिका आहेत व अशाही लोकांचे जीवन आनंदमय व कार्यशील बनवणारे आणि त्यांसाठी एक मोठी संस्था काढणारे एक (प्रसिद्ध आमटे गुरुजीप्रमाणेच) ध्येयवादी गृहस्थही आहेत. 'महाश्वेता' ही सुमती क्षेत्रमाडे यांची कादंबरी. सर्वांगीण कोड फुटलेल्या नायिकेची आहे व ती केवळ सहानुभूतीने लिहिली गेली आहे असे नव्हे, तर जाणकार वैद्यकीय दृष्टीनेही त्यातले भलेबुरेपण स्पष्ट करणारी आहे !

जेव्हा अशा एखाद्या समस्येबद्दल तुला कादंबरी लिहायची इच्छा होईल, तेव्हा तू अगत्याने ती लिही. मात्र त्या समस्येचा सर्वांगीण अभ्यास करून मगच ती लिहायला घे, इतकेच माझे प्रेमाचे व मनापासूनचे सांगणे आहे.

* * *

तर अलके, समजले ना ? कादंबरी लेखनाचे उद्दिष्ट किती भिन्न प्रकारचे असू शकते ते ? दरेक या हेतूंकडे पाहण्याचे दृष्टिकोनही कसे वेगवेगळे असतात हेही आपण पाहिलेच. लेखकाचा कादंबरीलेखनाचा हेतू व त्याचा दृष्टिकोन कोणताही असो तो वाचकांच्या मनावर प्रभावीपणे व कुशलतेने बिंबवणे हेच कादंबरीचे खरे इप्सित ! कादंबरी संपवून खाली ठेवल्यावरही तो वाचकांच्या मनात कढईतल्या हलव्यांच्या दाण्याप्रमाणे घोळत राहावा


व त्यामुळे त्यांच्या मनातील विचारांना चालना, प्रेरणा मिळायला हवी, तरच ते कादंबरीलेखनाचे उच्च व अंतिम यश ! अशा कादंबऱ्या वाचकांच्या अवश्य मनास येतात.

होय अलका– शेवटी ही महत्त्वाची एक बाब सांगून हे पत्र– किंवा ही पत्रमाला पुरी करणार आहे, ती म्हणजे 'वाचकांची मनपसंती' ही लेखकाने नित्य ध्यानी बाळगण्यासारखी गोष्ट आहे. अग, आपल्या लेखनाचे खरे मर्म जाणणारे, योग्य चीज करणारे व गुणदोष ओळखणारे वाचकच तर असतात. आजच्या वाचकाची मनोभूमिकाही पूर्वीप्रमाणे साधीसुधी– काहीही वाचायला दिले तरी चालेल– अशी राहिलेली नाही आहे ! तो वाङ्मयप्रेमी रसिक तर प्रथमपासूनच आहे पण साहित्यातील बरे-वाईटपण जाणणारा चोखंदळपणा आज त्यांच्या ठायी अतिशय वर्धित झालेला आहे, तो उत्कृष्ट असा समाजनिरीक्षक असून विवेकशील व स्वतंत्र विचारसरणीचा नागरिकही आहे, त्यालाही सत्प्रेरणा अवश्य आहेत व म्हणून वाङ्मयानंदाचे नितळ लेणे, त्याला आजच्या ललित साहित्यांतून जरूर अपेक्षित असते हे विसरून कसे चालेल ? नव्या लेखकांनी तर आदरून ही जाण ठेवूनच ललित कथा-कादंबरी हाती घ्यावी; असे मी म्हणेन !


कादंबरीलेखन हा विषय फार व्याप्तीचा, व त्यात सांगण्या-सुचवण्याजोगेही विषय अनंत, त्या दृष्टीने आतापर्यंत मला सुचलेले, अनुभवास आलेले, वा प्रतीत झालेले बहुतेक सारे विचार व त्यांचे विवेचन मी केलेले आहे अलका ! ह्याने तुझ्या कथा-कादंबरीलेखनात जर तुला थोडेबहुत मार्गदर्शन झाले, काही नवे शिकता आले, तर ही पत्रे लिहिल्याचे खरे चीज झालेच ! तर लौकरच तू एक प्रथितयश लेखिका व्हावेस व तुझ्याकडून एकाहून एक उत्तम कथा-कादंबऱ्या निर्माण व्हाव्या हीच आमची मनिषा– आणि हाच तुला आमचा आशीर्वाद माय डिअर अलका !'

अच्छा ! आता खरंच निरोप घेते अं ! –

तुझी
सौ. ताई.




REFBK-0022703



अलका तू असं लिही.

- लेखनाची पूर्व तयारी
- लघुकथा कशा लिहाव्या
- कादंबरी लेखन

प्रत्येक लेखक केव्हातरी नवोदित असतो. लेखक व्हायचे असेल तर साधना करावी लागते, मेहनत घ्यावी लागते व तीही ज्येष्ठांच्या मार्गदर्शनानेच. त्यातूनच सिद्धहस्त लेखक घडत असतो. तुम्हाला लेखक लेखिका व्हायचे असेल व त्यात अत्युच्च यश मिळवायचे असेल तर हे पुस्तके तुम्ही एकाद्या पाठपुस्तकाप्रमाणे किंवा धार्मिक पोथीप्रमाणे वाचले पाहिजे व त्याचे मनन केले पाहिजे.

सौ. मालती दांडेकर लिहायला लागल्या त्याला चाळीस वर्षे झाली आहेत. त्यांचे या चाळीस वर्षातील स्वतः घेतलेल्या अनुभवाचे बोल या पुस्तकात तुम्हाला वाचायला मिळतील. हे पुस्तक म्हणजे लेखनाच्या क्षेत्रात पराक्रम गाजवण्यासाठी तुमच्यासाठी उघडलेली संधी आहे. भविष्यकाळातील ज्ञानपीठ पारितोषक विजेता, 'अलका तू असं लिही' या पुस्तकानेच मला लेखक बनवले असे सांगणार आहे !

वरदा बुक्स
'सेनापती बापट मार्ग, पुणे १६